# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०८/ २०१७** **दिनांक २०.०८.२०१७**

**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी १०.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २०.०८.२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत, इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ २६४८/ २०१७, दिनांक १२ ऑगस्ट, २०१७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा रविवार दिनांक २०.०८.२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष
०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य
०४. मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य
०५. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
०६. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
०७. मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग, सदस्य व यांनी दूरध्वनीद्वारे कळविले होते.

तसेच मा.डॉ.मनीषा कायंदे, सदस्या, मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर- सदस्य व मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर- सदस्य यांनी कोणतीही पुर्व सुचना देता सभेसाठी अनुपस्थित होते . याची नोंद घेऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर सकाळी १०.३० वाजता मा.अध्यक्ष महोदय यांनी सभेचे कामकाज चालू केले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक २५.०७.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६७६** दिनांक २५.०७.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र.५२५-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, मुंबईवरुन शिर्डीकडे येणाऱ्या पालखी/ पदयात्री यांचे सोयीसाठी पालखीथांबा उभारणेकामी अर्जदार यांच्या जमीनीचा उपयोग होणार असल्यामुळे, श्रीमती रिना रत्नेशचंद जैन, शहापुर यांची मौजे लाहे, ता.शहापुर, जि.ठाणे येथील गट नं.४९१ मधील ०.४० आर जमीन विनामोबदला स्विकारणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

यावर सविस्तर चर्चा होऊन, मुंबईवरुन शिर्डीकडे येणाऱ्या पालखी/ पदयात्री यांचे सोयीसाठी पालखीथांबा उभारणेकामी अर्जदार यांच्या जमीनीचा उपयोग होणार असल्यामुळे, श्रीमती रिना रत्नेशचंद जैन, शहापुर यांची मौजे लाहे, ता.शहापुर, जि.ठाणे येथील गट नं.४९१ मधील ०.४० आर जमीन विनामोबदला स्विकारणेस मान्यता देण्यात आली.

**तसेच सदरहू देणगीदार या जमीनीमध्ये स्वखर्चाने भर टाकून रस्त्याच्या लेव्हलपर्यंत आणून तेथे पालखी थांबा उभारण्यासाठी संस्थानला विकसित करुन देणार आहेत, त्याचप्रमाणे दानपत्राचे नोंदणी शुल्क व तत्सम संबंधीत इतर खर्च स्वत: करणार असल्याने, त्यांचे मागणीप्रमाणे श्री.अग्रवाल यांच्या आई-वडीलांचे स्मरणार्थ या पालखी थांब्यास नाव देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**(२) निर्णय क्र.५२६-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, मुंबईवरुन शिर्डीकडे येणाऱ्या पालखी/ पदयात्री यांचे सोयीसाठी पालखीथांबा उभारणेकामी अर्जदार यांच्या जमीनीचा उपयोग होणार असल्यामुळे, श्री.काशिनाथ गोविंद पाटील, रा.कोपरी, चंदनसार, ता.वसई, जि.ठाणे यांची मौजे कसारा, ता.शहापुर, जि.ठाणे येथील गट नं.३२ हिस्सा २ मधील क्षेत्र ०.३० आर जमीन विनामोबदला स्विकारणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, मुंबईवरुन शिर्डीकडे येणाऱ्या पालखी/ पदयात्री यांचे सोयीसाठी पालखीथांबा उभारणेकामी अर्जदार यांच्या जमीनीचा उपयोग होणार असल्यामुळे, श्री.काशिनाथ गोविंद पाटील, रा.कोपरी, चंदनसार, ता.वसई, जि.ठाणे यांची मौजे कसारा, ता.शहापुर, जि.ठाणे येथील गट नं.३२ हिस्सा २ मधील क्षेत्र ०.३० आर जमीन विनामोबदला **दानपत्राद्वारे स्विकारणेस तसेच त्यासाठी दानपत्र नोंदणी व इतर अनुषंगीकयेणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**(३) निर्णय क्र.५३४-**

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, उपरोक्त प्रस्तावामधील ब तक्त्यामध्ये नमूद केलेल्या ०८ रस्त्यांपैकी चार रस्त्यांची कामे शिर्डी नगरपंचायतीने पुर्ण केलेली असल्यामुळे, ती वगळता इतर (१) १२ चारी रस्ता (स्वागत कक्ष ते नांदूर्खी शीव रस्ता १२ चारी बंदीस्त करणे), (२) पुखराज लोढा ते पिंपळवाडी रस्ता, (३) रज्जाक शेख लगत पुनमनगर गल्ली क्र.०१ ते रावजी कोंडाजी कोते यांचे घरापर्यंत रस्ता व (४) हॉटेल श्रध्दापार्क ते पुखराज लोढा- १२ चारी इनामवाडी हे अस्तित्वातील ०४ रस्ते संस्थानमार्फत विकसीत करणेत यावे. तसेच प्रस्तावामधील क तक्त्यामध्ये नमुद केलेले ०६ रस्ते भूसंपादन करुन विकसीत करणेकरीता शिर्डी नगरपंचायत यांचेमार्फत सविस्तर अंदाजपत्रक शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रमाणीत करुन घेऊन, शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, उपरोक्त प्रस्तावामधील ब तक्त्यामध्ये नमूद केलेल्या ०८ रस्ते सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत विकसीत करणेस विधी व न्याय विभागाने मान्यता दिलेली आहे. परंतु आता, या रस्त्यापैकी ४ रस्त्यांची कामे शिर्डी नगरपंचायतीने पुर्ण केलेली असल्यामुळे, ती वगळता इतर (१) १२ चारी रस्ता (स्वागत कक्ष ते नांदूर्खी शीव रस्ता १२ चारी बंदीस्त करणे), (२) पुखराज लोढा ते पिंपळवाडी रस्ता, (३) रज्जाक शेख लगत पुनमनगर गल्ली क्र.०१ ते रावजी कोंडाजी कोते यांचे घरापर्यंत रस्ता व (४) हॉटेल श्रध्दापार्क ते पुखराज लोढा- १२ चारी इनामवाडी हे अस्तित्वातील ०४ रस्ते संस्थानमार्फत विकसीत करणेत यावे.**

**चारी क्र.१२ बंदीस्त न करणेसाठी स्थानिक शेतकऱ्यांचे निवेदन प्राप्त झालेले आहे. याबाबत शिर्डी नगरपंचायत यांनी निर्णय घ्यावा, तद्नंतर सदरहू रस्ता विकसीत करणेत यावा.**

**त्याचप्रमाणे प्रस्तावामधील क तक्त्यामध्ये नमुद केलेले ६ रस्ते भुसंपादन करुन विकसीत करणेकामी बराचसा कालावधी लागणार असल्यामुळे, प्रथमत: सदरहू रस्ते भुसंपादन करणेकामी आवश्यक असणारा निधी संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्यात यावा व भुसंपादन प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर ते रस्ते विकसीत करणेसाठीच्या निधीचा प्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा. यासाठी अधिनियमातील तरतूदीनुसार छाननी समितीच्या पुर्वपरवानगीने, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा.**

**तसेच नगर-मनमाड रस्त्यापासून पश्चिमेकडे चारी क्र.११ वरुन हेलीपॅडकडे जाणारा रस्ता विकसीत करणेत आला आहे. त्याप्रमाणे नगर-मनमाड रस्त्यापासून पुर्वेकडे जाणारा चारी क्र.११ सन-न-सॅण्ड हॉटेलपर्यंत बंदीस्त करुन रस्ता विकसीत करणेत यावा.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**(४) निर्णय क्र.६५४-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामधील धार्मिक कार्यक्रमांमध्ये प.पू.गंगागिरीजी महाराज अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करणेत यावे व या सप्ताहासाठी देहू, आळंदी, पंढरपुर अशा ठिकाणच्या वारकरी सांप्रदायांनाही बोलविणेत यावे, असे ठरले. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये प.पू.गंगागिरीजी महाराज अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करणेत यावे. परंतु हा सप्ताह आयोजनामध्ये संस्थानची जबाबदारी, भूमिका व ग्रामस्थांचा सहभाग याबाबत, शिर्डी ग्रामस्थांबरोबर सविस्तर चर्चा करावी, असे ठरले.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०२** **दिनांक ०९.०८.२०१७ रोजी झालेल्या झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.६७७** दिनांक ०९.०८.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **साई धर्मशाळा व साईआश्रम भक्तनिवास विभागासाठी पेस्ट कंट्रोल व रोडंन्ट कंट्रोल, फॉगिंग ट्रिटमेंट व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी कामाचा कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम- (१) १४/२ घ- भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्ती काम किंवा उपाययोजना हाती घेणे. (२) पोट कलम (१) (ख) भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृह बांधणे व त्यांची देखभाल करणे.

व्यवस्थापन समितीचा ठराव:- दि.१३/०७/२०१७ रोजीचे मा.उपसमितीचे सभेतिल विषय क्र. ६ चे निर्णया नुसार साई धर्मशाळा व साई आश्रम भक्तनिवास विभागांसाठी पेस्ट कंट्रोल व रोडंन्ट कंट्रोल, फॉगिंग ट्रिटमेंट व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी करणे कामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये किटक नाशक फवारणी (एकुण सहा फवारणी करिता) S & R Pest control Services Nashik व फॉगींग ट्रिटमेंट (धुरीकरण) प्रतिफवारणी १५ दिवसासाठी एक (महिन्यातुन २ फवारणी असे एकुण २४ फवारणी) आणि डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (जुन ते ऑक्टोबर या कालावधीसाठी महिन्यातु २ फवारणी असे एकुण १० फवारणी) करणेकामी Pest Control M.Walshe, Mumbai यांचे निम्नतम दर प्राप्त झालेले असून सदरहु दोन्हीही निम्नतम दरधारक आजचे उपसमितीचे सभेसमोर चर्चा करणेसाठी उपस्थित होते.त्यांनी दर कमी करणेस असमर्थतता दर्शविली व उपरोक्त सर्व कामी एकाच ठेकेदारास दिल्यासच आम्ही काम करण्यास तयार आहोत, असे सांगितले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, S & R Pest control Services Nashik यांनी किटक नाशक फवारणीकामी (एकुण सहा फवारणी) प्रति क्वे.फुट दिलेल्या दराचे विवरण (केमीकल खर्च, मजुरी इ.) त्यांचेकडुन लेखी स्वरुपात घेण्यात यावे. तो पर्यंत सदरहु विषय स्थगित ठेवणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

प्रस्तावनाः- सन २०१७-१८ करीता (दि.०१/०४/२०१७ ते ३१/०३/२०१८) अखेर साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल, रोडेंट कंट्रोल, फॉगींग टिंट्रमेट (धुरीकरण) व डास आळी प्रतीबंधक औषध फवारणी (Anti Larval) करणेकामी, गुणवत्ता व दर यांच्या आधारे, विहीत पध्दतीने ई– निविदा व त्याकामी साई आश्रम भक्तनिवास यांचा रु. ९,७३,९५०.५० व साई धर्मशाळा यांचा रु. ५,३२,९१९.३३ इतका खर्च असा एकुण रु.१५,०६,८६९.८३ पुर्णांकिंत रक्कम रु. १५,०७,०००/- मात्र (अक्षरी रु. पंधरा लाख सात हजार मात्र) येणा-या वार्षिक कामाचे खर्चास मान्यता सदर्भ क्र. ०१ अन्वये मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेली आहे.

सदर कामाकरीता संदर्भ क्र.०२ नुसार जाहिरात व ई-निविदा मसुद्यास मान्यता घेऊन, जनसंपर्क विभागा मार्फत दि.१२/०५/२०१७ रोजी दैनिक वर्तमानपत्रात, माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे संकेतस्थळ व ई.डी.पी विभागामार्फत महाराष्ट्र राज्य शासनाच्या संकेतस्थळावर ई-निविदा जाहिरात करणेत आली. जाहीरातीनुसार ७ निविदाधारकांनी निविदा प्रक्रीयेमध्ये सहभाग घेऊन ऑनलाईन ७ ई-निविदा कार्यालयीन वेळेपूर्वी सादर केले असलेबाबत ई.डी.पी विभागाने कळविले आहे.तसेच निविदाधारकांनी इकडील विभागाकडे कागदपत्रांच्या हार्ड कॉपीचे ७ लिफाफे वेळेत सादर केलेले आहेत.

**प्रस्ताव:-** उपरोक्त प्राप्त निविदाधारकांचे तांत्रीक निविदा दि.०७/०६/२०१७ रोजीच्याखरेदी समिती समोर उघडण्यात येऊन, तांत्रिक कागदपत्रांचा छाननी तक्ता तयार करण्यात येऊन लेखाशाखा विभागामार्फत तपासून घेण्यात आला आहे. तांत्रिक बीड मध्ये ७ पैकी ३ निविदाधारक पात्र झाले आहेत.

तांत्रिक बीडमध्ये पात्र झालेल्या तीनही निविदाधारकांचे वाणिज्यिक बीड (प्राईज बीड) खरेदी समिती व निविदाधारक यांचे समक्ष दि.१७/०६/२०१७ रोजी उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ. नं. | औषध फवारणी तपशील | KHFM Hospitality & Facility Management Services (P) Ltd, Andheri (E)(1) | | Pest Control M.Walshe, Mumbai (2) | | S & R Pest control Servicrs, Nashik (3) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (सर्व समावेशक करासह) | | (सर्व समावेशक करासह) | | (सर्व समावेशक करासह) | |
| | | प्र.स्क्वे.फुट रुपये पैसे | एकूण रक्कम रुपये पैसे | प्र.स्क्वे.फुट रुपये पैसे | एकूण रक्कम रुपये पैसे | प्र.स्क्वे.फुट रुपये पैसे | एकूण रक्कम रुपये पैसे |
| १ | किटक नाशक फवारणी (एकूणसहा फवारणी करिता) | | | | | | |
| | साईआश्रम भक्तनिवास एकूण क्षेत्रफळ- ३,४९,७३५ चौ.फुट | १.९७ | ६,८८,९७७.९५ | २.१० | ७,३४,४४३.५० | **०.४५** | १,५७,३८०.७५ |
| | साई धर्मशाळा एकुण क्षेत्रफळ १,५७,९८२.३२ चौ.फुट | १.४३ | २,२५,९१४.७२ | १.५० | २,३६,९७३.४८ | **०.५४** | ८५,३१०.४५ |
| २ | फॉगींग ट्रिटमेन्ट (धुरीकरण) प्रतिफवारणी १५ दिवसासाठी एक (महिन्यातुन २ फवारणी असे एकूण २४ फवारणी ) | | | | | | |
| | साईआश्रम भक्तनिवास एकुण क्षेत्रफळ- ४,१८,२२० चौ.फुट | ६,२००/- | १,४८,८००/- | **१,४००/-** | ३३,६००/- | ११,०००/- | २,६४,०००/- |
| | साईधर्मशाळा एकुण क्षेत्रफळ ४,८७,६११ चौ.फुट | ३,५००/- | ८४,०००/- | **१,४००/-** | ३३,६००/- | ११,०००/- | २,६४,०००/- |
| ३ | डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी (जुन ते ऑक्टोबर या कालावधीसाठी महिन्यातुन २ फवारणी असे एकुण १० फवारणी ) | | | | | | |
| | साईआश्रम भक्तनिवास एकुण क्षेत्रफळ ४,१८,२२० चौ.फुट | ३,५००/- | ३५,०००/- | **१,२००/-** | १२,०००/- | ९,०००/- | ९०,०००/- |
| | साईधर्मशाळा एकुण क्षेत्रफळ - ४,८७,६११चौ.फुट | २,६००/- | २६,०००/- | **१,२००/-** | १२,०००/- | ९,०००/- | ९०,०००/- |
| अ | एकूण साईआश्रम भक्तनिवास | | ८,७२,७७७.९५ | | ७,८०,०४३.५० | | ५,११,३८०.७५ |
| ब | एकूण साईधर्मशाळा | | ३,३५,९१४.७२ | | २,८२,५७३.४८ | | ४,३९,३१०.४५ |
| | एकूण अ+ ब | | १२,०८,६९२,६७ | | १०,६२,६१६.९८ | | **९,५०,६९१.२०** |

**छाननी करुन अनुमानः-** महाराष्ट्र शासनाने पारीत केलेला अधिनियम व मा. व्यवस्थापन समितीचा संमत ठरावानुसार साई धर्मशाळा व साई आश्रम भक्तनिवास याठिकाणी पेस्ट कंट्रोल व रोडंन्ट कंट्रोल, फॉगिग ट्रिटमेन्ट व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी करता येईल.

विभागाचे सुस्पष्ट मत/अभिप्रायः- उपरोक्त तीनही निविदाधारकांचे ई-निविदेव्दारे प्राप्त झालेले वाणिज्यिक बीड (प्राइज बीड) दि.१७/०६/२०१७ रोजी मा.खरेदी समिती सभेसमोर उघडणेत येऊन, उपरोक्त दर्शविलेप्रमाणे तुलनात्मक तक्त्याचा विचार करता S & R Pest control Services Nashik यांचे एकत्रित

पेस्ट् कंट्रोल करिताचे दर न्युनतम आहेत व Pest Control M.Walshe, Mumbai यांचे धुरीकरण(फॉगिंग ट्रिटमेन्टस) व डास आळी प्रतिबधंक फवारणी करिताचे दर न्युनतम आलेले आहेत.

दिनांक १३/०७/२०१७ रोजी चे मा.उपसमितीचे सभेत S & R Pest control Services Nashik व Pest Control M.Walshe, Mumbai यांचे प्रतिनीधी उपस्थित होते. त्यांचेशी झालेल्या चर्चेनुसार दोन्ही न्युनतम धारकांनी त्यांचे म्हणणे लिखीत स्वरुपात दिलेले असुन त्यांचा तपशिल खालील प्रमाणे –

S & R Pest control Services Nashik यांनी दि.१५/०७/२०१७ रोजीचे ई– मेल मध्ये रेट ॲनेलिसीचा तपशिल दिलेला आहे.

| साईआश्रम भक्तनिवास | साईधर्मशाळा |
|---|---|
| **0.45 Paise** | **0.54 Paise** |
| **1. 0.15 Paise –Labour** | **1. 0.15 Paise –Labour** |
| **2. 0.15 Paise – Chemical** | **2. 0.15 Paise – Chemical** |
| **3. 0.09 Paise – Taxes** | **3. 0.10 Paise – Taxes** |
| **4. 0.06 Paise O/H & Profit** | **4. 0.14 Paise O/H & Profit** |
| 0.45 paise | 0.54 Paise |

We assure you that if the work is awarded to us, it will be carried out to the utmost satisfaction.

Note– We would like to clear that it the entire scope of work with Fogging & Antilarva is awarded to us than these rates would be valid.

त्यानुसार एकुण वार्षिक खर्च रु. ९,५०,६९१.२०/- इतका होणार आहे.

दि.१७/०६/२०१७ रोजीचे खरेदी समिती व पात्र निविदाधारकांचे समक्ष प्राईज बीड उघडण्यात आले त्यानंतर साई धर्मशाळा यांच्याकडील दि. १८/०७/२०१७ चे मंजुर टिपणी वरील मा. मुख्य लेखाधिकारी तथा प्र. अधिकारी यांचे अभिप्राय नुसार" मे S & R Pest control Services Nashik यांचे दर निवेदेनुसार न्युनतम म्हणजे रु. ९,५०,६९१.२०/- असे एकत्रीत किटक नाशक फवारणी, फॉगिग ट्रिटमेन्ट व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी, इत्यादी साठी आहेत. त्यामुळे न्युनतम दर धारकास कार्यारंभ आदेश देणे योग्य राहील असे मत आहे." अशी शिफारस केलेली आहे.

तरी मे. S & R Pest control Services Nashik यांचे एकुण वार्षिक दर निविदेनुसार न्युमतम म्हणजे रु. ९,५०,६९१.२० असे एकत्रित पेस्ट कंट्रोल व रोडंट कंट्रोल, फॉगिग ट्रिटमेन्ट व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी इत्यादिसाठी न्युनतम दरधारकास कार्यारंभ आदेश देण्याचे मान्यतेसाठीचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत शिफारस करणेसाठी सदरचा विषय मा.उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर .

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साई धर्मशाळा व साईआश्रम भक्तनिवास विभागासाठी करावयाची पेस्ट कंट्रोल व रोडंन्ट कंट्रोल, फॉगिंग ट्रिटमेंट व डास आळी प्रतिबंधक औषध फवारणी ही सर्व कामे एकाच ठेकेदारास द्यावी, अशी संबंधीत ठेकेदारांची मागणी असल्यामुळे या कामांसाठी ई-निविदा प्रक्रियेद्वारे एकत्रित निम्नतम दरधारक S & R Pest control Servicrs, Nashik यांचे रु.९,५०,६९१.२० मात्र वार्षिक दर स्विकारणेत यावेत व त्यांना प्रायोगिक तत्वावर २ औषध फवारण्यांसाठी कार्यादेश देण्यात यावा. २ औषध फवारण्यांमध्ये त्यांचे काम समाधानकारक असल्यास, त्यांना पुढील कालावधीसाठीचा कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम धर्मशाळा)

---

०२ **संस्थान कर्मचारी निवासस्थान साईनगर, समर्पण व साईध्यान नं.०१ व ०२ इमारतींचे आतील व बाहेरील रंगकाम करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि२५/०२/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र. ९१ खालीलप्रमाणे झालेला आहे.

*“..यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचारी निवासस्थान साईनगर, समर्पण व साईध्यान नं.०१ व ०२ इमारतीचे आतील व बाहेरील रंगकाम करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.”*

**प्रस्तावना**: उपरोक्त मान्यतेनुसार साईनगर, समर्पण व साईध्यान नं.०१ व ०२ इमारतीचे आतील व बाहेरील रंगकाम करणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत रु.४१,७६,२२०/- मात्र इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार ई-निविदा सूचना वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करुन दि.१५/०६/२०१७ अखेर पर्यंत ई-निविदा अपलोड करणेची मुदत देणेत येऊन, दि.१७/०६/२०१७ रोजी पर्यंत तांत्रीक माहितीचा लिफाफा क्र.०१ (Technical bid) सादर करणेची मुदत देणेत आली होती. सदरचे मुदतीत एकुण ०८ निविदा धारकांनी ई-निविदा अपलोड केल्या होत्या. सदरच्या ई-निविदेचा लिफाफा क्र.०१ (Technical bid) दि.२८/०६/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेत उघडणेत आला. त्यांचा छाननी अहवाल तयार केला असता, त्यामध्ये तिन ठेकेदार पात्र झाले आहे. सदरचे पात्र ठेकेदारांचे ई-निविदेचा लिफाफा क्र. ०२ (Commercial bid) दि.१२/०७/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of bidders | Tender Coated Amount | Remark |
|---|---|---|---|
| **01.** | **C 4 Infrastructures Pvt. Ltd., Nashik** | **Rs.36,93,574.95** | **L-1** |
| 02. | M/s. R. L. Bhutada, Kopargaon | Rs.43,32,050.58 | - |
| 03. | Sai Enterprises, Aurangabad | Rs.48,91646.80 | - |

**प्रस्ताव:** तरी विषयांकीत कामासाठी वरीलप्रमाणे प्राप्त झोलेले दरामध्ये ठेकेदार C 4 Infrastructures Pvt. Ltd., Nashik यांनी देऊ केलेले पुर्णांकीत दर रू.३६,९३,५७५/- मात्र निम्नतम स्वरुपाचे आहेत. तरी त्यांचे दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी मा. उपसमितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**संस्थान कर्मचारी निवासस्थान साईनगर, समर्पण व साईध्यान नं.०१ व ०२ इमारतींचे आतील व बाहेरील रंगकाम करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रकियेमधील निम्नतम दरधारक C 4 Infrastructures Pvt. Ltd., Nashik हे आजचे उपसमिती सभेसमोर त्यांनी दिलेल्या दरांवर चर्चा करणेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेबरोबर दरांबाबत चर्चा केली असता, चर्चेअंती त्यांनी सदरहूकामी रु.३५,००,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचारी निवासस्थान साईनगर, समर्पण व साईध्यान नं.०१ व ०२ इमारतींचे आतील व बाहेरील रंगकाम करणेकामी C4 Infrastructures Pvt. Ltd., Nashik यांचे रु.३५,००,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

०३ **श्री साईनाथ रुग्णालयातील 4 Body Mortuary Cabinet Buyback करुन नवीन 6 Body Mortuary Cabinet खरेदी करणेकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

दि.२७/०४/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील विषय नं. ३३ निर्णय क्र. ३७६ अन्वये 4 Body Mortuary Cabinet Buyback करुन नवीन 6 Body Mortuary Cabinet विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रु.५,६८,१२५/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.२२/०८/२०१३ अखेर ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यास अनुसरुन प्राप्त झालेल्या ई-निविदा Digital Signature Certificate ची मुदत संपुष्टात आल्यामुळे Open होऊ शकल्या नाहीत.

त्यानंतर सदरचे खरेदीकामी पुन्हा Re-Schedule करण्यात यावे असे माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दि.२३/०८/२०१३ रोजीची मंजूर टिपणीअन्वये औषध भांडार विभागास कळविण्यात आलेले होते. त्यानुसार पुन्हा तारखा निश्चित करण्यात येऊन दि.२३/०९/२०१३ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतू IT विभागाकडून Digital Signature Certificate वेळेत तयार न झाल्यामुळे सदर ई - निविदा संकेत स्थळावर प्रसिद्ध होऊ शकली नाही. त्यामुळे पुन्हा सुधारीत तारखा देऊन त्याप्रमाणे IT विभागाकडून www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर निविदा देण्यात येऊन दि.०९/१०/२०१३ अखेर बंद होणार होत्या परंतू IT विभागाकडून दि. ०२/१०/२०१३ अखेर अशी तारीख झाल्यामुळे दि०२/१०/२०१३ रोजीच

संकेत स्थळावरुन निविदा बंद झाल्या होत्या. त्यामुळे ब-याच निविदाधरकांना निविदा पाहून देखील निविदा सादर करता आल्या नाहीत. सदरचे खरेदीकामी पुन्हा फेर ई– निविदा मागविणेकामी संस्थानच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमानपत्रात तसेच www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर फेर जाहिरात देण्यात येऊन दि.३०/११/२०१३ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदरचे खरेदीकामी तीन वेळेस जाहिरात देण्यात आली होती. त्यामुळे सद्यपरिस्थितीत प्रत्येक मशिनरी उपकरणांची काही ठिकाणी दोन तर काही ठिकाणी तीन पेक्षा जास्त निविदा प्राप्त झाल्या आहे, त्यामुळे आहे त्या प्राप्त कमर्शियल निविदा मा.त्रिसदस्य समिती सभेपुढे समक्ष उघडून त्यावर निर्णय व्हावा असा प्रस्ताव दि. १२/०६/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर दि. १२/०६/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र. ४६९ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील मशिनरी/ उपकरणे/ इन्स्ट्रुमेंट/ कन्झुमेबल स्पेअर पार्ट खरेदीकामी मागविणेत आलेल्या ई – निविदा मागील आर्थिक वर्षातील असल्यामुळे व त्या प्राप्त होऊन सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झालेला असल्यामुळे सदर निविदा ऑनलाईन बंद झालेल्या आहेत. त्यामुळे आजचे सभेमध्ये या निविदा उघडू शकल्या नाही व चर्चेसाठी बोलविणेत आलेल्या निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये वेगवेगळया सात प्रकारच्या साहित्यांची खरेदीबाबत उल्लेख आहे. त्यापैकी रु. १० लाख मात्रपेक्षा कमी खर्च येणारे व त्यापेक्षा जास्त खर्च येणा-या साहित्यांची विभागणी करणेत येऊन, नवीन प्रस्ताव तयार करणेत यावा आणि वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करणेत येऊन, नवीन प्रस्ताव तयार करणेत यावा आणि वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करणेत येऊन निविदा/ ई– निविदांची मागणी करणेत यावी असे ठरले आहे. तसेच यापुढे हॉस्पिटल साहित्य खरेदीकामी चर्चा/ वाटाघाटी होणार नाहीत, निम्नतम दरधारकांस पुरवठा आदेश देण्यात येईल, याकरिता अंदाजे दर देण्यात यावे, याबाबतचा निविदेमध्ये स्पष्ट उल्लेख करावा, असे ठरले होते.

त्यानुसार 4 Body Mortuary Cabinet Buyback करुन नवीन 6 Body Mortuary Cabinet खरेदीकामी वर्तमान पत्रात देऊन निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२३/०९/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे तसेच खरेदीकामी कमीत-कमी तीन निविदा आवश्यक असल्यामुळे वरील खरेदीकामी पुन्हा फेरनिविदा मागविण्याच्या प्रस्तावास दि.०७/१०/२०१४ रोजीच्या मंजूर टिप्पणीन्वये मान्यता घेऊन दि.२०/०२/२०१५ अखेर ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या.

परंतु तिस-यांदा दिलेल्या फेर जाहिरातीस अनुसरुन देखील एकच निविदा प्राप्त झालेली असल्यामुळे सदरचे खरेदीकामी दुस-यांदा दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या दोन निविदा अशा एकूण ०३ सिलबंद तांत्रिक निविदा मा. उपसमिती सभेपुढे संबंधीत निविदा धारकांचे समक्ष उघडून निर्णय घेणेकामीचा प्रस्ताव दि.२७/१०/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यात आला होता, त्यावर निर्णय क्र.४०२ अन्वये सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील 4 Body Mortuary Cabinet Buyback करुन नवीन 6 Body Mortuary Cabinet खरेदीकामी तिस-या वेळेस ई-निविदांची मागणी करुनही एकच निविदा प्राप्त झालेली असल्यामुळे ही निविदा उघडणेत येऊन, त्यामधील दर स्विकारणे क्रमप्राप्त आहे, परंतु स्पर्धात्मक दर मिळविणेकरीता मागील निविदांचा विचार करता येऊ शकतो का, याची खात्री करणेत येऊन, उपसमितीचे सभेसमोर सदरहू निविदा उघडणेत याव्यात, असे ठरले होते.

परंतु रुग्णालयाचे ई.डी.पी. विभागाने Digital Signature Certificate ची मुदत संपुष्टात आल्यामुळे सदर निविदा Open होऊ शकणार नाही असे कळविले होते. त्यामुळे सदर 4 Body Mortuary Cabinet Buyback करुन नवीन 6 Body Mortuary Cabinet खरेदीकामी दि.२३/१२/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये पुन्हा वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.११/०७/२०१६ ते २५/०७/२०१६ पर्यंत निविदा विक्री ठेवण्यात आली होती, तर दि.२८/०७/२०१६ अखेर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती, तर एकुण १३२ पुरवठाधारकांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. त्यास अनुसरुन ०२ निविदा प्राप्त झाल्याचा अहवाल ई.डी.पी. विभागामार्फत प्राप्त झाल्यानंतर दि.२६/०७/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.०१/०८/२०१६ पर्यंत ई-निविदेस मुदतवाढ देण्यात आली तर दि.०२/०८/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.०८/०८/२०१६ पर्यंत ई-निविदेस मुदतवाढ देण्यात आली. त्यास अनसुरुन सदरचे खरेदीकामी एकुण ऑनलाईन तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer |
|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune |
| 2 | M/s. Megastar Engineering, Pune |
| 3 | M/s. J K Sales & Services, Aurangabad |

उपरोक्त खरेदीकामी प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक ई-निविदा दि.१७/०२/२०१७ रोजी मा.उपसमितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असून त्यावर श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकिय अधिक्षक यांचा अभिप्राय घेण्यात आलेला असून त्यांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय कळविलेला आहे.

"We are using blue star mortuary cabinet since 2005 we are satisfactory about the blue star company. So we need it of same company now."

वरील प्राप्त ऑनलाईन ई-निविदांपैकी M/s. J K Sales & Services, Aurangabad यांनी ऑनलाईन ई-निविदा दिलेली आहे, परंतु त्यांची प्रत्यक्षात Hard Copy प्राप्त झालेली नसल्यामुळे त्यांची निविदा अपात्र झालेली आहे. त्यामुळे सदरचे खरेदीकामी प्राप्त उर्वरीत ०२ कमर्शियल ई-निविदा दि.१९/०५/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे निविदाधारकांचे समक्ष उघडण्यात आलेल्या असून निविदाधारकांनी देऊ केलेल्या दरांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Original Rate per in Rs. |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune | 745000.00 |
| 2 | M/s. Megastar Engineering, Pune | 680000.00 |

वरील तुलनात्मक दरांचे तक्त्यात M/s. Megastar Engineering, Pune यांनी दिलेल्या Blue Star या कंपनीचे रु.६,८०,०००/- हे दर निम्नत्तम येत असून M/s. Megastar Engineering, Pune यांनी दि.२७/०५/२०१७ रोजीचे ई-मेल अन्वये ऑनलाईन ई-निविदेतील दिलेल्या दरामध्ये नविन Mortuary Cabinet ची किंमत रु.६,५५,०००/- व जुन्या Mortuary Cabinet ची Buyback किंमत रु.२५,०००/- अशी देऊ केलेली आहे, असे कळविले आहे. तर M/s. Austin Health Care, Pune यांनी दि.२६/०५/२०१७ रोजीचे ई-मेल अन्वये ऑनलाईन ई-निविदेतील दिलेल्या दरामध्ये नविन Mortuary Cabinet ची किंमत रु.७,४५,०००/- व जुन्या Mortuary Cabinet ची Buyback किंमत रु.२०,०००/- देऊ केलेली आहे.

तसेच Mortuary Cabinet खरेदी करणेबाबत श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकिय अधिक्षिका यांनी तांत्रिक बाबींचे तुलनात्मक तक्त्यावर Blue Star या कंपनीचे Mortuary Cabinet घेणेबाबत शिफारस केलेली आहे.

तरी M/s. Megastar Engineering, Pune यांचेबरोबर चर्चा विनिमय करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या रक्कम रु.६,५५,०००/- (अक्षरी रु.सहा लाख पंचावन्न हजार मात्र) चे खर्चास मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील 4 Body Mortuary Cabinet Buyback करुन नवीन 6 Body Mortuary Cabinet खरेदी करणेकामी M/s. Megastar Engineering, Pune यांचे ई-निविदेमधील रु.६,५५,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०४ **श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतीवर तिस-या मजल्याचे बांधकाम करणेसाठी प्राप्त ई-निविदाचे वाणिज्यीक देकारावर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोटकलम (१) च्या. खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तमालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वंस्तकव्यअवस्थेवचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

***मा. व्यवस्थापन* समिती निर्णय:-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३८ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

“.. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयांमध्ये रुग्णांकरीता आवश्यक सुविधा व बेडचे संख्येत वाढ करणेसाठी सर्व्हे, नं.१४८ पैकी मधील जागेत नविन इमारतीचे बांधकाम करणे प्रस्तांवित असून, त्यासाठी आर्किटेक्टरची नेमणूक करणेकरीता विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेत याव्यात, असे ठरले.”

**प्रस्तावना:–** मा. व्यनवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत मान्यता मिळालेनुसार तिसऱ्या मजल्यासचे बांधकाम अंदाजपत्रक रु४,५४,३५,७६७/- तसेच सध्या असलेली सोलर सिस्टम काढून तिसऱ्या मजल्याचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पुन्हा बसविणेसाठी रु.२,५०,०००/- मात्र असे एकुण रु.४,५६,८५,७६७/- मात्र रकमेची एकत्रित निविदा मागविणेकामी वृत्तपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात होती. ठेकेदार यांना ई-निविदा अपलोड करण्याची अंतिम मूदत दि.१०/०७/२०१७ अखेर ठेवण्यात आली होती. ई-निविदा अपलोड करणेची अंतिम मूदतीत खालील ०४ ई-निविदा अपलोड झालेल्या आहे.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव/ गांव |
|---|---|
| ०१ | चंद्रगुप्त कन्स्ट्रक्शन, साकुरी |
| ०२ | क्लासिक असोशिएट , नाशिक |
| ०३ | एन.एस.बनकर पाटील ॲण्ड कं. श्रीरामपूर |
| ०४ | प्रकाश कोन्स्ट्रोवेल लि. नाशिक |

सदर प्राप्त ई-निविदांचे तांत्रीक निविदा मा. खरेदी समितीचे दि.१९/०७/२०१७ सभेपुढे उघडणेत आल्या असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता तांत्रीक छाननी अहवालानुसार उपरोक्त ठेकेदारांपैकी खालील तीन ठेकेदार पात्र झाले आहेत.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव/ गांव |
|---|---|
| ०१ | क्लासिक असोशिएट , नाशिक |
| ०२ | एन.एस.बनकर पाटील ॲण्ड कं. श्रीरामपूर |
| ०३ | प्रकाश कोन्स्ट्रोवेल लि. नाशिक |

उपरोक्त ०३ पात्रताधारक ठेकेदार यांनी सादर केलेला ई- निविदांचा वाणिज्यिक लिफाफे दि.०४/०८/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले असून, त्यांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव/ गांव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | क्लासिक असोशिएट, नाशिक | **४,२६,३९,६६२.९३** | **निम्नतम** |
| ०२ | एन.एस.बनकर पाटील ॲण्ड कं. श्रीरामपूर | ४,२६,६८,६०५.२१ | -- |
| ०३ | प्रकाश कोन्स्ट्रोवेल लि. नाशिक | ४,४१,०६,५६८.२३ | - |

उपरोक्त तपशिलानुसार ०३ निविदाधारकांपैकी ठेकेदार क्लासिक असोशिएटस् नाशिक यांचे दर निम्नतम आहेत. तरी याकामी निम्नतम दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देणेसाठी सदरील विषय मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतीवर तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेसाठी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रकियेमधील निम्नतम दरधारक क्लासिक असोशिएट, नाशिक यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर त्यांनी दिलेल्या दरांवर चर्चा करणेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेबरोबर दरांबाबत चर्चा केली असता, चर्चेअंती त्यांनी सदरहूकामी रु.४,२४,००,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतीवर तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेसाठी क्लासिक असोशिएट, नाशिक यांचे रु.४,२४,००,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस शिफारस होती.**

**परंतु सदरहू इतिवृत्त वाचून कायम करताना अशी चर्चा झाली की, श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतीवर तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेसाठी तयार करणेत आलेल्या अंदाजपत्रकाची रक्कम खुपच जास्त असल्यामुळे सदरहूकामी बाजारभावापेक्षा जास्त दर प्राप्त झालेले आहेत, असे निदर्शनास येत आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने जीएसटी अंमलबजावणीनंतर शासकीय कंत्राटात होणारा बदल या विषयाचे दि.१९ ऑगष्ट, २०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या परिपत्रकामध्ये “दिनांक २२**

**ऑगस्ट, २०१७ पुर्वी स्विकृत करण्यात आलेल्या निविदा, मात्र कंत्राटाकरिता कार्यारंभ आदेश देण्यात आलेले नाहीत, अशा निविदा रद्द करणेबाबत मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करता, श्री साईनाथ रुग्णालयाचे दोन्ही इमारतीवर तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेकामी फेर ई-निविदा मागविण्यात याव्या, असे ठरले.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

०५ **संस्थान परिसरामध्ये साईभक्तांना श्रींचे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता LED Wall Screen खरेदी करणे.**

संस्थान परिसरामध्ये साईभक्तांना श्रींचे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता LED Wall Screen खरेदी करणेकामी ०६ ई-निविदा प्राप्त झालेल्या होत्या, परंतु त्यापैकी तांत्रिक ई-निविदांमध्ये ०३ ई-निविदा पात्र झालेल्या होत्या. परंतु या तीनही ई-निविदाधारकांनी एकाच कंपनीसाठी दर भरलेले असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे साईभक्तांच्या सोयीसाठी LED Wall Screen खरेदी करणेकामी या क्षेत्रातील सर्व कंपन्यांचे स्पेशिफिकेशन देऊन, नव्याने फेर ई-निविदांची मागणी करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

**विषय नं.०३** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव उदघाटन कार्यक्रमासाठी मान्यवर निश्चित करणे व त्यांना निमंत्रण देणे याविषयी चर्चा करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समिती ठराव:-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.१७१ खालीलप्रमाणे समंत करणेत आलेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवा निमित्ताने दि.०१ ऑक्टोंबर, २०१७ ते ३१ऑक्टोंबर, २०१८ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजीक साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरुपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे, असे ठरले आहे.

*२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५८ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.*

*शताब्दी वर्षाचेसुरुवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी सोबत सादर केलेल्या नुमन्यांमधील अ.नं. ०३ चा नमुना सर्वानुमते मान्य करण्यात आला. या ध्वजासाठी भगव्या रंगाचे उच्च प्रतीचे रेशमी कापड वापरण्यात येऊन, त्यावर समाधी शताब्दीचा लोगो व श्रींचा श्रध्दा –सबुरी हा मंत्र छापणेत यावा. तसेच ध्वजाची उंची साधारणपणे ६० फुट म्हणजेच रामनवमी उत्सवातील निमोणकर निशाणाचे उंची इतकी असावी व ऊन, वारा, पावसामुळे ध्वज खराब होईल याकरीता प्रत्येक उत्सवाच्या वेळेस ध्वजाचे कापड बदलण्यात यावे.ध्वजाची पाद्यपूजा, उभारणी व स्तंभ संरजाम बागेत करावी. शताब्दी वर्षाचे सुरुवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी व इतर धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे उदघाटन प्रसंगी मा. मुख्यमंत्री तसेच संत मंहत आदि मान्यवरांना तसेच समारोपाच्या कार्यक्रमास मा. पंतप्रधान यांना निमंत्रीत करणेत यावे याचबरोबर आयोजित होणा-या निरनिराळया कार्यक्रमांसाठी मान्यवरांना निमंत्रीत करणेत यावे सदर कार्यक्रमास प्रसिध्दी मिळणेसाठी देशभरातील चॅनल/ पत्रकारांना निमंत्रीत करावे याशिवाय शताब्दीचे अनुषंगाने इतर विविध विषयावर चर्चा करणेत आली. व उपरोक्त*

*चर्चेबरोबरच समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्या कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणेत येऊन झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.*

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे.

सदर कार्यक्रमांचे स्वरुप व रुपरेषा ठरविणेसाठी आजतागायत शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना वजा प्रस्ताव, जागतिक साईमंदीर विश्वस्त परिषदमध्ये झालेली चर्चातसेच वेळोवेळी मा. व्यवस्थापन झालेल्याबैठका यातील मुद्दे विचारात घेऊन मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर सभेतील निर्णय क्रमांक १७१ नुसार शताब्दी वर्षाचे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ याकालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक तयार करणेत आले होते. सदरचे वेळापत्रक मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत सादर करण्यात आले होते.

सदर सभेत शताब्दीचे अनुषंगाने विविध विषयावंर चर्चा करणेत आली यावेळी शताब्दी वर्षाची सुरुवात ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाने करावी शताब्दी वर्षाचे सुरुवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी व इतर धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे उदघाटन प्रसंगी मा. मुख्यमंत्री तसेच संत मंहत आदि मान्यवरांना तसेच समारोपाच्या कार्यक्रमास मा.पंतप्रधान यांना निमंत्रीत करणेत यावे याचबरोबर आयोजित होणा-या निरनिराळया कार्यक्रमांसाठी मान्यवरांना निमंत्रीत करणेत यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताव:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार शताब्दी वर्षातील आयोजित विविध कार्यक्रमांना मान्यवरांना निमंत्रीत करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

अ) **<u>उदघाटन कार्यक्रम-</u>** दि.०१ऑक्टोंबर २०१७ रोजी या शताब्दी वर्षाच्या वर्षाचे प्रारंभ दिनी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाची सुरुवात भव्य दिव्य अशा स्वरुपात होणेसाठी सदरचे उदघाटन कार्यक्रमासाठी मा.मुख्यमंत्री महोदय यांना निमंत्रित करण्यात आलेले असून याचबरोबर सदर कार्यक्रमासाठी खालील मान्यवरांना निमंत्रीत करणे उचित होईल असे मत आहे.

**१)** महाराष्ट्र शासनाचे सर्व मा. मंत्री महोदय
**२)** मा. विरोधी पक्ष नेते
**३)** मा. अध्यक्ष, विधान सभा व विधान परिषद
**४)** अहमदनगर जिल्ह्यातील सर्व मा. खासदार व मा. आमदार
**५)** संस्थानच्या सल्लागार समितीचे सदस्य/छाननी समिती अध्यक्ष
**६)** मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीचे सर्व सदस्य
**७)** मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा उप समितीचे सर्व सदस्य
**८)** संस्थानचे माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष व विश्वस्त
**९)** अहमदनगर जिल्हा –जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य
**१०)** अहमदनगर जिल्हयाच्या सर्व शासकिय/निमशासकिय विभागाचे वरीष्ठ अधिकारी
**११)** स्थानिक मा. नगराध्यक्ष व मा. नगरसेवक
**१२)** देणगीदार साईभक्त
**१३)** याशिवाय मा. व्यवस्थापन समितीने सूचविलेले मान्यवर.

ब) **<u>धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम-</u>** मा. व्यवस्थापन समितीचे दि. २३/०५/२०१७ रोजीचे सभेत निरनिराळया कार्यक्रमांसाठी (धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक) मान्यवरांना निमंत्रीत करण्यात यावे, असे ठरले असल्याने याबाबत कोणत्या मान्यवंराना निमंत्रीत करावे याबाबत धोरणात्मक निर्णय होणे अपेक्षित आहे.

क) **<u>शताब्दी महोस्तव समारोप कार्यक्रम–</u>** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत समारोपाच्या कार्यक्रमास मा.पंतप्रधान यांना निमंत्रीत करणेत यावे असे ठरले आहे. याशिवाय समारोप कार्यक्रमाप्रसंगी मा. व्यवस्थापन समितीने सूचविलेल्या मान्यवरांना निमंत्रीत करता येईल.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षातील उदघाटन कार्यक्रम, धार्मिक सांस्कृतिक व सामाजिक तसेच समारोप कार्यक्रमासाठी मान्यवर निश्चित करणे तसेच याशिवाय निर्णयात नमूद केलेप्रमाणे कोणते संत मंहत यांना श्री साईबाबा शताब्दी महोत्सवी वर्षाच्या प्रारंभ दिनी आयोजीत ध्वजारोहण कार्यक्रमास निमंत्रीत करावे याबाबत विचार विनिमिय होऊन धोरणात्मक निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६७८** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव उदघाटन कार्यक्रमाच्या निमंत्रिण पत्रिका छपाई करावयाच्या असून त्या पत्रिकांमध्ये मान्यवरांच्या नावाचा समावेश करणेसाठी, मान्यवरांची नावांची निश्चिती होणेसाठी सदरचा प्रस्ताव सादर केला असलेबाबतची माहिती मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सभेस दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा शताब्दी महोत्सवी वर्षाच्या प्रारंभ दिनी आयोजीत ध्वजारोहण कार्यक्रमास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच विरोधी पक्षनेते, विधानसभा, महाराष्ट्र राज्य, अहमदनगर जिल्हयाचे पालकमंत्री व मा.राज्यमंत्री (विधी व न्याय विभाग) यांना निमंत्रण देण्यात यावे. तसेच अहमदनगर जिल्हयातील सर्व खासदार, आमदार व जिल्हापरिषद अध्यक्ष यांनाही आमंत्रित करणेत यावे व सांस्कृतिक/ सामाजिक कार्यक्रमांना त्या-त्या वेळी उपलब्ध असणाऱ्या मान्यवरांना निमंत्रित करणेत यावे. त्याचप्रमाणे समाधी शताब्दी समारोप कार्यक्रमाबाबत यथावकाश निर्णय घेण्यात येईल, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०४** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष उदघाटन सोहळयाचा व ध्वजारोहन कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणे व उद्घाटन सोहळा भव्य होणेसाठी विविध विषयांवर चर्चा करणे व आवश्यक धोरणात्मक निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी दि.०३/०८/२०१७ रोजी लेंडीबाग येथे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त दि.०१ ऑक्टोबर,२०१७ रोजी विभागांनी करावयाच्या कामांबाबत नियोजन करणेच्या सूचना केल्या आहेत.

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१७ शुक्रवार, दि.२९/०९/२०१७ ते सोमवार, दि.०२/१०/२०१७ अखेर असा चार दिवस साजरा करण्यात येत आहे. श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सवाचे तृतीय दिवशी श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे प्रथम दिवसाने सुरुवात होत आहे. त्यानिमित्त संस्थानतर्फे भव्य कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्याकरीता मंदिर विभागामार्फत खालीलप्रमाणे नियोजन करणेस मान्यता मिळावी, ही विनंती.

**दि. ०१ ऑक्टोबर, २०१७ रोजीचे कार्यक्रम**

दि.३०/०९/२०१७ रोजी श्रीपुण्यतिथी उत्सवाचा मुख्य दिवस असल्याने समाधी मंदिर रात्रभर दर्शनासाठी उघडे असल्याने काकड आरती होणार नाही. तसेच दि.०१ ऑक्टोबर, २०१७ चे दिवशी खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

**कार्यक्रम पत्रिका**

| **अश्विन शु ॥११** | **रविवार, दि.०१/१०/२०१७ रोजीचे कार्यक्रम** |
|---|---|
| पहाटे ५.०० वाजता | श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाची सुरुवात निमित्त श्रींचे समाधी व मूर्तीस सप्तनद्यांचे (गंगा, यमुना, सरस्वती, नर्मदा, सिंधु, कावेरी) पाण्याने स्नान. |
| सकाळी ५.३०वाजता | श्रींची नित्याची "शिर्डी माझे पंढरपुर" आरती. |
| सकाळी ५.४५ वाजता | मा.व्यवस्थापन समितीचे वतीने (श्रीपुण्यतिथी उत्सव तृतीय दिवस) समाधी मंदिरात श्रींची पाद्यपूजा. |
| सकाळी ६.०० वाजता | श्रींचे समाधीस पुजारी यांचेमार्फत सप्तनद्यांचे पाण्याने समाधी अभिषेक पूज. |
| सकाळी ७.०० ते १०.०० वाजेपर्यंत | समाधी मंदिरात ६.५० वा भजन त्यानंतर मंत्रोच्चार, शिर्डी माझे पंढरपुर आरती व ललकारी होऊन ७वा शताब्दी महोत्सवाचे ध्वाजाची व फोटोची समाधी मंदिरातुन श्रीद्वारकामाई येथे मिरवणूक व तेथुन श्रींचे रथामध्ये फोटो व ध्वज ठेवुन शिर्डी शहरातुन मिरवणूक होऊन ध्वज शोभायात्रा लेंडीबागेत येईल.<br>सहभाग:- मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य व मुख्य कार्यकारी अधिकारी, उपजिल्हाधिकारी तसेच उपकार्यकारी अधिकारी, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी ग्रामस्थ आणि नाट्यरसिक संच, शिर्डी यांचा सहभाग असेल. |
| सकाळी ८.०० ते ८.३० वाजेपर्यंत | श्रीगणेशयाग यज्ञ- (श्रीदत्त मंदिरासमोरील मोकळया जागेत)<br>उपासनी कन्याकुमारी स्थान, साकुरी, ता.राहाता यांचेमार्फत मा.अध्यक्ष महोदय व इतर यांचे हस्ते प्रधान संकल्प करुन पूजेस सुरुवात करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| सकाळी १०.०० ते १०:३० वाजता | मा.मुख्यमंत्री व इतर मान्यवरांचे दर्शन कार्यक्रम व मा.मुख्यमंत्री महोदय यांचे हस्ते ध्वजपुजन व ध्वजारोहण कार्यक्रम. |
| सकाळी १०.३० ते १२.०० वा. | मा.मुख्यमंत्री महोदय यांचे उपस्थितीत मुख्य उदघाटन समारंभ. |
| दुपारी १२.१० वाजता | श्रींची माध्यान्ह आरती. |
| दुपारी ३.१५ ते ४.०० वाजेपर्यंत | १६ गुंठे जागेत सामुहिक श्रीसाईनाथ स्तवन मंजरी पठण कार्यक्रम. |
| दुपारी ४.०० वाजता | समाधी मंदिरात पुजारी यांचेमार्फत नित्याचे श्रीसाईसच्चरित्राचे अध्याय वाचन. |
| दुपारी ४.०० ते ६.०० वाजेपर्यंत | एकादशीनिमित्त नामवंत कीर्तनकार यांचे कीर्तन. |
| सायंकाळी ६.१५वाजता | श्रींची धुपारती. |
| सायं.७.३० ते १०.०० वाजेपर्यंत | साईभजन संध्या कार्यक्रम. |
| रात्रौ १०.३० वाजता | श्रींची शेजारती. |

उपरोक्त दिवसभराचे कार्यक्रमामधील विशेष कार्यक्रमाचे नियोजन खालीलप्रमाणे करणे आवश्यक आहे-

०१) **सप्तनद्यांचे पाण्याने श्रींचे समाधी व मुर्तीस स्नान स्नान**-श्रीपुण्यतिथी उत्सवाचा तृतीय दिवस असल्याने व समाधी मंदिर रात्रभर उघडे असल्याने पहाटे ५:००वा श्रींचे मुर्तीस व समाधीस स्नान सुरु होईल. श्रींचे श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाची सुरुवात निमित्त श्रींचे समाधी व मूर्तीस सप्तनद्यांचे (गंगा- वाराणसी, यमुना-मथुरा, गोदावरी-नाशिक, सरस्वती-प्रयाग, नर्मदा-मध्यप्रदेश(महेश्वर), सिंधु-पंजाब, कावेरी-कर्नाटक, तुंगभद्रा-आंध्र प्रदेश व इतर) पाण्याने स्नान घालण्याचे नियोजन आहे. याकरीता विविध ठिकाणांहुन श्रींचे स्नानासाठी त्या-त्या ठिकाणचे पवित्र नद्यांचे पाणी घेऊन येण्याकरीता विविध क्षेत्राचे साईभक्तांशी संपर्क करुन त्यांचेकडुन ते मागविणेस मान्यता मिळावी. तसेच ते दि.०१ ऑक्टोबर,२०१७ रोजी श्रींचे समाधी व मूर्तीस वापरण्यात येणार आहे. तसेच यावेळी मंदिर विभागाकडील पुजारी यांचेकडुन मंत्रघोषाने व पुरुषसुक्ताने स्नान घालण्यात येईल.

०२) **मा.व्यवस्थापन समितीचे वतीने श्रींचे समाधी मंदिरात पाद्यपूजा**- संस्थानमार्फत साजरे होणारे सर्व उत्सवामध्ये विणा, पोथी, फोटो व उत्सव कालावधीतील पाद्यपूजा करण्याबाबतचे नियोजन सामान्य प्रशासन विभागामार्फत मा.व्यवस्थापन समितीचे सभेचे मान्यतेने आदेशान्वये कळविण्यात येते. तरी त्यानुसार श्रीपुण्यतिथी उत्सव तृतीय दिवस व श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे सुरुवातीचे असे एकत्रीत नियोजन करुन सामान्य प्रशासन विभागाकडुन पाद्यपूजेबाबत नियोजन करणेबाबत आदेश होणेस विनंती. त्यानुसार सकाळी ५:४५ वा मान्यवरांचे हस्ते पाद्यपूजा करण्यात येईल.

०३) **श्रींचे समाधीस पुजारी यांचेमार्फत सप्तनद्यांचे पाण्याने समाधी अभिषेक पूजा**-प्रतिदिन सर्व साईभक्तांचे कल्याणार्थ व श्रीसाईबाबांचे समाधीस संस्थान पुजारी यांचेमार्फत अभिषेक करण्याची प्रथा पुर्वीपासुन आहे. शताब्दी महोत्सवाचे निमित्त श्रींचे सप्तनद्यांचे पाण्याने समाधीस विशेष असा रुद्राभिषेक करण्यात येणार आहे. त्याकरीता श्रींचे स्नानाचे वेळी वापरण्यात येणारे सप्तनद्यांचे पाण्याने सकाळी ६:००वाजता श्रींचे समाधी अभिषेक मंत्रघोषाने करण्यात येणार आहे.

०४) **शताब्दी महोत्सव ध्वज मिरवणूक व शोभायात्रा:-** श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाची सुरुवात म्हणून श्रींचे शताब्दी महोत्सवाकरीता शताब्दी कक्षाचे सूचनेनुसार सोबत जोडलेल्या तीन डिझाईन पैकी एक डिझाईनचा ध्वज निश्चित होणेस विनंती आहे. सदर डिझाईन निश्चित झालेनंतर उच्च प्रतिच्या कपड्यावर ०५-०६ ध्वज तयार करण्यात येणार आहेत. सदर ध्वजाची भव्य स्वरुपामध्ये मिरवणूक काढण्यात येणार आहे. श्रींचे समाधी मंदिरात सकाळी ७.००वाजता भजन सुरु होईल. त्यानंतर मंत्रोच्चार व "शिर्डी माझे पंढरपुर" आरती व ललकारी करुन सकाळी ७ वा शताब्दी महोत्सवाचे ध्वाजाची व फोटोची समाधी मंदिरातुन श्रीद्वारकामाई येथे मिरवणूक निघेल. श्रीद्वारकामाई येथे छोटे भजन व शिर्डी माझे पंढरपुर आरती होऊन, तेथुन श्रींचे सुवर्ण वज्रलेप असलेल्या रथामध्ये फोटो व ध्वज ठेवुन पालखी मार्गाने मिरवणूक काढण्यात येईल. मिरवणूकीमध्ये श्रीसाईसच्चरित पारायण-२०१७ चे मिरवणूकीप्रमाणे भव्य स्वरुप असेल. मिरवणूक पालखी मार्गाने गेट क्र.०४ चे

आत येईल व रथ समाधी मंदिरात येईल. तसेच ध्वज हा उद्घाटन समारंभाचे ठिकाणी नेण्यात येऊन स्तंभावर संरक्षण व फायर ॲण्ड सेफ्टी विभागामार्फत बांधण्यास मान्यता असावी.

ध्वज मिरवणूकीमध्ये (शोभायात्रेमध्ये) श्रीसाईसच्चरित पारायण-२०१७मध्ये नियोजित केल्याप्रमाणे विविध देखावे करण्यात येणार आहेत. त्याकरीता सामान्य प्रशासन यांनी पारायण मिरवणूकीमध्ये नियोजित केलेले देखावे व ऑर्केस्ट्रा सामान्य प्रशासन शाखा (वशी-०५) कडुन नेमणेस मान्यता असावी. तसेच त्याकामी रु.५०,०००/- व मेकपमॅन यांना रु.२०,०००/- असे एकूण रु.७०,०००/- खर्च अपेक्षीत आहे. तरी त्याकरीता आवश्यक असल्यास नाट्य रसिक संच व ग्रामस्थ यांची मदत घेऊन सामान्य प्रशासनाकडुन व शताब्दी कक्षाकडुन पारायणाकरीता नेमलेले कलाकार व वाजंत्री नेमणेबाबत आदेश होणेस विनंती

०५) **<u>श्रीगणेशयाग यज्ञ</u>:-** श्रीसाईबाबा यांच्या महासमाधीस सन-२०१८ मध्ये १०० वर्षे पुर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थानमार्फत श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१/१०/२०१७ ते दि.१८/१०/२०१८ या कालावधीत साजरे केले जाणार आहे. त्याकामी संस्थानमार्फत रविवार,दि.०१/१०/२०१७ रोजी सकाळी ८.०० वाजता श्रीदत्त मंदिराचे समोर मंडपामध्ये **"श्रीगणेशयाग यज्ञ"** आयोजित करण्यात आलेला आहे. तरी सदर कार्यक्रमाचे पौरोहित्य श्री उपासनी कन्याकुमारी संस्थान, साकुरी यांचेमार्फत करण्यात येणार आहे. यावेळी सकाळी ८.०० ते ८.३० चे दरम्यान श्रीदत्त मंदिर येथे श्रीगणेशयाग यज्ञाचे मा.अध्यक्ष महोदय, मा.विश्वस्त, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया व इतर मान्यवरांचे हस्ते प्रधान संकल्प करुन पूजेस सुरुवात करण्यात येईल.

०६) **<u>मा.मुख्यमंत्री महोदय यांचे दर्शन व ध्वजरोहण कार्यक्रम</u>:-** दि.०१/१०/२०१७ रोजी मा.मुख्यमंत्री यांची दर्शनाची वेळ सकाळी १०:०० ते १०:३० या कालावधीत निश्चित व्हावी, ही विनंती. लेंडीबाग येथे स्तंभाजवळ मान्यवरांचे हस्ते ध्वज पूजन व श्रीफळ फोडुन श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास सुरुवात करण्यात येईल.

०७) **<u>उद्घाटन कार्यक्रम</u>:-** सकाळी १०:३० ते १०.४५ या कालावधीत मा.मुख्यमंत्री महोदय यांचे शुभहस्ते श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त मुख्य उद्घाटन कार्यक्रम संपन्न होईल .

०८) **<u>मान्यवरांचा सत्कार समारंभ</u>:-** सकाळी ११.०० वा. मा.मुख्यमंत्री यांचा संस्थानमार्फत सत्कार करणेकामी शताब्दी विशेष सन्माचिन्ह तयार करुन देणेस मान्यता मिळावी. तरी त्याकामी अंदाजे रु.१०,०००/- खर्च अपेक्षीत आहे. तसेच इतर मान्यवरांना मंदिर विभागाकडे उपलब्ध असलेले साईमंदिर विश्वस्त परिषदेकरीता तयार केलेले मुर्तीचे सन्मानचिन्ह देणेस व त्याकामी सदरचे खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

०८) **<u>श्रींची माध्यान्ह आरती</u>:-** श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सवामध्ये तृतीय दिवशी श्रींची माध्यान्ह आरती दुपारी ठिक १२:१०वा सुरु होईल.

०९) **<u>सामुहिक स्तवनमंजरी कार्यक्रम</u>:-** श्रीसाईबाबा समाधी शतब्दी महोत्सवाचे सुरुवातीनिमित्त शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त यांचेमार्फत एकत्रीत १६ गुंठे येथे दुपारी ३:१५ ते ४.०० या कालवधीत सामुहिक श्रीसाईनाथ स्तवन मंजरी कार्यक्रम करण्यास मान्यता असावी.

१०) **<u>नित्याचे अध्याय वाचन</u>:-** प्रतिदिन श्रींचे समाधी मंदिरामध्ये श्रीसाईसच्चरिताचे अध्याय वाचन करण्यात येते. दररोज दुपारी ४ वाजता श्रींचे समाधी मंदिरामधील पुजारी यांचेकडुन श्रीसाईसच्चरिताचे एका अध्यायाचे पारायण करण्यात येईल.

११) **<u>एकादशीचे कीर्तन</u>:-** प्रत्येक एकादशीस संस्थानमार्फत कीर्तन करण्याची प्रथा आहे. तरी श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे सुरुवातीस एकदशी आल्याने सामान्य प्रशासन (वशी-०५) व शताब्दी कक्षामार्फत एक नामांकीत वारकरी कीर्तनकार यांना नियोजित करणेस मान्यता असावी, ही विनंती. श्रीपुण्यतिथी उत्सव-२०१७ चे कीर्तन प्रति वर्षाप्रमाणे नियोजित असावे. तसेच दि.०१/१०/२०१७ रोजी एकादशीचे नामांकीत वारकरी कीर्तनकार यांना नेमणेस त्याबाबतचे नियोजन सामान्य प्रशासन (वशी-०५) व शताब्दी कक्ष यांचेमार्फत होणेस विनंती आहे.

त्याचप्रमाणे दि.०१/१०/२०१७ रोजी प्रतिवर्षाप्रमाणे नियोजित श्रीपुण्यतिथी उत्सव-२०१७ निमित्त इतर धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होतील.

तरी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे दि.०१/१०/२०१७ रोजी श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाची सुरुवात करणेकमी नियोजन होणेकामी संबंधीत विभागाकडुन कार्यवाही करणेकरीता, शताब्दीचा ध्वज निश्चित करणेकामी, मिरवणूकीचे नियोजन होणेकामी व उपरोक्त दर्शविल्याप्रमणे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष उदघाटन सोहळा साजरा करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.०५** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाची माहिती जगभरातील साईभक्तांपर्यंत पोहोचविणेसाठी विविध प्रसारमाध्यमांवरुन सोहळयाविषयी माहिती देणे. त्यासाठी ऑडीओ क्लिप, व्हिडीओ क्लिप इ. तयार करणेसंदर्भात धोरणात्मक निर्णय घेणेविषयी सविस्तर चर्चा करणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद–** सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५७ – (ठ).
श्री साईबाबांचे जिवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील श्री साई साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – निरंक.**

**प्रास्ताविक–** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या विविध कार्यक्रमाची माहिती साईभक्तांना होणेसाठी रेडीओ व टिव्ही तसेच सोशल मिडीयाच्या माध्यमातुन प्रदर्शित करणेसाठी काही सेकंदाची क्लिीप तयार करणेबाबत दि. २०/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये बांधकाम-शताब्दी कक्षाने कळविलेले आहे. तसेच मा. अध्यक्ष महोदय यांना दि. १०/०८/२०१७ रोजीचे पत्रान्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी सदरहु विषयावर चर्चा करणेकामी व निर्णय होणेसाठी सभेचे आयोजन होणेसाठी विनंती केलेली आहे. त्यास अनुसरुन उपरोक्त विषयान्वये खालील काही मुद्दयावर चर्चा व्हावी असे नम्र मत आहे.

१) सदर क्लिपकरीता मायना, मसुदा, विषय कसा असावा.
२) सदर क्लिप मध्ये किती भाषिक व किती कलाकारांचा समावेश असावा.
३) सदर क्लिप किती भाषेमध्ये असावी.

सदर क्षेत्रातील काही निर्मात्यांना क्लिपबाबत विचारणा केली असता, त्यांनी प्रथमतः विषय, भाषा, मसुदा, मायना, प्रकार याची मागणी केली. तसेच सदर क्लिपकरीता Editing, Video Mixing, कलाकार, आवश्यक असणारे साहित्य इ. ची गरज भासणार असुन त्यानुसार खर्च लागणार आहे असे त्यांनी दुरध्वनीद्वारे कळविलेले आहे.

तरी, मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सदर क्लिपसाठीचा विषय, भाषा, मसुदा, मायना, प्रकार यावर चर्चा होवुन सदर क्लिपसाठी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

**मागणी–** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या विविध कार्यक्रमाची माहिती साईभक्तांना होणेसाठी रेडीओ व टिव्ही तसेच सोशल मिडीयाच्या माध्यमातुन प्रदर्शित करणेसाठी काही सेकंदाची क्लिीप तयार करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सदर क्लिपसाठीचा विषय, भाषा, मसुदा, मायना, प्रकार यावर चर्चा होवुन सदर क्लिपसाठी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर करत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान** - तांत्रिक व आर्थिक.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या विविध कार्यक्रमाची माहिती साईभक्तांना होणेसाठी रेडीओ व टिव्ही तसेच सोशल मिडीयाच्या माध्यमातुन प्रदर्शित करणेसाठी काही सेकंदाची क्लिीप तयार करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सदर क्लिपसाठीचा विषय, भाषा, मसुदा, मायना, प्रकार यावर चर्चा होवुन सदर क्लिपसाठी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.६८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या विविध कार्यक्रमाची माहिती साईभक्तांना होणेसाठी रेडीओ व टिव्ही तसेच सोशल मिडीयाच्या माध्यमातुन प्रदर्शित करणेसाठी काही सेकंदाची क्लिीप तयार करुन घेणेसाठी समिती सदस्य ॲड़मोहन जयकर यांनी यासंबंधीच्या संस्थांशी (एजन्सीज) संपर्क साधुन त्यांचेकडून प्रस्ताव प्राप्त करुन घेण्याची तयारी दर्शविली, त्यास समितीने मान्यता दिली. तसेच याकामी येणाऱ्या खर्चास व आवश्यकतेनुसार ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०६** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव दिनांक ०१ ऑक्टोबर २०१७ रोजी भव्य ध्वजयात्रा, श्री साईचरित्र ग्रंथ दिंडी, रथ मिरवणूक आयोजित करणेविषयी चर्चा व आवश्यक धोरणात्मक निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समिती ठरावः-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१७१

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवा निमित्ताने दि.०१ ऑक्टोंबर, २०१७ ते १८ ऑक्टोंबर, २०१८ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजीक साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरुपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे,

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५८

शताब्दी वर्षाचे सुरुवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी सोबत सादर केलेल्या नुमन्यांमधील अ.नं. ०३ चा नमुना सर्वानुमते मान्य करण्यात आला. या ध्वजासाठी भगव्या रंगाचे उच्च प्रतीचे रेशमी कापड वापरण्यात येऊन, त्यावर समाधी शताब्दीचा लोगो व श्रींचा श्रध्दा –सबुरी हा मंत्र छापणेत यावा. तसेच ध्वजाची उंची साधारणपणे ६० फुट म्हणजेच रामनवमी उत्सवातील निमोणकर निशाणाचे उंची इतकी असावी व ऊन, वारा, पावसामुळे ध्वज खराब होईल याकरीता प्रत्येक उत्सवाच्या वेळेस ध्वजाचे कापड बदलण्यात यावे.ध्वजाची पाद्यपूजा, उभारणी व स्तंभ संरजाम बागेत करावी. शताब्दी वर्षाचे सुरुवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी व इतर धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे उदघाटन प्रसंगी मा. मुख्यमंत्री तसेच संत मंहत आदि मान्यवरांना तसेच समारोपाच्या कार्यक्रमास मा. पंतप्रधान यांना निमंत्रीत करणेत यावे याचबरोबर आयोजित होणा-या निरनिराळया कार्यक्रमांसाठी मान्यवरांना निमंत्रीत करणेत यावे. सदर कार्यक्रमास प्रसिध्दी मिळणेसाठी देशभरातील चॅनल/ पत्रकारांना निमंत्रीत करावे याशिवाय शताब्दीचे अनुषंगाने इतर विविध विषयावर चर्चा करणेत आली. व उपरोक्त चर्चेबरोबरच समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्या कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणेत येऊन झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

आ) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६७१.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ चा उदघाटन समारंभ कार्यक्रम दि. ०१ ऑक्टोंबर, २०१७ रोजी गेट नं. ०३ समारील १६ गुंठे जागेमध्ये करणेस व त्यानुषंगाने निमंत्रण पत्रिका, मंडप स्टेज व इतर अनुषंगिक बाबी करणेस, तसेच त्यासाठी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. या उदघाटन कार्यक्रमाच्या दृष्टीने प्रसिध्दीसाठी Video Clip, Audio Clip, Flex तयार करुन घेण्यास व त्यासाठी येणा-या खर्चासही मान्यता देण्यात आली. तसेच या कामांसाठी येणारा खर्च देणगीदार साईभक्त देण्यास इच्छूक असतील तर त्यांनाही आवाहन करणेत यावे, असे ठरले. याचबरोबर, या उदघाटन कार्यक्रमाच्या दिवशी शोभायात्रा, ग्रंथदिंडी, साईरथ मिरवणूक आयोजित करणेस व त्यासाठी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावनाः- श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे.

सदर कार्यक्रमांचे स्वरुप व रुपरेषा ठरविणेसाठी आजतागायत शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना वजा प्रस्ताव, जागतिक साईमंदीर विश्वस्त परिषदमध्ये झालेली चर्चा तसेच वेळोवेळी मा. व्यवस्थापन झालेल्या बैठका यातील मुद्दे विचारात घेऊन मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर सभेतील निर्णय क्रमांक १७१ नुसार शताब्दी वर्षाचे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ याकालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक तयार करणेत आले होते.

सदरचे वेळापत्रक मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत सादर करण्यात आले होते. सदर सभेत शताब्दीचे अनुषंगाने विविध विषयावंर चर्चा करणेत आली यावेळी शताब्दी वर्षाची सुरुवात ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाने करावी व ध्वजारोहण कार्यक्रमाचे उदघाटन प्रसंगी मा. मुख्यमंत्री तसेच संत मंहत आदि मान्यवरांना निमंत्रीत करण्यात यावे असे ठरले आहे. यासाठी ध्वजारोहणापुर्वी ध्वजाची शिर्डी गावातून भव्य शोभायात्रा काढण्याचे नियोजन आहे.

**प्रस्तावः-**

**<u>ध्वज शोभायात्रेचा मार्गः-</u>** ध्वजयात्रा 'शिर्डी माझे पंढरपूर' या आरतीनंतर सकाळी ०६.०० वाजता सुरू होऊन ती समाधी मंदिरातून- श्री द्वारकामाई- चावडीमार्गे-पालखी रोड – कानिफनाथ मंदिर – नगर मनमाड रोड – बसस्थानक – खंडोबा मंदिर – गेट क्र. ४ मधून लेडींबाग यामार्गे सकाळी ०९.०० वाजता मिरवणूकीची सांगता होईल. सदरचे मिरवणूकीत श्रींचा रथ व त्यामध्ये फोटो व ध्वज असेल.

**<u>ध्वज शोभायात्रेचे स्वरूपः-</u>** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.३५८ अन्वये वेळापत्रकास मान्यता देण्यात आली आहे. या वेळापत्रकात शताब्दी वर्षाचे प्रारंभ दिनी ध्वजारोहण कार्यक्रमाचा समावेश केलेला असून, या यात्रेचे स्वरुप खालीलप्रमाणे करता येईल.

- शोभायात्रेची सुरुवात समाधी मंदिरातून सकाळी ६.०० वाजता सुरु होईल.
- मिरवणूकीच्या अग्रभागी सनई-चौघडा-संबळ आदी पारंपारीक वाजंत्री व त्यामागे शिंग, तुतारी असतील.
- त्यापाठोपाठ झांजपथक, ढोलपथक, लेझीम पथक, बॅण्ड पथक असतील.
- ध्वज मिरवणूकीत शिर्डी व परिसरातील शाळा कॉलेजस यांना सहभागी करुन त्यांचे लेझीम पथक, झांज पथक, तसेच श्रींच्या जीवनावर आधारीत वेगवेगळया वेषभूषेतील देखावे असतील.
- त्यापाठोपाठ विविध राज्यांमधील पारंपारिक वेषातील साईभक्त असतील.
- त्यानंतर मिरवणूकीत साईच्या भक्तगणांमधील प्रमुख भक्त (त्या-त्या वेष आणि रंगभूषेत) असतील.
- त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संतमंडळीचे दर्शन (त्या-त्या वेष आणि रंगभूषेत) होईल.
- त्यानंतर भजनीमंडळी असतील
- शिर्डीतील प्रख्यात मंडळे जसे नाटय रसिक संच, क्रांती युवक मंडळ, सन्मित्र युवक मंडळ आदि मंडळांना आमंत्रीत करतायेईल.
- शेवटी श्री साईबाबाचे प्रतिमेसह ध्वजारोहणाचा ध्वज असेल.

उपरोक्त नमूद बाबींची पुर्तता करणेसाठी खालील काही ढोलपथक, बॅण्ड व सनई चौघडा कलाकारांनी खालीलप्रमाणे अंदाजीत खर्च कळविलेला आहे.

| अ. नं. | पारंपारीक वादयांचा प्रकार | मंडळ/कलाकाराचे नांव | संपर्क क्रमांक | अंदाजित खर्च रू. |
|---|---|---|---|---|
| १. | सनई – संबळ ०६ लोक | १. श्री. रावतिराम विधाटे, गुहा | ०९६८९६२५९३२ | ३५००/- |
| | | २.श्री. रतन भोसले, रामपूर, राहूरी | ०९६८९६२३४८७ | ३५००/- |
| २. | शिंग-तुतारी-सनई-चौघडा(गाडीसह) | १. श्री. रामकृष्ण सखाराम गुरव, बेट कोपरगांव | ०९३२६९०९७५४<br>०९६७३७३८५७० | ५५००/- |
| ३. | झांज पथक | १. सन्मित्र मित्र मंडळ | | मोफत |
| ४. | ढोल पथक | १. नादब्रम्ह ढोल ताश पथक, पुणे - १२० कलाकार (६० ढोल, १५ ताशे) त्यासाठी २ बस व ट्रकचा प्रवास खर्च | आनंद खंडेलवाल मो.क्र.८९५६१७१५२५ | ६०,०००/- (फक्त प्रवास खर्च) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | २. पार्लेश्वर ढोल पथक,मुंबई– १०० कलाकार (६० ढोल, १५ ताशे) व त्यासाठी २ प्रवासी बस व ट्रक प्रवास खर्च | सुमित- ९९३०९३५३६७<br>हितेश ०९८२१२९६११३ | ७२,०००/-<br>(फक्त प्रवास खर्च) |
| ५. | बॅन्जो/ ऑर्केस्टा पथक | १) श्री कैलास वारुळे, शिर्डी | मो – ९३२५९५००७४ | २१,०००/- मानधन |
| | | २) स्वर सम्राट, सटाणा<br>C/0 श्री गजानन अण्णा शर्वेकर, | ०९४२२७९२०३८ | ३०,०००/-<br>(प्रवास खर्च) |
| ६. | लेझीम पथक | शिर्डी परिसरातील सर्व शाळा | | मोफत |
| ७. | पारंपारीक वादयासह विविध राज्यातील वेषभुषा | प्रत्येक राज्यातील अंदाजे १० साईभक्त. (महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, केरळ, कर्नाटक व इतर) | | संस्थनमार्फत चहा पाणी नाष्टा, निवास, भोजन, दर्शनव्यवस्था करावी लागेल. |
| ८. | श्रींची वेषभुषा व देखावे | १) शिर्डी परिसरातील शाळेतील विदयार्थी | | मोफत |
| | | २) विजय दादा कुडाळकर, कुडाळ जि. सिंधुदुर्ग (ट्रॅक्टर ट्रॉलीवर ०५ भव्य जिवंत देखावे- मेकअप व वेशभूषासह एकूण २५ ते ३० कलाकार) | श्री. कुडाळकर ०९४२०२१००२० | १,७५,०००/-<br>(मेकअप, वेशभूषा व प्रवास खर्च ) |
| ०९. | शिर्डी व परिसरातील भजनी मंडळ | | | मोफत |
| १०. | इतर खर्च | सांऊड सिस्टीम, ट्रक्टर व टॉली, इ. वाहन, इंधन खर्च, जनरेटर, आवश्यकतेनुसार वाढीव मनुष्यबळ इतर वाढीव सर्व समावेक्षक खर्च. | | १,५०,०००/- |
| | | | **एकूण खर्च** | **५,२०,५००/-** |

तसेच शिर्डी व शिर्डी परिसरातील ग्रामस्थांना पारंपारीक वेषभुषा म्हणजेच पुरुषांसाठी पांढया रंगाचे धोतर, शर्ट अथवा कुर्ता पायजमा तर महिलांसाठी नऊ वार साडी परिधान करुन सदर यात्रेत सहभागी करुन घेता येईल, जेणेकरुन या विशिष्ट पेहरावामुळे ध्वजयात्रेची शोभा वाढेल. या करीता शिर्डी ग्रामस्थ यांना आवाहन करता येईल.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी ध्वजयात्रा मिरवणूकीची सुरुवात भव्य व आकर्षक स्वरुपात होणेसाठी उपरोक्त नमूद केलेल्या बाबींसाठी संस्थानचे संबंधीत विभागांमार्फत आवश्यक कार्यवाही होणेसाठी तसेच वर नमूद अंदाजीत खर्च रक्कम रु.५,२०,५००/- (अक्षरी रक्कम रू. पाच लाख, वीस हजार, पाचशे) मात्रचे खर्चास तसेच सदर कार्यक्रमप्रसंगी ऐनवेळी उदभवणा-या प्रासंगिक खर्चास मान्यता मिळणेकामी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.६८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव दिनांक ०१ ऑक्टोबर २०१७ रोजी भव्य ध्वजयात्रा, श्री साईचरित्र ग्रंथ दिंडी, रथ मिरवणूक समाधी मंदिरातून श्री द्वारकामाई- चावडीमार्गे- पालखी रोड – कानिफनाथ मंदिर – नगर मनमाड रोड – बसस्थानक – खंडोबा मंदिर – गेट क्र. ४ मधून लेडींबाग यामार्गे काढणेत यावी व यामध्ये शिर्डी ग्रामस्थांचा सहभाग घेण्यात यावा, असे ठरले. तसेच यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५,२०,५००/- मात्रचे खर्चास, त्याचप्रमाणे सदर कार्यक्रमप्रसंगी उद्भवणाऱ्या प्रासंगिक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०७** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणाऱ्या विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणे, कलाकार निश्चित करणे व त्यांचे मानधन/ इतर विषयांवर चर्चा व धोरणात्मक निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे

आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७१.
२) मा. व्यवस्थापन समितीचे दि. २७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २७७.
३) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८०.
४) मा. व्यवस्थापन समितीचे दि. २३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३५८.
५) मा. व्यवस्थापन समितीचे दि. १५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५१९.
६) मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६५४, ६७१, ६७२.

**प्रस्तावना-** थोर संत श्रीसाईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. यासाठी संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल. या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे.

**प्रस्ताव–** श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षामध्ये शिर्डीत येणा-या भाविकांसाठी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन केल्यास संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल. या दृष्टीकोनातून आयोजित करावयाच्या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे यशस्वीतेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे वेळोवेळी झालेल्या बैठंकातील निर्णयानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

अ) **धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाचे वेळापत्रक-** आजतागायत शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना वजा प्रस्ताव, जागतिक साईमंदीर विश्वस्त परिषदमध्ये झालेली चर्चातसेच वेळोवेळी मा. व्यवस्थापन झालेल्याबैठका यातील मुद्दे विचारात घेऊन मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर सभेतील निर्णय क्रमांक १७१ नुसार शताब्दी वर्षाचे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ याकालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक तयार करणेत आले होते. सदरचे प्रारुप वेळापत्रक मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत सादर करण्यात आले त्यास मान्यता मिळालेली आहे परंतु त्यातील काही बांबीबाबत प्रशासकीयदृष्ट्या अंमलबजावणी करणे अडचणीचे ठरत असल्याने त्यात काही बदल सूचवून सोबतचे **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केलेप्रमाणे सुधारीत वेळापत्रक तयार करण्यात आले आहे.

**ब) साईभजन संध्या कलाकार निश्चिती व मानधन-**

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक सादर करणेत आले होते. त्यावर निर्णय क्र.३५८ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे. "*धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमांचे स्वरुप पाहून संबंधीतांना मोफत कार्यक्रम सेवा सादर करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात यावे. जे कलाकार मोफत कार्यक्रम सादर करणेस तयार नसतील, अशा कलाकारांकडून मानधनाबाबतचा प्रस्ताव घेऊन, या कार्यक्रमांसाठी देणगीदार/ प्रायोजक मिळतात का, ते पहावे अन्यथा त्यांच्या मानधनाबाबत व्यवस्थापन समिती उचित निर्णय घेईल.*"

शताब्दी वर्षातील आयोजित कार्यक्रमांसाठी मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार दि.१५/०६/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवासाठी आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी नामवंत कलाकार निश्चित करणेस व कलाकार निश्चित झालेनंतर त्यांना निंमंत्रीत करणेसाठी पत्रव्यवहार करणेस तसेच त्यांचे मानधन निश्चित करणेसाठीचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर निर्णय क्रं. ४९५ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-१८ मध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी सोबत परिशिष्ट म्हणून सादर केलेल्या नामांकित कलाकारांच्या यादिमधील कलाकारांशी संपर्क करुन, ते शिर्डी येथे कार्यक्रम सादर करणेस तयार आहेत का, ते पहावे व त्यांचे मानधनासह तारखा घेण्यात येऊन, याबाबतचा फेरप्रस्ताव व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, असा पारीत झालेला आहे."*

उपरोक्त निर्णयास अनुसरुन कार्यवाही करताना काही कलाकारांचे दूरध्वनी उपलब्ध न झाल्याने त्यांच्याशी संपर्क होऊ शकलेला नाही तसेच त्यातील काही कलाकारांनी प्रतिसाद न दिल्याने आता सोबतचे **परिशिष्ट ब** मध्ये साईभजन संध्यासाठी (मानधनासह व मोफत अशा ०२ स्वतंत्र) कलाकारांची यादी सादर केलेली आहे.

**क) सांस्कृतिक कार्यक्रम कलाकार निश्चिती व मानधन -**

मा. व्यवस्थापन समितीचे दि. १५/०६/२०१७ रोजीचे सभेत झालेल्या निर्णयास (४९५) अनुसरुन अनुसरुन कार्यवाही करताना काही कलाकारांचे दूरध्वनी उपलब्ध न झाल्याने त्यांच्याशी संपर्क होऊ शकलेला नाही तसेच त्यातील काही कलाकारांनी प्रतिसाद न दिल्याने आता सोबतचे **परिशिष्ट क** मध्ये साईभजन संध्यासाठी (मानधनासह व मोफत अशा ०२ स्वतंत्र) कलाकारांची यादी सादर केलेली आहे.

**ड) श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षातील प्रवचन कार्यक्रमाची सद्यस्थिती**

शताब्दी वर्षाचे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते १८ ऑक्टोबर, २०१८ याकालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक तयार करणेत आले होते. सदर प्रारुप वेळापत्रकात शताब्दी वर्षातील प्रत्येक महिन्यात नामवंत प्रवचनकारांच्याप्रवचनांचा कार्यक्रमांचासमावेश केलेला आहे. सदरहू वेळापत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.३५८ अन्वये मान्यता मिळाली आहे.

त्यानुसार सदर कार्यक्रमाचे आयोजनासाठी सदर प्रवचनकारांना ई-मेल, दुरध्वनीव पत्रव्यवहार करुन संपर्क करणेत आला. त्यानुसार खालीलप्रमाणे सदर कार्यक्रमाचे आयोजनाबाबतची आजतागायतची सद्यस्थिती व नव्याने प्रस्तावित प्रवचनकारांची माहिती सोबतचे **परिशिष्ट ड** मध्ये नमूद केली आहे.

तरी श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्ष भव्य स्वरुपात साजरे करण्याचे दृष्टीकोनातून धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांबाबत खालील बाबींवर धोरणात्मक निर्णय होणे अपेक्षित आहे.

१) शताब्दी वर्षात आयोजित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमांची रुपरेषा व स्वरुप ठरविणे.

२) शताब्दी वर्षात आयोजित साईभजन संध्या व इतर सांस्कृतिक कार्यक्रमासाटी कलाकार निश्चिती, त्यांचे मानधन, प्रवासखर्च, भोजन व निवासव्यवस्था, चहा पाणी व नाष्टा तसेच याबरोबर आवश्यकतेनुसार दर्शन/ आरती व्यवस्था आदि बाबत निर्णय घेणे.

३) शताब्दी वर्षात आयोजीत प्रवचन कार्यक्रमांमध्ये काही प्रवचन कार्यक्रमांची निश्चिती झालेली आहे याशिवाय काही कार्यक्रमांची नव्याने निश्चिती करावी लागेल. त्याचबरोबर सदर प्रवचनकार व्यक्तींचेमानधन, प्रवासखर्च, भोजन व निवास व्यवस्था,चहा पाणी व नाष्टा तसेच याबरोबर आवश्यकतेनुसार दर्शन/आरती व्यवस्था आदि बाबत निर्णय घेणे.

४) दरवर्षी साजरे होणा-या उत्सवांप्रमाणे शताब्दी वर्षातील उत्सव काळातील किर्तन कार्यक्रमांसाठी नारदीय किर्तनकार यांची निश्चिती करणे तसेच त्याचबरोबर सदर किर्तनकार व्यक्तींचे मानधन, प्रवासखर्च, भोजन व निवास व्यवस्था,चहा पाणी व नाष्टा तसेच याबरोबर आवश्यकतेनुसार दर्शन/आरती व्यवस्था आदि बाबत निर्णय घेणे.

५) शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांमध्ये कोणता कार्यक्रम कोणत्या ठिकाणावर (स्थळ) असावा याबाबत निर्णय घेणे.

६) शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, सांऊंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटिव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्च याबाबत निर्णय घेणे.

तरी उपरोक्त नमूद बाबींवर धोरणात्मक निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६८२** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणाऱ्या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची खालीलप्रमाणे सुधारित रुपरेषा ठरविणेत आली.**

**परिशिष्ठ-अ**

**श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-१८ मध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे सुधारीत वेळापत्रक**

**माहे सप्टेंबर -२०१७**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रमाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| शुक्रवार,२९/०९/२०१७ श्रीपुण्यतिथी उत्सव प्रथम दिवस | रा. ७ ते १० | **सांस्कृतिक -** पंडीत विजय घाटे व इतर कलाकार(तालवाद्य कचेरी) यांचा कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोरील-१६ गुंठे परिसर |
| शनिवार,३०/०९/२०१७ श्री पुण्यतिथी उत्सव मुख्य दिवस | रा.७ ते १० | साईभजन संध्या --------------- | साईनगर मैदान |

**माहे ऑक्टोबर -२०१७**

| **वार/ दिनांक/ दिनविशेष** | **वेळ** | **कार्यक्रमाचे स्वरुप** | **कार्यक्रम ठिकाण** |
|---|---|---|---|
| रविवार, ०१/१०/२०१७ पुण्यतिथीउत्सव तिसरा दिवस/ एकादशी तथा शताब्दी महोत्सव प्रारंभ दिवस | स. ६ ते ९ | **धार्मिक-** १) ध्वज शोभायात्रा (शिर्डीतून) | शिर्डी गावातून |
| | स.०७.३० | २) गणेश याग यज्ञ- उपासनी कन्याकुमारी स्थान, साकुरी ता. राहाता यांचेमार्फत | लेंडीबाग दत्त मंदिर |
| | स.०९.३० | ३) ध्वजारोहण कार्यक्रम – मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण | लेंडीबाग दत्त मंदिर |
| | स.१० ते ११.३० | ४) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे उपस्थितीत मुख्य उदघाटन कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर / साईनगर मैदान |
| | स. ११.०० | **सामाजिक -** १) नेत्र तपासणी व चष्मेवाटप – डॉ प्रकाश गंगवाणी, मुंबई<br>२) नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर- डॉ. कुलीन कोठारी, मुंबई व इतर (जगभरातील सर्व साई मंदिरामार्फत जागतिक पातळीवर नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर कार्यक्रम)<br>३) जगभरातील सर्व साई मंदिरांमध्येमरणोत्तर नेत्रदान संकल्प राबविणेसाठी नाव नोंदणी.<br>(उपस्थिती डॉ.तात्याराव लहाने, डीन, ग्रॅण्ट मेडीकल कॉलेज/ जे.जे हॉस्पीटल मुंबई) | श्रीसाईनाथ रुग्णालय |
| | रा. ७ ते १० | **सांस्कृतिक-** महानाट्य – सबका मालिक एक है | साईनगर मैदान |
| सोमवार, ०२/१०/२०१७ पुण्यतिथी उत्सव चौथा दिवस | रा. ७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या - ---------------- | साईनगर मैदान |
| दिनांक निश्चित नाही. | | **धार्मिक-** प्रवचन– --------------------------- | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर / साईनगर मैदान |
| शुक्रवार, दि.१३/१० ते शनिवार, १४/१०/२०१७- ०२ दिवस | | **पणजी (गोवा) येथे पादुका दर्शन सोहळा कार्यक्रम** | |

| | | | |
|---|---|---|---|
| शनिवार, २८/१०/२०१७ | सा. ७ ते १० | सांस्कृतिक – साईभजन संध्या --------------------- | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर / साईनगर मैदान |

**माहे नोव्हेंबर -२०१७**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| शुक्रवार,०३/११/२०१७ ते रविवार,०५/११/२०१७- ०३ दिवस | स. ७ ते १०<br>दु. ३ ते ६<br>रा. ७ ते १० | **धार्मिक-** प्रवचन- जीवन विद्या - श्री. प्रल्हाद दादा पै. (विद्यार्थी, महिला, कौटुंबिक या विषयांवर आधारीत) | साईआश्रम-०१/ साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर / साईनगर मैदान |
| गुरुवार, ०९/११/२०१७ | स.१० ते ६ | **सामाजिक –** रक्तदान शिबीर व जगभरातील सर्व साई मंदिरामार्फत रक्तदान शिबीर आयोजित करणेसाठी आवाहन | श्री साईनाथ रुग्णालय |
| शनिवार, ११/११/२०१७ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या –------------- | साईनगर मैदान |
| दिनांक निश्चित नाही. | | **पादुका दर्शन सोहळा-----------** | |
| शनिवार, २५/११/२०१७ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या –------------- | साईनगर मैदान |

**माहे डिसेंबर -२०१७**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| रविवार,०३/१२/२०१७ -जागतिक अपंग दिन | स.१० ते ६ | **सामाजिक-** १) जयपूर फुट शिबिर आयोजन व जगभरातील सर्व साई मंदिरामार्फत शिबीर आयोजित करणेसाठी आवाहन<br>२) दिव्यांगाना सायकल वाटप<br>३) कर्णबधिर यांना यंत्रवाटप | श्री साईनाथ रुग्णालय /श्री साईबाबा हॉस्पिटल |
| दिनांक निश्चित नाही. | | **पादुका दर्शन सोहळा कार्यक्रम -----------** | |
| शनिवार, २३/१२/२०१७ – (देशातील व विदेशातील साईमंदिरे) | स.१० ते ६<br>रा.७ ते १० | **धार्मिक-** जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषद (ग्लोबल साई टेंम्पल ट्रस्ट सम्मीट ) चर्चासत्र<br>**सांस्कृतिक -** साईभजन संध्या –दि.२३/१२/२०१७ ----------- | साईआश्रम - ०१<br>साईनगर मैदान |
| रविवार, २४/१२/२०१७ – (विदेशातील साईमंदिरे) | | | प्रसादालय हॉल |
| रविवार, २४/१२/२०१७ ते रविवार, ३१/१२/२०१७ – एकूण ०८ दिवस | रा.७ ते१० | **सांस्कृतिक -** साईभजन संध्या व इतर सांस्कृतिक कार्यक्रम –-- --------------- | साईआश्रम - ०१/ साईनगर मैदान |

**माहे जानेवारी -२०१८**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| दिनांक निश्चित नाही | | **धार्मिक- प्रवचन --------------------------** | साईआश्रम -०१/ साईनगर मैदान/ साई कॉम्पलेक्स समोरील १६ गुंठे परिसर |

| | | | |
|---|---|---|---|
| दिनांक निश्चित नाही | | **पादुका दर्शन सोहळा कार्यक्रम------------------** | |
| शुक्रवार, २६/०१/२०१८ – भारतीय प्रजासत्ताक दिन | रा. ७ ते १० | **सांस्कृतिक -** चित्ररथ – दिल्ली येथे राजपथावर श्री साईबाबांचे जीवनचरित्रावर आधारीत | दिल्ली |
| | | **सांस्कृतिक -** साईभजन संध्या – ------------------- | साईआश्रम -०१/ साईनगर मैदान/ साई कॉम्पलेक्स समोरील १६ गुंठे परिसर |
| दिनांक निश्चित नाही | | **सामाजिक -** शासनाच्या सहकार्याने पाणीपरिषद –<br>१) डॉ. राजेंद्र सिंह<br>२) श्री. माधवराव चितळे | साईआश्रम -०१/ साईनगर मैदान/ साई कॉम्पलेक्स समोरील १६ गुंठे परिसर |

**माहे फेब्रुवारी -२०१८**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| गुरुवार,०१/०२/२०१८ते शनिवार,०३/०२/२०१८-०३ दिवस | रा.७ ते १० | **धार्मिक-** प्रवचन – विद्यावाचस्पती श्री. शंकर अभ्यंकर (विषय- संत/ मंहत, स्वामी विवेकानंद, महापुरुष/राष्ट्रपुरुष यावर आधारीत) | साईआश्रम -०१ |
| दिनांक निश्चित नाही | | **पादुका दर्शन सोहळा कार्यक्रम------------------** | |
| शनिवार, २४/०२/२०१८ | स.१० ते ६ | **सामाजिक-** कॅन्सर निदान शिबिर व जगभरातील सर्व साई मंदिरामार्फत शिबीर आयोजित करणेसाठी आवाहन | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** साईभजन संध्या –-------------------- | साईआश्रम -०१ |

**माहे मार्च - २०१८**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| दिनांक निश्चित नाही. | | **पादुका दर्शन सोहळा कार्यक्रम-------------** | |
| दिनांक निश्चित नाही. | | **धार्मिक-** प्रवचन -------------- | साईआश्रम -०१ |
| गुरुवार, १५/०३/२०१८ | स.१० ते रा.१० | **सामाजिक -** अन्नदान कार्यक्रम- जागतिक स्तरावर अन्नदान कार्यक्रम आयोजित करणेसाठी आवाहन | श्री साईप्रसादालय |
| शनिवार,२४/०३/२०१८ - रामनवमी उत्सव प्रथम दिवस | रा.०७ ते १० | **सांस्कृतिक -** गीत रामायण- श्रीधर फडके | साईआश्रम -०१ |
| रविवार, २५/०३/२०१८- रामनवमी उत्सव मुख्य दिवस | स. ०६ वाजता<br>रा. ०७ ते १० | **धार्मिक-** १) कावडी कार्यक्रम- गंगा, गोदावरी, सिंधू कावेरी आदि नद्यांचे पाण्याने श्रींना स्नान<br>**सांस्कृतिक-** रामलीला कार्यक्रम/ रावण दहन कार्यक्रम | समाधी मंदिर<br>साईआश्रम -०१ |
| सोमवार २६/०३/२०१८- श्री रामनवमी उत्सव सांगता दिवस | रा.०७ ते १० | **सांस्कृतिक -** साईभजन संध्या ---------------------- | |
| सोमवार,२६/०३/२०१८ ते बुधवार,२८/०३/२०१८-०३ दिवस | | कुस्ती स्पर्धा – राष्ट्रीय स्तरावरील हिंद केसरी / महाराष्ट्र केसरी स्पर्धा | शेती महामंडळ जमीन |

**माहे एप्रिल - २०१८**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| गुरुवार, ०५/०४/२०१८ ते रविवार, ०७/०४/२०१८ -०३ दिवस | | **धार्मिक -** प्रवचन – श्री अवधूत शिवानंद महाराज – शिवयोग सत्संग (ऋषी ते कृषी) | साईआश्रम -०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| शनिवार ०७/०४/२०१८- जागतिक आरोग्य दिन | स. १० ते ०६ | **सामाजिक -** रक्तदान शिबीर – जगभरातील सर्व साईमंदिरामार्फत शिबिरआयोजित करणेसाठी आवाहन | श्री साईनाथ रुग्णालय |
| दिनांक निश्चित नाही. | | पादुका दर्शन सोहळा कार्यक्रम-------------- | |
| ---------------------- | रा. ७ ते १० | **सांस्कृतिक -** साईभजन संध्या --------------------- | साईआश्रम -०१ |

**माहे मे- २०१८**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| मंगळवार, ०८/०५/२०१८- जागतिक रेडक्रॉस दिन | स.१० ते ०५ | **सामाजिक -** अवयवदान संकल्प –जगातील सर्व साई मंदिरांमार्फत अवयवदान संकल्प कार्यक्रम नांव नोंदणी करणेसाठी आवाहन | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| दिनांक निश्चित नाही. | | पादुका दर्शन सोहळा कार्यक्रम | |
| | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** साईभजन संध्या---------------------- | साईआश्रम -०१ |
| गुरुवार,१७/०५/२०१८ ते शनिवार, १९/०५/२०१८ -०३ दिवस | -- | **धार्मिक -** आधिकमासा निमित्त विष्णुयाग यज्ञ | लेंडीबाग दत्त मंदिरासमोर |
| शनिवार,१९/०५/२०१८ ते रविवार, २७/०५/२०१८ - एकूण ०९ दिवस | रा.७ ते १० | **धार्मिक -** प्रवचन- संत कनकेश्वरी देवी (श्रीराम कथा) | साईआश्रम -०१ |

**माहे जून- २०१८**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| बुधवार ,०६/०६/२०१८ ते मंगळवार,१२/०६/२०१८- ०७ दिवस | रा. ७ ते १० | **धार्मिक -** प्रवचन – रामायण - ह.भ.प. श्री. रामराव महाराज ढोक | साईनगर मैदान/ साईआश्रम -०१ |
| बुधवार, २०/०६/२०१८- जागतिक स्वच्छता दिन | -- | **सामाजिक -** शिर्डी शहरात स्वच्छता अभियान व जगातील सर्व साई मंदिरांमार्फत स्वच्छता कार्यक्रम राबविण्यासाठी आवाहन | शिर्डी शहर |
| | रा. ७ ते १० | **सांस्कृतिक -** साईभजन संध्या -------------------------- | साईआश्रम -०१ |
| दिनांक निश्चित नाही. | | परदेशात पादुका दर्शन सोहळा कार्यक्रम ------------ | |

**माहे जूलै -२०१८**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| दिनांक निश्चित नाही. | | परदेशात पादुका दर्शन सोहळा कार्यक्रम | |
| रविवार,०१/०७/२०१८- वनदिन रविवार, १/०७/२०१८ ते शनिवार, ७/०७/२०१८ - एकूण ०७ दिवस वनसप्ताह | स. १० ते ०५ | **सामाजिक -** वृक्षारोपण कार्यक्रम व जगभरातील सर्व साई मंदिरांद्वारेवृक्षारोपण अभियान राबविण्यासाठी आवाहन | शिर्डी परिसर |
| दिनांक निश्चित नाही | | **धार्मिक-** प्रवचन –--------------- | साईआश्रम -०१ |
| गुरुवार,२६/०७/२०१८- गुरुपौर्णिमा उत्सव प्रारंभ दिवस | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** साईभजन संध्या श्री. नितिन मुकेश | साईआश्रम -०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| शुक्रवार,२७/०७/२०१८ - गुरुपौर्णिमा उत्सव मुख्य दिवस | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** पंडीत हरीप्रसाद चौरासिया | साईआश्रम -०१ |
| शनिवार, २८/०७/२०१८- गुरुपौर्णिमा उत्सव सांगता दिवस | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** साईभजन संध्या – | साईआश्रम -०१ |

**माहे ऑगष्ट- २०१८**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| दिनांक निश्चित नाही. | | परदेशात पादुका दर्शन सोहळा कार्यक्रम ------------------- | |
| | रा.०७ ते १० | **सांस्कृतिक -** साईभजन संध्या ------------------ | साईआश्रम -०१ |
| गुरुवार, १६/०८/२०१८ ते गुरुवार, २३/०८/२०१८ एकूण ०८ दिवस | -- | **धार्मिक -** श्रावण मास – पं.पु.गंगागीर महाराज- अखंड हरीनाम सप्ताह | शेती महामंडळ जमीन |
| सोमवार, २७/०८/२०१८ ते सोमवार, ०३/०९/२०१८ –एकूण ०८ दिवस | | **धार्मिक-** श्री साईचरित्र पारायण- शिर्डी व जगभरातील सर्व साई मंदिरा मध्ये त्या- त्या भाषेतील साईचरीत्र पारायण सोहळा आयोजित करणेसाठी आवाहन . | शेती महामंडळ जमीन |
| गुरुवार,३०/०८/२०१८ | स. १० ते ०५ | **सामाजिक -** हृदयरोग निदान शिबिर व जगभरातील सर्व साईमंदिरामार्फत शिबीर आयोजित करणेसाठी आवाहन | श्री साईबाबा हॉस्पिटल |

**माहे सप्टेंबर- २०१८**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| सोमवार,०३/०९/२०१८ ते गुरुवार,०६/०९/२०१८- ०४ दिवस | -- | **धार्मिक-** श्रावण मासात रूद्र स्वाहःकार यज्ञ. | लेंडीबाग दत्त मंदिर |
| दिनांक निश्चित नाही. | | परदेशात पादुका दर्शन सोहळा कार्यक्रम ----------------- | |
| गुरुवार, १३/०९/२०१८- श्री गणेश चतुर्थी (श्रीसाईनाथ स्तवन मंजरी शतकपूर्ती दिन) | स.७.३० | **धार्मिक-** सामुहिक स्तवनमंजरी पठण- जगभरातील सर्व साई मंदिरांमध्येएकाच दिवशी स्तवनमंजरी पठणाचा कार्यक्रम | साईआश्रम -०१/ साई कॉम्प्लेक्स समोरील १६ गुंठे परिसर |
| | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** साईभजन संध्या-------------------------- | |
| गुरुवार, २७/०९/२०१८ | -- | सामाजिक - थॅलेसिमिया/ हिमोफिलीया/ सिकलसेल ॲनेमिया निदान व उपचार तसेच जागतिक स्तरावर सर्व साईमंदिरामार्फत असे शिबीर आयोजित करणेसाठी आवाहन | श्री साईबाबा रुग्णालय |

**माहे ऑक्टोबर -२०१८**

| वार/ दिनांक/ दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| बुधवार, १०/१०/२०१८ | रा. ७ ते १० | **सांस्कृतिक -** साई भजन संध्या - -------------------- | साईनगर मैदान/साईआश्रम-१ |
| गुरूवार, ११/१०/२०१८ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** साई भजन संध्या - -------------------- | साईनगर मैदान/ साईआश्रम-१ |
| शुक्रवार, १२/१०/२०१८ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** श्री साईबाबांवर कव्वाली- -------------- | साईनगर मैदान/ साईआश्रम-१ |
| शनिवार, १३/१०/२०१८ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** ड्रम - शिवमणी व इतर नामांकित कलाकार | साईनगर मैदान / साईआश्रम-१ |
| रविवार, १४/१०/२०१८ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** साई भजन संध्या - --------------------- | साईनगर मैदान/ साईआश्रम-१ |
| सोमवार १५/१०/२०१८ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** साई भजन संध्या - --------------------- | साईनगर मैदान/ साईआश्रम-१ |

| | | | |
|---|---|---|---|
| मंगळवार, १६/१०/२०१८ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** साई भजन संध्या - -------------------- | साईनगर मैदान / साईआश्रम-१ |
| बुधवार, १७/१०/२०१८ - पुण्यतिथी पहिला दिवस | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** साई भजन संध्या - --------------------- | साईनगर मैदान / साईआश्रम-१ |
| गुरूवार, १८/१०/२०१८- पुण्यतिथी मुख्य दिवस श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रम | दु. १२.३० <br> रा.७ ते १० | मान्यवरांच्या हस्ते नियोजित टपाल तिकीट प्रकाशन, रु.१००/- मात्रचे नाणे चलनात आणणेबाबतचा कार्यक्रम, आय.ए.एस. ॲकॅडमी उदघाटन <br> **सांस्कृतिक -** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम -------------- | शेती महामंडळ जमिन |
| शुक्रवार,१९/१०/२०१८- पुण्यतिथी सांगता दिवस | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** साई भजन संध्या - --------------------- | |

**तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क, ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार व त्यांचे मानधन स्थानिक उप-समितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावेत. त्यामधील विनामुल्य सेवा करणाऱ्या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/ परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.**

**या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु.३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, सांऊंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटिव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०८** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ मध्ये येणाऱ्या साईभक्तांसाठी तात्पुरत्या स्वरुपात निवासव्यवथा, वाहन पार्किंग व्यवस्था तसेच इतर आवश्यक मुलभूतसोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेविषयी चर्चा व धोरणात्मक निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस सन-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने त्याचे औचित्य साधून श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते १८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. समाधी शताब्दी वर्षामध्ये श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या भक्तांना सर्व प्रकाराच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देता याव्यात यासाठी टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स, मुंबई यांचे मार्फतकृती आराखडा तयार करणेत आला आहे. यासाठी विधी व न्याय विभाग, शासन निर्णय दि.२२/१०/२०१३ अन्वये मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली संयुक्त कृती आराखडा समिती गठीत करणेत आली आहे. दि.३१/०३/२०१७ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली विधानभवन, मुंबई येथे झालेल्या कृती आराखडा समितीच्या बैठकीत रु.३०२३.१७ कोटी मात्र अपेक्षित खर्चाचे कृती आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सन २०१७-१८ मध्ये येणा-या साईभक्तांसाठी तात्पुरत्या स्वरुपात निवासव्यवस्था, वाहन पार्किंग व्यवस्था तसेच इतर आवश्यक मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेकामी कृती आराखड्यामध्ये खालीलप्रामणे कामांचा समावेश आहे.

| अ.नं | कामाचा तपशिल | अंदाजित खर्च (रू.कोटी) | आवश्यकता |
|---|---|---|---|
| १ | साईभक्त कॅम्प व तात्पुरत्या स्वरुपाचे निवास व्यवस्थे करीता मैदान तयार करणे, मंडप उभारणे तसेच इतर अनुषंगीक सुविधा पुरविणे, | २५.६८ | साईभक्तांकरीता निवास व्यवस्था विकसीत करणेसाठी ११३एकर क्षेत्रात संस्थानतर्फे साईट लेव्हलिंग, पाणीपुरवठा, शौचालय व मुताऱ्यांची व्यवस्था, विद्युतपुरवठा इ सुविधा उपलब्ध करुन प्लॉट दिले जातील. यामध्ये निवासाकरीता शेड उभारणी संबंधीत पालखी मंडळाला/ ठेकेदाराला करावी लागेल.<br>सर्व पार्कींगचे ठिकाणी तसेच शिर्डी शहरालगत एकूण १६.५० एकर क्षेत्रामध्ये साईभक्तांचे निवासासाठी ०७ दिवसांसाठी तात्पुरत्या स्वरुपात निवासव्यवस्था पारायण मैदानाचे जवळ कार्यक्रमाचे कालावधीत ७० दिवसाकरीता साईभक्तांना तात्पुरत्या स्वरुपाचे निवासस्थान उपलब्ध करुन देणे.<br>मंडप व पाणीपुरवठा, शौचालय, मुता-यांची व्यवस्था, विद्युतपुरवठा इ सुविधा उपलब्ध करुन देणे.<br>(एकूण मैदानः- १२९.५० एकर, मुतारीः- १३४२, संडासः- ३७५६, बाथरुमः- ३७५६) |
| २ | पोलिस व इतर विभागांचे अधिकारी/ कर्मचारी, मेटेंनन्स स्टाफ यांचेकरीता तात्पुरती निवास व्यवस्था | १.५० | गर्दीचे नियोजनासाठी असलेले पोलिस व इतर स्टाफ यांचेकरिता तात्पुरत्या स्वरुपात निवास व्यवस्थेसाठी मंडप टाकणे, मैदान सपाटीकरण करणे, अंतर्गत रस्ते तयार करणे, पाणीपुरवठा, शौचालय,मुता-यांची व्यवस्था, विद्युत व्यवस्था करणे इत्यादी कामे करणे आवश्यक आहे.<br>(एकूण मैदानः- ४.१३ एकर, मुतारीः- ३५, संडासः- १००, बाथरुमः- १००) |
| ३ | तात्पुरते वाहनतळ, शौचालय व पाणीपूरवठा व्यवस्था एकूण मैदानः- १६२.७६ एकर<br>बसेस-४०४१, कार-२०६२४ संडासः- ७१, मुतारीः- १०० | १२.०० | श्री साईबाबा महासमाधी शताब्दी कालावधीत शिर्डीत येणा-या साईभक्तांकरिता अतिरिक्त वाहनतळ व्यवस्था निर्माण करणेसाठी, जमिन सपाटीकरणासह मैदान तयार करणे, अंतर्गत रस्ते, संडास, मुतारी, वॉश बेसिन, विद्युत, इत्यादी व्यवस्था करणे.<br>वाहनतळे, साईभक्त कॅम्प, पारायण मैदान, येथे पाणी पुरवठ्याची व्यवस्था करणेसाठी पाईपलाईन, टॅन्कर्स, पी.व्ही.सी. टाक्या इत्यादी व्यवस्था करणे. |

सल्लागार टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स, मुंबई यांनी तयार केलेल्या प्रकल्प अहवालात श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कालावधीत शिर्डीत येणा-या साईभक्तांकरीता वाहनतळे व निवास व्यवस्था करणेकामी खालीलप्रमाणे व्यवस्था करण्याचे प्रस्तावित करणेत आले आहे.

**अ) वाहन पार्किंग व्यवस्था-**

| पार्किंग नंबर | ठिकाण | क्षेत्रफळ | वाहन पार्किंग क्षमता | शिर्डी पासून अंतर | जागा मालक |
|---|---|---|---|---|---|
| १ | सावळीविहीर बु,<br>गट नंबर ५/२९/३०/३२ | १०.५० एकर | १६२७ कार | ६ किमी. | श्री के.सी.पांडे |
| २ | सावळीविहीर बु.<br>गट नंबर- २४७ ते २५४,<br>सोनेवाडी गट नंबर- ५७, ५९ ते ६८ | १०० एकर | १३७२८ कार<br>२७६५ बसेस | ८ किमी | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या. |
| ३ | सावळीविहीर बु,<br>गट नंबर २३१/२, | १७ एकर | १८४४ कार<br>३७१ बसेस | ४.५० किमी | गोदावरी शुगर मिल |
| ४ | निमगांव को-हाळे,<br>गट नंबर २३/२, | ७ एकर | ५४५ कार<br>२३५ बसेस | २.५० किमी | श्री जयकिसन धिंगरा |
| ५ | निमगांव को-हाळे, शासकीय विश्राम गृहाजवळ शटल बस डेपो | ३ एकर | १६७ बसेस | १.५० किमी | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ए | निमगांव को-हाळे,<br>गट नंबर १८३ | ५ एकर | ३८५ कार<br>१६८ बसेस | २.५० किमी | श्री साईबाबा संस्थान |
| ६ | शिर्डी सर्व्हे नं.१५९/१६१ | १० एकर | १०५६ कार<br>२१३ बसेस | १.५० किमी | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या. |
| ७ | साकुरी गट नं.३५६ पैकी व ३५८ पैकी | ७.८३ एकर | ७३९ कार<br>१२२ बसेस | ३ किमी | श्री रवीश्री कंदुला |
| ८ | साकुरी गट नं.२८०/३ | ५.४३ एकर | ७०० कार | ३ किमी | साईप्रसाद प्रॉपर्टीज |

सिंहस्थ कुंभमेळा – २०१५ चे कालावधीत गर्दीचे नियोजनासाठी उपरोक्तपैकी अनुक्रम नं.१,३, ५ ते ८ या ठिकाणी पार्कींगची व्यवस्था करणेसाठी मुरुम टाकून वाहनतळांची निर्मिती करणेत आली होती. त्यामुळे तेथे आवश्यकतेनुसार थोडेफार प्रमाणात मुरुम टाकून व्यवस्था करता येईल असे मत आहे. अ.नं.५ ए, मध्ये दर्शविले पार्किंगचे ठिकाण हे संस्थान मालकीचे मौजे निमगांव – को-हाळे येथील गट नं.१८३ मधील आहे. सदरचे क्षेत्र हे श्री साईप्रसादालयाचे पश्चिमेकडील साईचरित्र पारायण व गंगागिरी महाराजांचे सप्ताहसाठी गृहीत धरणेत आलेल्या महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांचे मालकीचे गट नं८९ व ९० चे जवळ आहे. त्यामुळे सदरचे क्षेत्रामध्ये पार्किंग विकसित करणे आवश्यक आहे.

उपरोक्तपैकी अ.नं.२ मध्ये दर्शविलेप्रमाणे महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांचे मालकीचे मौजे सावळीविहीर बु, २४७ ते २५४ व सोनेवाडी गट नं.५७,५९ ते ६८ या ८८.३ एकर क्षेत्रात शताब्दी कालावधीतील होणा-या संभाव्य गर्दीच्या अंदाज घेऊन त्यानुसार सदर पार्किंग विकसित करणेबाबत निर्णय घेता येईल.

**ब) निवास व्यवस्था क्षमता**

| निवास ठिकाण | ठिकाण | क्षेत्रफळ | निवास क्षमता | शिर्डी पासून अंतर | जागा मालक |
|---|---|---|---|---|---|
| १ | सावळीविहीर बु,<br>गट नंबर ५/२९/३०/३२ | २ एकर | १४५० व्यक्ती | ६ किमी. | श्री.के.सी.पांडे |
| २ | सावळीविहीर बु.<br>गट नंबर- २४७ ते २५४,<br>सोनेवाडी गट नंबर- ५७, ५९ ते ६८ | ८३ एकर | ६०१७५ व्यक्ती | ८ किमी | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या. |
| ३ | सावळीविहीर बु,गट नंबर २३१/२, | ३ एकर | २१७५ व्यक्ती | ४.५० किमी | गोदावरी शुगर मिल |
| ४ | निमगांव को-हाळे ,गट नंबर २३/२, | २ एकर | १४५० व्यक्ती | २.५० किमी | श्री जयकिसन धिंगरा |
| ५ | निमगांव को-हाळे, गट नं.१८०,१८१ | ४ एकर | ३००० व्यक्ती | १.५० किमी | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या. |
| ५ए | निमगांव को-हाळे ,गट नंबर १८३ | २० एकर | १४५०० व्यक्ती | २.५० किमी | श्री साईबाबा संस्थान |
| ६ | शिर्डी सर्व्हे नं.१५९/१६१ | २ एकर | १४५०व्यक्ती | १.५० किमी | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या. |
| ७ | शिर्डी सर्व्हे नं.१४८ पैकी | ०२ एकर | १४५० व्यक्ती | ०.५ किमी | श्रीमती रजनी जोगळेकर |
| ७ए | शिर्डी सर्व्हे नं.१४८ पैकी | १० एकर | ७२५० व्यक्ती | ०.५ किमी | श्रीमती रजनी जोगळेकर |
| ८ | साकुरी गट नं.३५६ पैकी व ३५८ पैकी | २ एकर | १४५० व्यक्ती | ३ किमी | श्री रवीश्री कंदुला |

सल्लागार टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स, मुंबई यांनी तयार केलेल्या प्रकल्प अहवालात साईभक्तांचे निवासाकरीता उपरोक्तप्रमाणे मंडप व्यवस्था गृहीत धरण्यात आलेली होती. तथापी शताब्दी कालावधीत होणा-या गर्दीचा अंदाज घेऊन आवश्यकतेनुसार निवासाकरीता मंडप व्यवस्था उभारणी करता येईल.

श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सन २०१७-२०१८ चे कालावधीतील संभाव्य गर्दीचे एकुण ७० दिवस खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं | दिनविशेष | गर्दीचा कालावधी (दिनांक) | दिवस |
|---|---|---|---|
| ०१. | पुण्यतिथी | दि.२९/०९/२०१७ ते दि.०२/१०/२०१७ | ०४ |
| ०२. | दिवाळी सुट्टी | दि.२२/१०/२०१७ ते दि.२९/१०/२०१७ | ०८ |
| ०३. | नाताळ सुट्टी | दि.२४/१२/२०१७ ते दि.०१/०१/२०१८ | ०९ |
| ०४. | प्रजासत्ताक दिन | दि.२६/०१/२०१८ ते दि.२८/०१/२०१८ | ०३ |
| ०५. | महाशिवरात्री | दि.१०/०२/२०१८ ते दि.११/०२/२०१८ | ०२ |
| ०६. | रामनवमी उत्सव | दि.२४/०३/२०१८ ते दि.२६/०३/२०१८ | ०३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ०७. | उन्हाळा सुट्टी - (सर्व गुरूवार, शनिवार, रविवार) | दि.०८/०५/२०१८ ते दि.०२/०६/२०१८ | ११ |
| ०८. | गुरूपौणिमा उत्सव | दि.२६/०७/२०१८ ते दि.२९/०७/२०१८ | ०४ |
| ०९. | श्रावण मास प्रारंभ- (गंगागिर महाराज सप्ताह सोहळा) | दि.१६/०८/२०१८ ते २३/०८/२०१८ | ०८ |
| १०. | श्रावण मास- (श्री साई सतचरित्र पारायण सोहळा) | दि.२७/०८/२०१८ ते दि.०३/०९/२०१८ | ०८ |
| ११. | दसरा- (श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप) | दि.१०/१०/२०१८ ते दि.१९/१०/२०१८ | १० |
| | | **एकूण :** | ७० |

**प्रस्ताव-** वरील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या संभाव्य गर्दीचे कालावधीपैकी क्रमांक ११ मधील कालावधीत सर्वात जास्त गर्दी अपेक्षित आहे. त्याखालोखाल अ.क्र.९ व १० चे कालावधीचे कार्यक्रमासाठी मोठी गर्दी होणे अपेक्षीत आहे. त्यामुळे सदर कालावधीत पार्किंग व निवास व्यवस्था मोठ्या स्वरुपात उपलब्ध करावी लागेल. याव्यतिरीक्त क्र.०१ ते ०८ मध्ये नमूद केलेल्या कालावधीसाठी तुलनेने कमी गर्दी अपेक्षित असलेने त्यानुसार निवास व पार्किंगची व्यवस्था करावी लागेल. शताब्दी कालावधीत चार हजार साईभक्तांची ५० दिवसांसाठी निवासव्यवस्था करणेसाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. मोठ्या गर्दीचे कालावधीत निवासव्यवस्था उभारणेसाठी Rate Contract करणेसाठी ई-निविदा मागवून दर निश्चित करता येतील.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-१८ चे कालावधीत शिर्डी येथे येणा-या साईभक्तांसाठी तात्पुरत्या स्वरुपात निवासव्यवस्था, वाहनतळे व अनुषंगिक व्यवस्था करणेसाठी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कृती आराखड्यामध्ये वरीलप्रमाणे सोई-सुविधा उभारणे प्रस्तावीत करणेत आले आहे.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कृती आराखड्यामध्ये प्रस्तावीत करणेत आलेल्या सोयीसुविधा उभारणे अथवा श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात भाविकांची होणारी संभाव्य गर्दी व त्या अनुषंगाने वाहन पार्किंग, तात्पुरती निवास व्यवस्था व इतर आवश्यक सोयी सुविधा समाधी शताब्दी वर्षात उभारणीकामी कोणत्या ठिकाणी व किती कालावधीसाठी तात्पुरती वाहन पार्किंग व्यवस्था, तात्पुरती निवासव्यवस्था व इतर सोयी सुविधा निर्माण आवश्यक आहे, याबाबत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, टाटा कन्सल्टिंग इजिनिअर्स यांनी सादर केलेल्या आराखडयामधील निवासव्यवस्था, वाहन पार्किंग व्यवस्था व इतर मुलभूत सोयी-सुविधांसाठी प्रस्तावित केलेल्या जागा या भाविकांसाठी गैरसोयीच्या असल्याने त्याठिकाणी मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणे योग्य होणार नाही. याकरीता श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ मध्ये येणाऱ्या साईभक्तांची तात्पुरत्या स्वरुपात निवासव्यवस्था, वाहन पार्किंग व्यवस्था तसेच इतर आवश्यक मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेकामी स्थानिक समिती सदस्यांनी जागेची निश्चिती करुन द्यावी. या तात्पुरत्या मुलभूत सोयी-सुविधा फक्त गर्दीचे कालावधीमध्ये परिस्थितीनुसार अंदाजे ५० दिवसांसाठी उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसेच त्यासाठी मोकळया जमीनींचे सपाटीकरण वगैरे करणेऐवजी आपल्याकडील उपलब्ध असलेल्या तयार मैदानांवर या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्या व आवश्यकतेनुसार महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची शिर्डी लगत असलेल्या जमिनी अधिग्रहीत करणेत याव्यात, असे ठरले. तसेच यासाठी वार्षिक दर ठरविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता विविध पायाभुत सोयी-सुविधा निर्माण करणेविषयी चर्चा व धोरणात्मक निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.६८४** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०** **श्री साईबाबा संस्थानमार्फत I.A.S. ॲकेडमी सुरु करणेसंदर्भातील विविध विषयांवर चर्चा करुन धोरणात्मक निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** संस्थानचे मा.व्यवस्थापन समिती दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेत, श्री.काशिनाथ गोविंद पाटील, कोपरी, ता.वसई-विरार (पूर्व) जिल्हा ठाणे यांची मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७,१७८, २८२/१, २८४ व २८८ मधील भुखंड क्रमांक १ इमारत बी व डी विनामोबदला संस्थानला देणगी स्वरुपात हस्तांतरण करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच मा.व्यवस्थापन समिती दि.२३-२४/०५/२०१७ चे सभेतील निर्णयास अनुसरून आय.ए.एस. अकॅडमी सुरू करणेसाठी करावयाचे कामांचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती

दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर समितीने निर्णय क्र.५११ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"मौजे निघोज, ता.राहाता येथील देणगी मिळालेल्या "बी" व "डी" इमारतींमध्ये आय.ए.एस.अकॅडमी सुरू करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच या अकॅडमीच्या गर्व्हनर कौन्सिलमध्ये सदस्य म्हणून मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष यांचेबरोबरच मा.ॲड.मोहन जयकर, मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे व मा.श्री.प्रताप भोसले या समिती सदस्यांचा समावेश करणेत यावा, असे ठरले."

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत आलेल्या प्रस्तावात अ.नं.४ राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई या नामांकित अकॅडमी यांचेकडे प्रशासकीय कामकाजासाठी असलेल्या पदसंख्येप्रमाणे आकृतीबंध तयार करुन शासनाचे विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांची मान्यता घ्यावी लागेल असे प्रस्तावीत करणेत आले होते, त्यास समितीने दि.१५/०६/२०१७ रोजी निर्णय क्र.५११ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच सेवानिवृत्ती सनदी अधिकारी श्री.सुधीर ठाकरे यांनी विनामोबदला या अकॅडमीच्या गर्व्हनिंग कौन्सीलचे अध्यक्षपद स्विकारणेस संमती दिलेली असलेबाबतची माहिती मा.अध्यक्ष महोदय यांनी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३-२४/०५/२०१७ चे सभेत दिलेली आहे.

सदर निर्णयानुसार आकृतीबंध मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेकामी इकडील कार्यालयामार्फत दि.२९/०६/२०१७ रोजी प्रस्ताव सादर केला असता, सदर प्रस्तावावर मा.उप कार्यकारी अधिकारी महोदय यांनी "गर्व्हनिंग कौन्सिलमध्ये अधिका-यांचा समावेश करुन, त्याचे आदेश पारित करुन, त्यांची बैठक घेऊन नंतर सविस्तर सर्व मुद्यांचा अभ्यास झाल्यानंतर व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने पुढील कार्यवाही करावे" असे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महादेया यांचे निर्देश असलेबाबत शेरा लिहिलेला आहे.

त्यानंतर आय.ए.एस.अकॅडमीचे कामकाज मा.श्री.मनोज घोडे पाटील, उप जिल्हाधिकारी यांचेकडे सोपविणेबाबत इकडील कार्यालयामार्फत दि.१५/०७/२०१७ रोजीचे प्रस्ताव सादर केला असता, सदर प्रस्तावावर "मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी आय.ए.एस.अकॅडमीचे कामकाजकरिता १. मुख्य कार्यकारी अधिकारी २.उपजिल्हाधिकारी –२, ३.उप कार्यकारी अधिकारी ४. कार्यकारी अभियंता व ५. मुख्यलेखाधिकारी यांची समिती स्थापन करावी व त्यांचा गर्व्हनिंग कौन्सिलमध्ये समावेश करावा. त्या समितीच्या मार्गदर्शनाखाली सर्व कामकाज करणेत यावे. तसेच आस्थापना विभागामार्फत सर्व कामकाज करणेबाबत" निर्देश दिलेले आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५११ अन्वये आय.ए.एस. अकॅडमीच्या गर्व्हनर कौन्सिलमध्ये सदस्य म्हणून मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष यांचेबरोबरच मा.ॲड.मोहन जयकर, मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे व मा.श्री.प्रताप भोसले या समिती सदस्यांचा समावेश करणेत यावा, असे ठरलेले आहे. इकडील कार्यालयाकडील दि.१५/०७/२०१७ रोजीचे टिपणीवरील मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशाप्रमाणे १. मुख्य कार्यकारी अधिकारी २.उपजिल्हाधिकारी –२, ३. उप कार्यकारी अधिकारी ४. कार्यकारी अभियंता व ५. मुख्यलेखाधिकारी यांचा गर्व्हनिंग कौन्सिलमध्ये समावेश करणेस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता द्यावी असे निर्देश दिलेले आहेत.

सदरची समिती गठीत केल्यानंतर त्याबाबत स्वतंत्र आदेश पारित करण्यात येईल, समितीच्या कामकाजासाठी एक लिपीक-टंकलेखक उपलब्ध करुन देता येईल. तसेच सदर समितीचे मार्गदर्शनानुसार

१. आय.ए.एस. ॲकडमीसाठी Coaching Study Material साठी आऊटसोर्स पद्धतीने एजन्सीची नेमणूक करणे किंवा मानधनावर अधिव्याख्याते किंवा तज्ञ यांची नेमणूक करणे.
२. आय.ए.एस.अकॅडमीसाठी प्रशासकीय कामकाजासाठी स्वतंत्र आकृतीबंध तयार करणे
३. आय.ए.एस.अकॅडेमीसाठी Screening Test द्वारे विद्यार्थ्यांची निवड करणेसाठी कार्यपद्धती निश्चित करणे.
४. आय.ए.एस.अकॅडेमीसाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य, फर्निचर, संगणक इ. खरेदी करणे.

गर्व्हनिंग कौन्सिलची बैठक घेऊन वरील सर्व विषयांवर सविस्तर चर्चा करणे आवश्यक आहे. तसेच गर्व्हनिंग कौन्सिलमध्ये यावर निर्णय घेऊन, त्यास मा.व्यवस्थापन समितीची व त्यानंतर विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घ्यावी लागेल, असे मत आहे.

तरी उपरोक्त समितीचा समावेश गर्व्हनिंग कौन्सिलमध्ये करणेस व नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानमार्फत सुरु करावयाच्या I.A.S. ॲकेडमीच्या गव्हर्निंग कौन्सिलमध्ये मा.श्री.सुधीर ठाकरे, मा.श्री.सुरेश हावरे, मा.श्री.चंद्रशेखर कदम, मा.ॲडमोहन जयकर, मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, मा.श्री.प्रताप भोसले व मा.श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.), मुख्यकार्यकारी अधिकारी यांचा समावेश करणेत यावा. तसेच या गव्हर्निंग कौन्सिलने I.A.S. ॲकेडमी सुरु करणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या विषयांवर मार्गदर्शन करावे, असे ठरले.**

**तसेच मुख्यकार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपजिल्हाधिकारी- २, उपकार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी व कार्यकारी अभियंता यांचे कार्यकारी मंडळ (Executive Council) तयार करणेस मान्यता देण्यात आली.**

**श्री.सुधीर ठाकरे यांची संस्थानच्या प्रस्तावीत आयएएस ॲकेडमीच्या गर्व्हनिंग कौन्सिलच्या अध्यक्षपदी निवड करणेत आलेली आहे. आयएएस ॲकेडमीच्या कामकाजासाठी श्री.सुधीर ठाकरे यांना शिर्डी येथे येणे-जाणेसाठी व शिर्डी येथे वाहनव्यवस्था, निवासव्यवस्था,भोजनव्यवस्था संस्थानमार्फत देण्यात यावी. तसेच शिर्डी येथील वास्तव्याच्या कालावधीत एक सुरक्षा कर्मचारी पुर्णवेळ त्यांचे बरोबर देणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.११** **साईपादुका दर्शन सोहळा विविध राज्यांमध्ये आयोजित करण्यासंदर्भात प्राप्त प्रस्तावांवर सविस्तर चर्चा करुन, धोरणात्मक निर्णय घेणे. तसेच त्यासंदर्भात नियमावलीवर चर्चा करुन निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/ तरतूद क्र. | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(ख) | रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. |
| ०२ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-** माहे-ऑक्टोबर-२०१७ ते ऑक्टोबर-२०१८ या कालावधीमध्ये संस्थानमार्फत श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त जे साईभक्त शिर्डी येथे दर्शनासाठी येऊ शकत नाही अशा साईभक्तांचे सोईसाठी समाधी शताब्दी महोत्सवाचे पार्श्वभूमीवर श्रींच्या मुळ पादुका देश-विदेशात ठिकठिकाणी नेण्याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/०४/२०१७ रोजीचे सभेमध्ये निर्णय झालेला आहे.

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतीक व सामाजिक कार्यक्रमांची रुपरेषा व स्वरुप ठरविणेकामी धोरणात्मक निर्णय घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०४.२०१७ चे सभेपुढे विषय नं.०३ सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.२८० नुसार "जे सर्वसामान्य साईभक्त श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येऊ शकत नाही, अशा साईभक्तांच्या सोयीसाठी, समाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्रींच्या मुळ पादुका देश -विदेशामध्ये ठिकठिकाणी दर्शनासाठी उपलब्ध करुन देण्यात याव्यात. यासाठी जी साईमंदिरे बाबांच्या पादुकांची मागणी करतील, त्यांची योग्य ती चौकशी व खातरजमा करुन, त्यांनाही चांदीच्या पादुका दर्शनासाठी उपलब्ध करुन द्याव्यात. या पादुकांसोबत संस्थानची दक्षिणा पेटी व देणगी पावती पुस्तक ठेवण्यात यावे. मंदिर विभागाने या संबंधीची नियमावली तयार करावी व समाधी शताब्दी वर्षातील मुळ पादुका दर्शन सोहळ्याची सुरुवात आंध्रप्रदेश राज्यातील विजयवाडा येथुन करणेत यावी, याठिकाणी श्रींच्या भक्तांची संख्या जास्त प्रमाणात आहे. तसेच समाधी शताब्दी वर्षामध्ये आयोजित कार्यक्रमांमधील भजन/ कीर्तन/ प्रवचन या प्रकारचे कार्यक्रम मंदिराचे उत्तरेस सरंजाम बागेत ठेवावेत व मोठ्या स्वरुपाच्या कार्यक्रमांसाठी जागेची निश्चित करावी." असा निर्णय पारीत करणेत आलेला आहे.

**विभागाचा अभिप्राय-** वरील निर्णयास अनुसरुन श्रीसाईबाबांच्या मुळ पादुका व चांदीच्या पादुका देशा-विदेशामध्ये विविध ठिकाणी दर्शनासाठी उपलब्ध करुन देणेसाठी खालीलप्रमाणे निकष व नियमावली निश्चित करण्यात यावी असे नम्र मत आहे.

**अ) देशा-विदेशातील व इतर राज्यातील पादुका दर्शन कार्यक्रमासाठी आयोजकांकडून खालीलप्रमाणे व्यवस्था होणे अपेक्षित आहे.**

| अ.नं. | श्रींचे पादुका दर्शन कार्यक्रमासाठी आवश्यक असलेल्याव्यवस्थेबाबत तपशील. |
|---|---|
| १) | **कार्यक्रमाचे ठिकाणी श्रींच्या मुळ पादुका व्यतिरिक्त इतर प्रतिकात्मक पादुका व प्रतिकात्मक समाधी नसणेबाबत.** |
| | १.संस्थानचे श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त होणा-या पादुका दर्शन सोहळयाकरीता श्रीसाईबाबांच्या म्युझियम हॉलमध्ये ठेवण्यातआलेल्या श्रींच्या मुळ पादुकांपैकी एक पादुका भारतात व परदेशात नेण्यात येतील. तसेच जे साईमंदिरे श्रींच्या पादुकांची मागणी करतील, त्यांची शताब्दी कक्षामार्फत योग्य ती चौकशी व खातरजमा करुन त्यांना चांदीच्या पादुका उपलब्ध करुन द्याव्यात. या पादुकांसोबत संस्थानची दक्षिणा पेटी व देणगी पुस्तक ठेवण्यात यावे (मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ चे सभेतील विषय नं.०३, निर्णय क्र.२८० नुसार) |
| | २.पादुका दर्शन सोहळ्याकरीता ज्या ठिकाणी जाण्याचे नियोजन आहे, अशा ठिकाणी श्रीसाईबाबांची प्रतिकात्मक समाधी नसावी. |
| | ३.पादुका दर्शनासाठी नेण्यापुर्वी संस्थानचे लेखाशाखेमार्फत सदर पादुकांचा विमा उतरविणे आवश्यक आहे. |
| | ४.श्रींच्या पादुका कोणत्या ठिकाणी न्याव्यात व कोणत्या ठिकाणी नेऊ नये याबाबत निर्णय घेणेचा अधिकार पुर्णपणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा राहील. |
| | ५.पादुका कोणत्याही परिस्थितीत नियोजित ठिकाण सोडून इतरमंदिर अथवा कोणाच्या घरी नेऊ नयेत. |
| २) | **कार्यक्रमासाठी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी जागा उपलब्ध करावी. (मैदान किंवा स्टेडीयम)** |
| | १. पादुका दर्शन कार्यक्रमासाठी पुरेसेस्टेज आयोजकाने तयार करावयाचे आहे. |
| | २. दर्शनरांगेसाठी पुरेशी रेलींग व्यवस्था आयोजकाने करावयाची आहे. |
| | ३. भजनसंध्या कार्यक्रमासाठी स्टेजची व्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | ४. दर्शकांची बैठक व्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | ५. महाप्रसाद व त्याकरीता आवश्यक बैठक व्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | ६. दर्शनार्थी भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | ७. संस्थान प्रकाशनांसाठी स्टॉल व्यवस्था आयोजकांनी करुन द्यावयाची आहे. |
| | ८. भक्तांसाठी खाद्यपदार्थांचे स्टॉल व्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | ९. जागोजागी डस्टबीनची व स्वच्छतागृहांची व्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | १०. स्टेजवर लाईट व फॅन व्यवस्था योग्य त्या सुरक्षीततेसह आयोजकांनी करावयाची आहे |
| | ११. स्टेज डेकोरेशन (शताब्दी लोगोसह, संस्थानचे बॅनरसह), तसेच ध्वनीक्षेपणव्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | १२.कार्यक्रमाचे ठिकाणी आवश्यक ती सुरक्षीततेची अग्निशमनची उपकरणे,इ. ची व्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | १३.संस्थानचेदेणगी काऊंटर असावे, इतर कोणाचेही नसावे. आवश्यकतेनुसार संस्थानमार्फतदक्षिणा पेट्या ठेवाव्यत. |
| ३) | **शिर्डी येथून येणा-या मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष,मा.विश्वस्त, मा.का.अ, मा.उपका.अ यांची स्वतंत्र निवास व्यवस्था व इतर कर्मचारी वृंदांसाठी स्वतंत्र निवासव्यवस्था व नाष्टा,जेवण,चहापानाची व्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे.** |
| ४) | **श्रींच्या पादुकांसाठी सुरक्षित जागा असावी. तसेच आवश्यक व परिपुर्णसुरक्षा रक्षकांची नेमणूक करणे.** |
| ५) | **प्रचार व प्रसिद्धी (शताब्दी लोगो व शिर्डी मंदिर कळस) इत्यादीचे नियोजन करणे.** |
| | १. स्थानिक केबलधारकांकडून याबाबत प्रसिध्दी देणेची व्यवस्था करावी. |
| | २. होर्डींग्ज/बॅनर तयार करुन योग्य ठिकाणी लावणेची व्यवस्था करणे. |
| | ३. पॅम्प्लेटस् छापुन कार्यक्रम व संस्थनमार्फत भक्तांनाकरीता राबविणेत येणा-या योजनांची प्रसिध्दी देणे. |
| | ४. सोशल मिडीया व्हाटस्‌ॲप व फेसबुक इत्यादी साईटवर प्रसिद्धी देणे. |
| | ५. न्यूजपेपरमधून प्रसिद्धी देणे. |
| ६) | **वाहन व्यवस्था करणे.** |
| | १. विमानतळ/रेल्वे स्टेशनपासून निवासव्यवस्थेपर्यंत मा.विश्वस्तांसाठी वाहनव्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | २. विमानतळ/रेल्वे स्टेशन ते निवासव्यवस्थेपर्यंत कर्मचारीवर्गासाठी वाहनव्यवस्था तसेच अधिकारी/कर्मचारी यांना कार्यक्रम स्थळाचे जवळ निवासव्यवस्था आयोजकांनी करावयाची आहे. |
| | ३. श्रींचे पादुकांसाठी सुरक्षारक्षकांसहीत तीन वाहनाचे नियोजन करावयाचे आहे. मधल्या वाहनामध्ये श्रींच्या पादुका असतील त्यातीलपुढे व मागे सुरक्षा वाहन असावे. तसेच आवश्यक त्याठिकाणी पादुका विमानाने नेण्यात याव्यात. |
| | ४. श्रींच्या पादुका मिरवणूकसाठी चित्ररथ व्यवस्था तसेच दुचाकी-चारचाकी गाडयांचा ताफा इ.ची व्यवस्था करणेत यावी. |
| ७) | **पत्रकार परिषदेसाठी जागा उपलब्ध करुन देणे.** |
| | १. पत्रकारांना देणेसाठी प्रसिद्धीपत्रक छापणे |
| | २. पत्रकारांच्या चहापानाची व्यवस्था करणे |
| | ३. पत्रकारांचा शाल, श्रीफळ व श्रींची मूर्ती देऊन सत्कार करणे अथवा यथोचित सन्मान करणे. |
| ८) | **संबंधीत प्राधिकरणाकडून आवश्यक परवानगी घेणेत यावी.** |

| | |
|---|---|
| | १.पोलिस परवानगी घेणेव गर्दीचे नियोजनाकरीता पुरेसा बंदोबस्तठेवणेची कार्यवाही आयोजकांनी करावयाची आहे. |
| | २.नगरपालिका किंवा तत्सम कार्यालयाची परवानगी |
| | ३.पादुका दर्शन सोहळा, मिरवणूक, श्रीसाई भजन संध्या व इतर कार्यक्रम यांच्या तत्सम परवानग्या संबंधीत आयोजकाने विहीत वेळेत घ्यावयाच्या आहेत. |
| **९)** | **निमंत्रण व सत्कार समारंभबाबत कार्यवाही करणे.** |
| | स्थानिक आमदार, खासदार, मंत्री, नेतेमंडळी, ज्येष्ठ कलाकार, पत्रकार व इतर महत्वाचे व्यक्तींना निमंत्रण देण्यात यावे. तसेच त्यांचा यथायोग्य सत्कार करण्यात यावा. |
| **१०)** | **दर्शनार्थींची सुरक्षा व्यवस्था उत्कृष्ट असावी.** |
| | १.दर्शन सोहळयाचे असलेले ठिकाण हे रुग्णालये, निवासी क्षेत्र, शैक्षणिक संकुलापासून योग्यअंतरावर असावे. |
| | २.दर्शन सोहळयाचे ठिकाणी प्रथमोपचार केंद्र,ॲम्ब्युलन्स सुविधा, अग्निशमन व्यवस्था असावी. |
| | ३.पादुका दर्शन सोहळयाचे ठिकाणी गर्दीचे नियोजन करण्यात यावे, आपत्कालीन परिस्थीतीत योग्य ती उपाययोजना व्हावी. |
| **११)** | **पादुका दर्शन सोहळ्याचे ठिकाणी विविध प्रदर्शनठेवणेत यावे.** |
| | कार्यक्रमाचे ठिकाणी शक्य असल्यास श्रीसाईबाबांचेग्रंथ प्रदर्शन/ चित्र प्रदर्शन/ रांगोळी प्रदर्शन व तत्सम प्रदर्शन ठेवावे. |
| **१२)** | **विमा** |
| | १) पादुका दर्शन सोहळ्याकरीता येणा-या भक्तांचा योग्य तो अपघात विमा उतरविण्यात यावा. |
| | २)शिर्डी येथुन श्रींच्या पादुकांचा विमा उतरविण्यात यावा. तसेच कार्यक्रमाकरीता संस्थानचे अधिकारी, पदाधिकारी व इतर कर्मचारी यांचा प्रवासासह विमा उतरविण्यात यावा. |
| **१३)** | **कार्यक्रमाची रुपरेषा व नियोजन योग्य पध्दतीने करणेत यावे.** |
| | १.कार्यक्रम एक दिवसीय असावा. त्यामध्ये काकड आरती व शेजारती करता येणार नाही. तसेच शिर्डी माझे पंढरपुर,माध्यान्ह आरती व धूपारतीची वेळ शिर्डी येथील वेळेप्रमाणे असावी व त्याचे पालन काटेकोरपणे केले जावे. |
| | २. तसेच कार्यक्रमाची रुपरेषा व कार्यक्रमाचे नियोजन संस्थानचे मंदिर विभाग व शताब्दी कक्ष हे एकत्रीत करतील. |
| | ३.कार्यक्रमाचे सुरुवातीस सनई-चौघडा वादन असावे, मध्यंतरीचे वेळेतव इतर वेळेत त्या राज्याचे भाषेतील विविध सांस्कृतिक व साईभजन कार्यक्रमाचे नियोजन असावे. |
| | ४.त्याचप्रमाणे कार्यक्रमाचे सुत्रसंचलनाकरीता स्थानिक भाषा व मराठी/हिंदी/इंग्रजी यापैकी एक भाषेचे ज्ञान असलेल्या जाणकार व्यक्तीस नेमाणेत यावे. |
| | ५.मिरवणूकीसाठी बॅण्ड, ढोलपथक वा तत्सम स्थानिक कलापथके स्थानिक परवानगीने नेमण्यात यावी. |
| | ६.आयोजकाने दर्शनार्थी भक्तांना दर्शनानंतर शक्य असल्यास वितरणासाठी प्रसाद पाकीटे उपलब्ध करुन द्यावीत. |
| **१४)** | **संस्थानचे नावलौकीकास बाधा येणार नाही याबाबत संबंधीत आयोजकाची जबाबदारी असेल व त्याबाबतची खबरदारी व दक्षता आयोजकांनी घ्यावयाची आहे.** |
| **१५)** | **श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे नावाचा इतर खाजगी कामासाठी अथवा उद्दिष्टांसाठी वापर करता येणार नाही.** |

**ब)** संस्थान मार्फत पादुका दर्शन व साईभजन संध्या कार्यक्रमासाठी आवश्यक मनुष्यबळाचे नियोजन शताब्दी कक्षामार्फत करण्यात येईल व कार्यक्रमाचे नियोजनाचे वेळी शताब्दी कक्षाचे आदेशानुसार संबंधीत विभागामार्फत आवश्यकतेनुसार मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात येईल.

तसेच श्रींच्या मुळ पादुका श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कार्यक्षेत्राचे बाहेर नेऊ नये , असे नम्र मत आहे. तरी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्षाकरीता पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमाकरीता नियमावली निश्चित होणेकामी व त्यासाठी संस्थानचे मनुष्यबळ नेणेकामी निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.६८६** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, साईपादुका दर्शन सोहळा विविध राज्यांमध्ये आयोजित करण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करणेसाठी समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे व मुख्यकार्यकारी अधिकारी यांची समिती गठीत करणेत आली. या समितीने साईपादुका दर्शन सोहळयासाठीची नियमावली ८ दिवसांमध्ये अंतीम करावी, असे ठरले.**

(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख/ समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१** **देशभरातील विविध राज्यांमध्ये साई पादुका दर्शन सोहळा आयोजित करण्यासंदर्भात प्राप्त प्रस्तावांवर सविस्तर चर्चा करुन, धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद –**

(१) कलम २१ मधील पोट कलम १(ड)श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे

(२) कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय –**

१) दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१७१

*"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते ३१ ऑक्टोबर, २०१८ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजीक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरुपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे. तसेच श्रींचे पादुका जवळपास १०० ठिकाणी दर्शनासाठी पाठविण्यात याव्यात."*

२) दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२८०

*"जे सर्वसामान्य साईभक्त श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येऊ शकत नाही, अशा साईभक्तांच्या सोयीसाठी, समाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्रींच्या मुळ पादुका देश– विदेशामध्ये ठिकठिकाणी दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात याव्यात. यासाठी जी साईमंदिरे बाबांच्या पादुकांची मागणी करतील, त्यांची योग्य ती चौकशी व खातरजमा करुन, त्यांनाही चांदीच्या पादुका दर्शनासाठी उपलब्ध करुन द्याव्यात. या पादुकांसोबत संस्थानची दक्षिणा पेटी व देणगी पावती पुस्तक ठेवण्यात यावे. मंदिर विभागाने या संबंधीची नियमावली तयार करावी व समाधी शताब्दी वर्षातील मुळ पादुका दर्शन सोहळ्याची सुरुवात आंध्रप्रदेश राज्यातील विजयवाडा येथून करणेत यावी. या ठिकाणी श्रींच्या भक्तांची संख्या जास्त प्रमाणात आहे.".*

३) "दिनांक २३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३५८

शताब्दी वर्षाचे प्रत्येक महिन्यात पादुका दर्शन कार्यक्रम आयोजित करावा. पादुका दर्शन सोहळयासाठी सर्व सोयीयुक्त संस्थान वाहन तयार करुन घेण्यात यावे. या कार्यक्रमाचे नियोजन व खर्च त्या-त्या राज्यातील दानशूर साईभक्तामार्फत किंवा मंदिरामार्फत करण्यात यावे. तसेच देश विदेशातील पादुका दर्शनासाठी दोन पादुकांचा सेटचा वापर करण्यात यावा. तसेच महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात पादुका दर्शन सोहळा आयोजित करण्यात यावा."

४) दिनांक २५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ६२५

*"श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सन २०१७-१८ चे कालावधीत भारतात व परदेशात श्री साईपादुका दर्शन व साईभजन संध्या कार्यक्रमाचा पहिल्या ०३ (ऑक्टोबर ते डिसेंबर -२०१७) महिन्यांसाठीचे कार्यक्रम निश्चित करुन पुढील सभेसमोर सादर करणेत यावे तसेच पादुका सोहळयासाठी सर्व ठिकाणी मुळ पादुका पाठवू नयेत. मागणी करणा-या संस्थेची क्षमता पाहुनच पादुका दर्शनासाठी पाठविणेत याव्यात. सदरहु पादुका दर्शन सोहळयासाठी पाठविणेकामी महाराष्ट्रासाठी एक व महाराष्ट्राबाहेरील राज्यांसाठी एक अशी दोन वाहनांची व्यवस्था करणेत यावी."*

**प्रस्तावना**:- श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि. १ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे.

*जे सर्वसामान्य साईभक्त श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येऊ शकत नाही, अशा साईभक्तांच्या सोयीसाठी, समाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्रींच्या मुळ पादुका देश –विदेशामध्ये ठिकठिकाणी दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात याव्यात असा निर्णय दिनांक २८/०४/२०१७ रोजीचे सभेत झालेला आहे.*

**प्रस्ताव**:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेकामी दि.०३/०६/२०१७ रोजी प्रशासकीय अधिकारी व विभाग प्रमुख यांचे समवेत झालेल्या बैठकीत मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांनी पादुका दर्शन कार्यक्रमासाठी ज्यांचे प्रस्ताव संस्थानकडे प्राप्त झाले आहेत अशांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे, असे निर्देश दिलेले आहेत.

तसेच मा. अध्यक्ष सो. यांनी दिलेल्या निर्देशानुसार शिर्डी येथे झालेल्या देशविदेशातील साईमंदिरांचे चर्चासत्राला हजर असणा-या साईमंदिरांना, वर्तमानपत्रातून तसेच संस्थानच्या सकेंतस्थळावरुन श्रींचे पादुका दर्शन

सोहळा आयोजीत करणेबाबत आवाहन करणेत आले होते, सदर जाहिरातीस चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळत असून याबाबत अजूनही काही मंदिरांचा संस्थानकडे पादुका दर्शन सोहळा घेणेबाबत पत्रव्यवहार सुरु आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे वेळावेळी झालेल्या निर्णयांनुसार कार्यवाही करणेसाठी संस्थानकडे प्राप्त झालेल्या सर्वच प्रस्तावधारकांकडून माहिती मागविण्यात आलेली आहे व अजूनही काही प्रस्ताव येत आहेत. त्याची माहिती सोबत **'परिशिष्ट'** म्हणून जोडली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/०७/२०१७ रोजीचे सभेत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सन २०१७-१८ चे कालावधीत भारतात व परदेशात श्री साईपादुका दर्शन व साईभजन संध्या कार्यक्रमाचा पहिल्या ०३ (ऑक्टोबर ते डिसेंबर -२०१७) महिन्यांसाठीचे कार्यक्रम निश्चित करुन पुढील सभेसमोर सादर करणेत यावे, असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार पहिल्या ०३ महिन्यांसाठी प्रस्तावित करण्यात येत असलेल्या गोवा, तामिळनाडू- पॉन्डेचरी व गुजरात येथील **मंदिर/ ट्रस्ट/ साईभक्तांची** माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | महिना | राज्य | शहर / गांव | मंदिर/ट्रस्ट/साईभक्तांचे नांव | आयोजकाकडून अंदाजे करण्यात येणारा खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | ऑक्टोबर, २०१७ | गोवा | पणजी | गोवा प्रदेश श्री साई पादुका दर्शन सोहळा समिती, पणजी | ४० लाख |
| २. | नोव्हेंबर, २०१७ | तामिळनाडू | चैन्नई | शिर्डी साईबाबा डिव्होटिज ट्रस्ट | १. ५ कोटी |
| | | | चैन्नई | ऑल इंडीया साई समाज | खर्च नमूद नाही (as it cost) |
| | | | कोईमतूर | शिर्डी साईबाबा डिव्होटिज, कोईमंबतुर | ५० ते ६० लाख |
| | | | करुर | शिर्डी साई चॅरिटेबल ट्रस्ट, करूर | २० लाख |
| | | पॉन्डेचरी | पॉन्डेचरी | इंटरनॅशनल शिर्डी साईबाबा डिव्होटिज ट्रस्ट, पॉडेचरी | आवश्यक तेवढा |
| ३. | डिसेंबर, २०१७ | गुजरात | अहमदाबाद | श्री शिर्डी साईबाबा समाज सेवा संस्थान, अहमदाबाद | २५ लाखापेक्षा जास्त |
| | | | सुरत | साई विश्व समस्त साईभक्त मंडळ, सुरत व श्री साईगणेश सेवा ट्रस्ट, सुरत | १ ते १.५ कोटी |
| | | | सुरत | श्री साई गणेश सेवा ट्रस्ट, सुरत | २५ ते ३० लाख |

उपरोक्त नमूद तक्त्यातील गोवा या राज्यात जाणेसाठी दि.१३ व १४ आक्टोबर, २०१७ ही तारीख शताब्दी वर्ष सुरु होण्याचा अल्प कालावधी विचारात घेता मा. अध्यक्ष सो. यांचेशी चर्चा करुन कार्यक्रमाची तारीख निश्चित केलेली असून याबाबत आयोजकांना कळविणेत आले आहे. आता नोव्हेंबर व डिसेंबर, २०१७ या महिन्यात उपरोक्त नमूद तामिळनाडू- पॉन्डेचरी व गुजरात या राज्यांमध्ये जाण्यासाठी तारीख निश्चित करावी लागेल.

उपरोक्त नमूद परिस्थिती विचारात घेता, आता खालील बाबींवर तातडीने निर्णय होणे गरजेचे आहे

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत (निर्णय क्रं.३५८) पादुका दर्शन सोहळयासाठी मुळ पादुका नेणेबाबतचे झालेल्या निर्णयावर पुर्नःविचार होणेबाबत निर्णय घेणे.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेत ठरलेप्रमाणे श्री साईपादुका दर्शन सोहळा कार्यक्रमाचे ऑक्टोंबर, नोव्हेंबर व डिसेंबर -२०१७ या महिन्यांतील तारखा, ठिकाण व आयोजक निश्चित करणे.

३) साईपादुका दर्शन सोहळयासाठी प्राप्त प्रस्तावांची छाननी करणेसाठी मा. विश्वस्त यांची समिती नेमून प्रस्तावांची छाननी करुन कार्यक्रमाचे ठिकाण, दिनांक व आयोजक निश्चित करणे.

४) छाननी नंतर अंतिम केलेल्या प्रस्तावांच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी विश्वस्त व अधिकारी यांच्या समितीने प्रत्येक ठिकाणी भेटी देऊन कार्यक्रमाचे सविस्तर नियोजन करणेसाठी आवश्यक कार्यवाही करणे.

५) विविध ठिकाणी आयोजित करावयाच्या पादुका दर्शन कार्यक्रमासाठी प्रत्येकवेळी किमान दोन विश्वस्त व किमान दोन अधिकारी उपस्थित राहतील व त्यासाठी वेळोवेळी येणा-या तातडीच्या आवश्यक खर्चास मान्यता देणे.

६)	बाहेरील राज्यात तसेच परदेशात पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमासाठी खालील विभागांपैकी आवश्यकतेप्रमाणे कर्मचारी पाठविणेबाबत निर्णय घेणे.

| अ.नं. | विभागाचे नाव | कर्मचारी संख्या | | अ.नं. | विभागाचे नाव | कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मंदिर विभाग | ०५ | | ०२ | संरक्षण विभाग | ०६ |
| ०३ | लेखाशाखा | ०३ | | ०४ | प्रकाशने विभाग | ०२ |
| ०५ | सीसीटिव्ही | ०२ | | ०६ | वाहन विभाग | ०४ |
| ०७ | शताब्दी कक्ष | ०२ | | | | |

७)	पादुका सोबत महाराष्ट्र शासनाचे पोलीस विभागाचा बंदोबस्त घेणेबाबत निर्णय घेणे.

८)	आवश्यकतेप्रमाणे काही प्रसंगी देशातंर्गत विमान प्रवासाने पादुका नेणे व आणणेबाबत निर्णय घेणे

तरी पादुका नियमावलीस अधिन राहून, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात सोबतच्या परिशिष्टात दर्शविल्याप्रमाणे उपरोक्त बाबींवर निर्णय धोरणात्मक निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६८७**	**उपरोक्त विषयावर सविस्तर चर्चा होऊन, समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे व मुख्यकार्यकारी अधिकारी यांची समिती गठीत करणेत येऊन, या समितीने देशभरातील विविध राज्यांमध्ये साई पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची ८ दिवसांमध्ये छाननी करुन अंतिम करावे. तसेच परदेशातील अर्जांची छाननी करतेवेळी समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे. पादुका दर्शन सोहळयासाठी देशातील काही ठराविक ठिकाणी श्रींच्या मुळ पादुका व परदेशात चांदीच्या पादुका पाठविण्यात याव्यात, असे ठरले.**

**माहे आक्टोंबर २०१७ या महिन्यात साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजीत करावयाचा पादुका दर्शन सोहळयाची सुरुवात दि.१३ व १४ आक्टोंबर २०१७ रोजी पणजी (गोवा) येथून करणेत यावी. त्यासाठी गोवा प्रदेश श्री साईदर्शन पादुका सोहळा समिती, पणजी यांचे मुळ पादुका दर्शन प्रस्तावास मान्यता देणेत आली. उपरोक्त छाननी समितीने अंतिम केलेल्या प्रस्तावांच्या ठिकाणी समिती सदस्य व संस्थानचे अधिकारी यांनी उपलब्धतेनुसार प्रत्यक्ष भेटी देऊन कार्यक्रमाच्या पुर्वतयारीचा व नियोजनाचा आढावा घ्यावा. पादुका दर्शन सोहळयाचे पूर्वतयारी व पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेसाठी येणाऱ्या अनुषंगीक सर्व खर्चास/ प्रवास खर्चास (वाहन, रेल्वे, विमान) मान्यता देण्यात आली.**

**राज्यात, परराज्यात परदेशात पादुका दर्शन कार्यक्रमासाठी प्रस्तावित केल्यानुसार आवश्यकतेप्रमाणे कर्मचारी पाठविणेत यावेत. प्रत्येक पादुका दर्शन सोहळयासाठी सोबत जावयाच्या कर्मचाऱ्यांचे विभाग, संख्या व नामनिर्देश याबाबत मुख्यकार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेणे आवश्यक राहील. यासाठी येणाऱ्या आवश्यक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**विविध ठिकाणी आयोजित करावयाच्या पादुका दर्शन सोहळयासाठी प्रत्येक वेळी उपलब्धतेप्रमाणे सर्व विश्वस्त व किमान २ अधिकारी यांना उपस्थित राहण्यास व त्यासाठी येणाऱ्या अनुषंगीक सर्व खर्चास/ प्रवास खर्चास (वाहन, रेल्वे, विमान) मान्यता देण्यात आली. उपस्थित राहणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नामनिर्देशीत करणे आवश्यक राहील, असे ठरले.**

**आवश्यकतेनुसार तातडीच्या प्रसंगी देशातंर्गत विमान प्रवासाने पादुका घेऊन जाणे-येणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. याबाबत वेळोवेळी प्रसंगानुरुप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा, असे ठरले व त्यासाठीच्या अनुषंगीक सर्व खर्चास मान्यता देण्यात आली. पादुका दर्शन सोहळयासाठी प्रवास व इतर ठिकाणी सुरक्षेच्या कारणास्तव हत्यारी पोलीस बंदोबस्त घेणेस व त्यासाठीच्या अनुषंगीकखर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२**	**दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी आयोजित करावयाचे श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाचे शुभारंभ कार्यक्रमासाठी मंदिर परिसराचे पुर्वेकडील नियोजित टेन्साईल फॅब्रीकचे शेडमध्ये स्टेज व इतर अनुषंगीकव्यवस्था करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:** श्री साईबाबा यांच्या समाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्षे पूर्ण होत असल्याने त्याचे औचित्य साधून श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर,२०१७ ते १८ ऑक्टोबर, २०१८ (विजया दशमी) अखेर साजरे करणेत येणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. समाधी शताब्दी वर्षामध्ये श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येणा-या भक्तांना सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देता याव्यात यासाठी टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स, मुंबई यांचेमार्फत कृती आराखडा तयार करणेत आला आहे यासाठी विधी व न्याय विभाग, शासन निर्णय दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली कृती आराखडा समिती गठीत करणेत आली आहे. दि.३१/०३/२०१७ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली विधान भवन, मुंबई येथे झालेल्या कृती आराखडा समितीच्या बैठकीत रु.३०२३.१७ कोटी मात्र खर्चाचे कृती आराखडयास मान्यता देण्यात आली आहे. सदरहू आराखडयामध्ये धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजनसाठी रु.२५ कोटी इतक्या खर्चाची कामे प्रस्तावीत करण्यात आली आहेत.

**अ)** दि.०१ ऑक्टोंबर,२०१७ रोजी सन्मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते नियोजित असलेल्या शताब्दी वर्ष शुभारंभ कार्यक्रमासाठी मंदिर परिसराचे पुर्वेकडील मोकळया जागेत, ज्या ठिकाणी सध्या टेन्साईल फॅब्रीक शेड उभारण्याचे काम प्रगतीत आहे त्या शेडमध्ये स्टेज,डेकोरेशन व इतर अनुषंगीक कामांसाठी या क्षेत्रात काम करणा-या सजावटकार यांचेकडून प्राप्त अंदाजपत्रकानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे

| **अ.नं.** | **कामाचा तपशिल** | **कायम स्वरुपी स्टेज व्यवेस्थेसाठी अपेक्षीत खर्च** | **तात्पुरते स्टेज व्यवस्थेसाठी अपेक्षीत खर्च** |
|---|---|---|---|
| **A)** | **स्टेज व्यवस्था** | | |
| ०१ | सिव्हील वर्क | ९२,२५४/- | २८१३७/- |
| ०२ | एम एस फ्रेम वर्क | ११,४५,०००/- | ३,४९,२२५/- |
| ०३ | छताकरीता बायसन बोर्ड | ३,७८,८४०/- | १,१५,५४६/- |
| ०४ | वुडन पॅनलींग | ६,०६,७२०/- | १,८५,०५०/- |
| ०५ | एफआरपी डेकोरेटीव्ह वर्क | २६,००,०००/- | ७,९३,०००/- |
| ०६ | डेकोरेटीव्ह फ्लोरींग | २,६०,८००/- | ७९,५४४/- |
| ०७ | एलईडी लायटींग | १०,००,०००/- | ३,०५,०००/- |
| ०८ | एलईडी स्क्रीन | ३०,००,०००/- | ९,१५,०००/- |
| ०९ | पेटींग | ७,५०,०००/- | २,२९,४९८/- |
| **स्टेज करीता एकूण खर्च रु- (A)** | | **९८,३३,६१४/-** | **३०,००,०००/-** |
| **B)** | **डेकोरेटीव्ह एन्ट्री गेट** | १८,००,०००/- | १८,००,०००/- |
| | **एकूण – (A+B)** | **१,१६,३३,६१४/-** | **४८,००,०००/-** |

**ब)** **तसेच वर नमूद स्टेज व्यवस्थेव्यतिरिक्त शेडमध्ये खालीलप्रमाणे इतर आवश्यक व्यवस्था करावी लागेल.**

(कालावधी:- दि.०१/१०/२०१७ अखेर १ दिवस.)

| **अ.नं.** | **व्यवस्थेचा तपशिल** | **परिमाण** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| ०१ | स्वागत कमानी २X२ साईजचे बॉक्सच्या ०२ नग कमीत कमी १५ फुट रुंदीच्या बॉक्स टाईप कमानी बांधणे. | ०२ नग | ५,०००/- | १०,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | टेन्साईल फॅब्रीकचे संपुर्ण शेडमध्ये मॅटीन व सतरंजी टाकणे. कार्यक्रमास उपस्थीत असलेल्यांसाठी बैठक व्यवस्थेकामी संपुर्ण शेडमध्ये सिंथेटीक मॅटीन टाकून त्यावर स्वच्छ व सुशोभित वेलवेट मॅटीन टाकणे. | १६००० चौ. फुट | ३/- | ४८,०००/- |
| ०३ | शेडचे पुर्व व पश्चिम साईडने आतिल बाजूस पुर्ण १५ फुट उंचीची स्वच्छ व सुशोभित कापडाची कनात व बाहेरील बाजूने प्लास्टीक ताडपत्री बांधणेसाठी आवश्यक एम एस पाईपचे स्ट्रक्चरसह व्यवस्था करणे. | ४०० र. फुट | ५/- | २०००/- |
| ०४ | शेडचे मागील बाजुस पुर्ण २२ फुट उंचीची स्वच्छ व सुशोभित कापडाची कनात व बाहेरील बाजूने प्लास्टीक ताडपत्री बांधणेसाठी आवश्यक एम एस पाईपचे स्ट्रक्चरसह व्यवस्था करणे. | १४० र. फुट | ७/- | ९८०/- |
| | | | **एकूण रक्कम रु. (ब)** | **६०,९८०/-** |

**प्रस्ताव:- सदर प्रस्तावाबाबत खालील बाबींविषयी निर्णय होणेस विनंती.**

१) वरील 'अ' मध्ये नमूद केलेप्रमाणे कायम स्वरुपी स्टेज व्यवस्था करावयाची झाल्यास त्यासाठी डेकोरेटीव्ह गेटसह येणारे रक्कम रु.१,१६,३३,६१४/- मात्र खर्च येईल सदर खर्चास व या कामासाठी ई–निविदा मागविणेस मान्यता देणे.

**अथवा**

तात्पुरते स्टेज व्यवस्था करणेकामी डेकोरेटीव्ह गेटसह येणारे रक्कम रु.४८,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास व या कामासाठी ई- निविदा मागविणेस मान्यता देणे. किंवा अन्य पर्यायावर मा. व्यवस्थापन समितीत चर्चा होऊन निर्णय घेणे.

२) वरील खर्च हा ई– निविदा प्रक्रिया राबवून करणे आवश्यक आहे. तथापी ०१ ऑक्टोबर हा कालावधी जवळ आल्याने व उपलब्ध कालावधी कमी असल्याने, निविदा प्रक्रिया पूर्ण करणे शक्य होणार नाही. यासाठी देणगीदार उपलब्ध झाल्यास त्यांचेकडून उपरोक्त खर्च करणे, यावर चर्चा होऊन निर्णय घेणे.

३) वरील 'ब' मध्ये नमूद स्टेज व्यतिरिक्त शेडमध्ये इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी रक्कम रु.६०,९८०/- मात्रचा खर्च अपेक्षित असून सदरची व्यवस्था करणेसाठी मंडप ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविणेस मान्यता देणे.

तरी वरील बाबींविषयी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६८८** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाचे शुभारंभ कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्था करणेकामी, विविध स्टेजच्या नमुन्यांचे सादरीकरण करणेसाठी सल्लागार श्री.नितिन देसाई यांचे प्रतिनिधी आजचे सभेसमोर उपस्थित होते. त्यांनी सभेसमोर सादरीकरण केले व सभेने विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाचे शुभारंभ कार्यक्रमासाठी व शताब्दी महोत्सवामध्ये वर्षभर होणाऱ्या कार्यक्रमांसाठी स्टेज व्यवस्था तयार करणेकामी खालीलप्रमाणे कामे करुन घेण्यात यावीत.**

| अ.नं. | कामाचा तपशिल | कायम स्वरुपी स्टेज व्यवेस्थेसाठी अपेक्षीत खर्च | तात्पुरते स्टेज व्यवस्थेसाठी अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| **A)** | **स्टेज व्यवस्था** | | |
| ०१ | सिव्हील वर्क | ९२,२५४/- | --- |
| ०२ | एम एस फ्रेम वर्क | ११,४५,०००/- | --- |
| ०३ | छताकरीता बायसन बोर्ड | --- | १,१५,५४६/- |
| ०४ | वुडन पॅनलींग | --- | १,८५,०५०/- |
| ०५ | एफआरपी डेकोरेटीव्ह वर्क | --- | ७,९३,०००/- |
| ०६ | डेकोरेटीव्ह फ्लोरींग | --- | ७९,५४४/- |
| ०७ | एलईडी लायटींग | --- | ३,०५,०००/- |
| ०८ | एलईडी स्क्रीन | --- | ९,१५,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०९ | पेटींग | --- | २,२९,४९८/- |
| **B)** | **डेकोरेटीव्ह एन्ट्री गेट** | --- | १८,००,०००/- |
| | **एकूण रु.** | १२,३७,२५४/- | ४४,२२,६३८/- |

**उपरोक्त कायम व तात्पुरत्या स्वरुपात करावयाच्या कामांच्या अंदाजपत्रकाची फेर छाननी करुन कमीत-कमी खर्चामध्ये सदरहू कामे करुन घेण्यात यावीत.**

**तसेच डेकोरेटीव्ह एन्ट्री गेट तयार करणेकामी सभेस दाखविण्यात आलेल्या डेमोमधील गेट खुपच भपकेबाज व अवाढव्य होते. ते गेट आटोपशीर व आकर्षक त्याचप्रमाणे कमी किमतीमध्ये तयार करावे.**

**तसेच ब तक्त्यामध्ये नमुद केलेप्रमाणे स्टेज व्यवस्थेव्यतिरिक्त इतर आवश्यक व्यवस्था करणेस मान्यता देण्यात आली.**

**उपरोक्त कामे करुन घेण्यासाठी कमी कालावधी असल्यामुळे सदरहू कामे देणगीदारांमार्फत, देणगी स्वरुपात करुन घेण्यात यावीत, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात आयोजित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमात शिर्डी ग्रामस्थांचे सहभागाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

४) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्नकामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

५) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

६) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समिती ठराव:-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.१७१ खालीलप्रमाणे समंत करणेत आलेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवा निमित्ताने दि.०१ ऑक्टोंबर, २०१७ ते ३१ऑक्टोंबर, २०१८ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजीक साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरुपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे, असे ठरले आहे.

*२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५८ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.*

*------- समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्या कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणेत येऊन झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.*

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे.

सदर कार्यक्रमांचे स्वरुप व रुपरेषा ठरविणेसाठी आजतागायत शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना वजा प्रस्ताव, जागतिक साईमंदीर विश्वस्त परिषदमध्ये झालेली चर्चा तसेच वेळोवेळी मा.

व्यवस्थापन झालेल्याबैठका यातील मुद्दे विचारात घेऊन मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर सभेतील निर्णय क्रमांक १७१ नुसार शताब्दी वर्षाचे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ याकालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक तयार करणेत आले होते. सदरचे वेळापत्रक मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत सादर करण्यात आले होते. सदर सभेत *शताब्दीचे अनुषंगाने इतर विविध विषयावर चर्चा करणेत आली. व उपरोक्त चर्चेबरोबरच समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्या कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणेत येऊन झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.*

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षातील प्रत्येक महिन्यात विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमांचा समावेश करणेत आलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील कार्यक्रमांचा समावेश केलेला आहे.

१) ध्वजशोभायात्रा
२) रामनवमी उत्सवात आयोजित कुस्ती स्पर्धा
३) प. पु. गंगागीर महाराज अखंड हरीनाम सप्ताह
४) श्री साईचरीत्र पारायण सोहळा
५) श्री साईनाथ स्तवन मंजिरी

उपरोक्त नमूद कार्यक्रम व विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमामध्ये शिर्डी ग्रामस्थांचे सहभागा विषयी निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे.

**ध्वजशोभायात्रा-** श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्षाची सुरुवात दि.०१ ऑक्टोंबर २०१७ रोजी होत आहे. शताब्दी वर्षाची सुरुवात ध्वजरोहणाने करावयाची निश्चित झालेले असल्याने सदर ध्वजाची शिर्डी गावातून भव्य मिरवणूक काढण्याचे नियोजित आहे. सदर कार्यक्रम भव्य दिव्य होणेसाठी तसेच शिर्डी वाशियांसाठी हि एक अभूतपूर्व ठेव असणार आहे. त्यामुळे सदर कार्यक्रमासाठी शिर्डी ग्रामंस्थांचा सहभाग असणे क्रमप्राप्त आहे.

**रामनवमी उत्सवात आयोजित कृस्ती स्पर्धा –** दरवर्षी रामनवमी उत्सवात शिर्डी ग्रामंस्थांच्या वतीने भव्य स्वरुपात कुस्तीस्पर्धेचे नियोजन केले जाते. सदर कुर्स्तीस्पर्धेत देशातील विविध राज्यातील मल्ल सहभाग घेतात. संस्थानकडून सदर कुस्तीस्पर्धेसाठी मोठया प्रमाणात रक्कम दिली जाते.

शताब्दी वर्षाचे निमित्ताने संस्थानचा महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे तीन दिवस आयोजन करण्याचा मानस आहे. ०३ दिवस भव्य कुस्तीस्पर्धेचे नियोजन करावयाचे झाल्यास याबाबत या स्पर्धेचे नियोजनासाठी शिर्डी ग्रामंस्थांचा कितपत समावेश असावा किंवा दरवर्षी प्रमाणे शिर्डी ग्रामंस्थाकडून सदर स्पर्धेचे नियोजन करुन संस्थानने फक्त आवश्यक ती देणगी उपलब्ध करुन द्यावी याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

**प.पु.गंगागीर महाराज अखंड हरीनाम सप्ताह–** सदरचा सप्ताह आयोजनाचा कार्यक्रम शिर्डी ग्रामंस्थानी सूचविलेला आहे. याबाबत त्यांनी संस्थानकडे पत्रव्यवहार केला असून सप्ताह आयोजनासाठी गावकरी सातत्याने संस्थानकडे पाठपूरावा पुरावा करत आहे. तरी सदर कार्यक्रमाबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

**श्री साईचरीत्र पारायण सोहळा-** दरवर्षी साईचरीत्र पारायण सोहळा शिर्डी ग्रामंस्थाचे सहभागाने मोठया थाटामाटात पार पडत असतो. शताब्दी वर्षात शिर्डी ग्रामस्थ साईचरीत्र पारायण सोहळयासाठी सुमारे ५३ हजार पारायणार्थी पारायणासाठी बसविण्यासाठी प्रयत्नशिल आहेत.

**श्री साईनाथ स्तवन मंजिरी–** शताब्दी वर्षात योगायोगाने श्री साईनाथ स्तवन मंजिरी लेखनपुर्तीला १०० वर्ष पूर्ण होत असल्याने हाही कार्यक्रम संस्थानकडून भव्य स्वरुपात करण्याचे नियोजन आहे. करीता या कार्यक्रमात ग्रामस्थांचा सहभाग असणे क्रमप्राप्त आहे.

उपरोक्त नमूद कार्यक्रमांव्यतीरिक्त शताब्दी वर्षाचे अनुषंगाने २०१७-२०१८ मध्ये येत असलेल्या दिनविशेषाच्या दिवशी पुढीलप्रमाणे विविध धार्मिक व सामाजीक कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. १) रक्तदान शिबिर २) जागतिक अपंग दिन आयोजन, ३) अन्नदान कार्यक्रम, ४) कावडी कार्यक्रम, ५) जागतिक स्वच्छता दिनानिमित्त स्वच्छता अभियान, ६) अवयवदान संकल्प, ७) वनदिनानिमित्त ग्रीन शिर्डी कार्यक्रम राबविणे. या कार्यक्रमांच्या आयोजनामध्ये ग्रामंस्थांचा सहभाग असणे आवश्यक आहे.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजीत उपरोक्त नमूद धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमामंध्ये शिर्डी ग्रामंस्थाचे सहभागाबाबत विचारविनिमय होऊन धोरणात्मक निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६८९** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.**

**श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात करावयाच्या ध्वजयात्रेमध्ये ग्रामस्थांना सहभागी करुन घेण्यात यावे.**

**श्री रामनवमी उत्सवामध्ये कुस्ती स्पर्धा आयोजीत करणेबाबत समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांनी महाराष्ट्र केसरी व हिंद केसरी कुस्ती स्पर्धा शिर्डी येथे आयोजित करणेसाठी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक संबंधीतांकडून प्राप्त करुन घेऊन मा.व्यवस्थापन समितीच्या पुढील बैठकीत याबाबतचे सादरीकरण व सविस्तर सादर करावा.**

**प.पु. गंगागिरीजी महाराज अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन, व्यवस्थापन व सर्व खर्च ग्रामस्थांनी करावा. संस्थानकडून सदर कार्यक्रमातील काही बाबींचा (उदा. मंडप, स्टेज, पाणी पुरवठा) खर्च करावा. याबाबत समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांनी शिर्डी ग्रामस्थांशी चर्चा करुन, करावयाच्या खर्चाचा प्रस्ताव पुढील व्यवस्थापन समिती सभेत सादर करावा.**

**श्री साईचरित्र पारायण सोहळा दरवर्षीप्रमाणे ग्रामस्थांचे सहभागाने करुन त्याचा खर्च संस्थानने करावा. तथापि, यापेक्षा वेगळा व मोठया प्रमाणावर पारायण सोहळा करावयाचा असल्यास त्याचे आयोजन ग्रामस्थांनी करुन दरवर्षीप्रमाणे येणारा खर्च संस्थानने करावा व उर्वरित खर्च ग्रामस्थांनी करावा. तसेच दरवर्षीप्रमाणे सामुहिक स्तवनमंजिरी पठणाचा कार्यक्रम ग्रामस्थांचे सहभागाने करावा, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४** **साई पादुका दर्शन सोहळयाकरीता दोन ए.सी. प्रवासी बसमध्ये करावयाच्या सोयी-सुविधा करीता अंतर्गत बदल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील:-**

१) कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्यती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यकत त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) कलम २१ (१) मध्ये, विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल,--

(ख) - रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग) - भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

(ड) - श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. या कालावधीत शिर्डीत येणा-या भाविकांसाठी सोयीसुविधा उभारणे तसेच संपुर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येणार आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ चे सभेतील निर्णय क्र.६२७ नुसार,"साई पादुका दर्शन सोहळयाकरीता महाराष्ट्रातील पुर्ण जिल्हयांमध्ये श्रींच्या पादुका दर्शनासाठी घेऊन जाणेसाठी एक व बाहेरील राज्यांकरीता एक अशा ०२ अत्याधुनिक ए.सी. बस खरेदी करणेसाठी टाटा, अशोक लेलंण्ड व भारतबेंज या तीन कंपन्यांच्या बसेसबाबत तपशीलवार चर्चा करणेत येऊन, त्यामधील भारतबेंज या कंपनीची (917 Tourist A.C. Bus BS-IV, Mod.-35+1+1 SPB) बस खरेदी करणेचे निश्चित करणेत आले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे भारतबेंज कंपनीच्या 917 Tourist A.C. Bus BS-IV, Mod.-35+1+1 SPB या मॉडेलच्या ०२ अत्याधुनिक ए.सी. बस खरेदी करणेकामी भारतबेंज

कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यांकडून विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व सदरहू बसमध्ये श्रींच्या पादुका ठेवणेसाठी आवश्यक असलेली बॉडीबिल्डींग करणेस तसेच त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली”, असे ठरले.

**विभागाचा अभिप्राय:-** भारत बेंज कंपनीच्या 917 Tourist A.C. Bus BS-IV, Mod.-35+1+1 SPB या मॉडेलच्या दोन ए.सी. प्रवासी बसेस खरेदी करणेकामी जा.नं.एसएसएस/वाहन/२६०७/२०१७ दि.१०/०८/२०१७ रोजीचे पत्राने भारत बेंज कंपनीचे अधिकृत डिलरकडून दरपत्रके मागविण्यात आलेली आहेत. त्यानुसार सदर दोन बसेस खरेदी करुन ताब्यात मिळालेनंतर बसमध्ये साई पादुका नेणे करीता आवश्यक सोयी-सुविधाकराव्या लागतील.

अ) सदर बसमध्ये खालील तपशिला प्रमाणे बदल करावयाचा असल्यास त्याकामी एक बस करीता खर्च अपेक्षीत आहे.

| Sr. No. | Modification Of Bus | Amount |
|---|---|---|
| 1 | Providing & Applying Desmenting of Bus with removing & clearing of chairs, making place for sai baba statue platform including all necessary fabrication, gas cutting, welding, etc complete. | 4,00,000.00 |
| | Exterior of Bus | |
| A | Exterior of Structural Framing | 4,33,000.00 |
| B | Wooden Ply panneling | 1,26,284.00 |
| C | Rubber mats | 10,000.00 |
| D | Decorative FRP / Veenier sheets | 3,38,735.00 |
| E | Cladding with Glass Panneling | 3,11,044.00 |
| F | Interior of Sai baba Cabin | 45,000.00 |
| G | Painting | 2,15,600.00 |
| H | Lightining | 1,11,550.00 |
| I | Misclenious Expenses | 58,787.00 |
| | Total | 20,50,000.00 |
| | GST 18% | 3,69,000.00 |
| | **Total Expenditure** | **24,19,000.00** |

बस खरेदीकामी कार्यादेश दिलेनंतर बस ताब्यात मिळणेस साधारंतः एक महिना कालावधी लागणार आहे. त्यानंतर उपरोक्त प्रमाणे बसचे अंतर्गत कामे करावयाचे असल्यास ई-निविदा प्रक्रिया व प्रत्यक्ष कामकाजाकरीता दोन महिने कालावधी लागणार असुन सदरची बाब खर्चीक स्वरुपाची व जादा कालावधी लागणार आहे. श्री साईबाबा शताब्दी महोत्सवाची दि.०१/१०/२०१७ रोजी सुरुवात होणार आहे.

संस्थान ए.सी. बस खरेदी करणार असलेने तीला वाढीव दरवाजा करता येणार नाही. तसेच बाहेरील बाजुने बदल केल्यास आर.टी.ओ. पासींग करतांना अडचण येऊ शकते.

**ब)** साई पादुका सोहळया करीता कमी कालावधीत खालील प्रमाणे बसमध्ये अंतर्गत सुविधा करता येतील.

१) त्यामुळे सदर बसमध्ये ड्रायव्हरचे मागील बाजुचे चार सिट काढुन तेथे आकर्षक स्टिल कपाट तयार करुन त्यात साई पादुका तसेच मंदिर विभागाचे मौल्यवान सामान, दक्षिणा पेटी इ. वस्तु सुरक्षित ठेवता येतील.

२) स्टिल कपाट ऐवजी खालील बाजुस आकर्षक लाकडी कपाट तयार करुन त्यात मंदिर विभागाचे मौल्यवान सामान, दक्षिणा पेटी इ. वस्तु ठेवता येतील व वरील बाजुस साई पादुका ठेवणेची व्यवस्था करुन त्यावर काचेचा बॉक्स बसविता येईल.

३) बसच्या बाहेरील सर्व बाजुस संस्थानचे नांव, श्रीसाईबाबांचे समाधी मंदिरातील मुर्तीसह चित्र, साई शताब्दी वर्षाचा लोगो तसेच इतर डिझाईन निश्चित करुन ते “विनायल स्टिकर” वर प्रिन्ट करुन बसला सर्व बाजुनी पेस्ट करता येईल.किंवा पेंटींग करुन घेता येईल. या कामी अंदाजे प्रति बस रु.१०,००,०००/- पर्यंत खर्च अपेक्षीत आहे.

बस मधील इतर शिटांवर कर्मचारी/ अधिकारी यांना प्रवास करता येईल. त्यामुळे कर्मचारी व अधिकारी करीता जादा वाहन व्यवस्था करावी लागणार नाही.

सदर बसचे डाव्या बाजुस व मागील बाजुस डिकी असलेने यात प्रकाशने विभागाचे संस्थान प्रकाशित सामान, इतर विभागाचे सामान तसेच कर्मचा-यांचे सामान ठेवता येईल.

**मागणी:-** साई पादुका दर्शन सोहळ्या करीता खरेदी करण्यात येणा-या दोन बसमध्ये करावयाच्या सोयी-सुविधा करीता अंतर्गत बदल करुन खालील बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे.

१) उपरोक्त दिलेल्या अ, ब पर्यायावर चर्चा होऊन निर्णय होणे.
२) उपरोक्त पर्याया व्यतिरीक्त इतर योग्य तो पर्याय निश्चित होणे.
३) निश्चित झालेल्या पर्यायानुसार येणा-या खर्चास मान्यता देणे.
४) निश्चित झालेल्या निणर्यानुसार दरपत्रके / ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागेल.

तरी उपरोक्त बाबींवर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील पर्याय ब प्रमाणे बसेसमध्ये अंतर्गत फेरबदल करणेसाठी प्रति बस रु.१० लाख मात्र पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली. तथापि, प्रथम एक बस घेऊन, त्यात प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फेरबदल करणेत यावा. सदर बसला पादुका दर्शन सोहळयासाठी मिळणारा प्रतिसाद पाहून आवश्यकतेनुसार दुसरी बस खरेदी करुन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फेरबदल करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५** **साईभक्तांचे सुविधेकरीता प्रस्तावित मोफत दर्शन पास (Time Base) वितरण काऊंटरबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८०

**प्रास्ताविक:-** साईभक्तांच्या होणा-या गर्दीचे नियोजन करणेसंदर्भात दर्शन रांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणाली कार्यान्वीत करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५८० नुसार जा.नं.एसएसएसटी/वशी-आयटी/२४६५/२०१६ ने दि.१७ ऑगष्ट,२०१६ रोजी मे. त्रिलोक सिक्युरिटी लि., तिरुपती यांना कार्यादेश देणेत आलेला आहे. त्यानुसार दर्शन रांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणाली अंतर्गत साईभक्तांना सर्व निवासस्थाने व मंदिर परीसरामध्ये दि.१२.१२.२०१६ पासून मे. त्रिलोक सिक्युरिटी लि., तिरुपती यांचेमार्फत दर्शन पास (Free Darshan Access Card) वितरित करण्याची सुविधा सुरू करणेत आलेली आहे.

सद्यस्थितीत मोफत दर्शनपास वितरीत करणेकामी जुने प्रसादालय येथे ११ काऊंटर, संस्थानचे सर्व निवासस्थाने, साई कॉम्प्लेक्स, शिर्डी बस स्टॅंड येथे प्रत्येकी एक असे एकूण १७ काऊंटर कार्यान्वीत करणेत आलेले आहेत.

जुने प्रसादालय परीसरात नव्याने दर्शनरांगेची उभारणीकरीता साईप्रसाद नं.०१ व ०२ इमारतीची जागा रिक्त करणेत येणार असल्याने, तेथील विविध कार्यालये, काऊंटर, स्टोअर इ. इतरत्र (साईउद्यान, मंगलकार्यालय व सेवाधाम इमारत) ठिकाणी स्थलांतरीत करणेत येत आहेत. सबब, सदर ठिकाणी कार्यान्वीत असलेले ११ मोफत दर्शन पास काऊंटर बंद करावे लागणार आहेत.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे जुने प्रसादालय येथील ११ मोफत दर्शन पास काऊंटर बंद करावे लागणार असल्याने तसेच ०१ ऑक्टोबर, २०१७ पासून सुरू होणा-या "श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव" कालावधीमध्ये होणारी साईभक्तांची संभाव्य गर्दी याचा विचार करता पर्यायी मोफत दर्शनपास काऊंटर सुरू करणे प्रस्तावित आहे. सद्यस्थितीत चालू असलेले व प्रस्तावित काऊंटर याची तपशिलवार माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | प्रस्तावित ठिकाण | सध्या कार्यान्वीत असलेले काऊंटर | प्रस्तावित काऊंटर संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | जुने प्रसादालय | ११ | ०० |
| ०२ | साईउद्यान इमारत | ०० | ०४ |
| ०३ | साई कॉम्प्लेक्स | ०१ | ०३ |

| अ.नं. | प्रस्तावित ठिकाण | सध्या कार्यान्वीत असलेले काऊंटर | प्रस्तावित काऊंटर संख्या |
|---|---|---|---|
| ०४ | खुले नाट्यगृह | ०० | ०४ |
| ०५ | साईनगर मैदान | ०० | ०८ |
| ०६ | द्वारावती निवासस्थान | ०१ | ०३ |
| ०७ | साईआश्रम भक्तनिवासस्थान | ०१ | ०१ |
| ०८ | साईबाबा भक्तनिवासस्थान | ०१ | ०१ |
| ०९ | साई धर्मशाळा | ०१ | ०१ |
| १० | शिर्डी बसस्थानक | ०१ | ०१ |
| | **एकूण संख्या** | **१७** | **२६** |

सध्या कार्यान्वीत असलेले १७ काऊंटरपैकी जुने प्रसादालय येथील ११ काऊंटर बंद होणार आहेत सबब, उवरीत ६ काऊंटर कार्यान्वीत राहणार आहेत. कार्यान्वीत असलेले ६ काऊंटर व प्रस्तावित २६ काऊंटर अशी एकूण ३२ काऊटर कार्यान्वीत करणेत येणार आहेत. प्रस्तावित काऊंटर सुरू करणेकामी माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत कोणत्याही प्रकारचा संगणकीय खर्च येणार नाही. सदर ३२ मोफत दर्शन पास काऊंटरसह गर्दीचे काळामध्ये शिर्डी प्रवेशद्वारावर प्रस्तावित कार पार्कींग व साईनगर रेल्वे स्टेशन येथेही मोफत दर्शन पास काऊंटर सुरू करणे प्रस्तावित आहे. सदरकामी जागा निश्चित झालेनंतर अनुषांगिक कार्यवाही सुरू करणेत येणार आहे.

प्रस्तावित मोफत दर्शन पास काऊंटर हे विविध ठिकाणी कार्यान्वीत होणार असल्याने आलेल्या साईभक्तांना जवळचे काऊंटरवरून मोफत दर्शनपास घेणे सुलभ होणार आहे, सबब, एकाच ठिकाणी होणारी साईभक्तांची गर्दी टाळणेस मदत होणार आहे.

सध्या कार्यान्वीत असलेल्या १७ मोफत दर्शनपास काऊंटरपैकी जुने प्रसादालय येथील बंद करावयाचे ११ काऊंटर तसेच कार्यान्वीत राहणा-या उर्वरीत ६ काऊंटरसह प्रस्तावित २६ काऊंटर असे एकूण ३२ मोफत दर्शन पास काऊंटरबाबतची माहितीनोंद घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी:-** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे साईभक्तांचे सुविधेकरीता सध्या कार्यान्वीत असलेल्या १७ मोफत दर्शनपास काऊंटरपैकी जुने प्रसादालय येथील ११ काऊंटर बंद झालेनंतर कार्यान्वीत्त राहणा-या उर्वरीत ६ काऊंटरसह प्रस्तावित २६ काऊंटर असे एकूण ३२ मोफत दर्शन पास काऊंटरबाबतची माहितीनोंद घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** तांत्रिक व प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे साईभक्तांचे सुविधेकरीता सध्या कार्यान्वीत असलेल्या १७ मोफत दर्शनपास काऊंटरपैकी जुने प्रसादालय येथील ११ काऊंटर बंद झालेनंतर कार्यान्वीत राहणा-या उर्वरीत ६ काऊंटरसह प्रस्तावित २६ काऊंटर असे एकूण ३२ मोफत दर्शन पास काऊंटरबाबतची माहितीनोंद घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.६९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे, साईभक्तांचे सुविधेकरीता मोफत दर्शन पास (Time Base) वितरण काऊंटर सुरु करणेकामी केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच साईनगर रेल्वे स्थानकावर मोफत दर्शन पास (Time Base) वितरण काऊंटर सुरु करणेसाठी जागा मिळणेसाठी रेल्वे विभागास पत्र दिलेले आहे, त्याचा पाठपुरावा करणेत यावा व साईपालखी निवारा, निघोज येथेही पालखी-पदयात्रींसाठी २ मोफत दर्शन पास (Time Base) वितरण काऊंटर सुरु करावे. याशिवाय मंदिराच्या जवळ मोफत अथवा भाडेपट्टयाने जागा उपलब्ध झाल्यास, तेथेही मोफत दर्शन पास (Time Base) वितरण काऊंटर सुरु करावे, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाचे संदर्भातील जाहिरात प्रसारणाबाबत आकाशवाणी यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:** मा.व्यवस्थापन समितीचे दि.25/02/2017 रोजीचे सभेतीतील निर्णय क्रं. 81

**प्रास्ताविक:** श्री साईबाबांचे जिवनकार्य व शिकवण याचा प्रचार व प्रसार व्हावा या हेतुने प्रसार भारती यांचेमार्फत शिरडी येथे एफएम रेडीओ केंद्र दि.01/02/2017 रोजी पासुन सुरु करण्यात आलेले आहे. सदर कार्यवाहीस मा.व्यवस्थापन समितीचे दि. 25/02/2017 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 81 अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे.

श्री साईबाबा संस्थानचे वतीने दि. 01/10/2017 ते 15/10/2018 या कालावधीत श्री साईबाबा महासमाधी शताब्धी वर्ष भव्य-दिव्य स्वरुपात साजरे करण्यात येणार आहे. या कालावधीत विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करणेत येणार आहे. साईबाबा संस्थानचे वतीने साजरे होणा-या कार्यक्रमांविषयी तसेच संस्थानमार्फत राबविणेत येणा-या विविध समाजपयोगी उपक्रमांची माहिती जगभरातील जास्तीत-जास्त साईभक्तांना व्हावी याकरीता प्रसारमाध्यमे, इंटरनेट व वेबसाईटसारख्या माध्यमांचा वापर करता येणे शक्य आहे.

आकाशवाणी नगर केंद्राचे प्रतिनीधी श्री. प्रदिप हलसगीकर, कार्यक्रम प्रमुख व श्री बाबासाहेब खराडे, कार्यक्रम अधिकारी यांनी दि. 01/08/2017 रोजी शिर्डी येथे येऊन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचेसोबत श्री साईबाबा महासमाधी शताब्धी वर्षाचे अनुषंगाने अकाशवाणी केंद्रांवर प्रसारीत करावयाच्या संभाव्य प्रसारणाबाबत सविस्तर चर्चा केलेली आहे.

बैठकीचे दरम्यान सदर प्रतिनीधींनी प्रामुख्याने महासमाधी शताब्धी महोत्सवाचे कालावधीत संस्थानमार्फत साजरे होणा-या विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतीक कार्यक्रमाबाबत प्रसिद्धी, कार्यक्रमांचे प्रसारण तसेच कार्यक्रम व उपक्रमांबाबत माहिती देणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य व मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांच्या मुलाखती प्रसारीत करणेबाबत सविस्तर चर्चा करणेत आलेली आहे.

शिर्डीत येणा-या साईभक्तांमध्ये भारतातील विविध भागातील साईभक्तांचा समावेश आहे सबब, महासमाधी शताब्दी महोत्सवाचे कार्यक्रमांची प्रसिद्धी भारतातील विविध आकाशवाणी केंद्रांवरुन केल्यास तेथिल साईभक्तांना कार्यक्रमांविषयीमाहिती होईल. सदरकामी विविध पर्याय आकाशवाणीचे प्रतिनिधींनी अवगत केलेले आहे. चर्चेदरम्यान महासमाधी शताब्दी कार्यक्रमास व्यापक प्रसिद्धी देणेकामी आकाशवाणीचे प्रतिनिधींना सविस्तर प्रस्ताव सादर करणेस सुचित केले होते. त्याप्रमाणे उपरोक्त संदर्भान्वये, त्यांचा प्रस्ताव इकडील विभागास प्राप्त झालेला आहे.

सदर प्रस्तावामध्ये पुढीलप्रमाणे विविध पर्याय देण्यात आलेले आहेत.

**1.** महाराष्ट्रातील 20 प्रमुख केंद्रांवर प्रतीदिन सकाळी प्रसारीत होणा-या प्रादेशीक बातम्यांपुर्वी 30 सेकंद जाहिरात प्रसिद्ध करणेसाठी पुढीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत. प्रतिदिन रक्कम रुपये 21,030/- मात्र 01 सप्टेबर ते 30 ऑक्टोबर 2017 अखेर एकूण 60 दिवसांकरीता 12,61,800/-

- 15 % डिस्काऊंट 1,89,270/-

एकूण- 10,72,530/-

18 % GST 1,93,055/-

एकूण रक्कम रुपये 12,65,585/-

**2.** महाराष्ट्रातील ठराविक केंद्रांवर प्रतिदिन तीन वेळेस सशुल्क व तीन वेळेस मोफत प्रत्येक 20 सेकंद जाहिरात प्रसारण

**a.** **चित्रपट संगीत -** प्रतीदिन एकवेळेस सशुल्क व एकवेळेस मोफत प्रसारण रक्कम रुपये 8,920/- मात्र, 60 दिवसांकरीता रक्कम रुपये 8920 X 60 = 5,35,200/-

**b.** **भक्तीसंगीत-**प्रतीदिन दोन वेळेस सशुल्क व दोन वेळेस मोफत प्रसारण रक्कम रुपये 5,840/- X2=11680/-मात्र,60 दिवसांकरीता रक्कम रुपये 11680 X 60 = 7,00,800/-

एकूण रक्कम रुपये (a+b) 12,36,000/-

- 15 % डिस्काऊंट 1,85,400/-
एकूण-10,50,600/-
18 % GST - 1,89,100/-
एकूण रक्कम रुपये 12,39,708/-

**3.** भारतातील 44 विविध भारती केंद्रांवर जाहिरात प्रसारीत करणेसाठी पुढीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

**a.** सकाळी 07 ते 10 यावेळेत 15,440/- प्रति 10 सेकंद याप्रमाणे 60 दिवस प्रतिदिन 20 सेकंद जाहिरातीसाठी 18,52,800/- (सदर रक्कमेवर 15 % डिस्काऊंट व 18 % GST लागू होऊन येणारी रक्कम रुपये 18,58,264/-)

**b.** सकाळी 10 ते 12 यावेळेत 12,980/- प्रति 10 सेकंद याप्रमाणे 60 दिवस प्रतिदिन 20 सेकंद जाहिरातीसाठी 15,57,600/- (सदर रक्कमेवर 15 % डिस्काऊंट व 18 % GST लागू होऊन येणारी रक्कम रुपये 15,62,273/-)

**4.** भारतातील सर्व 200 केंद्रावर जाहिरात प्रसिद्ध करणेसाठी प्रतिदिन 20 सेकंद

**a.** सकाळी प्रसारीत होणा-या हिंदी बातम्यांचे दरम्यान (सकाळी 8:00 ते 8:15) प्रतिदिन 20 सेकंद रक्कम रुपये 39,600/- याप्रमाणे 60 दिवस रक्कम रुपये 23,76,000/-

**b.** सकाळी प्रसारीत होणा-या इंग्रजी बातम्यांचे दरम्यान (सकाळी 8:15 ते 8:30) प्रतिदिन 20 सेकंद रक्कम रुपये 39,600/- याप्रमाणे 60 दिवस रक्कम रुपये 23,76,000/-

श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवाची माहिती भारतातील जास्तीत जास्त साईभक्तांना व्हावी या हेतूने भारतातील आकाशवाणी केंद्रावर जाहिरात प्रसिद्ध करणेबाबत उपरोक्तप्रमाणे आकाशवाणी यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करुन त्यांनी देऊ केलेल्या सवलतीमध्ये वाढ करणेच्या दृष्टीने आकाशवाणीचे संबंधीत प्रतिनिधींना मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर बोलविता येईल. तसेच या कालावधीमध्ये प्रसारीत करावयाच्या कार्यक्रमांबाबत सदर प्रतिनिधींबरोबर चर्चा करुन नियोजन करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी:** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव कार्यक्रम प्रसारण व जाहिरांतीसदर्भात आकाशवाणी यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करणेकरीता आकाशवाणी यांचे प्रतिनिधींना मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर बोलविणेस मान्यता मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव कार्यक्रम प्रसारण व जाहिरांतीसदर्भात आकाशवाणी यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तप्रावर सविस्तर चर्चा करणेकरीता आकाशवाणी यांचे प्रतिनिधींना मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर बोलविणेस मान्यता मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.६९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आकाशवाणी यांचेकडून प्राप्त झालेला प्रस्ताव अमान्य करणेत आला. त्याऐवजी मा.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र शासन यांना याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करुन त्यांचेकडून शताब्दी सोहळयाबाबत प्रचार व प्रसिध्दीची आवश्यक कार्यवाही करावी, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.७** **श्री पुण्यतिथी उत्सव- २०१७ मध्ये श्री साई मंदिर, मंदिर परिसरात श्री द्वारकामाई मंडळ, मुंबई यांचे मार्फत विद्युत रोषणाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** २१. (१) समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल.

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन ;

(ख) रुढीनुसार व प्रथेनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे;

(ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनसाठी व प्राथनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे;

वरील अधिनियम २१ (१) (ख) व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**पर्याय क्र.०१)** वर्षभर विद्युत रोषणाईकरीता संस्थानमार्फत मटेरियल खरेदी करावयाचे झाल्यास अंदाजे रक्कम रु.६,५३,७२,१६५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**पर्याय क्र.०२)** विद्युत रोषणाईकरीता खरेदी करावयाचे सर्व मटेरियल वर्षभर भाडे तत्त्वावर घेतल्यास अंदाजे रक्कम रु.४,५१,०६,७९४/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**पर्याय क्र.०३)** विद्युत रोषणाईकरीता सर्व मटेरियल वर्षभर प्रतीमाह १० दिवस भाडे तत्त्वावर घेतल्यास अंदाजे रक्कम रु.३,००,७१,१९६/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**पर्याय क्र.०४)** विद्युत रोषणाईकरीता सर्व मटेरियल श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७, शिर्डी महोत्सव-२०१७, श्री रामनवमी उत्सव-२०१८, श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१८ व श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ या उत्सव कालावधीत (प्रत्येक १० दिवस) भाडोत्री घेतल्यास अंदाजे रक्कम रु.१,८७,९४,४९७/- इतका खर्च अपेक्षित आहे. याव्यतिरिक्त या रोषणाईसाठी गरज पडल्यास भाडोत्री जनरेटरसेट लावावे लागणार आहेत. त्याचा खर्च प्रतिदिन रु.१०,०००/- (प्रत्यक्ष वापर दिवस) + इंधन अंदाजे राहिल.

"श्री साई समाधी शताब्दी महोत्सवामधील संपुर्ण वर्षातील उत्सवांकरीता" (२०१७-२०१८) श्री साई मंदिर, मंदिर परीसर व इतर संस्थान परिसरात विद्युत रोषणाई करणेकामी वरील चार पर्यायापैकी कोणत्या पर्याया संबंधी ई-निविदेची कार्यवाही करावी याबाबत चर्चा होऊन निर्णय होणे कामीचा प्रस्ताव विद्युत विभागामार्फत मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर केलेला होता.

पर्याय क्र.०४ मध्ये १० दिवसाकरीता भाडोत्री विद्युत रोषणाईचा पर्याय नमूद केलेला होता, यावर मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील विषय क्र.६१ निर्णय क्र.५८१ अन्वये सविस्तर चर्चा होऊन, " श्री साई समाधी शताब्दी महोत्सवामधील संपुर्ण वर्षातील उत्सवांकरीता" (२०१७-२०१८) श्री साई मंदिर, मंदिर परीसरात विद्युत रोषणाई व लाईट इफेक्ट देखाव्यासाठी खुपच जास्त खर्च येत आहे. याकरीता समाधी शताब्दी महोत्सवामध्ये प्रस्तावातील पर्याय क्र.०४ मध्ये नमूद केलेपैकी श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ मध्ये तीन दिवस, श्री रामनवमी उत्सव-२०१८ मध्ये ०३ दिवस, श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१८ मध्ये ०३ दिवस, श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ मध्ये १० दिवस तसेच शिर्डी महोत्सव-२०१७ मध्ये ११ दिवस (दि.२३.१२.२०१७ ते दि.०२.०१.२०१८) असे वर्षातील एकुण ३० दिवसाकरीता मंदिर, मंदिर परीसरात विद्युत रोषणाई व लाईट इफेक्ट देखावे वर्षभर उभारणी करीता ई-निविदांची मागणी करण्यात यावी, असे ठरले. तसेच याकामी येणा-या सर्व समावेशक खर्चास मान्यता मिळालेली आहे.

सध्या श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेमार्फत रामनवमी उत्सवात ०३ दिवस, श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवात ०३ दिवस ह्या दोन्ही उत्सवात संपुर्ण मंदिर व परिसरात (गेट सोडून) विद्युत रोषणाई केली जाते. तसेच श्री साईराज डेकोरेटर्स, मुंबई यांचेमार्फत श्री गुरुपौर्णिमा उत्सवात ०३ दिवस मंदिर व परिसरात (गेट सोडून) विद्युत रोषणाई केली जाते.

श्री रामनवमी उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव या दोन्ही उत्सवात श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेमार्फत विद्युत रोषणाई सोबत देखावा उभा केला जातो.

श्री रामनवमी उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव या दोन्ही उत्सवात विद्युत रोषणाई व देखावा उभा करण्यासाठी (ट्रान्सपोर्ट + मटेरियल भाडे + इंधन वगैरे) प्रत्येक उत्सवात मिळून रु.८ ते ९ लाख खर्च संस्थानमार्फत केला जातो. परंतु उत्सवात उभारण्यात येणा-या देखाव्यासाठी यापेक्षा जास्त खर्च येत असतो व त्याचा खर्च श्री व्दारकामाई मंडळाचे सहकारी स्वत: करतात.

याबाबत यापुर्वी सन- २०१० साली दि.२०.०९.२०१० रोजी श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी संस्थान परिसरात विद्युत रोषणाई व सजावट करण्यासाठी लागणा-या पेमेंट बाबत पत्र दिले होते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

"श्री व्दारकामाई मंडळाचे आद्य संस्थापक कै.बारकुशेठ मांडवकर हे असून कै.बारकुशेठ मांडवकर यांनी संकल्प सोडल्याप्रमाणे व त्यांनी सुरु करुन दिलेल्या प्रथेनुसार गेल्या पंचवीस वर्षापासून श्री साईबाबांच्या श्री रामनवमी उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव-दसरा उत्सव या उत्सवांमध्ये श्री साई भक्तांमध्ये तसेच शिर्डीच्या पंचक्रोशीतील जनतेमध्ये उत्साहवर्धक वातावरणाची निर्मिती व्हावी तसेच मनाला आल्हाददायक वाटावे,

त्याचबरोबर प्रबोधनही व्हावे, धार्मिक गोष्टींची माहिती व्हावी, यासाठी मुंबई येथून येऊन नयनरम्य विद्युत रोषणाई व प्रबोधनकारी देखावे सादर करण्याचे, आम्ही, श्री व्दारकामाई मंडळाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न करीत आहोत. कै.बारकुशेठ मांडवकर यांनी दाखविलेल्या समाजसेवेच्या पायवाटेवरुन ही अल्पशी सेवा आम्ही श्री साई चरणी रुजू करीत असतो.

श्री व्दारकामाई मंडळ हे कै.बारकुशेठ मांडवकर यांचे नेतृत्वाखाली ६ ते ७ विविध व्यवसायातील साईभक्तांनी एकत्र येऊन स्थापन झालेले आहे. त्यांचेमार्फत मुंबईतील विविध ठिकाणचे डेकोरेटर्स व त्यांचे कलाकार यांना एकत्र जमवून त्यांना शिर्डी येथे आणून विद्युत रोषणाई व सजावट करण्याचा प्रयत्न श्री व्दारकामाई मंडळ सतत करीत आहे.

श्री व्दारकामाई मंडळ हे हौशी साईभक्तांचे मंडळ आहे या मंडळामार्फत कोणत्याही स्वरुपाचा व्यवसाय केला जात नाही. तसेच हे मंडळ श्री साईंची सेवा घडावी म्हणून फक्त शिर्डी येथील उत्सवाचे वेळीच एकत्र येऊन विद्युत रोषणाई करीत असते. यामध्ये व्यवसायाचा संबंध नसल्याने श्री व्दारकामाई मंडळाचे रजिस्ट्रेशन करण्याचा आजपर्यंत प्रसंग उदभवला नाही.

श्री व्दारकामाई मंडळाचे संचालक हे उत्सवाचे वेळी मुंबईच्या विविध भागातील विविध डेकोरेटरर्सशी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, फोनव्दारे संपर्क साधून त्यांना शिर्डी येथील उत्सवाचे वेळी एकत्र आणून उत्सवातील विद्युत रोषणाई करण्याचा प्रयत्न करीत असते. हे विविध डेकोरेटर्स तसेच त्यांचे कर्मचारी, त्यांचे अत्यंत नाजूक विविध रोषणाईचे साहित्य हे शिर्डी येथे सुखरुप आणणे, देखाव्यासाठी लागणा-या फळया शिर्डी येथे मुंबई येथून भाडयाने नेणे, उत्सवातील काळात डेकोरेटर्स व कर्मचारी यांचे औषधपाणी व त्यांचे किरकोळ वैयक्तिक खर्च, उत्सवात रोषणाई करतांना त्यांना लागणारे किरकोळ साहित्य हे सर्व खर्च रोखीने करणे, तसेच उत्सव संपल्यानंतर प्रत्येक डेकोरेटर्सला मंडळातर्फे भेट वस्तू देणे व पुन्हा मुंबईस सुखरूप नेणे ही सर्व कामे श्री व्दारकामाई मंडळ करीत असते.

वरील सर्व कारणांसाठी श्री व्दारकामाई मंडळाच्या संचालक मंडळाला पदोपदी रोख रकमेची गरज पडत असते. वरील खर्चामधील फक्त मुंबई-शिर्डी-मुंबई या प्रवासी कर्मचा-यांचे एस.टी.भाडे व देखाव्यासाठी लागणा-या भाडोत्री सामानाच्या भाडयाची रक्कम ही श्री साईबाबा संस्थानकडून रोख मिळावी एवढीच माफक अपेक्षा श्री व्दारकामाई मंडळाच्या संचालक मंडळाने ठेवलेली आहे. तसेच श्री पुण्यतिथी-दसरा उत्सवाचे वेळी मुंबई येथे नवरात्र उत्सव मोठया प्रमाणात साजरा केला जात असल्या कारणाने डेकोरेटर्सचे साहित्य डेकोरेटर्सनी विविध ठिकाणी ऑर्डर्स घेतलेल्या असल्याने गुंतलेले असते. त्यामुळे श्री पुण्यतिथी-दसरा उत्सवात शिर्डी येथे विद्युत रोषणाई करण्यासाठी श्री व्दारकामाई मंडळाला बाजारातून भाडयाने रोख रक्कम देऊन रोषणाईचे सामान आणावे लागते. कधीकधी रोषणाई करतांना अचानक साहित्य कमी पडल्यास तातडीने मुंबई येथे माणूस पाठवून साहित्य मागवावे लागते. याकामी संस्थानकडून रोख रक्कम मिळणे अपेक्षित असते.

श्री रामनवमी उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव-दसरा उत्सव या उत्सवांमधून कलाकार प्रवास भाडयाचे तसेच प्रसंगानुरुप आणाव्या लागणा-या भाडोत्री साहित्याचे खर्चाच्या रकमेचा चेक संस्थानकडून व्दारकामाई मंडळाचे श्री.शशिकांत दळवी यांचे नावावर आतापर्यंत ब-याच वर्षापासून आंध्रा बँकेच्या चेकव्दारे मिळत होता. यातून श्री.शशिकांत दळवी यांचे नावावर इन्कम टॅक्सही कापला जात आहे गेल्या रामनवमी उत्सवात आम्हाला (व्दारकामाई मंडळाचे नावाऐवजी श्री.शशिकांत दळवी यांचे नावावर) पेमेंट देण्यास संस्थान ऑडीटरांनी हरकत घेतली होती. त्यांना यासाठी संस्थान बोर्डाचा ठराव पाहिजे आहे. तरी वरील सर्व बाबींचा सहानुभूतीपुर्वक विचार होऊन श्री रामनवमी उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव-दसरा उत्सव या उत्सवामधून कलाकार प्रवास भाडयाचे तसेच प्रसंगानुरुप आणाव्या लागणा-या भाडोत्री साहित्याचे खर्चाच्या रकमेचा चेक संस्थानकडून व्दारकामाई मंडळाचे श्री.शशिकांत दळवी यांचे नावावर आंध्रा बँकेच्या चेकव्दारे मिळावी ही विनंती करीत आहोत."

या पत्रावर दि.१०.१०.२०१० रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील विषय क्र.२१ निर्णय क्र.८०७ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे उत्सवकाळात व्दारकामाई मंडळ, मुंबई हे संस्थान परिसरात विद्युत रोषणाई आणि सजावटीची कामे करतात. त्यांना देण्यात येणारे पेमेंट व्दारकामाई मंडळाचे श्री शशिकांत दळवी, मुंबई यांचे नांवे देण्यात यावे असे ठरले

सन १९८९ पर्यंत श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेमार्फत फक्त श्री रामनवमी उत्सवात विद्युत रोषणाई केली जात होती. तसेच विविध देखावे (एकाच वेळी अनेक) उभे केले जात होते. परंतू सन १९८९ साली ७० व्या पुण्यतिथी उत्सवात मा.व्यवस्थापन मंडळाने विद्युत रोषणाई करावयाची ठरविल्याने त्यावेळी कोटेशन मागविले असता फक्त विद्युत रोषणाईकामी बाहेरील डेकोरेटर्स / कॉन्ट्रॅक्टर्सनी रु. १४ लाखाची त्यावेळी मागणी केली होती.

त्यामुळे तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाने श्री व्दारकामाई मंडळालाच ७० व्या पुण्यतिथीला विद्युत रोषणाई करण्यासाठी स्वत:हून निमंत्रित केले होते. व तेव्हापासून आतापर्यंत झालेल्या सर्व पुण्यतिथी उत्सवामध्ये श्री व्दारकामाई मंडळामार्फतच विद्युत रोषणाई करण्यात येऊन व देखावे उभारण्यात आले होते.

श्री व्दारकामाई मंडळ हे हौशी साईभक्तांचे मंडळ आहे या मंडळामार्फत कोणत्याही स्वरुपाचा व्यवसाय केला जात नाही. तसेच हे मंडळ श्री साईंची सेवा घडावी म्हणून फक्त शिर्डी येथील उत्सवाचे वेळी मुंबईच्या विविध भागातील विविध डेकोरेटर्सशी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, फोनव्दारे संपर्क साधून त्यांना शिर्डी येथील उत्सवाचे वेळी एकत्र आणून उत्सवातील तीन दिवसच विद्युत रोषणाई करतात. यापेक्षा जास्त दिवस ते विद्युत रोषणाई करु शकत नाही, कारण त्यांचेमार्फत येणारे डेकोरेटर्स यांची रोजी रोटी ही ते करत असलेल्या लाईटींग डेकोरेशनवर अवलंबून असते. नवरात्र उत्सव, गणपती उत्सव अशा वेगवेगळया उत्सवात ते मुंबई येथे डेकोरेशनची कामे करत असतात म्हणून संस्थानने सादर केलेल्या पर्याय क्र.०४ मधील नमूद प्रत्येक उत्सवात १० दिवस विद्युत रोषणाई करणे श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांना शक्य नव्हते.

मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८१ अन्वये "श्री साई समाधी शताब्दी महोत्सव" २०१७-२०१८ करीता श्री साई मंदिर, मंदिर परीसरात विद्युत रोषणाई व लाईट इफेक्ट पर्याय क्र.०४ मध्ये नमूद केले पैकी श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ मध्ये ०३ दिवस, श्री रामनवमी उत्सव-२०१८ मध्ये ०३ दिवस, श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१८ मध्ये ०३ दिवस, श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ मध्ये १० दिवस तसेच शिर्डी महोत्सव-२०१७ मध्ये ११ दिवस (दि.२३.१२.२०१७ ते दि.०२.०१.२०१८ ) मंदिर, मंदिर परीसरात विद्युत रोषणाई व लाईट इफेक्ट देखावे उभारणेकरीता ई-निविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले आहे.

दि.२७.०७.२०१७ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर केलेल्या पर्याय क्र.०४ नुसार विद्युत रोषणाई करीता सर्व मटेरियल श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७, शिर्डी महोत्सव-२०१७, श्री रामनवमी उत्सव-२०१८, श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१८ व श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ या उत्सव कालावधीत (प्रत्येक १० दिवस ) असे वर्षात एकुण ५० दिवस भाडोत्री घेतल्यास अंदाज रक्कम रु.१,८७,९४,४९७/- इतका अपेक्षित खर्च येणार आहे म्हणजे प्रति दिवसाकरीता रु. १,८७,९४,४९७ / ५० दिवस = रु. ३,७५,८९०/- प्रती दिवस इतका खर्च येणे अपेक्षित आहे. यानुसार (श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ मधील ०४ दिवसाकरीता रु.१५,०३,५६०/- इतका खर्च अपेक्षित आहे.)

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.५८१ मध्ये श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ करीता ०३ दिवस विद्युत रोषणाई करण्याचे नमूद असून प्रत्यक्षात उत्सव दि.२९.०९.२०१७ ते दि.०२.१०.२०१७ असा ०४ दिवस आहे.

दि.०५.०८.२०१७ रोजी मा.उप जिल्हाधिकारी, श्री.मनोज घोडेपाटील साहेब यांची श्री व्दारकामाई मंडळाचे संचालक यांचेशी विविध उत्सवांमध्ये करावयाच्या विद्युत रोषणाई करणेकामी समक्ष चर्चा झाली असून झालेल्या चर्चेनुसार श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी दि०७.०८.२०१७ रोजी लेखी पत्र देऊन पुढीलप्रमाणे उत्सवात प्रती वर्षाप्रमाणे संस्थानचे मागणीनुसार विद्युत रोषणाई करणार असल्याचे कळविले आहे.

| अ.क्र. | विद्युत रोषणाई करणा-या मंडळाचे नांव | विद्युत रोषणाई करण्यात येणारे उत्सव | मा.व्यवस्थापन समितीचे ठरावानुसार विद्युत रोषणाई करावयाचे दिवस | श्री व्दारकामाई मंडळामार्फत विद्युत रोषणाई करावयाचे दिवस |
|---|---|---|---|---|
| ०१) | श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ | ०३ दिवस | ०४ दिवस |
| | | श्री रामनवमी उत्सव-२०१८ | ०३ दिवस | ०३ दिवस |
| | | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ | १० दिवस | १० दिवस |

श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी श्री पुण्यतिथी उत्सवामधील विद्युत रोषणाई व देखाव्याच्या कामाची पुर्वतयारी चालू केल्याचे दि.०५.०८.२०१७ रोजी समक्ष सांगितले आहे.

मागील श्री पुण्यतिथी उत्सव-२०१६ मधील विद्युत रोषणाई व उभारण्यात आलेल्या देखाव्याकरीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांना संस्थानमार्फत आदा करण्यात आलेल्या रकमेचा तपशिल पुढीलप्रमाणे-

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | २४० कलाकारांचे जाणे येणे सह एस.टी.प्रवास भाडे (येणे व जाणेसह) रु. ४०४ X २४० X २ | १,९३,९२०/- |

| | | |
|---|---|---|
| २ | उत्सवाचे शेवटच्या दिवसापर्यंत भाडोत्री लाकडी फळयांचे भाडे, ३ भाडोत्री जनसेट – ४ दिवसाकरीता, तसेच फ्रेम, कपडा, लाकडी फ्रेम,सिरिंज, वायर, स्पॉट लाईट, हॅलोजन, मेटल हॅलाईड, फळया, पी.ओ.पी., मोल्डींग्ज व इतर साहित्य हमाली, उतराई, भराई, चढाई वगैरे | ३,७५,०००/- |
| ३ | देखाव्यासाठी प्लॅस्टर ऑफ पॅरीस आणावे लागले, त्याचे ६०० गोण्यांचे रु.१००/- प्रमाणे | ०,६०,०००/- |
| ४ | श्री पुण्यतिथी उत्सवात उभारण्यात आलेला देखावा उत्सवानंतर काही दिवस श्री साईबाबा संस्थानचे परिसरात भक्तांना पाहणेसाठी हा देखावा व त्यातील साहित्य काढणेसाठी मुंबई वरुन पुन्हा एकदा ४० कलाकारांचे गाडी भाडे परतीसह (रु. ४०४ X रु. ४० X २) | ०,३२,३२०/- |
| ५ | या देखाव्यासाठी आणलेल्या फळयांची त्यांनी दि१४-०९-२०१६ चे पत्रान्वये रु.६४,०००/- इतकी रक्कम कळविली होती. यातील निम्मी ५० टक्के रक्कम ते डेकोरेटरस वर्गणी करुन आदा केलेली आहे व राहिलेली ५० टक्के रक्कम रु. ३२,०००/- इतकी संस्थानकडून आदा करणेत आलेली आहे. | ०,३२,०००/- |
| | **एकुण आदा केलेली रक्कम रु.:-** | **६,९३,२४०/-** |

श्री पुण्यतिथी उत्सव-२०१६ करीता विद्युत रोषणाई व उभारण्यात आलेल्या देखाव्याकरीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांना रक्कम रु ६,९३,२४०/- इतकी संस्थानमार्फत आदा करण्यात आलेली आहे.

तसेच मटेरियल वाहतुकीसाठी प्रती ट्रक रु.२८,०००/- (रु. अठ्ठावीस हजार) मात्र प्रमाणे ५ (पाच) ट्रक्सचे भाडे रु. १,४०,०००/- इतकी रक्कम मे.विकास ट्रान्सपोर्ट संगमनेर यांना आदा करण्यात आलेली आहे.

उत्सव कालावधीतील डिझेल जनसेट इंधन कामी रक्कम रु. ६७,८००/- इतका खर्च झालेला आहे.

श्री पुण्यतिथी उत्सव-२०१६ करीता (विद्युत रोषणाई व देखावा खर्च) एकत्रित खर्च रक्कम रु. ९,०१,०४०/- झालेला आहे.

येत्या श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ मध्ये करावयाच्या विद्युत रोषणाईच्या अंदाजित खर्चाबाबत श्री व्दारकामाई मंडळ यांचेशी चर्चा केली असता त्यांनी(कलाकारांचे जाणे येणेसह एस.टी.प्रवास भाडे, भाडोत्री मटेरियल व इतर साहित्य) साधारणत: ७ ते ८ लाख रुपये श्री व्दारकामाई मंडळाचा खर्च तसेच भाडोत्री ट्रक्ससाठी १.५० ते २ लाख असा मिळून ८.५ ते १० लाख रुपये खर्च येईल असे सांगितले आहे. याव्यतिरिक्त देखाव्यासाठी जादा लागणारा खर्च श्री व्दारकामाई मंडळाचे सहकारी स्वत: करणार आहे.

श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांना दि०५.०८.२०१७ रोजी चर्चेमध्ये विद्युत रोषणाईसाठी ने येता फक्त देखावा उभा करण्यासाठी आपण येऊ शकता काय? अशी विचारणा केली असता फक्त देखाव्यासाठी श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई हे येऊ शकणार नाही, शिवाय या श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ मधील विद्युत रोषणाई व देखाव्याची तयारी या वर्षाचा श्री रामनवमी उत्सव संपतानाच चालू केली असून ती तयारी अंतिम टप्प्यात असल्याचे त्यांनी सांगितले आहे

दि.२७.०७.२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार ई-निविदा बोलविण्यास रक्कम रु.१२ ते १५ लाख रुपये (देखाव्या व्यतिरिक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. यामध्ये फोकस लाईट व इमारतीवरील विद्युत रोषणाईचा समावेश होता, परंतू श्री रामनवमी उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव यामध्ये उभारण्यात येणा-या देखाव्याचा समावेश नव्हता.

उभारण्यात येणा-या एका देखाव्यासाठी रु.१० ते १५ लाख (विद्युत रोषणाई व्यतिरिक्त) इतका जवळपास खर्च येतो व हा खर्च श्री व्दारकामाई मंडळाचे सहकारी स्वत: करतात. यामध्ये भाडोत्री फळया, पी.ओ.पी. तसेच फ्रेम कपडा, लाकडी फ्रेम, लोखंडी फ्रेम, मोल्डींग्ज तयार करणे, साचे तयार करणे, कंथन लावणे, कलर करणे, मुर्त्या मुंबईतून आणून त्या उभ्या करणे किंवा थर्माकोलमध्ये येथे तयार करणे इ.कामे करावी लागतात. प्रत्येक श्री रामनवमी उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव यामध्ये वेगवेगळे देखावे सादर केले जातात. एकाच प्रकारचा देखावा पुन्हा रिपीट केला जात नाही.

श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई हे गेल्या ४० वर्षापासून श्री रामनवमी उत्सवात व गेल्या २४ वर्षापासून श्री पुण्यतिथी उत्सवात विद्युत रोषणाई व देखावे उभे करतात. याप्रथेनुसार संस्थानमार्फत त्यांना आताही जा.क्र.नं.एसएसएसटी/ विद्युत/ २२७०/ २०१७ दि.२६.०७.२०१७ अन्वये प्रतीवर्षाप्रमाणे विद्युत रोषणाई करणार

किंवा कसे याबाबत लेखी विचारणा करण्यात आली होती. या पत्रास अनुसरुन दि.२७.०७.२०१७ रोजी पत्र देऊन प्रतिवर्षा प्रमाणे श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ करीता विद्युत रोषणाई करण्यासाठी येत असल्याचे कळविले आहे. तसेच या पत्रात विद्युत रोषणाईचे सामान मुंबई येथून आणणे व उत्सव संपल्यावर पुन्हा परत पोहोचविण्यासाठी त्यांनी विकास ट्रान्सपोर्टच्या ०८ ट्रक्स व संस्थानचा ०१ ट्रक मिळावा अशी विनंती केली आहे.

श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेमार्फत गेल्या ४० वर्षापासून श्री रामनवमी उत्सव व गेल्या २४ वर्षापासून श्री पुण्यतिथी उत्सव या दोन्ही उत्सवात प्रती उत्सव ०३ दिवस संपुर्ण मंदिर व परिसरात श्री साई सेवा म्हणून विद्युत रोषणाई व देखावा केला जातो. तरी श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ मध्ये मे.व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून ०४ दिवसाकरीता विद्युत रोषणाई व देखावा करुन घेतल्यास साधारणत: ७ ते ८ लाख रुपये श्री व्दारकामाई मंडळाचा खर्च त्यामध्ये संपुर्ण मंदिर परिसरात विद्युत रोषणाई व देखावा तसेच भाडोत्री जनसेट इ.खर्च समाविष्ट असून तसेच भाडोत्री ट्रक्ससाठी रु. १.५ ते २ लाख असा मिळून ८.५ ते १० लाख रुपये खर्च येईल व भाडोत्री विद्युत रोषणाई साठी ई- निविदा बोलविल्यास ०४ दिवसाकरीता रु. १४ लाखा पर्यंत (देखाव्याव्यतिरिक्त) खर्च अपेक्षित आहे.

प्रत्येक उत्सवाचे खर्चाबाबत प्रशासन शाखेच्या वशी-०५ मार्फत संस्थानच्या सर्व विभागांकडून अपेक्षित खर्चाचा व मागील वर्षी झालेल्या खर्चाचा तपशिल मागवून घेऊन तो एकत्रित करुन वशी-०५ मार्फत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे तो मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला जात असतो.

यावर्षी वशी-०५ कडे (वशी-०५ कडील पत्र क्र.एसएसएस/ वशी-०५/ ५५१/ २०१७ दि.२१.०४.२०१७) विद्युत विभागामार्फत दि.२४.०४.२०१७ रोजी खालीलप्रमाणे खर्चाचा तपशिल कळविण्यात आला होता.

| अ.क्र. | तपशील | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१६ साठी अपेक्षित खर्च | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१६ मध्ये झालेला खर्च | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ साठी अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | विद्युत रोषणाई | रु. ७,७०,०००/- | रु. ७,१३,२४०/- | रु. ८,००,०००/- |
| २ | भाडोत्री जनसेट भाडे/ इंधन खर्च | रु. २,२५,०००/- | रु. १,८७,८००/- | रु. २,५०,०००/- |
| | एकुण :- | रु. ९,९५,०००/- | रु. ९,०१,०४०/- | रु. १०,५०,०००/- |

**मागणी:- ०१).** दि.२७.०७.२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ मध्ये करावयाच्या ०३ दिवस भाडोत्री (यासाठी रु. १४ लाख अपेक्षित खर्च आहे) विद्युत रोषणाईसाठी (देखाव्याव्यतिरिक्त) करणेसाठी ई- निविदा बोलवावी किंवा,

**०२).** प्रतीवर्षाप्रमाणे गेल्या ४० वर्षापासून श्री रामनवमी उत्सवात व गेल्या २४ वर्षापासून श्री पुण्यतिथी उत्सवात विद्युत रोषणाई व देखावा उभा करणारे श्री व्दारकामाई मंडळ यांचेमार्फत श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ मध्ये यांचेकडून विद्युत रोषणाई व देखावा करुन घ्यावे किंवा कसे? तसेच मागील प्रथेप्रमाणे श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांना त्यांनी मागणी केलेली कलाकारांचे जाणे येण्याचे भाडेसह इतर किरकोळ खर्च व भाडयाने काही गोष्टी आणाव्या लागतात (उदा.फळया वगैरे) त्यासाठीची रक्कम आदा करणेस व त्यांचे विद्युत रोषणाईचे सामान मुंबईतून आणणे व उत्सव संपल्यावर पुन्हा परत पोहचविण्यासाठी भाडोत्री ट्रक्सची व्यवस्था करावी लागणार आहे. यासाठी सर्व मिळून जास्तीत जास्त रु. १०,००,०००/- इतका अपेक्षित खर्च आहे.

उपरोक्त नमूद क्रमांक ०१ अथवा ०२ यामधील योग्य त्या कार्यवाहीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री पुण्यतिथी उत्सव- २०१७ मध्ये श्री साई समाधी मंदिर, मंदिर परिसरामध्ये श्री द्वारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून विद्युत रोषणाई करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे याकामासाठी आवश्यकतेप्रमाणे दरपत्रके मागविणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.८** **श्री साईबाबांच्या जीवनावर आधारित सबका मालिक एक है या महानाटयाचे संस्थानने आयोजन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१.	अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२.	अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३.	अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४.	अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समिती ठराव:-** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या धार्मिक सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची रूपरेषा व स्वरूप ठरविणेकामी साईभक्त, शिर्डी ग्रामस्थ तसेच जागतीक साई मंदिर विश्वस्त/ पदाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना व अभिप्राय यावर चर्चा होऊन धोरणात्मक निर्णय होणेकामी धार्मिक सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे वेळापत्रक मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत आले होते. त्यात सप्टेंबर-२०१७ व ऑक्टोबर-२०१८ मध्ये या नाटयप्रयोगाचा समावेश करण्यात आलेला आहे. सदरहू प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.३५८ अन्वये खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*“..समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्या कार्यक्रमांची रूपरेषा ठरविणेत येऊन, झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे..”*

**प्रस्तावना:-** श्री. प्रशांत डांगे, कार्यकारी निर्माता, साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांनी मा. अध्यक्ष व मा. कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषित केलेल्या पत्रात “ श्री साईबाबांच्या आर्शिवादाने साई क्रिएटिव्ह व्हिजनची नागपूर मध्ये स्थापना केलेली असून आदरणीय हेमांडपंत यांचे तत्वज्ञानाने साई चरित्रावर आधारीत “ सबका मालिक एक है ” या प्रकाश आणि ध्वनी हिंदी महानाटयाचे दि.२९, ३० व ३१ ऑक्टोबर २०१० रोजी नागपूर मधील चिटणीस पार्क मध्ये आयोजन केलेले होते. या महानाटयामध्ये १७१ कलाकारांचा समावेश असून या महानाट्याद्वारे राष्ट्रीय एकात्मता, स्त्री भ्रूण हत्या, शिक्षणाची आवश्यकता, ग्राम स्वच्छता अभियान तसेच हिंदु मुस्लिम एकात्मतेची महती अशा प्रकारच्या अनेक घटकांमधून श्री साईबाबांचे विचार सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम करत आहोत. या महानाटयासाठी सुमारे ६७२० स्क्वेअर फूटाचा भव्य रंगमंच बनविलेला असून या महानाटयास सर्व प्रेक्षकांनी व प्रसारमाध्यमांनी आपलेसे केलेले आहे. आजतागायत या महानाटयाचे देशभरात विविध ४५ ठिकाणी सादरीकरण झालेले आहे. सन २०१८ मध्ये श्री साईबाबा समाधीस १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीचे वतीने ०१ ऑक्टोबर २०१७ ते १८ ऑक्टोबर २०१८ हे साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे करण्यात येणार आहे. या शताब्दी वर्षात देशभरात व जगभरात वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी या शताब्दी वर्षात श्री साईबाबांच्या जीवनावर आधारीत सबका मालिक एक है या जगातील पहिल्या हिंदी महानाटयाचे श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेने आयोजन करावे हि आमची इच्छा आहे..” असे कळविलेले असून सदर पत्राबरोबर या महानाटयाच्या अंदाजपत्रकाची प्रत जोडलेली आहे.

श्री. डांगे यांनी नाटयप्रयोगासाठी स्टेज उभारणी, लाईट, सांऊउ सिस्टम, वाहतूक व्यवस्था व इतर त्याचेमार्फत करण्यात येईल असे कळविले आहे त्याशिवाय आयोजकामार्फत खालील नमूद केलेप्रमाणे व्यवस्था करण्यात यावी असे नमूद केलेले आहे.

**A)	Organizer’s Responsibility:**

1.	Ground / Stadium. (6 day before show)
2.	Audience sitting arrangement & Bari gating.
3.	Green Room’s 15 ft X 30 ft - 6 Nos. (with Carpet, Chairs, Fan’s, Heliozoan’s & Mairror’s)
4.	Ground Light’s (Sufficient Light for Audience)

5. Mobile urinal's 2 Nos. (on back side of Green Room's for Artist)
6. Generator's (with Diesel)
a) 125 KVA for Light's (Before 1 day's of show & show day)
b) 125 KVA for Sound (Before 1 day's of show & show day)
c) 10 KVA for service lights (Before 6 day's of show & 2day's after show)
7. Residence for Artist & Back stage worker's
a) Back stage worker's (Before 6 day's of show & 2day's after show)
b) 30 Production Team Person's (2 day's before show & 1day's after show)
c) 110 Artist (2 day's before show & 1day's after show)
8. Food for Artist & Back stage person's (2 time Nasta, 1 time Lunch, 1 time Dinner & 4 time Tea)
9. Permitions for performance.
10. SecurityArrangment's
11. Advertisement
12. Printing Material (Hoardings/Banners/Tickets etc.)

**B) महानाटयासाठी देय रकमेचा तपशील –**

| Sr. No. | Description | Amount Rs. |
|---|---|---|
| 1. | Travelling & Transporting (रंगमंच साहित्य, कालाकार वाहतूक इत्यादी खर्च ) | 3,05,000/- |
| 2. | Back Stage (Stage, Light, Sound, Crackers, Costumes & Makeup) (रंगमंच उभारणी, लाईट इफेक्ट, सांऊउ सिस्टम, आतिषबाजी, रंगभूषा व वेशभूषा इत्यादी खर्च) | 3,00,000/- |
| 3. | Artist Remuneration कालाकार मानधन | 2,95,000/- |
| | **Total :** | **9,00,000/-** |

**प्रस्तावः-** साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांचे "सबका मालिक एक है" हे हिंदी महानाटय श्री साईबाबाचे जीवनावर आधारित असल्याने श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार व प्रसार होण्याच्या दृष्टीने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-१८ मध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे वेळापत्रकात दि. ३०/०९/२०१७ रोजी व शताब्दी वर्षाचे शेवटी दि. ११/१०/२०१८ रोजी या नाटयप्रयोगाचा समावेश करण्यात आलेला आहे.

तरी श्री प्रशांत डांगेव श्री सोमेश्वर बालपांडे - साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांचा "सबका मालिक एक है " हा नाटयप्रयोग शताब्दी वर्षाचे पूर्वसंध्येला म्हणजेच दि. ३०/०९/२०१७ रोजी व शताब्दी वर्षाचे शेवटी दि.११/१०/२०१८ रोजी अशा दोन वेळेस शिर्डी येथे आयोजीत करावयाचे झाल्यास एका नाटयप्रयोगासाठी रक्कम रू. ९ लक्ष (अक्षरी रुपये नऊ लाख) मात्र याप्रमाणे दोन वेळेस नाटयप्रयोगासाठी रक्कम रू.१८ लक्ष (अक्षरी रुपये अठरा लाख) मात्र खर्च येणार आहे.

१) सदरचा खर्च हा ३ लक्षा पेक्षा जास्त असल्याने ई-निविदा प्रकीया न राबवता करणे उचित होणार नाही. यावर मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

२) तसेच उपरोक्त नाटयप्रयोगातील प्रसंग व संवाद याचे स्किप्रट तपासून त्या ला मान्यता देणे आवश्यक आहे. यासाठी मा. विश्वस्त यांची समिती गठीत करून त्यांनी प्रसंग व संवाद तपासून शिफारस करणे उचित राहील.

वरील १ व २ या प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समितीत चर्चा होऊन निर्णय होणेकामी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या जीवनावर आधारित सबका मालिक एक है या महानाटयाचे समाधी शताब्दीच्या पार्श्वभूमीवर दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी आयोजन करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच या नाटयप्रयोगातील प्रसंग व संवाद याचे स्क्रिप्टस्थानिक उपसमिती सभेकडून तपासुन घ्यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी कालावधीत शिर्डी येथे येणारे साईभक्तांचे निवास व्यवस्थेकरीता संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे शिवारातील गट नं.१७२ पै. मध्ये (साईधर्मशाळा परिसरात) अथवा इतर उपलब्ध जागेत तात्पुरते स्वरुपात मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेकामी येणाऱ्या खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद -**

१) अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट- कलम (१) अन्वये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार, धार्मिक विधी, पुजा- अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उदिष्टये साध्य करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

२) अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये "रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**तसेच** अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** संस्थानतर्फे दिनांक ०१ ऑक्टोबर २०१७ ते १७ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव साजरा करणेत येणार आहे. याकालावधीत शिर्डी येथे येणारे साईभक्तांचे निवास व्यवस्थेकरीता तात्पुरते मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे. याकरीता मौजे निमगाव-को-हाळे शिवारातील गट नं. १७२ पै. मध्ये (साईधर्मशाळा परिसरात) क्षेत्रात अथवा इतर उपलब्ध जागेत साईभक्तांचे निवासाकरीता तात्पुरत्या स्वरुपाचे पत्र्याचे छत असलेला मंडप टाकून निवासव्यवस्था करता येईल. तसेच सदर ठिकाणी सुरक्षा केबीन, क्लोक रुम, माहिती केंद्र, प्रथमोपचार केंद्र, फुड स्टॉल इत्यादी करीता पत्र्याचे शेड करावे लागेल. सदर व्यवस्था करणेकामी येणा-या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**अ) शताब्दी कालावधीमध्ये साईभक्तांचे निवासाकरीता तात्पुरती मंडप व इतर व्यवस्था करणे.**

पत्र्याचे छत, कनात व बिछाईत इ. व्यवस्थेसह मंडप उभारणी करणे.

| अ.नं. | मंडपाचा तपशिल | परिमाण | कालावधी (वर्षभरात) | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | २००० व्यक्तींचे निवासाची व्यवस्था होईल या क्षमतेचा मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे. (श्री साईचरित पारायण व प.पु. गंगागिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमाचे कालावधीत तसेच संस्थानचे तीन उत्सव व इतर गर्दीचे कालावधी करीता साईभक्तांकरीता अतिरिक्त निवास सुविधा) | ८०,०००/- चौ. फुट | ५० दिवस | २.०० प्र.चौ. फुट प्र. दिवस | ८०,००,०००/- |
| २. | सुरक्षा केबीन, क्लोक रुम, माहिती केंद्र, प्रथमोपचार केंद्र, फुड स्टॉल करीता पत्र्याचे शेड असलेले व तीन बाजूने पत्र्याचे पार्टीशन तसेच आतिल बाजूस कापडी मंडपसह व्यवस्था करणे. (साईज -१०'X२०' प्रत्येकी) | १०००.०० चौ. फुट | ५० दिवस | २.०० प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,००,०००/- |
| | | | | **एकूण रक्कम रु. (अ)** | **८१,००,०००/-** |

**ब) शताब्दी कालावधीमध्ये साईभक्तांचे निवासाकरीता करणेत आलेल्या तात्पुरती मंडप व इतर व्यवस्थेचे ठिकाणी पोर्टेबल संडास व मुताऱ्यांची व्यवस्था करणे.**

| अ.नं. | मंडपाचा तपशिल | परिमाण | | कालावधी (वर्षभरात) | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | संडास | मुता-या | | |
| १. | २००० व्यक्तींचे निवासाची व्यवस्थेचे ठिकाणी पोर्टेबल संडास व मुता-या इ. व्यवस्था करणे. | २५ नग | १० नग | ५० दिवस | १७,२५,०००/- |

| | |
|---|---|
| **एकूण रक्कम (ब) -** | **१७,२५,०००/-** |
| **एकूण रक्कम रु. (अ+ब)** | **९८,२५,०००/-** |

श्री साईबाबा समाधी शताब्दी दि.०१ ऑक्टो.२०१७ ते १८ ऑक्टो.२०१८ या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता तात्पुरते निवासाकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेसाठी कृतीआराखडयात नमूद केलेप्रमाणे रक्कम रु.८,४७,००,०००/- मात्रचे खर्चास दि.३१/०३/२०१७ रोजीचे मा. मुख्यमंत्री महोदय यांचे कक्षेत झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कालावधीत शिर्डी येथे येणा-या साईभक्तांचे निवास व्यवस्थेकरीता तात्पुरते मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेकामी रक्कम रु. ९८,२५,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्ताव :** तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी कालावधीत शिर्डी येथे येणारे साईभक्तांचे निवास व इतर अनुषंगीक व्यवस्थेकरीता येणारे रक्कम रु. रु.९८,२५,०००/- मात्रचे खर्चास तसेच आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती मंजूर दराने करुन घेता येईल. याकामी वर्षभरातील किमान ५० दिवस याकरीता प्र.चौ. प्र. दिवस याप्रमाणे दर मागविता येतील. अथवा वर्षभरातील ५० दिवस म्हणजे १५ दिवसाकरीता, ७ दिवसा करीता, ३ दिवसाकरीता, १ दिवसाकरीता याप्रमाणे दर मागविता येतील. तरी याकामी येणारे खर्चास व वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई- निविदा मागविणेकरीता मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६९५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी कालावधीत शिर्डी येथे येणारे साईभक्तांचे निवास व्यवस्थेकरीता संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे शिवारातील गट नं.१७२ पै. मध्ये (साईधर्मशाळा परिसरात) अथवा इतर उपलब्ध जागेत तात्पुरते स्वरुपात मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु सदरहू तात्पुरते मंडप आवश्यकतेनुसार वर्षभरातील एकूण ४० दिवसांसाठी उभारणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **मंदिर परिसरातील लेंडीबागेचे नुतनीकरण व सुशोभिकरण करणेकामी लॅण्डस्केप डिझायनरची नेमणूक करणे व येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्रस्तावना- दि.1 ऑक्टोंबर 2017 पासुन श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाची सुरवात होत असुन, त्या अनुषंगाने दि.1 ऑक्टोंबर 2017 रोजी शताब्दी निमित्ताने मंदिर परिसरातील लेंडीबागेत ध्वजारोहन कार्यक्रम आयोजीत करणेत आलेला आहे. सदर कार्यक्रम मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते होणार आहे. दर्शनासाठी येणारे साईभक्त लेंडीबागेतुन जात असल्याने सदर बागेतील लॉन, शोभेची झाडे तसेच कारंजा यासाठी कामे करावयाची आहे. लेंडीबागेत झाडे लावुन बरेच वर्ष झालेली असल्याने सदर बागेचे नुतनीकरण व सुशोभीकरण करणे गरजेचे आहे.

याकरीता मंदिर परिसरातील लेंडीबागेत नविन लॉन बसवुन, विविध प्रकारची शोभेची झाडे लावता येईल. व भक्तांना बागेत फिरणेसाठी ग्रेनाईटबसवुन पाथवे तयार करता येईल. तसेच सदर बागेतील सर्व लोखंडी जाळ्या काढुन त्या ठिकाणी स्टीलची जाळी बसविता येईल.लेंडीबागेत आलेल्या साईभक्तांना दिवे लावणेकरीता 6 ते 7 फुट ऊंचीची दिपमाळ तयार करता येईल. लेंडीबागेत धबधब्यासमोर असणारे कमळतळे काढुन त्या ठिकाणी साईभक्तांच्या मनोरंजनासाठी संगीतकारंजा तयार करता येईल. तसेच शताब्दी महोत्सवाच्या ध्वजाचा स्तंब लेंडीबागेतील धबधब्यासमोर असल्याने सदर ध्वज हा सर्वांना दिसावा याकरीता लेंडीबागेतील ठराविक ठिकाणच्या मोठ्या वाढलेल्या झाडांची कटींग करुन त्यांना आकार देता येईल.

संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी,शासन,निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान- आर्थीक विषय आहे.

मागणी- मंदिर परिसरातील लेंडीबागेचे नुतनीकरण व सुशोभीकरण करणेकामी लॅन्डस्केप डिझायनरची नेमणुक करुन खालीलप्रमाणे कामे करुन घेता येईल.

| अ.नं. | करावयाची कामे | एकुण अंदाजे खर्च |
|---|---|---|
| 01 | लेंडीबागेत नविन लॉन व शोभेची झाडे लावणे तसेच वाढलेल्या झाडांची कटींग करुन त्यांना आकार देणे. | रु. 4,84,000/- |

| | | |
|---|---|---|
| 02 | लेंडीबागेतील कमळतळे काढुन त्याजागी भक्तांच्या मनोरंजनासाठी संगीत कारंजा तयार करणे. | रु. 8,50,000/- |
| 03 | साईभक्तांना बागेत फिरणेसाठी ग्रेनाईट बसविणे | रु. 11,16,000/- |
| 04 | लेंडीबागेतील लॉन, कारंजाच्या कडेने स्टीलची जाळी बसविणे. | रु. 60,00,000/- |
| 05 | 8 फुटाच्या 4 दगडी दिपमाळ तयार करणे. सिव्हील, पेंटींग व लायटींग कामासह | रु. 9,25,000/- |
| 06 | साईभक्तांना दिवे लावणेकरीता 24 फुट हाईटची दगडी दिपमाळ तयार करणे. सिव्हील, पेंटींग व लायटींग कामासह | रु. 10,00,000/- |
| 07 | लेंडीबागेत असणाऱ्या धबधब्याचे नुतनीकरण करणे तसेच त्यावर कलर लायटींगचे डेकोरेशन करणे. | रु. 10,00,000/- |
| 08 | लेंडीबागेतील गार्डनमध्ये फिश ॲक्वारियम करणे. | रु. 5,00,000/- |
| 09 | लेंडीबागेतील गेटवर आकर्षक अशा कमानीची उभारणी करणे. | रु. 10,00,000/- |
| 10 | मंदिर परिसरातील गेट नं.1 व 5 मधील गार्डनच्या जागेत (हायमॅक्स जवळ) पाण्याचा धबधबा तयार करुन त्यावर साईबाबांचे चरित्र लेजर-शो मार्फत साईभक्तांना दाखविणे. 2 प्रोजेक्टर | रु.72,00,000/- |
| 11 | पी.आर.ओ ऑफिस समोरील जुना चालु असलेल्या कारंजाचे नुतनीकरण करुन नविन संगीत कारंजा तयार करणे. | रु. 8,50,000/- |
| 12 | बॅनर | रु.70,000/- |
| 13 | लेंडीबागेत लाईट ॲण्ड साऊंड सिस्टीम बसविणे | रु. 8,00,000/- |
| 14 | लेंडीबागेतील धबधब्यासमोर श्रींची मुर्ती | रु. 8,00,000/- |
| 15 | श्रींचे पादुका | रु.5,00,000/- |
| | **एकुण खर्च** | **रु 2,30,95,000/-** |
| | **GST 18 %** | **रु. 41,57,100/-** |
| | **एकुण खर्च** | **रु.2,72,52,100/-** |

विभागाचा अभिप्राय- तरी मंदिर परिसरातील लेंडीबागेचे नुतनीकरण व सुशोभीकरण करणेकामी लॅन्डस्केप डिझायनरची नेमणुक करणेस तसेच उपरोक्तप्रमाणे कामे करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.2,72,52,100/- (दोन कोटी बाहत्तर लाख बावन्न हजार शंभर) मात्राचे खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६९६** **आजचे सभेत मंदिर परिसरातील लेंडीबागेचे नुतनीकरण व सुशोभिकरण करणेकामीचे सादरीकरण दाखविणेत आले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील लेंडीबागेचे नुतनीकरण व सुशोभिकरण करणेसाठी खालीलप्रमाणे कामे करुन घेणेकामी लॅण्डस्केप डिझायनरची नेमणूक करणेत यावी.**

| अ.नं. | करावयाची कामे | एकुण अंदाजे खर्च |
|---|---|---|
| 01 | लेंडीबागेत नविन लॉन व शोभेची झाडे लावणे तसेच वाढलेल्या झाडांची कटींग करुन त्यांना आकार देणे. | रु. 4,84,000/- |
| 02 | लेंडीबागेतील लॉन, कारंजाच्या कडेच्या आहे, त्याच जाळया दुरुस्त करुन रंगरंगोटी करणे. तसेच ज्या ठिकाणी जाळया नाहीत, अशा ठिकाणी इतर जाळयांशी सुसंगत जाळया बसविणे. | रु. 60,00,000/- |
| 03 | 8 फुटाच्या २ दगडी दिपमाळ तयार करणे. सिव्हील, पेंटींग व लायटींग कामासह | रु. 9,25,000/- |
| 04 | साईभक्तांना दिवे लावणेकरीता 24 फुट हाईटची दगडी दिपमाळ तयार करणे. सिव्हील, पेंटींग व लायटींग कामासह | रु. 10,00,000/- |
| 05 | लेंडीबागेत असणाऱ्या धबधब्याचे नुतनीकरण करुन लाईट ॲण्ड साऊड शो तयार करणे. | रु. 10,00,000/- |

| | | |
|---|---|---|
| 06 | मंदिर परिसरातील गेट नं.1 व 5 मधील गार्डनच्या जागेत (हायमॅक्स जवळ) पाण्याचा धबधबा तयार करुन त्यावर साईबाबांचे चरित्र लेजर-शो मार्फत साईभक्तांना दाखविणे. 1 प्रोजेक्टर | रु.72,00,000/- |
| 07 | पी.आर.ओ ऑफिस समोरील जुना चालु असलेल्या कारंजाचे नुतनीकरण करुन नविन संगीत कारंजा तयार करणे व साईबाबांच्या शिकवणूकीवर १० मिनीटाचा शो करणे. | रु. 8,50,000/- |
| | एकूण रु. | १,७४,५९,०००/- |

**उपरोक्त कामांच्या अंदाजपत्रकाची फेर छाननी करुन कमीत-कमी खर्चामध्ये व ही कामे करुन घेण्यासाठी कमी कालावधी असल्यामुळे सदरहू कामे देणगीदारांमार्फत, देणगी स्वरुपात करुन घेण्यात यावीत, असे ठरले.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **श्री साईबाबांच्या समाधी शताब्दी महोत्सव काळात साईभक्तांना टी-शर्ट खरेदीबाबतचा विषय निरस्त करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०९.१०.२०१६ निर्णय क्र. ७०३ श्री साईबाबांचे शताब्दी महोत्सव काळात साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन द्यावयाचे टी-शर्ट, रुमाल व टोपी विविध पुरवठादार उत्पादक कंपनी यांचेकडून उपलब्ध करुन देणेबाबत विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत निर्णय झालेला असुन त्यासाठी एकुण रक्कम रु. २,३६,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्राप्त झालेली आहे व त्यासाठी सन २०१७-१८ चे प्रकाशने विभागाचे अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आलेली आहे.

दि.०६.०५.२०१७ ची टिपणीवर फेरसादर करणेबाबत प्राप्त निर्देशा अनुसार धुळे, सुरत, मुंबई, दिल्ली व सोलापूर येथून प्राप्त झालेले टी-शर्टचे नमुने पहाणे-पसंतीचे व त्यानुसार खरेदीचे कामकाज श्री सचिन तांबे, माजी विश्वस्त यांचे मार्गदर्शनानुसार प्रक्रिया पुर्ण करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषयावरील चर्चे अंती मा. अध्यक्ष महोदय यांनी मौखिक आदेशित केले असलेने, श्री. सचिन तांबे यांनी धुळे व सुरत येथील नमुने पसंत केले आहे.

दि.१८.०७.२०१७ चे परिपत्रक मा. सचिन भागवत तांबे, सदस्य यांनी साईबाबा संस्थान विश्वस्त पदाचा राजीनामा दिला असलेने, सदर राजीनामा स्विकृत केला असलेबाबत मा. श्री. ना. प्र. धोटे, शासनाचे विधी सल्लागार-नि-सह-सचिव यांनी दि. १०.०७.२०१७ रोजीचे पत्रान्वये कळविले असले कारणाने मा. श्री सचिन भागवत तांबे यांचे नाव मा. व्यवस्थापन समिती सदस्यांचे यादीतून कमी करणेत आलेबाबत सर्व अधिक्षक व विभागप्रमुख यांनी नोंद घेणेबाबत परिपत्रकात नमूद केले आहे.

दि. १०.०८.२०१७ चे टिपणीवर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचे निर्देशानुसार टी-शर्ट खरेदी करुन साईभक्तांना उपलब्ध करुन देणे ही प्रक्रिया क्लिष्ट असल्याने तसेच त्यासाठी खर्च होणारी रक्कम रु. २,३६,२५,०००/- हि जास्त असुन व सध्या कापड खरेदीवर २८% GST लागत असल्याने साईभक्तांना वाजवी दरात टी-शर्ट उपलब्ध करुन देता येणार नाहीत व पुरवठादार यांनी सादर केलेले कापडाचे नमुने व कापडाची प्रतवारी तपासुन घेणेकामी संस्थानकडे तांत्रिक क्षमतेचे मनुष्यबळ उपलब्ध नाही. व तसेच संस्थानने टी-शर्ट खरेदी करुन विक्री प्रक्रिया राबवविल्यास साईभक्तांनामधून नाराजीबाबच्या प्रतिक्रीया येण्याची शक्यता नाकारता येत नाही. आता श्री साई समाधी शताब्दी पर्व सुरु कालावधी जवळ आल्याने वेळेत टी-शर्ट उपलब्ध होण्यास बराच कालावधी जाईल असे वाटते.

करिता टी-शर्ट, टोपी व रुमाल खरेदी बाबतचा इकडील विभागाकडून सादर केलेला प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०९.१०.२०१६ मधील निर्णय क्र. ७०३ निरस्त करणेस मा. व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेनुसार श्री साईबाबांच्या समाधी शताब्दी महोत्सव काळात साईभक्तांना टी-शर्ट उपलब्ध करुन देणेबाबत दि.०९.१०.२०१६ रोजीचे व्यवस्थापन समिती सभेमधील निर्णय क्र.७०३ निरस्त करणेत आला.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कालावधीकरीता फायर/ आपत्कालीन साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे समाधीस सन १८ ऑक्टोबर २०१८ मध्ये १०० वर्षे पुर्ण होणार आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते १८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरा करण्यात येणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सोहळयाकरीता वर्षभर देश विदेशातून साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मंदिर व संस्थान परिसरात आपत्कालीन परिस्थिती उदभवल्यास फायर ॲण्ड सेफ्टी विभागास व दक्षता पथकास खालील साहित्याची आवश्यकता आहे.

**आपत्कालीन परिस्थितीकरीता खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे.**

| अ.नं. | साहित्य | वर्णन | नग | प्रति नग अंदाजे दर | एकुण किमंत |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | बॅक पॅक सिलेंडर | WATER MIST AND CAF FIRE EXTINGUISHERS, BACKPACK & HAND HELDTYPE DESIGN : HIGH PRESSURE | ०२ | २,९९,५२०/- | ५,९९,०४०/- |
| | | | | **एकूण रक्कम** | ५,९९,०४०/- |

**अक्षरी रु.पाच लाख नव्यान्नव हजार चाळीस मात्र.**

**विभागाचा अभिप्राय –**

१. **बॅक पॅक-** मंदिर व संस्थान परिसरात आपत्कालीन परिस्थिती उदभवल्यास प्रवाही इलेक्ट्रीक शॉर्टसर्किट वर नियंत्रण मिळविणेकामी सदर साहित्याचा उपयोग होणार आहे.

उपरोक्त परिशिष्टामधील अ.नं. ०१ बॅक पॅक सिलेंडर खरेदी करणेकामी अंदाजे रु ६,००,०००/- (अक्षरी रु. सहा लाख मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदर साहीत्य प्राप्त होणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करुन दरपत्रके मागवुन साहीत्य खरेदी करता येईल असे नम्र मत आहे.

**करीता...**

अ. उपरोक्त परिशिष्टातील अ.नं.०२ प्रमाणे साहित्य खरेदीकामी अहमदनगर, नाशिक, पुणे, मुंबई या शहरातील नामवंत वर्तमान पत्रकात संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फत जाहीरात प्रसिध्द करणेकामी तसेच संस्थानचे संकेतस्थळावर ई– निविदा प्रक्रिया प्रसिध्द करणेस मान्यता असावी .

ब. सदर साहित्य देणगी स्वरुपास मिळालेस ते स्विकारणे मान्यता असावी.

क. बॅक पॅक सिलेंडर खरेदी कामी येणा-या अंदाजे रु.६,००,०००/- खर्चास मान्यतेसाठी सदरचा विषय सादर.

तरी उपरोक्त **अ, ब,** आणि **क** बाबत प्रस्ताव मान्यतेसाठी मा.व्य.समिमीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कालावधीकरीता फायर/ आपत्कालीन साहित्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६,००,०००/- मात्र पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच दरम्यानचे कालावधीमध्ये सदरहू साहित्य देणगी स्वरुपात मिळाल्यास, स्विकारणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- फायर ॲण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे संदर्भात चर्चा करणे व त्यासंदर्भात अंमलबजावणीसाठी व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद–** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात “समितीचे कर्तव्य व अधिकारी” या शिर्षकाखाली अधिनियम नंबर १७ (१) मध्ये “राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा

कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांकः-** मा.व्यवस्थापन समिती दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.१४ वरील निर्णय क्र.५०५.

**प्रास्तविकः-** श्री साईबाबा समाधीस सन २०१८ मध्ये शंभर वर्ष पुर्ण होत आहेत.त्यानिमीत्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते १९ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी अखेर) श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे करण्यात येणार आहे. शताब्दी वर्षाचे कालावधीत श्रींचे दर्शनासाठी साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असल्याने यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधीनी पुणे यांचेमार्फत आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणेकामी येणाऱ्या खर्चाचा अंदाज घेणेकामी प्रस्ताव मागविणेत आलेला होता. त्यांनी आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणेकामी रु.३ लाख इतका खर्च कळविलेला असुन त्यापैकी ॲडव्हान्सपोटी ६०% रक्कम रु.१,८०,०००/- व आराखडा तयार झालेनंतर उर्वरीत ४०% रक्कम रु.१,२०,०००/- यशदाचे खात्यावर जमा करणेबाबत कळविले होते.

**सद्यस्थितीः-** मा.व्यवस्थापन समिती दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.१४ वरील निर्णय क्र.५०५ नुसार खर्चास मान्यता मिळालेली असुन ६०% रक्कम यशदा, पुणे यांना आदा करण्यात आलेली आहे. त्यानुसार कर्नल व्ही.एन.सुपनेकर, संचालक, आपत्ती व्यवस्थापन केंद्र, यशदा यांनी दि.२८/०७/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली संस्थानचे सर्व विभागाचे अधिकारी तसेच इतर शासकीय विभागाचे अधिकारी यांचे समवेत बैठक घेतलेली असुन बैठकीमध्ये शताब्दी महोत्सवाचे निमीत्ताने करावयाचे नियोजनाबाबत सुचना केलेल्या आहेत. तसेच यानंतर पुन्हा दि.१०/०८/२०१७ व दि.११/०८/२०१७ रोजी यशदाचे ०४ प्रतिनीधी यांनी संस्थानचे सर्व निवासस्थाने, प्रसादालय, वाढीव कार पार्कींग यांची पहाणी करुन माहिती घेतलेली असुन आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणेकामी पुढील कार्यवाही सुरु आहे.

**अनुमानः-** धोरणात्मक.

**मागणीः-** शताब्दी वर्ष २०१८ चे गर्दीचे नियोजनकामी यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे यांचे मार्फत आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे व त्याकामी येणारे अनुषंगीक खर्चास मान्यता मिळणे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः-** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष २०१८ कालावधीत शिर्डी येथे भेट देणाऱ्या सर्व भाविकांचे दर्शन सुखकर व्हावे तसेच आपतकालीन व्यवस्थापनासह कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न अबाधीत ठेवणेसाठी यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधीनी, पुणे यांचे मार्फत आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणेत येत असुन त्यांचेमार्फत आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करुन मिळालेनंतर आपत्ती व्यवस्थापन आराखडा अंमलबजावणीसाठी व त्यासाठी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधीनी, पुणे यांचे मार्फत आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करुन मिळालेनंतर त्याची अंमलबजावणी करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१४** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ साठी संस्थान मालकीच्या मौजे शिर्डी व निमगाव कोऱ्हाळे हद्दीतील पडीत असलेल्या जमीनी साईभक्तांना सोयी-सुविधा पुरविणेकामी व तद्नुषंगाने विविध प्रयोजनांसाठी वापरणेकामी जमीनींची सुधारणा करणे व त्यासाठी होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील १७(१) मधील तरतुदीनुसार राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे,मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम १(ग) अन्वये भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**प्रस्ताव-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ साठी, संस्थान मालकीच्या मौजे शिर्डी व निमगाव- को-हाळे हद्दीतील पडीत असलेल्या जमीनी साईभक्तांना सोयी-सुविधा पुरविणेकामी व तद्नुषंगाने विविध प्रयोजनांसाठी वापरणेकामी जमीनींची सुधारणा करणे, त्यांना कंपाऊंड करणे व त्यासाठी होणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना-** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यासाठी तसेच पार्कींग व्यवस्था करणेसाठी आवश्यकतेनुसार साईभक्त कॅम्प व तात्पुरत्या स्वरुपाची निवास व्यवस्था करणेसाठी, शताब्दी कालावधीत आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास भाविकांना आश्रय देण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत कार्यवाही करणेसाठी व समाधी शताब्दी वर्षामध्ये श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या भक्तांना सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देता याव्यात यासाठी मोठया प्रमाणात व सुयोग्य अशा जमीनींची आवश्यकता भासणार आहे.

यास्तव शिर्डी व निमगाव-को-हाळे हद्दीतील संस्थानचे मालकीच्या सध्यस्थितीत पडीत असलेल्या खालील नमूद केलेल्या जमीनींची लेव्हलींग करुन सुधारणा करुन त्यांना कंपांऊड करुन त्यांचा उपयोग उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव काळात विविध प्रयोजनांसाठी करता येईल.

संस्थान मालकीच्या पडीत जमीनींची माहीती- **(परिशिष्ट अ)**

| अ.नं. | गावाचे नाव | सर्वे नंबर | क्षेत्र हे.आर | मंदिरापासून अंतर अंदाजे (किमी) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिर्डी | ५४,५५ | ०१.८९ | ३१३ मीटर | पडीत |
| २ | | १२४/११ | ००.६० | १ किमी | चिकू बाग |
| ३ | | १२४/१२ | ००.६० | १ किमी | चिकू बाग |
| ४ | | २०७/२ | ००.८० | २.५ किमी | पडीत (कंपांऊड आहे) |
| ५ | | २१२/२ | ००.४२ | ३ किमी | पडीत |
| ६ | | २१२/३ | ००.९८ | ३ किमी | पडीत |
| ७ | | २१३/१ | ००.४० | ३ किमी | पडीत |
| ८ | | २१३/१ | ००.३७ | ३ किमी | पडीत |
| ९ | | २०३/२ | ००.६० | २.५ किमी | पडीत |
| १० | | २०३/१ | ००.६० | २.५ किमी | पडीत |
| ११ | निमगाव-को-हाळे | १९८ | ०३.३८ | ३ किमी | पडीत |
| १२ | | १९९ | ०१.९६ | ३ किमी | पडीत |
| १३ | | २०० | ०१.८८ | ३ किमी | पडीत |
| १४ | | २०१ | ००.९८ | ३ किमी | पडीत |
| १५ | | २१८ | ०१.०० | ३.५ किमी | आंबा (कंपांऊड आहे) |
| १६ | | २२१ | ०३.२६ | ३.५ किमी | आंबा (कंपांऊड आहे) |
| १७ | | २२९ | ००.९८ | ३.५ किमी | पडीत (कंपांऊड आहे) |
| १८ | | २३४ | ००.८४ | ३.५ किमी | पडीत (कंपांऊड आहे) |
| १९ | | २३५/३ | ०२.४१ | ३.५ किमी | पडीत (कंपांऊड आहे) |
| २० | | २३८ | ००.२७ | ३.५ किमी | पडीत (कंपांऊड आहे) |
| २१ | | २४५ | ०३.३० | ३.५ किमी | पडीत (कंपांऊड आहे) |
| २२ | | २४९ | ०१.७८ | ३.५ किमी | पडीत (कंपांऊड आहे) |
| २३ | | २५० | ०१.८५ | ३.५ किमी | पडीत (कंपांऊड आहे) |
| २४ | | २३९ | ००.१८ | ३.५ किमी | पडीत |

**विभागाचा अभिप्राय**-उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमासाठी पार्कींग व्यवस्था करण्यासाठी आणि आवश्यकतेनुसार साईभक्त कॅम्प व तात्पुरत्या स्वरुपाची निवास व्यवस्था करण्यासाठी तसेच शताब्दी कालावधीत आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास भाविकांना आश्रय देण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत कार्यवाही करण्यासाठी व समाधी शताब्दी वर्षामध्ये श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या भक्तांना सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देता याव्यात यासाठी **परिशिष्ट अ** मधील जमीनींची संस्थानचे बांधकाम विभागामार्फत लेव्हलींग करुन जमीनींची सुधारणा करुन त्यांना आवश्यकतेनुसार कंपांऊंड करुन उपरोक्त विविध प्रयोजनासाठी त्यांचा वापर करता येईल.

तरी सदरचे प्रस्तावास व तद्नुषंगाने होणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्तुतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या परिशिष्ट अ मधील जमीनींची संस्थानचे बांधकाम विभागामार्फत लेव्हलींग, सुधारणा करणे व आवश्यकतेनुसार कंपांऊंड करुन विविध प्रयोजनासाठी त्यांचा वापर करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच यापैकी काही जमीनींमध्ये प्रस्तावित गोशाळेमधील गाईंसाठी चाऱ्याची व्यवस्था करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **मौजे निमगाव- कोऱ्हाळे गट नं.८७-८८ मधील जागेत प्रसाद लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिट उभारणेकरीता आर्किटेक्ट सुशिल देशमुख यांनी तयार केलेल्या आराखडा व अंदाजपत्रकाचे सादरीकरण पाहून निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.३२२ (३०) अन्वये मौजे निमगांव- को-हाळे गट नं.८७,८८ मधील जागेत प्रसाद लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिट उभारणेकरीता आर्किटेक्ट सुशिल देशमुख ॲण्ड असोसिएटस्, औरंगाबाद यांना दि०२/०६/२०१७ रोजीचे पत्रान्वये नेमणूक पत्र देणेत आले आहे.

आर्किटेक्ट यांनी सदर कामाचे अंदाजपत्रक व आराखडा तयार केलेला आहे तसेच सदर जमिनीचे रेखांकन मंजुरीसाठी प्रस्ताव उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत मा. सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे. आर्किटेक्ट यांनी सदरहू प्रकल्पाचे खालीलप्रमाणे दोन पर्यायी आराखडे व अंदाजपत्रक तयार केलेले आहेत.

| Sr.No. | Option Type | Discription | Built up Area in Sqm. | Cost of Block Estimate in Cr. |
|---|---|---|---|---|
| 01 | Option - I | R.C.C. Building (Only GF) | 3275.075 | Rs.14.41 Cr. |
| 02 | Option - II | Compositee – PEB + RCC Building (only GF) | 4102.91 | Rs.12.15 Cr. |

विषयांकीत कामासाठी आर्किटेक्ट सुशिल देशमुख ॲण्ड असो., औरंगाबाद यांनी तयार केलेल्या दोन पर्यायी आराखंडयांचे सादरीकरण पाहून त्यापैकी एक पर्याय निश्चीत करणेबाबत निर्णय होणेसाठी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. याबाबत निर्णय क्र.६५१ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

*"प्रसाद लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र फुट प्रोसेसिंग युनिट उभारणेकामीचा आराखडा व अंदाजपत्रकाचे सादरीकरण करणेसाठी आर्किटेक्ट सुशिल देशमुख हे सभेसमोर उपस्थीत राहू शकले नाही. यामुळे सदरहू सादरीकरण सादर करणेकरीता त्यांना पुढील सभेसमोर बोलविणेत यावे असे ठरले."*

**प्रस्तावः-** तरी विषयांकीत कामासाठी आर्किटेक्ट सुशिल देशमुख ॲण्ड असो., औरंगाबाद यांनी तयार केलेल्या दोन पर्यायी आराखंडयांचे सादरीकरण पाहून त्यापैकी एक पर्याय निश्चीत होणेस विनंती.

**निर्णय क्र.७०१** **आर्किटेक्ट सुशिल देशमुख ॲण्ड असो., औरंगाबाद यांनी लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र युनिट उभारणीकामीचे सादरीकरण आजचे सभेमध्ये सादर केले. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र युनिट उपरोक्त प्रस्तावातील पर्याय ०१ प्रमाणे उभारणेत यावे, असे ठरले. त्यासाठी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१४.४१ करोड मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **श्री साईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजी विभागाकरीता नवीन 3 Tesla MRI Machine खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात रेडीओलॉजी विभागात सध्या असलेले Siemens कंपनीचे MRI मशिन मॉडेल Magnetom Avanto हे मशिन सन २००६ मध्ये रक्कम रु.५,०५,००,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले आहे. सदरचे मशिन सध्या काम करत आहे. परंतू सदर मशिन हे जुने झाल्यामुळे सध्या वारंवार बंद पडत असून त्यामुळे त्याचा बंद पडण्याचा कालावधी हा देखील वाढत आहे, पर्यायाने दैनंदिन कामाची व रुग्णांची गैरसोय होते. सदर मशिनवर मे-२०१६ पर्यंत ७९४६६ इतक्या रुग्णांचे MRI करण्यात आलेले आहे. सदर मशिन वारंवार बंद पडत असल्यामुळे त्यावरील वार्षिक दूरुस्ती व देखभालीचा खर्च देखील वाढत आहे, मे-२०१६ पर्यंत सदर मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकामी रु.१,८१,६९,४३३/- इतका खर्च झालेला आहे. दि.३१/०३/२०१६ अखेर सदर मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत रु.२८,४३,८३२/- इतकी आहे. सध्या सन २०१६-१७ करीता कंपनीने रक्कम रु.३२,३६,३३२/- इतक्या रक्कमेचे CMC करीता कोटेशन दिलेले आहे, म्हणजेच सदर मशिनवर मशिनचे घसारा वजा जाता येणा-या किंमतीपेक्षा सध्याचा दूरुस्ती व देखभालीचा खर्च जास्त होत आहे. त्यामुळे रेडीओलॉजी विभागाने व बायोमेडीकल विभागाने नविन उच्च तंत्रज्ञान असलेले 3 Tesla MRI Machine घेण्याची शिफारस केलेली आहे.

नविन मशिन खरेदीकामी मे.सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते, त्यांचे दरपत्रकानुसार खरेदीचा तपशील खालीलप्रमाणे –

| Sr. No. | Name of Item | Qty. | App. Rate per in Rs. | App. Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | 3 Tesla MRI Machine with Accessories | 01 | 8,50,00,000.00 | 8,50,00,000.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **8,50,00,000.00** |

त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रेडीओलॉजी विभागाकरीता ०१ नग नविन उच्च तंत्रज्ञान असलेले 3 Tesla MRI Machine विहित पध्दतीने ई - निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.८,५०,००,०००/-(अक्षरी रु. – आठ कोटी पन्नास लाख मात्र) चे खर्चास तसेच Siemens कंपनीचे जुने MRI मशिन मॉडेल Magnetom Avanto without UPS परत (Buyback) करणेकामी शासनाची पूर्व मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव दि.१६/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपूढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता, त्यावर निर्णय क्र.५५८ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजी विभागातील जुने ०१ नग MRI Machine दुरुस्त करणेत येऊन, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये वापरणेत यावे, असे ठरले व श्री साईबाबा रुग्णालयामध्ये नविन ०१ नग 3 Tesla MRI Machine खरेदी करणेसाठी विहित पध्दतीने ई- निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात देऊन दि.०२/०१/२०१७ ते दि.१६/०१/२०१७ या कालावधीत निविदा मागविण्यात आल्या होत्या, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१९/०१/२०१७ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ऑनलाईन एकही निविदा प्राप्त झाली नव्हती त्यामुळे "शासन निर्णय क्र.- भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उदयोग- ४ दि.३० ऑक्टोबर २०१५ – प्रकरणे चार मधील मुद्दा क्र.४.४.३.१ मधील – निविदा कालावधीस मुदतवाढ" अन्वये जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी सदर ई-निविदेस दि.१७/०१/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.२३/०१/२०१७ पर्यंत प्रथम एक आठवडयाची मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन दोन ई-निविदा प्राप्त झालेल्या होत्या. परंतु खरेदीकामी तुलनात्मक दर मिळणेकामी कमीत कमी ०३ निविदांची आवश्यकता असल्यामुळे दि.२४/०१/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.३०/०१/२०१७ पर्यंत दुस-यांदा एक आठवडयाची मुदतवाढ देण्यात आलेली होती. परंतु त्यास अनुसरुन एकही निविदा प्राप्त झालेली नाही.

खरेदीकामी दोनच ई-निविदा प्राप्त झाल्यामुळे व तुलनात्मक दर मिळणेकामी कमीत कमी तीन निविदांची आवश्यकता असल्यामुळे उपरोक्त खरेदीकामी दि.०७/०२/२०१७ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये दुस-यांदा ई – निविदा मागविण्यात येऊन दि.२५/०३/२०१७ ते ०८/०४/२०१७ अखेर ऑनलाईन ई – निविदा मागविण्यात आल्या होत्या, त्यास अनुसरुन एकही ऑनलाईन ई– निविदा प्राप्त झाली नाही, त्यामुळे दि.१०/०४/२०१७ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये प्रथम दि. १५/०४/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार एकही निविदा प्राप्त झाली नाही, त्यामुळे दि. १४/०४/२०१७ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये दि.२४/०४/२०१७ अन्वये दुस-यांदा मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु, पुरवठाधारकांनी प्रि–बिडमध्ये उपस्थित केलेल्या शंकाचे निरसन करणेकामी १० दिवसांचा कालावधी लागल्यामुळे दि.२४/०४/२०१७ नंतर पुन्हा ०६ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली होती, त्यास अनुसरुन ऑनलाईन ०२ ई – निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Siemens Ltd., Mumbai | 04/05/2017 |
| 2 | M/s. Philips Electronics India Limited, Mumbai | 04/05/2017 |

वरीलप्रमाणे प्राप्त ०२ तांत्रिक ई-निविदा दि.१९/०५/२०१७ रोजी मा.खरेदी समिती सभेपुढे उघडण्यात येऊन तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला होता. त्यामध्ये M/s.Siemens Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांचे Specification आपल्या मागणीप्रमाणे नसल्याबाबत डॉक्टरांनी कळविलेले होते व M/s. Philips Electronics India Limited, Mumbai यांनी Online VAT Registration Certificate दिलेले नसल्यामुळे दोन्ही निविदा अपात्र करण्यात आल्या होत्या.

त्यामुळे दि.२६/०६/२०१७ रोजीच्या मंजुर टिप्पणीन्वये तिस-यांदा ई-निविदा मागविण्यास मान्यता घेऊन दि.०७/०७/२०१७ ते १७/०७/२०१७ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या व दि.१२/०७/२०१७ रोजी प्री-बिड मिटींग आयोजीत करण्यात आलेली होती. त्यामध्ये उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन करून दि.१३/०७/२०१७ रोजी Amendment अपलोड करण्यात येऊन दि.२४/०७/२०१७ पर्यंत ई-निविदा भरण्यास मुदतवाढ देण्यात आली. त्यास अनुसरून Online ०३ ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

सदरहू प्राप्त झालेल्या ०३ Online तांत्रिक ई-निविदा दि.०४/०८/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून सदर दोन्ही निविदांमधील तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून बायोमेडीकल विभागामार्फत तपासून घेण्यात आलेला आहे. त्यानुसार तीनही निविदा पात्र असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Supplier |
|---|---|
| 01 | M/s. Siemens Healthcare Pvt.Ltd., Mumbai |
| 02 | M/s. Philips Electronics India Limited, Mumbai |
| 03 | M/s. Wipro GE Healthcare Pvt.Ltd., Pune |

वरीलप्रमाणे पात्र तीनही ऑनलाईन कमर्शियल ई-निविदा दि.१९/०८/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिती सभेपुढे संबधित निविदाधारकांचे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांनी देऊ केलेल्या तुलनात्मक दरांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| **Sr. No.** | **Details** | **Price in Rs. Inclusive all Taxes ( without Custom Duty)** | | |
|---|---|---|---|---|
| | | **M/s. Philips Ltd.** | **M/s. Siemens Ltd.** | **M/s. Wipro GE Ltd.** |
| 1 | **3.0 Tesla MRI System With Suitable RF Enclosure with Warranty Five Years** | 112558695.35 | 174500000.00 | 106771480.50 |
| 2 | **ACCESSORIES** | | | |
| | A} Water chiller for Cold Head/Gradients | 1106660.00 | 0.00 | 2000000.00 |
| | B} Non-ferromagnetic patient transfer trolley of international make should be provided | 435818.00 | 380000.00 | 0.00 |
| | C} 3 T MR compatible Dual head Pressure injector with 500 syringes : with facility for continuous battery charging | 1697565.00 | 2500000.00 | 2470500.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | D} 3 T MR compatible Multipara Monitor : Monitor with remote display (ECG,NIBP,SPO2, ETCO2) along with infusion pump with remote display having common single wireless network system for both. The multi para monitor should be upgradable. The Monitor should provided with all reusable accessories for Adult and Paediatric Patients | 2464000.00 | 5000000.00 | 2684000.00 |
| | E} 3T Compatible Anesthesia System: For pediatric and Adult use with anesthetic Ventilator and acessories having separateindexed provisionfor connecting central pipeline supplies of oxyegen and two nitrous oxide cylenders.It should have High pressure tubing for medical gases with pressure guages.Gas flow management system should be precisely calibrated with cascaded tube flow meters with mechanical guard and emergency oxygen flush.There should be close circuit breathing system with carbon Dioxide absorbent. Vaporizer must be isolated from the gas flow in off position and should prevent simultaneous activation of more than one vaporizer. The system should be FDA approved and should have local distributor for servicicng and installation.All componenets of the anesthetic system should from the same manufacturer. All the required accesories shpould be provided along with the machine. | 1150040.00 | 2525000.00 | 0.00 |
| | F} 3 T MR compatible Music System | 19294.00 | 15000.00 | 0.00 |
| | G} Central Medical Gas Pipeline as per requirement | 0.00 | 100000.00 | 300000.00 |
| | H}**Printer:**<br>**(1) Dry Chemistry Direct Digital Camera:** capable of printing all films sizes online with resolution of 500 DPI or more. All film sizes should be freely configurable at user level; | 626993.00 | 460000.00 | 650000.00 |
| | **(2) Colour Laser Network Printer:** for printing of \Colour CSH Perfusion/BOLD maps and images and film documentation on papaer (minimum 24 ppm) | 63339.00 | 36000.00 | 91500.00 |
| | **I} Data Archival for long time Storage:** For archival & Storage of images and spctroscopy with Storage capacity of 10 TB. System should have database software for maintaining the demogrqaphic patient data and recalling the same.It should have DVD writer facilityfor copying speciic patient data on DVD/CD | 1161223.00 | 45000.00 | 610000.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **J} Metal detection Device:** It should be light weight but robust design and built having two poles. one each side of entrance of examination room. It should be able to detect all ferromagnetic materials,alloy and ferrite materials uniformly in all directions and orientations. It should able to detect such objects in walking and in running with speed.The device should be passive and should have visual as well as audio alarm. | 165375.00 | 1400000.00 | 0.00 |
| | **K)** Full system UPS for entire MRI system with min. 30 minutes backup. | 1888979.00 | 2000000.00 | 1525000.00 |
| | L)Any other accessory required if any can be quoted as separately. | 0.00 | 0.00 | 9615720.00 |
| | M) Consumables: The rates of all the consumables required for above system and its accessories should be fixed for the Warranty period. | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 3 | N)Turn Key: The bidder to inspect the site and collect the site plan along with tender document. Turn key work to be done as per site plan. Turnkey work done by the bidder to be maintained during the warranty and CMC period. | 1000000.00 | 2500000.00 | 0.00 |
| 4 | AMC: After End of Warranty period, AMC should be 1 % of the basic cost of machine Plus service tax at actual | 0.00 | 1400000.00 | 6050000.00 |
| 5 | CMC:After End of Warranty period, CMC should be 5 % of the basic cost of machine Plus service tax at actual. | 5964340.00 | 5769432.00 | 35040042.00 |
| | The price for AMC , CMC should be fixed for next five years after completion of Warranty. The successful bidder to provide 98% uptime during the CMC period. In case downtime exceeds 2%, the CMC period will be extended double the excess downtime. CMC charges will be included for price comparison of bids | | | |
| | Total cost in Rs. (Machine with 5 years Warranty + Accessories+ CMC) | **130302321.35** | **197230432.00** | **161758242.50** |
| | **Total cost in Rs. ( Machine with 5 years Warranty + Accessories)** | **124337981.35** | **191461000.00** | **126718200.50** |

वरीलप्रमाणे प्राप्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात M/s. Philips Electronics India Limited, Mumbai यांचे सर्व ॲक्सेसरीजसह पुर्णांकित मुळ दर रक्कम रु.१२,४३,३७,९८१/- (अक्षरी रु.बारा कोटी त्रेचाळीस लाख सदोतीस हजार नऊशे एक्याऐंशी मात्र) हे निम्नत्तम येत आहेत. त्यामुळे सदरहू मशिन त्यांचेकडून खरेदी करावे लागणार असून नविन मशिन खरेदीकामी अंदाजे प्रस्तावित रक्कम रु. रु.८,५०,००,०००/- इतकी घेण्यात आली होती, परंतु प्रत्यक्षात मशिन खरेदीकामी रक्कम रु.१२,४३,३७,९८१/- इतका खर्च येणार असल्यामुळे सदरहू मशिन खरेदीकामी प्रस्तावित रक्कमेपेक्षा रु.३,९३,३७,९८१/- इतका जास्तीचा खर्च येणार

आहे तसेच ५ वर्षाचा वॉरंटी कालावधी संपल्यानंतर रक्कम रु.५९,६४,३४०/- इतका CMC करीता खर्च देऊ केलेला आहे.

तसेच सदर मशिन आयात करणेकामी मशिनची L/C उघडून Custom Duty मध्ये सुट मिळणेकामीची पुढील कार्यवाही वित्त विभाग यांचेमार्फत करता येईल व Custom Duty मध्ये सुट न मिळाल्यास संस्थानमार्फत Custom Duty ची रक्कम अदा करावी लागणार आहे.

तरी M/s. Philips Electronics India Limited, Mumbai यांचेबरोबर चर्चा विनिमय करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच सदरचे खरेदीकामी मशिनची रक्कम रु.१२,४३,३७,९८१/- व CMC ची रक्कम रु.५९,६४,३४०/- अशी दोन्ही मिळून एकुण पुर्णांकित रक्कम रु.१३,०३,०२,३२१/- चे खर्चास तसेच सदरचे मशिन आयात करणेकामी मशिनची L/C उघडून Custom Duty अदा करणेकामीची पुढील कार्यवाही वित्त विभाग यांचेमार्फत करणेस व Custom Duty मध्ये सुट न मिळाल्यास संस्थानमार्फत Custom Duty ची रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजी विभागाकरीता नवीन 3 Tesla MRI Machine खरेदीकामी मंजुरी देण्यात आलेली अंदाजपत्रकीय रक्कम व ई-निविदा प्रक्रियेमध्ये तीनही पुरवठाधारकांकडून प्राप्त झालेले दर यामध्ये खुपच तफावत दिसून येत आहे. याकरीता या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक M/s. Philips Electronics India Limited, Mumbai यांचेकडील MRI Machine ची तांत्रिक पहाणी करुन, या मशिनसाठीच्या मंजुर अंदाजपत्रकासह सदरहू प्रस्ताव पुढील सभेसमोर फेरसादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **संस्थानचे साईआश्रम भक्तनिवास व साईबाबा भक्तनिवास या ठिकाणी रुमचे कुलूपे तोडून वारंवार चोऱ्या होत असल्याने संबंधीत सुरक्षा एजन्सी, सफाई कामाची एजन्सी/ संस्थान कामगार यांना जबाबदार धरुन दंडात्मक कारवाईबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयान्वये सादर की, दि.११/०८/२०१७ रोजी व दि.१३/०८/२०१७ रोजी साईआश्रम भक्तनिवास इमारतीमध्ये तसेच दि.१३/०८/२०१७ रोजी साईबाबा भक्तनिवासच्या रुमच्या दरवाजाचे कुलूपे तोंडून चोरीच्या चार विविध घटना घडलेल्या असुन त्याचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे.

**घटना क्र.०१.**

दि.११/०८/२०१७ रोजी साईभक्त अनुराधा मोहापात्रा या साईभक्तांनी साईआश्रम भक्तनिवासचे J इमारतीमध्ये रुम नं.१२१ ही निवासाकरीता घेतलेली होती. दि.११/०८/२०१७ रोजी साईभक्त अनुराधा मोहपात्रा या रुमला स्वत: चे कुलूप लावून कुटूंबीयासमवेत सकाळी ०७.०० वाजता मंदिराकडे कॅश काऊंटींगकामी आल्या. कॅश काऊंटींगकामी येणेसाठी त्यांनी स्वत: जवळील रोख रक्कम रु.११,०००/-, ०१ नग सोन्याची अंगठी, ०३ नग मोबाईल रुममध्ये ठेवून आलेल्या होत्या. सदरचे भक्त सुमारे १०.०० वाजता रुमवर परतल्या असता रुमचा दरवाजा उघडा असुन दरवाजास कुलूप नव्हते. साईभक्तांनी रुममध्ये पाहिले असता त्यांचे ०३ मोबाईल, ०१ सोन्याची अंगठी व रु.११,०००/- चोरी झाल्याचे निदर्शनास आले. सदरच्या चोरीचा प्रकार प्रवेशद्वारावरील सुरक्षा रक्षक श्री सागर जाधव यांना कळविला. सुरक्षा रक्षक श्री.जाधव यांनी सदरचा प्रकार सुपरवायझर श्री विजय लाडवंशी व सुरक्षा रक्षक श्री अजय मोरे यांना सांगितला.

श्री विजय लाडवंशी, कंत्राटी सुरक्षा एजन्सीचे सुपरवायझर, श्री सागर जाधव, सुरक्षा रक्षक यांनी रुमची पहाणी केली असता रुमचे कुलूप उघडून चोरी झालेली असल्याचे निदर्शनास आले. घडलेल्या प्रकाराबाबत सुरक्षा सुपरवायझर श्री विजय लाडवंशी हे साईभक्तांना शिर्डी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविणेकामी घेऊन गेले.

दि.११/०८/२०१७ रोजी J इमारतीमध्ये ०४ ते १२ शिफ्टमध्ये बी.व्ही.जी. इंडिया लि. या एजन्सीकडील खालीलप्रमाणे मदतनीस व स्वाच्छता कर्मचारी यांची नेमणुक केलेली होती.

१. श्री सोमनाथ भाऊसाहेब थोरात, मदतनीस
२. श्री योगेश नारायण गोसावी, मदतनीस
३. श्री दिगंबर वसंत गवळी, मदतनीस
४. श्री रामेश्वर म्हसु क्षिरसागर, आरोग्य कर्मचारी
५. श्री रोहीदास दत्तु साळवे, आरोग्य कर्मचारी
६. श्री गणेश सुभाष गायकवाड, आरोग्य कर्मचारी

७. श्री सोन्याबापु नानासाहेब डांगे, आरोग्य कर्मचारी

**घटना क्र.०२**

दि.११/०८/२०१७ रोजी साईभक्त हिमांशु गार्गील, रा.मोरेरा, (मध्य प्रदेश) यांनी साईआश्रम भक्तनिवासचे K इमारतीमध्ये रुम नं.६५ व ६६ या घेतलेल्या होत्या. सदरचे भक्तांनी दि.११/०८/२०१७ रोजी सकाळी ०७.०० वाजेच्या सुमारास दोन्ही रुमला कुलूपे लावून परिवारासोबत शनिशिंगणापुर येथे दर्शनाकरीता गेलेले होते. सायंकाळी ०६.४५ चे सुमारास माळयावरील मदतनीस श्री सचिन पोपटराव दिवे यांनी राऊंड घेतला असता, रुम नं.६५, ६६ चे कुलूपे तुटलेले आढळले. त्यामुळे मदतनीस यांनी ०७.०० चे सुमारास संबंधीत साईभक्त यांना दुरध्वनीद्वारे रुमचे कुलूपे तुटल्याची माहिती दिली व नंतर ०७.३० चे सुमारास सुरक्षा रक्षक श्री कृष्णा कांबळे व सुपरवायझर श्री नवनाथ वर्बे यांना माहिती दिली. त्यामुळे सदरचे रुमचे दरवाज्यावर एका सुरक्षा रक्षकांची नेमणुक करण्यात आली. साईभक्त हे रात्रौ ०८.३० चे सुमारास रुमवर पोहचल्यानंतर त्यांनी दोन्ही रुमची पहाणी केली. पहाणीअंती रुममधुन काहीही चोरी झालेली नसल्याचे त्यांचे निदर्शनास आले. त्यामुळे सदरचे भक्तांनी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार देण्यास नकार दिलेला आहे.

K इमारतीचे तिसऱ्या माळयावर खालीलप्रमाणे बी.व्ही.जी. कर्मचारी यांची नेमणुक करण्यात आलेली होती.

१. श्री सचिन पोपटराव दिवे, मदतनीस

२. श्री अनिल सदाशिव जेजुरकर, आरोग्य कर्मचारी

**घटना क्र.०३.**

दि.१३/०८/२०१७ रोजी साईबाबा भक्तनिवास येथे साईभक्त एन. रामाप्रसाद व साईप्रसाद यांनी C ब्लॉकची रुम नं.३१५ ही निवासाकरीता घेतलेली होती. सदरचे भक्त यांनी दु.०३.०० वाजता साईबाबा भक्तनिवास येथील सुरक्षा एजन्सीचे कार्यालयात येऊन रुमचे कुलूप तोडून रुममध्ये चोरी झालेबाबत कळविले. त्यानुसार साईबाबा भक्तनिवासकडील कंत्राटी सुरक्षा अधिकारी श्री साहेबराव शेजुळ, सुपरवायझर श्री चांगदेव ताजणे, व सुरक्षा रक्षक श्री दिपक कोते यांनी जाऊन रुमची पाहणी केली असता सदरचे भक्त यांनी रुमला संस्थानचे कुलूप न लावता त्यांचेकडील खाजगी कुलूप रुमला लाऊन मंदिराकडे दर्शनासाठी गेलेले होते. मंदिरातुन दर्शन करुन परत आल्यानंतर त्यांना रुमचे कुलूप तोडून रुममधील मोबाईल व आयपॅड चोरीस गेल्याचे निदर्शनास आल्याने त्यांनी सुरक्षा विभागास कळविले आहे.

साईबाबा भक्तनिवास येथील प्रत्येक माळयास सुरक्षा कर्मचारी नसुन AB विंग ३ माळयाकरीता एका सुरक्षा रक्षकाची तसेच BC/ CD विंग ३ माळयाकरीता एका सुरक्षा रक्षकाची नेमणुक केलेली आहे. दि.१३/०८/२०१७ रोजी साईभक्तांची गर्दी मोठया प्रमाणात असल्याने सदरचे माळयावरील कर्मचारी यांना मंदिर परिसरामध्ये गर्दी काढण्यासाठी पाठविणेत आलेले होते. या दिवशी साईबाबा भक्तनिवासकडील श्री भाऊसाहेब गंगाधर काळे, कायम मदतनीस व श्री सतिष भाऊसाहेब खरात, कंत्राटी स्वच्छता कर्मचारी यांची डयुटी नेमलेली होती. सदरचे साईभक्तांना शिर्डी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविणेसाठी पाठविले असता शिर्डी पोलिस स्टेशनचे पोलिस यांनी साईबाबा भक्तनिवास येथे जाऊन प्रत्यक्ष रुमची पाहणी करुन गेले.

संस्थान निवासस्थानामध्ये रुमचे कुलूपे तोडून अथवा डयुप्लीकेट चावीचे सहाय्याने कुलूप उघडून चोरी होण्याच्या घटना वारंवार घडत असल्याने चोऱ्यांचे संदर्भात दि.१४/०८/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.कार्यकारी अधिकारी, महोदया यांचे कक्षात दोन्ही कंत्राटी सुरक्षा एजन्सीचे मालक, मॅनेजर, सुरक्षा अधिकारी, सुपरव्हीजन स्टाफ व बी.व्ही.जी. इंडिया लि. या कंपनीचे मॅनेजर, सुपरव्हीजन स्टाफ यांची बैठक झाली असता. मा.कार्यकारी अधिकारी महोदया यांनी एवढया मोठया प्रमाणात स्टाफ असतांना होणाऱ्या चोऱ्याबाबत नाराजी व्यक्त केली असुन, घटना घडतेवेळी कर्तव्यावर हजर असलेले कर्मचारी यांनी कर्तव्यात कसुर केल्याने संबंधीत कर्मचारी यांचेवर कारवाई करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार कामगार विभागामार्फत दि.११/०८/२०१७ रोजी व १३/०८/२०१७ रोजी चोरीच्या घटना घडलेल्या इमारतीच्या माळयावर हजर असलेले कंत्राटी सुरक्षा एजन्सीचे कर्मचारी, सफाई सफाई कर्मचारी तसेच कायम कर्मचारी यांचेवर कामगार विभागामार्फत कार्यवाही सुरु असुन यापुढे अशा प्रकारे संस्थान निवासस्थानामध्ये चोरीचे प्रकार घडल्यास संस्थान निवासस्थानमधील कंत्राटी सुरक्षा एजन्सी/ सफाई कामाची एजन्सी/ तसेच माळयावरील कायम/ कंत्राटी कर्मचारी यांना जबाबदार धरुन साईभक्ताचे झालेले नुकसानीसाठी संबंधीत एजन्सीस जबाबदार धरुन त्यांना याबाबत शास्ती म्हणून दंड आकारावा व त्यांचे बिलातून रक्कम कपात करावी. तसेच तीन पेक्षा जास्त अशा घटना घडल्यास संबंधीत एजन्सीला संस्थानचे काळया यादी (Black List)

मध्ये समाविष्ट् करुन त्यांचे कंत्राट संपुष्टात (टर्मिनेट) करता येईल. तसेच संस्थानचे इतर विभागामध्ये अशाप्रकारे संस्थान मालमत्तेचे/ साईभक्तांचे नुकसान झाल्यास संबंधीत एजन्सीस जबाबदार धरणे आवश्यक आहे, असे नम्र मत आहे. तरी सदरचे विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे साईआश्रम भक्तनिवास व साईबाबा भक्तनिवास या ठिकाणी रुमचे कुलूपे तोडून वारंवार चोऱ्या होत आहेत, यावरुन तेथे कार्यरत असणाऱ्या सुरक्षा एजन्सी व सफाई कामाची एजन्सी निष्काळजीपणे काम करत आहेत, असे समितीचे मत झाले. याकरीता सदरहू एजन्सींना दंड म्हणून त्यांचेकडून चोरी झालेल्या रकमेच्या दुप्पट रक्कम वसूल करणेत यावी व या रकमेमधून साईभक्तांची चोरी गेलेली रक्कम, जी पोलिस स्टेशनने तपासणी करुन/ पडताळणी करुन मंजुर केलेली आहे, ती परत करणेत यावी. चोरी झालेल्या ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना तात्काळ कामावरुन कमी करण्यात यावे. दुसऱ्यांदा चोरी झाल्यास संबंधीत एजन्सीकडून दंड म्हणून चारपट रक्कम वसूल करावी व तरीही तिसऱ्यांना चोरी झाल्यास संबंधीत एजन्सीचे कॉन्ट्रॅक्ट रद्द करुन, सदरहू एजन्सीचा काळया यादीत समावेश करणेत यावा.**

**तसेच सध्या मंदिर परिसरासाठी १६ नग सीसीटीव्ही कॅमेरे खरेदी करावयाची प्रक्रिया राबविणेत आलेली असून सदरहू सीसीटीव्ही कॅमेरे साईआश्रम भक्तनिवास येथे बसविणेत यावे, त्याचप्रमाणे सुरक्षा एजन्सीच्या सर्व कर्मचाऱ्यांचे पोलिस व्हेरीफिकेशन, संबंधीत एजन्सीने तात्काळ करुन घेणेबाबत त्यांना कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख/ सीसीटीव्ही विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे श्री साईबाबा अध्यासन सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** जा.क्र.एसएसएस/ वशी-काअ/ २९९१/ २०१६ दि.१६ नोव्हेंबर, २०१६ चे परिपत्रकान्वये मा.अध्यक्ष महोदय, यांनी दि.१० व ११ नोव्हेंबर, २०१६ रोजीचे राऊंडमध्ये दिलेल्या सुचनांनुसार सबंधीत विभागांना निर्देश देणेत आलेले आहेत. सदर परिपत्रकामध्ये अ.क्र.१७ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात श्रीसाईबाबां विषयी स्वतंत्र अध्यासन (Chair) तयार करणेबाबत निर्देश देणेत आलेले आहेत.

सदर प्रकरणी यापुर्वी झालेल्या कार्यवाहीचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे

१. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०८.२००५ चे सभेतील निर्णय क्र.४६८ अन्वये पुणे विद्यापीठात संत श्री ज्ञानेश्वर महाराज, संत श्री नामदेव महाराज यांचे अध्यासन आहे, त्याचप्रमाणे श्री साईबाबांचे अध्यासन सुरु करणेबाबत पुणे विद्यापीठाचे कुलगुरु मा.श्री.अशोक कोळस्कर यांची मा.अध्यक्ष साहेब आणि मा.उपाध्यक्ष साहेब यांनी समक्ष भेट घेऊन चर्चा करावी असे ठरले होते.

२. त्यानुसार मा.अध्यक्ष महोदय, यांनी दि.२७ सप्टेंबर, २००५ रोजी पुणे विद्यापीठाचे कुलगुर मा.डॉ.अशोक कोळस्कर यांची समक्ष भेट घेऊन, पुणे विद्यापीठात श्री साईबाबांचे अध्यासन स्थापन करणेबाबत चर्चा केली.

३. मा.अध्यक्ष महोदय, यांचेशी झालेल्या चर्चेनुसार पुणे विद्यापीठाचे तत्कालिन कुलगुरु मा.डॉ.अशोक कोळस्कर यांनी दि.२९.०९.२००५ रोजी शिर्डी येथे भेट देऊन, श्री साईबाबांचे अध्यासन सुरु करणेसबंधी करावयाचे कार्यवाहीबाबत व अनुदान रुपाने निधीचे तरतुदीबाबत पुणे विद्यापीठामार्फत प्रस्ताव सादर केलेला आहे.

४. डॉ.अशोक कोळस्कर यांनी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये पुणे विद्यापीठात श्री साईबाबांचे अध्यासन सुरु करण्याची कार्यवाही करण्यासाठी दोन प्रकारे अनुदान रुपाने निधीची तरतुद करता येईल असे सुचविले होते. पैकी (अ) संस्थानकडून एक रकमी एकदाच एक कोटी रुपये विद्यापीठाला अनुदान देऊन, त्यावरील व्याजावर श्री साईबाबा अध्यासनाचे कार्य चालविता येईल. (या पद्धतीने मौलिक हक्क अध्यासन (Intellectual Property Rights Chair) पुणे विद्यापीठात स्थापन करण्यात आलेली आहे. यासाठी पुणे विद्यापीठाला एकरकमी दहा लक्ष रुपये Council of Scientific and Industrial Research यांनी दिलेले आहेत.) किंवा (ब) श्री साईबाबा अध्यासनाचे कार्य सुरु करण्यासाठी सुरुवातील पहिल्यावर्षी १० लक्ष रुपये अनुदान रुपाने संस्थानकडून पुणे विद्यापीठाला देण्यात यावे आणि पुढील पाच वर्षे प्रतिवर्षी १० लक्ष रुपये प्रमाणे अनुदान देण्यात यावे असे एकुण ६० लक्ष रुपये या कामासाठी उपलब्ध होतील. या रकमेवरील व्याज आणि सुरुवातीच्या अनुदानापैकी काही रक्कम

श्री साईबाबा अध्यासनाचे कार्यासाठी वापरण्यात येईल नंतर फक्त व्याजावर श्री साईबाबा अध्यासनाचे कार्य चालेल. असे कळविलेले होते.

५. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.१०.२००५ चे सभेतील निर्णय क्र.६३५ अन्वये उपरोक्त पैकी (ब) पर्याय स्विकारण्यात आला.

६. तसेच जा.क्र.एसएसएस/ कन्या–अध्यासन/३२९४/२००६ दि.०७ मार्च, २००६ रोजीचे चे पत्रान्वये मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.१०.२००५ चे सभेतील निर्णयानुसार कार्यवाही करणेस व सदर कामासाठी पुणे विद्यापीठास अनुदान देणेस मान्यता मिळणेबाबत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

७. सदर पत्रानुसार मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील दि.१० एप्रिल, २००६ रोजीचे पत्रान्वये पुणे विद्यापीठाचा अध्यासन सुरु करण्याबाबतचा तपशिलवार खर्चासह प्रस्ताव तसेच सदर अध्यासन सुरु करण्याने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७ (२)(ठ) ची कशाप्रकारे पूर्तता होईल याची कारणमिमांसा सादर करणेबाबत निर्देश दिलेले होते.

८. त्यास अनुसरुन जा.नं.एसएसएस/कन्या-अध्यासन/५५३५/२००६ दि.२७ एप्रिल, २००६ रोजीचे पत्रान्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना त्यांचे पत्रातील निर्देशाप्रमाणे प्रस्ताव पुनश्ः च सादर करण्यात आला.

९. त्यानंतर मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांनी त्यांचे दि.१६ नोव्हेंबर, २००६ रोजीचे पत्रान्वये कुल सचिव, पुणे विद्यापीठ यांचेकडे १. पुणे विद्यापीठामार्फत सुरु करण्यात आलेल्या संत तुकाराम अध्यासनाबाबतची/ अन्य अध्यासनांबाबतची तपशिलवार माहिती खर्चाच्या तपशिलासह २. श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांजकडून विद्यापीठास अध्यासनाकरिता निधी उपलब्ध करुन देण्यास आल्यास सदर निधीचा विनियोग कशा प्रकारे केला जाईत तसेच विद्यापीठात अध्यासनाबाबतच्या कोणत्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील, याबाबत माहिती मागविलेली होती.

१०. तसेच मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांनी त्यांचे दि.१८ एप्रिल, २००७ रोजीचे पत्रान्वये मा.कुल सचिव, पुणे विद्यापीठ यांना संत तुकाराम अध्यासनाबाबतची विविध मुद्यांबाबत माहिती मागविलेली होती.

११. त्यानुसार मा.कुलसचिव, पुणे विद्यापीठ यांनी त्यांचेकडील दि.२५.०७.२००७ रोजीचे पत्रान्वये मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी मागविलेली माहिती मुद्दे निहाय सादर केलेली आहे.

१२. त्यानंतर मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांनी त्यांचेकडील दि.१९ मार्च, २००८ रोजीचे पत्रान्वये विद्यापीठात एखादे नवीन अध्यासन निर्माण करावयाचे झाल्यास त्याच्या खर्चासाठी पुरेसे व्याज उपलब्ध होईल एवढा म्हणजे किमान १ कोटी रुपये स्थायी निधी देण्यास श्री साईबाबा संस्थान तयार आहे काय? याबाबत संस्थानचा अभिप्राय शासनास पाठविण्याबाबत कळविलेले होते. तसेच याबाबत दि.०५ जून, २००८ रोजीचे पुन्हा स्मरणपत्रही देण्यात आलेले आहे.

१३. मात्र त्यानंतर उपरोक्त प्रकरणी कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नाहीत, तसेच संस्थानमार्फत पुढील कार्यवाही केलेली आहे किंवा नाही, याबाबत काहीही माहिती उपलब्ध नाही.

आता दि.१६ नोव्हेंबर, २०१६ रोजीचे परिपत्रकान्वये मा.अध्यक्ष महोदय, यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात, श्री साईबाबांविषयी स्वतंत्र अध्यासन (Chair) सुरु करणेबाबत इकडील कार्यालयाकडील दि.०१.०१.२०१७ रोजीचे टिपणीवरील निर्देशानुसर मा.कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांना दि.०१ फेब्रुवारी, २०१७, दि.०७ फेब्रुवारी, २०१७ व दि.०३ जुलै, २०१७ रोजी पत्र देऊन माहिती व अभिप्राय मागविण्यात आलेला होता.

त्यानुसार प्रभारी कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी त्यांचेकडील संदर्भ क्रमांक– एटी/ अध्यासन/ १२५७ दि.२७.०७.२०१७ रोजीचे पत्रान्वये "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये श्री साईबाबा अध्यासन सुरु करण्याकरिता संस्थेकडून १ कोटी रुपयांचा निधी प्राप्त होण्याकरिता तत्कालीन कुलगुरु डॉ.अशोक कोळस्कर यांच्या कार्यकाळात प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्ताव संस्थानमार्फत शासनास सादर करण्यात आला होता. तदनंतर शासनाने याबाबत अधिकची माहिती या विभागाकडे मागितली असता वेळोवेळी सदर माहिती शासनास सादर करण्यात आलेली आहे. परंतू अद्यापी संस्थेमार्फत तसेच शासनामार्फत कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत. तरी याबाबत आपणास कळविण्यात येते की, मा.व्यवस्थापन परिषदेच्या ठराव

क्र.१८४/ २६०५१० दि.२६ मे, २०१० अन्वये विद्यापीठामध्ये एखादे नवीन अध्यासन निर्माण करावयाचे झाल्यास सदर अध्यासनाच्या खर्चापोटी पुरेसे व्याज उपलब्ध होईल एवढा म्हणजे किमान १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. शासनाकडून अथवा आपल्या संस्थानकडून श्री साईबाबा अध्यासन सुरु करण्याकरिता रु.१ कोटीचा निधी उपलब्ध करुन दिल्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये श्री साईबाबा अध्यासन सुरु करता येणे शक्य आहे" असे कळविलेले आहे.

सदरचा प्रस्ताव हा आर्थिक स्वरुपाचा व धोरणात्मक असल्याने याकामी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल. मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर सदरचा प्रस्तावास मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांची मान्यता घेणे अनिवार्य आहे असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या समाधी शताब्दीचे औचित्य साधून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे श्री साईबाबा अध्यासन सुरु करावे, असे समितीचे एकमत झाले. परंतु त्यासाठी रु.१ कोटी मात्र रक्कम निधी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडे डिपॉझीट स्वरुपात जमा करावयाची आहे. सदर डिपॉझीट रिफंडेबल आहे किंवा कसे, याबाबत माहिती घेऊन, तसा प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९** **श्रींचे दर्शनाकरीता साईभक्तांनी आणलेली फुले, गुच्छ व श्रीफळ स्विकारणेस बंदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणारे साईभक्त श्रींना अर्पण करणेकामी आपले समवेत फुले, गुच्छ, श्रीफळ, इ. साहित्य घेऊन येत असतात. श्रींना अर्पण करण्यासाठी आणलेले फुले, गुच्छ हे दर्शन रांगेतुन मंदिरामध्ये आणली जातात.

**<u>प्रस्ताव</u>:-** शिर्डी ग्रामस्थ व पदाधिकारी यांचे विनंतीनुसार श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांना सुट्टी फुले, गुच्छ व श्रीफळ यावर बंदी आणावी अशी सूचना केली आहे. त्यानुसार श्रींना दर्शनाचे वेळी साईभक्तांनी आणलेली फुले, गुच्छ व श्रीफळ बंदी करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**<u>विभागाचा अभिप्राय</u>:-** समाधी मंदिरामध्ये येणारे साईभक्त श्रींचे दर्शनासाठी येतांना विविध प्रकारची सुट्टी फुले, गुच्छ, प्रसाद, श्रीफळ असे साहित्य श्रींना अर्पण करण्याकरीता आणत असतात. सध्या सुरक्षेच्या कारणास्तव श्रींचे समाधी मंदिरामध्ये प्रवेश करण्यापुर्वी संरक्षण कर्मचारी यांचेकडुन साईभक्तांकडे असलेले श्रीफळ काढुन घेण्यात येत आहेत. श्रींचे समाधी मंदिरात फुले, गुच्छ घेऊन आल्याने खालीलप्रमाणे अडचण होत असलेबाबत शिर्डी ग्रामस्थ यांची तक्रार आहे. त्याबाबत ग्रामस्थांचे असे म्हणणे आहे की,-

०१) समाधी मंदिरात प्रवेश करण्याचे अगोदर गेटचे बाहेर उपस्थित असलेले फुले विक्रेता हे साईभक्तांना प्रवेशद्वारावर अडवुन त्यांचेकडुन जास्त पैसे लुबाडत असुन फसवणूक करत आहेत. तसेच अनेक साईभक्तांना याचा त्रास होत आहे. त्याचप्रमाणे फुले व गुच्छे विक्रेते साईभक्तांशी वेळप्रसंगी भांडन करुन शिवीगाळ करुन मारहाण देखील करत असल्याच्या घटना आढळुन आलेल्या आहेत.

०२) त्याचप्रमाणे साईभक्त ज्या वेळी समाधी मंदिर अथवा मंदिर परिसरामध्ये प्रवेश करतात, त्यावेळी त्यांचेकडुन फुलांच्या पाकळ्या खाली पडत आहेत त्यामुळे मंदिर परिसरामध्ये अस्वच्छता निर्माण होत आहे. समाधी मंदिरामध्ये पाकळ्या पडल्याने समाधी मंदिरात मदतनीस यांना वारंवार सफाई करण्याची गरज पडत आहे त्यामुळे वेळोवेळी दर्शन रांग बंद करावी लागत आहे. पर्यायाने साईभक्तांकरीता दर्शनासाठी अडथळा निर्माण होत असल्याचे आढळुन आले आहे. तसेच फुले व गुच्छे यामुळे दर्शनरांग मंद गतीने चालत असलेबाबत ग्रामस्थांची तक्रार आहे.

यापुर्वी संरक्षण विभागामार्फत श्रींना अर्पण करण्यात आलेल्या नारळ फळे न स्विकारणेबाबत दि.२८.०८.२०१४ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विषय ठेवण्यात आला होता त्यावर, निर्णय क्र.७१४ नुसार श्रींना नारळ अर्पण करणे ही बाब भक्तांच्या भावनेशी निगडीत आहे. सुरक्षिततेच्या कारणास्तव मंदिर प्रवेशद्वारावरच असे नारळ स्विकारण्यात यावेत. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला आहे. सदर ठरावानुसार संरक्षण विभागाचे कर्मचारी हे मंदिर परिसरामध्ये प्रवेशद्वारावर भक्तांकडुन श्रीफळ स्विकारुन जमा करुन घेण्यात येत आहेत. यावर पर्याय म्हणून श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत खालीलप्रमाणे उपाय योजना करता येतील-

अ) प्रथमत: मंदिर परिसरामध्ये असलेले प्रवेशद्वारावर प्रवेश करतांना संरक्षण विभागाचे कर्मचारी यांचेमार्फत साईभक्तांकडुन फुले गुच्छ जमा करुन घेण्यात यावेत.

ब) तसेच साधारण ३ महिन्यांनी सर्व साईभक्तांना याबाबत माहिती मिळाल्यानंतर पुर्णपणे फुले गुच्छ व श्रीफळ बंद करणेत यावेत असे नम्र मत आहे.

क) मंदिरामध्ये साईभकांनी फुले गुच्छ सोबत आणू नयेत असे फ्लेक्स बोर्ड विविध ठिकाणी लावता येतील.

ड) मात्र साईभक्तांनी आणलेले फुलांचे हार भाविकांना मंदिरात आणुन श्रींचे समाधीवर अर्पण करता येतील.

तरी याबाबत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.७०५** **शिर्डी ग्रामस्थ व पदाधिकारी यांनी समाधी मंदिरामध्ये सुट्टी फुले गुच्छ व श्रीफळ यावर बंदी आणावी अशी विनंती केली आहे, अशी माहिती मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सभेस दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी ग्रामस्थ व पदाधिकारी यांचेकडून समाधी मंदिरामध्ये सुट्टी फुले, गुच्छ व श्रीफळ यावर बंदी आणावी, हे त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात घेण्यात यावे व त्यासह फेरप्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२०** **संस्थानचे नियोजित साईगार्डन प्रकल्पांतर्गत लेजर शो बाबत.**
**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२१** **मे.लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन करणेबाबत.**
**निर्णय क्र.७०६** सदरहू प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे विषय नं.२० व २१ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.
(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२२** **हरे कृष्ण मुव्हमेंट यांचे अक्षयपात्र फौंडेशन, नागपुर यांना शालेय आहार पुरवठा करणेकामी, वाहने घेणेसाठी रक्कम रु.१,३८,५९,५००/- मात्र देणेबाबत.**

**प्रस्ताव-** हरे कृष्ण मुव्हमेंट यांचे अक्षयपात्र फौंडेशन ही संस्था सन २००० पासून कार्यरत आहे. या संस्थेचे युनिट अध्यक्ष श्री व्योमपाद दास यांनी दि.०६.०६.२०१७ रोजीचे पत्रान्वये, मा.श्री.सुरेश हावरे साहेब अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे शालेय आहार पुरवठा करणेसाठी वाहने घेण्याकामी संस्थानकडून अनुदान मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

अक्षय पात्र फौंऊडेशन ही एक सामाजीक संस्था असून, सरकारी शाळांमधील माध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत भोजन पुरविणेचे काम करत आहे. सुरवातीच्या काळात फौंडेशन मार्फत ५ शाळेतील १५०० मुलांपर्यंत ही योजना होती. दिवसेंदिवस यामध्ये वाढ होत असून, आज अक्षयपात्र फौंडेशन ही जगातील सर्वात मोठी माध्यान्ह भोजन पुरविणारी संस्था म्हणून नावारुपास येत आहे. सध्या या फौंडेशन मार्फत एकूण १६ लाख विद्यार्थी व १३५२९ शाळांपर्यत २७ स्वयंपाकगृहा मार्फत ही योजना ११ राज्यांत पोहचविण्यात आलेली आहे.

अक्षयपात्र फौंऊडेशनतर्फे नागपूर महानगरपालिका हद्दीतील मनपा व शासकीय अनुदानित शाळामधील ५००० विद्यार्थ्यांना केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीचा वापर करून शालेय पोषण आहार पुरवठा करणेबाबत युनिट अध्यक्ष अक्षयपात्र फौंऊडेशन व शिक्षणाधिकारी (प्राथ) जि. प. नागपूर, शिक्षणाधिकारी, मनपा नागपूर, आणि अधिक्षक (शापोआ), नागपूर शहर यांच्यात करार झालेला आहे.

अक्षयपात्र फौंऊडेशन यांचेमार्फत देण्यात येणा-या आहारामध्ये दाळ, भात, भाजी,चपाती असे पदार्थ देण्यात येतात. यासाठी फौंडेशनला प्रतिभोजन रु. २०-२५ मात्र पर्यंत खर्च येत असूनही अक्षयपात्र फौंडेशन ही योजना यशस्वीपणे राबवित आहेत. तसेच अक्षय पात्र फौंडेशन तर्फे केंद्रीय स्वयंपाकगृहामार्फत पुरविण्यात येणा-या आहाराकरिता शासनाकडून कोणतेही अनुदान अथवा तांदुळ व वाहतुक खर्च देण्यात येत नाही. सदर योजनेसाठी येणारा खर्च हा देणगीदार नागरीकांकडून प्राप्तहोणा-या देणग्यामधून भागविला जातो असे नमूद आहे.

तरी नागपूर शहरात केंद्रीय आहारगृहात शिजविलेला आहार विविध ठिकाणी पोहचविण्यासाठी संस्थानमार्फत वाहने व त्यांचे चेसीज बनविणे साठी अनुदान उपलब्ध करून देणेबाबत श्री साईबाबा संस्थानकडे विनंती केली आहे.

**अक्षयपात्र फौंडेशनने संस्थानकडे मागणी केलेल्या वाहनांचा तपशील पुढीलप्रमाणे:-**

A) Capex required for a fleet of Vechicles, Body Building and Distribution vessels

| Vechicle Make | Quantity | Cost/Vehicke (Incl tax] rto chgs & Insurance) | Total Cost |
|---|---|---|---|
| TATA 407 CHASSIS BODY 12FT | 4 NOS | RS. 1230000/- | RS.49,20,000/- |
| MAHINDRA MAX PICE UP CBS-BS-4 | 6 NOS | RS.722000/- | RS.43,32,000/- |
| TOTAL | 10 NOS | | RS. 92,52,000/- |

B) **Body Building Charges**

| Vehicle make | Quantity | Body Building Cost/vehicle (LS) | Total |
|---|---|---|---|
| TATA 407 | 4 NOS | RS.4,50,000/- | RS.18,00,000/- |
| MAHINDRA MAX PICk UP | 6 NOS | RS.3,00,000/- | RS.18,00,000/- |
| TOTAL | | | RS.36,00,000/- |

**C)**

| Distribution Vessels (SS-304 GRADE) | Quantity | Cost/Vesse | Total |
|---|---|---|---|
| Big Vessels | 140 | RS.3200/- | RS. 4,48,000/- |
| Medium Vessels | 130 | RS.2650/- | RS. 3,44,500/- |
| Small Vessels | 100 | RS.2150/- | RS. 2,15,000/- |
| Total | | | RS. 10,07,500/- |

The above Total costing includes :

The 10 Vehicles comprising of its base chassis cost & body building charges, RTO charges as well as cost of Distribution vessels included.

RS. 1,38,59,500/- (One crore thirty eight lakhs fifty nine thousand five hundred only)

**अर्थ साहाय्य करणेबाबत संस्थान अधिनियमात खालीलप्रमाणे तरतुद आहे:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईलः-

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तीसांठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे."

**विभागाचा अभिप्राय:-**

अ) Hare Krishna Movement Nagpur ही सार्वजनीक धर्मादाय विश्वस्तव्यवस्था असून सदर संस्थेचा रु. ५०१/- कोटी रुपयांचा राखीव निधी आहे. सदर संस्थेचा उद्देश हा भगवद् गीता आणि भगवान श्रीकृष्ण यांचे तत्वज्ञानाचा प्रचार प्रसार करणे हा आहे.

ब) अक्षयपात्र फौंऊडेशनने एकूण १० वाहनांसाठी व त्यांचे बॉडी बिल्डींग खर्चासाठी एकूण रु. 1,38,59,500/- इतकी मागणी केलेली आहे. मात्र सदर कामामध्ये बॉडी बिल्डींगचे कामाचाही समावेश आहे. सदरचे काम हे खाजगी वर्कशॉपमध्ये करण्यात येते. त्यामुळे त्यासाठी येणारा प्रत्यक्ष खर्च प्रमाणित करणे अडचणीचे होणार आहे.

**क)** दि. १५.११.२०१६ रोजी युनिट अध्यक्ष अक्षयपात्र फौंऊडेशन व शिक्षणाधिकारी (प्राथ) जि. प. नागपूर, शिक्षणाधिकारी, मनपा नागपूर, अधिक्षक (शापोआ), नागपूर शहर यांच्यात झालेल्या करारनाम्यानुसार केंद्रीय स्वयंपाकगृहात आहार तयार करण्याची व तयार आहाराचा पुरवठा लाभार्थी शाळांना करण्याची जबाबदारी अक्षयपात्र फौंऊडेशनची राहील असे नमूद केलेले आहे. अशाप्रकारे इतर संस्थाही वाहनांची मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**ड)** अक्षयपात्र फौंऊडेशन फक्त नागपूर शहरातील मनपा व शासकीय अनुदानित शाळांतील ५००० विद्यार्थ्यांना केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीमार्फत शालेय पोषण आहाराचा पुरवठा करण्यात येणार आहे. शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र. शापोआ-२११६/प्र. क्र. २००/एस. डी. -३ दि. २७.१०.२०१६ नुसार शहरी भागांमध्ये केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीमार्फत शालेय पोषण आहार पुरवठा करणा-या यंत्रणेस खालीलप्रमाणे आहार खर्चाचे अनुदान अदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. ती पुढीलप्रमाणे-

**शहरी भागातील आहार खर्चाची विभागणी**

| लाभार्थी | अनुज्ञेय आहार खर्च | तयार आहाराचा पुरवठा करणा-या यंत्रणेस अदा करावयाचे अनुदान |
|---|---|---|
| प्राथमिक | रु. ४.१३/- | रु. ४.१३/- |
| उच्च प्राथिमिक | रु. ६.१८/- | रु. ६.१८/- |

उपरोक्तप्रमाणे अनुदान मंजूर केलेले आहे. सदर अनुदान उपलब्ध असतांनाही श्री साईबाबा संस्थानकडे केलेल्या अनुदानाची मागणी करणे योग्य वाटत नाही.

इ) युनिट अध्यक्ष अक्षयपात्र फौंऊडेशन व शिक्षणाधिकारी (प्राथ) जि. प. नागपूर, शिक्षणाधिकारी, मनपा नागपूर, अधिक्षक (शापोआ), नागपूर यांच्यात झालेल्या कराराच्या कालावधीचा उल्लेख करारनाम्यात दिसून येत नाही. त्यामुळे निश्चित किती कालावधीसाठी शालेय पोषण आहार पुरवठा करणार आहे हे स्पष्ट होत नाही.

ई) दररोज शासकीय/निमशासकीय कार्यालयाकडुन, नोंदणीकृत संस्थांचे, वैयक्तीकरित्या, वेगवेगळया कारणासाठी अनेक प्रकारचे अनुदान मागणी प्रस्ताव येत असतात. त्यामध्ये एकाच प्रस्तावाचा विचार करता येणार नाही.

उ) आक्टोंबर २०१७ ते आक्टोंबर २०१८ या कालावधीत श्री साईशताब्दी वर्ष साजरे करण्याचा निर्णय व्यवस्थापन समितीने घेतलेला आहे. त्यासाठी विविध विकास कामांकरिता रु.३१८६ कोटी रुपयांचा कृतीआराखडा शासनास सादर केलेला आहे. संस्थानचा स्वतःचा निधीही त्यासाठी खर्च होणार असल्याने सबंधीतांना मदत देणे योग्यहोणार नाही.

तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, हरे कृष्ण मुव्हमेंट यांचे अक्षयपात्र फौंडेशन, नागपुर यांना शालेय आहार पुरवठा करणेकामी, वाहने घेणेसाठी रक्कम रु.१,३८,५९,५००/- मात्र अनुदानस्वरुपात देणेपुर्वी, ते करत असलेल्या कार्याचे सादरीकरण सादर करणेसाठी, त्यांना पुढील सभेसमोर बोलविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३** **आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारातील महिलांच्या पुनर्वसनासाठी दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ यांना रक्कम रु.१ कोटी आदा करणेच्या अटी-शर्तीबाबत.**

**प्रस्ताव-** दीनदयाळ ही एक मान्यताप्राप्त पंजीकृत सामाजिक संस्था असून १९९७ पासून अत्यंत अविकसीत अशा पारधी समाजाच्या विकासाकरिता आणि आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या परिवाराकरिता तसेच कृषीक्षेत्राच्या सर्वांगीण विकासाकरिता कार्यरत आहे. पोशिंद्याच्या आत्महत्या हा कलंक पुसण्याच्या दिशेने संस्थेने २००६ साली शेतकरी

विकास प्रकल्पाच्या माध्यमातून कामास सुरवात केली आहे. आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारांचे पालकत्व स्विकारून त्यांना कुटूंब आधार योजनेच्या माध्यमातून सुरू करून दिलेल्या व्यवसायामुळे आता हे परिवार अत्यंत प्रतिष्ठापूर्वक स्वावलंबी जीवन जगत आहे. यामध्ये शेळीपालन, किरणादुकान आटाचक्की, मुलामुलींच्या शिक्षणाची व्यवस्था इ. अंर्तभूत आहेत. तसेच येणा-या काळात आत्महत्या होवू नये, शेतकरी बांधवामध्ये जगण्याची नवी उमेद निर्माण व्हावी या करिता शेतक-यांसाठी शाश्वत शेतीचे प्रयोग करीत आहे.

आगामी काळात कूटूंब आधार योजनच्या माध्यमातून ६०० परिवारांना विविध व्यवसायाच्या माध्यमातून आर्थिक दृष्टया सक्षम स्वावलंबाकडे वाटचालीस मदत करण्याची संस्थेची योजना असून या प्रकल्पास एकूण रु. ६,३२,५०,०००/- इतका खर्च आहे. संस्था कूठल्याही प्रकल्पाकरिता शासकीय अनुदान घेत नाही. या पवित्र कार्यास सहकार्य करावे अशी विनंती केली असून त्यास अनुसरून मा. व्यवस्थापन मंडळाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय:-** दि.२७.०३.२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाचे बैठकीत निर्णय क्र. २२९ अन्वये चर्चा होऊन दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ ही संस्था आत्महत्याग्रस्त शेतकरी परिवारांचे पालकत्व स्विकारून आधार देत आहे. त्यामुळे मानव जातीचे कल्याण या उद्दात्त हेतूने छाननी समितीचे मान्यतेने दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ या संस्थेस तुर्तास रु. १ कोटी मात्र रक्कम अनुदान स्वरुपात देण्यात यावी व सदरहू रकमेचा विनीयोग ते कशा प्रकारे करणार याबाबतचा त्यांचेकडून अहवाल घेण्यात यावा.

तसेच सदरहू अनुदान देणेपुर्वी छाननी समितीच्या पुर्व परवानगीने विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

**छाननी समितीचा निर्णय:-** आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिलांचे पुर्नवसनासाठी आर्थीक मदत देणेबाबतच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात येऊन, दि.२७.०३.२०१७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. २२९ अन्वये रक्कम रु.१ कोटी मात्र अनुदान स्वरुपात आर्थिक मदत दिनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांना देणेस मान्यता देण्यात आली. परंतु वरील आर्थिक मदत वितरण करणेपुर्वी दिनदयाळ बहुउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ या संस्थेकडून रु. १ कोटी मात्र रकमेचा विनीयोग ती संस्था कशाप्रकारे, कोणत्या प्रकल्पातंर्गत व किती दिवसात करणार आहे, याबाबतची माहिती, बाधीत कुटुंबाची यादीसह सादर करावी. तसेच छाननी समितीचे मदतीसंदर्भातील ठरवलेल्या निकषांची पुर्तता करून घेण्यात यावी. त्याबाबत सर्व अटी शर्ती नमुद करून दिनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ यांचेशी करारनामा करणेत यावा, असे ठरले.

**शासन निर्णय:-** १. शासन निर्णय क्र. सासंवि-१०१७/९१२/प्र. क्र.९८/का.१६ दि. ०१ ऑगस्ट २०१६ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ च्या कलम १७ (१) मधील तरतुदीस अनुसरून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या परिवारातील महिलांच्या पुर्नवसनासाठी दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, जिल्हा यवतमाळ या संस्थेमार्फत राबविण्यात येणा-या ''कुटूंब आधार योजना'' या योजनेसाठी एक विशेष बाब म्हणून रु. १ कोटी इतके अर्थसहाय्य देण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

२. श्री संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून अर्थसहाय्य करण्यात येणा-या सदर रकमेचा विनीयोग ६ महिन्यांच्या कालावधीत श्री साईबाबा सादर केलेल्या यादीतील बाधित कुटुंबासाठी शेळी पालन, गोपालन, किरणा दुकान, आटा चक्की, शिवणकाम मशिन इ. उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेने करणे बंधनकारक राहील.

३. श्री साईबाबा संस्थानमार्फत उपलब्ध करून देण्यात येणा-या सदर निधीचा उपयोग योग्य प्रकारे करण्यात आला आहे. याबाबत श्री साईबाबा संस्थानकडून दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ या संस्थेच्या कार्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन निरीक्षण व पडताळणी करण्यात येईल.

**विभागाचा अभिप्राय:-** मा.छाननी समितीच्या निर्णयाचे अनुषंगाने दिनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ या संस्थेला रु.१.०० कोटी देणेपुर्वी करारनाम्याच्या अटी शर्ती मा.व्यवस्थापन समितीचे मान्येतनंतर सबंधीत मंडळाशी करारनामा करावयाच्याअटी शर्ती खालीलप्रमाणे

**अ.**

१) संस्थेचे अनुदान आत्महत्याग्रस्त शेतकरी महिलांच्या पुर्नवसनासाठी देण्यात येत आहे.

२) ज्या कारणासाठी अनुदान दिले त्याच कारणासाठी त्याचा वापर करण्यात यावा. इतर कामासाठी वापर केल्याचे आढळून आल्यास संस्थेकडून संपूर्ण रक्कम दंडणीय व्याजासह संस्थानला जमा करणे बंधनकारक राहील.

३) अनुदान देणेसाठी ज्या लाभार्थींची यादी संस्थानला सादर केली आहे त्याच लाभार्थ्यांना अनुदान द्यावे लागेल.

४) अनुदानाचा विनीयोग लाभार्थ्यांकडून योग्य प्रकारे होतो किंवा नाही हे पाहण्याची संपूर्ण जबाबदारी दिनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांची राहील.

५) अनुदान लाभार्थ्यांना वितरीत केल्यानंतर त्या लाभार्थ्यांचा संपूर्ण तपशील श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांना सादर करावा लागेल. त्यामध्ये **अ)** लाभार्थ्यांचे नाव, गाव तालुका यांचा उल्लेख असावा. **ब)** ज्या उद्देशासाठी/ व्यवसायासाठी रक्कम दिली त्याचा सविस्तर तपशील. **क)** किती रक्कम आदा केली बँक खात्याच्या तपशीलासह सादर करावी. **ड)** शेतकरी आत्महत्येबाबतचा तहसीलदार/ प्रांत यांचा दाखला. आदि बाबीचा समावेश राहील.

६) अनुदान वितरणाचे दिनांकापासून ६ महिन्यांत वापरणे बंधनकारक राहील.

७) आपले संस्थेच्या पदाधिकारी यांनी वेळोवेळी केलेल्या तपासणीचा अहवाल श्री साईबाबा संस्थानला सादर करावा लागेल.

८) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचे विश्वस्त/ अधिकारी यांना प्रत्यक्ष भेटीच्या/ तपासणीच्या वेळी संपूर्ण माहिती उपलब्ध करून द्यावी लागेल. तसेच लाभार्थ्यांच्या अनुदान विनीयोगाची तपासणीसाठी संपूर्ण सहकार्य करावे लागेल.

९) अनुदान वितरणाचा कालावधी ६ महीने आहे. त्यानंतर १ महिन्याचे आत संस्थेचे अध्यक्ष यांचे स्वाक्षरीने अनुदान विनीयोगाचे उपयोगिता प्रमाणपत्र श्री साईबाबा संस्थानला शिर्डी यांना सादर करणे बंधनकारक राहील.

**ब.** अनुदान विनियोगाचे प्रत्यक्ष तपासणीसाठी संस्थानचे विश्वस्तांची उपसमिती स्थापन करण्यास मान्यता असावी.

उपरोक्त **'अ'** प्रमाणे करारनामा व **'ब'** प्रमाणे तपासणीसाठी विश्वस्तांची उपसमिती स्थापन करणेबाबत विचार विनीमय व निर्णयार्थ मा. व्यवस्थापन समितीसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.७०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, छाननी समितीच्या निर्णयानुसार दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांचेशी करावयाच्या करारनाम्यातील अटी/ शर्तीचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच या करारनाम्यामध्ये, दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांनी संस्थानने दिलेल्या अनुदानाचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवणे आवश्यक असून अनुदानाच्या उपयोगाचे/ विनियोगाचे सनदी लेखापरिक्षकांकडून लेखापरिक्षण करुन, तो अहवाल संस्थानला सादर करावा, या अटीचा समावेश करणेत यावा. त्याचप्रमाणे मा.अध्यक्ष महोदय, समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले व मुख्यलेखाधिकारी यांची समिती तयार करणेत येऊन, या समितीने, दीनदयाळ बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांना वेळोवेळी दिलेल्या अनुदानाच्या वापराबाबतची तपासणी करावी, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४** **मुंबई ते शिर्डी रस्त्यावर दर ३० किमी. अंतरावर व अहमदनगर ते शिर्डी या रस्त्यावर पालखी निवारे सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७ (२) (ट) विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील.

**प्रस्ताव -** मौजे पिंप्री निर्मळ, ता.राहाता येथील साई पालखी निवारासाठी जागा देणगीबाबत.

**प्रस्तावना–** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे आयत्या वेळचा विषय क्रं.२२ निर्णय क्रं.७५४ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

श्रीं चे उत्सवा दरम्यान मुंबई ते शिर्डी अशा मोठया प्रमाणात पदयात्री साईभक्त श्रीं च्या पालख्या घेवून येत असतात. त्यांच्या निवास व्यवस्थेसाठी मुंबई पासून शिर्डी पर्यंत संस्थानमार्फत प्रत्येक ३० किमी अंतरावर

पालखी थांबे बनविणेत यावेत. पालखी थांब्याच्या ठिकाणी पदयात्रींसाठी निवारा,बायो-टॉयलेट व शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे. याकामी देणगी स्वरुपात जमीनी/जागा मिळणेसाठी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच याबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.

सदरचे निर्णयानुसार १) खर्डी गोलभान २) न्यू साईकृपा हॉटेल,कसारा बायपास ३) लतिफवाडी पोलीस स्टेशनजवळ ४) घोटी साईप्रसाद हॉटेल (घाटनदेवी) ५) खोपडी-दत्त मंदिर ६) दुशिंगवाडी ७) मलढोन फाटा ८) वावी ९) पाथरे १०) पोहेगाव ११) निमगाव-को-हाळे १२) शिंगवे नाईक १३) गुहा १४) पिंपरी निर्मळ या परिसरात देणगी स्वरुपात जमीनी/जागा मिळणेसाठी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच पालखी थांब्याच्या निश्चित केलेल्या गावांमध्ये नागरीकांना आवाहन करणेकामीचे फलेक्सबोर्ड संस्थानचे बांधकाम विभागामार्फत तयार करुन लावण्यात आले होते. त्यास अनुसरुन सरपंच, ग्रामपंचायत, पिंप्री निर्मळ, ता.राहाता यांनी त्यांचेकडील दि.०३/०४/२०१७ चे पत्रान्वये "पिंप्री निर्मळ येथे नगर-मनमाड रोडलगत शासकीय गट नं.३२७ मध्ये मोकळी जागा असून त्यापैकी ०.९० आर जागा ही साई निवारा पालखीसाठी देण्यात यावी,असे मत ग्रामस्थांचे आहे.

त्यासाठी ग्रामपंचायतने दि.३१/०३/२०१७ रोजी झालेल्या मासिक सभेत ही जागा साई निवारा पालखीसाठी देण्यात यावी,असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला आहे. तरी सदर जागा साई निवारा पालखीसाठी देण्यास ग्रामपंचायतची काही हरकत नाही," असेबाबत कळविलेले आहे.

उक्त पत्राच्या अनुषंगाने मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील,विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानसभा यांनी त्यांचेकडील उपरोक्त दि.१९/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये मौजे पिंप्री निर्मळ,ता.राहाता या ग्रामपंचायतीने पिंप्री निर्मळ येथील नगर-मनमाड रोडलगत शासकीय गट नं.३२७ मध्ये असलेल्या मोकळया जागेपैकी ०.९० आर जागा साई निवारा पालखीसाठी देवून सदर जागेत बहुउद्दुशीय सभागृह बांधून त्यास स्वर्गीय खासदार पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांचे नाव देण्याचा ग्रामस्थांचा मानस आहे. त्यासाठी ग्रामपंचायतीने दि.३१/०३/२०१७ रोजी झालेल्या मासिक सभेत जागा देणेबाबत ठराव केलेला आहे. याबाबत उचित कार्यवाही करणेच्या संबंधितांना सूचना देण्यात याव्यात,असेबाबत कळविलेले आहे.

मा.सरपंच,ग्रामपंचायत,पिंप्री निर्मळ यांनी सादर केलेल्या अर्जाचे सोबतच्या ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता गट नं.३२७ क्षेत्र ५ हेक्टर ६५ आर हे महाराष्ट्र शासनाचे मालकीचे असून भोगवटादार वर्ग-२ ची जमीन आहे. त्याचे इतर हक्कात हिंदू स्मशानभूमीकडे क्षेत्र ०.४० आर ग्रामपंचायतकडे वर्ग ५.३९ अशी नोंद असून सदर ७/१२ चे सन २०१४-१५ चे पीक पेरे सदर अवलोकन केले असता त्यात स्मशानभूमी ०.४० आर, घरकुले ०.१४ आर, प्राथमिक शाळा ०.४० आर आणि सामाजिक वनीकरण ४ हेक्टर ८५ आर असे दर्शविलेले आहे. सदर जमीन ही महाराष्ट्र शासनाचे मालकीची असल्याने ती शासनाचे परवानगीशिवाय हस्तांतर करता येत नाही.

**विभागाचा अभिप्राय-** ग्रामपंचायत,पिंप्री निर्मळ यांनी जरी सदर क्षेत्रापैकी ०.९० आर जागा नियोजित साई निवारा पालखीसाठी देणगी स्वरुपात देण्यास ठरावाद्वारे सर्वानुमते मंजूर केले असले तरी सदरची जागा संस्थानला दान स्वरुपात स्विकारणे विधीग्राहय ठरणार नाही व सदर जागेवर संस्थानमार्फत साई पालखी निवारा अथवा बहुउद्देशीय सभागृह बांधता येणार नाही.

तसे सरपंच ग्रामपंचायत, पिंप्री निर्मळ यांना त्यांचे दि.०३/०४/२०१७ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने इकडील जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/१५६६/२०१७ दि.२४/०६/२०१७ अन्वये मौजे पिंप्री निर्मळ, ता.राहाता येथील श्री साईबाबा संस्थानचे पालखी निवारासाठी आपण देवू केलेली जागा गट नं.३२७ पैकी ही महाराष्ट्र शासनाची असून भोगवटादार वर्ग-२ ची आहे. ती शासनाच्या परवानगीशिवाय हस्तांतर करता येत नाही, असेबाबत अलाहीदा कळविण्यात आलेले आहे.

तरी मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचेकडील उपरोक्त दि.१९/०६/२०१७ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील विभागाच्या अभिप्रायाचा विचार करता, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५** **संस्थानचे रुग्णालयासाठी बॉन्डेड ग्रॅज्युएट (एम.बी.बी.एस.) व पोस्ट ग्रॅज्युएट (एम.डी./ एम.एस./ डिप्लोमा) उमेदवारांची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संतश्रेष्ठ श्री साईबाबा हे अहमदनगर जिल्हयातल्या शिर्डी या गावात साधारणत: १८५६ च्या सुमारास आले. इ.स.१९१८ पर्यंत म्हणजे त्यांच्या महानिर्वाणापर्यंत त्यांचे शिर्डी येथेच वास्तव्य होते. या प्रदिर्घ कालखंडात साईबाबांनी मानवतेची शिकवण देवुन असंख्य भक्तांना सन्मार्गाला लावले. श्री साईबाबांच्या मुख्य भर हा आरोग्य सेवेवर होता. त्यांनी अनेक भक्तांचे असाध्य रोग बरे केले असुन रुग्णसेवा हिच ईश्वरसेवा हे त्यांचे ब्रिद होते. साईबाबांचा रुग्णसेवेचा हा वारसा चालवण्यासाठी श्री साई संस्थानने सन १९४४ मध्ये साईनाथ छाया या नावाने होमिओपॅथीक दवाखाना सुरु केला याच दवाखान्याचे पुढे म्हणजे सन १९६४ साली श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये रुपांतर करण्यात आले. आता तेथे ३०० खाटांची सुसज्ज्य व्यवस्था आहे. त्यानंतर अतिप्रगत उपचारासाठी संस्थानने श्री साईबाबा हॉस्पिटल या सुपरस्पेशालिटी दर्जाच्या हॉस्पिटलची स्थापना केली असुन त्यामध्ये सध्या २५० खाटांची सुसज्ज्य व्यवस्था आहे. श्री साईबाबा संस्थानमार्फत गरिब रुग्ण तसेच ज्यांचेकडे उपचारासाठी पैसे नाहीत अशांना मोफत तसेच इतर सर्व रुग्णांवर अतिशय अल्पदरात उपचार केले जातात.

राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गतही येथे गरिब तसेच गरजु रुग्णांवर सर्व प्रकारचे उपचार केले जातात. त्यामुळे श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलमध्ये वेगवेगळया उपचारासाठी रुग्णांचा कायमच ओघ चालु असतो.

श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये महाराष्ट्रातील इतर जिल्हयामधुन तसेच इतर राज्यातुनही रुग्ण येत असतात सध्या दोन्ही हॉस्पिटलमध्ये अद्ययावत साधन सामग्री बसविणेत आली असुन या ठिकाणी कार्डीयाक, न्युरो, युरो, आर्थो इत्यादी विभाग चालु असुन येथे वरिष्ठ सुपर स्पेशालिटी डॉक्टर्स तसेच इतर कर्मचारी काम करत आहेत.

तथापि वैद्यकिय अधिकारी उपलब्धतेसाठी वेळोवेळी जाहिरात प्रसिध्द करणेत येते. सदर कार्यवाहीस खुपच कालावधी लागतो त्यानंतर जाहिरात प्रसिदध करुनही भरतीसाठी कमी प्रतिसाद मिळतो. सबब वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होत नाही.

**मागणी-** यावर पर्याय म्हणुन महाराष्ट्रातील निरनिराळया शासकिय वैदयकिय महाविदयालयातुन उत्तीर्ण झालेल्या बॉन्डेड ग्रॅज्युएट व पोस्ट ग्रॅज्युएट उमेदवारांना श्री साईबाबा संस्थान मार्फत चालवणा-या रुग्णालयांमध्ये शासनाने ठरविलेल्या नियमाप्रमाणे मानधन/पगार देवुन खालील विभागात मागणी करुन बॉन्डेड पोस्ट ग्रॅज्युएट उमेदवारांचा उपयोग करुन घेता येईल.

याबाबत संदर्भ क्र.०२ नुसार महाराष्ट्र शासनाचे वैद्यकिय शिक्षण विभागाचे समवेत दिनांक २०/०६/२०१७ रोजीच्या सभेत शासकिय वैद्यकिय महाविदयालयातुन ग्रॅज्युएट (एम.बी.बी.एस) व पोस्ट ग्रॅज्युएट ग्रॅज्युएट (एम.डी/एम.एस/डिप्लोमा) बॉन्डेड (बंधपत्रधारक) उमेदवार श्री साईबाबा संस्थान संचलित रुग्णालयात मिळणेबाबत चर्चा करण्यात आली तसेच संदर्भ क्र.०३ नुसार मा.कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विदयापीठ नाशिक यांचे समवेत दि.२९/०६/२०१७ रोजी झालेल्या सभेतही वरिल मागणी करण्यात आली. त्यावर मा.कुलगुरु यांनी बंधपत्रीत उमेदवारांसाठी केलेल्यामागणीवर शासनाने नोटिफिकेशन काढले तर ते उमेदवार श्री साईबाबा संस्थान रुग्णालयात उपलब्ध होवु शकतील. त्यासाठी शासनाकडे या संबंधीत प्रस्ताव पाठविणेत यावा, असे सांगितले.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत-** श्री साईबाबा संस्थान रुग्णालयामध्ये बॉन्डेड ग्रॅज्युएट व पोस्ट ग्रॅज्युएट ग्रॅज्युएट उमेदवारांची नेमणुक करुन अत्यावश्यक असलेले डॉक्टर्स यांची गरज भागवता येईल. यासाठी पुढिल तक्त्यातील पदसंख्येची शासनाकडुन मान्यता घ्यावी लागेल. शासनाचे मान्यतेनंतर नेमणुक केलेल्या सदर बॉन्डेड उमेदवारांना शासकिय नियमाप्रमाणे एकत्रित मानधन (वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे-५४०० नुसार) आणि निवासस्थान किंवा निवासस्थान भत्ता व इतर भत्ते दयावे लागतील. तसेच श्री साईबाबा संस्थानवर पुढिल तक्तयातील दिलेल्या तपशिलाप्रमाणे संभाव्य रक्कम रु- २४,५९,९४०/- ( चोवीस लाख एकोणसाठ हजार नवशे चाळीस ) मात्र प्रति महिना आर्थिक भार पडेल.

| अ नं | पदनाम | पदसंख्या | संभाव्य खर्च (प्रति महिना) |
|---|---|---|---|
| ०१ | फिजीशियन (एम.डी.) | ०३ | ०१,६५,६१०/- |
| ०२ | जनरल सर्जन (एम.एस.) | ०३ | ०१,६५,६१०/- |
| ०३ | स्त्रिरोग तज्ञ (एम.डी/डिप्लोमा) | ०३ | ०१,६५,६१०/- |
| ०४ | बालरोग तज्ञ (एम.डी/डिप्लोमा) | ०३ | ०१,६५,६१०/- |
| ०५ | कान, नाक, घसा तज्ञ (एम.एस/डिप्लोमा) | ०३ | ०१,६५,६१०/- |
| ०६ | नेत्ररोग तज्ञ (एम.एस/डिप्लोमा) | ०३ | ०१,६५,६१०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०७ | अस्थिरोग तज्ञ (एम.एस/डिप्लोमा) | ०३ | ०१,६५,६१०/- |
| ०८ | भुलतज्ञ (एम.डी/डिप्लोमा) | ०३ | ०१,६५,६१०/- |
| ०९ | रेडिओलॉजी (एम.डी/डिप्लोमा) | ०३ | ०१,६५,६१०/- |
| १० | आरएमओ/सीएमओ (एम.बी.बी.एस ) | १५ | ०८,७८,५५०/- |
| | **एकुण** | **४२** | **२४,५९,९४०/-** |

त्यानुसार श्री साईबाबा संस्थान रुग्णालयाचे मंजुर आकृतीबंधात रिक्त असलेल्या जागांवर वरिल मंजुर बॉन्डेड उमेदवारांना दरवर्षी नियुक्तीदेवुन श्री साईबाबा संस्थान रुग्णालयाचे कामकाज सुरळीत चालवता येईल.

तरी संस्थानचे रुग्णालयासाठी बॉन्डेड ग्रॅज्युएट (एम.बी.बी.एस) व पोस्ट ग्रॅज्युएट (एम.डी/ एम.एस/ डिप्लोमा) उमेदवारांची नेमणुक करणेकामी शासनाचे संबंधित असलेल्या विभागाकडे प्रस्ताव पाठविणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे रुग्णालयासाठी बॉन्डेड ग्रॅज्युएट (एम.बी.बी.एस) व पोस्ट ग्रॅज्युएट (एम.डी/ एम.एस/ डिप्लोमा) उमेदवारांची नेमणुक करणेकामी शासनाचे संबंधित असलेल्या विभागाकडे प्रस्ताव पाठविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२६** **संस्थान अधिनस्त सर्व निवासस्थानांच्या निवासव्यवस्था वितरणाच्या नियमावलीबाबत.**
**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२७** **संस्थान कर्मचारी "गृहकर्ज व्याज सवलत योजना" नियमावलीबाबत.**
**निर्णय क्र.७११** उपरोक्त आयत्या वेळेच्या विषय नं.२६ व २७ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास/ मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२८** **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव- २०१७ साजरा करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे शुक्रवार दि.२९/०९/२०१७ ते सोमवार दि.०२/१०/२०१७ या चार दिवस श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव साजरा होणार आहे. त्या कालावधीत खालीलप्रमाणे कामे व तयारी करावी लागणार आहे.

**अधिनियम २००४ मधील तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील कलम नं १७ (१) मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे. राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे,मंदीरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी,पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्य असतील.

**प्रास्ताविक -**२१ (१) (ख) रुढी व प्रथांनुसार,मंदिरातील धार्मिक विधी,पुजा-अर्चा,समारंभ व उत्सव अयोजित करणे व पार पाडणे अशी तरतूद आहे.

| **अ.नं.** | **तपशिल** | **उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे** |
|---|---|---|
| १. | उत्सव निमंत्रण पत्रिका व प्रसाद | संस्थान व्यवस्थापनामार्फत पूर्वापार चालत आलेल्या प्रथेप्रमाणे भक्तमंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका छपाई करुन, पत्रिकेबरोबर उदीप्रसाद पाठवावा लागतो. यंदाचे श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवात सभासदांना १,८०,००० निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतील.<br>तसेच नेहमीप्रमाणे निमंत्रण पत्रिका व उत्सवासंबधीत माहिति प्रेस नोट म्हणून वर्तमान पत्रातून जनसंपर्क कार्यालयामार्फत प्रसिध्दी देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| २. | उत्सव व्यवस्था | **अ) कलाकार कार्यक्रम** |
| | शुक्रवार,दि.२९/०९/२०१७<br>( प्रारंभ दिवस) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ.१०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदानाचे स्टेजवर दर पुण्यतिथीला ठेवण्यात येतो. साईनगर मैदानावर शताब्दी महोत्सवात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याने, मंदिर परिसरातील स्टेजवर कार्यक्रम ठेवणेबाबत निर्णय घ्यावा लागेल. |
| | शनिवार,दि.३०/०९/२०१७<br>(मुख्य दिवस) | १.सायंकाळी ७.३० ते रात्रौ.१०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदानाचे स्टेजवर दर पुण्यतिथीला ठेवण्यात येतो. साईनगर मैदानावर शताब्दी महोत्सवात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याने, मंदिर परिसरातील स्टेजवर कार्यक्रम ठेवणेबाबत निर्णय घ्यावा लागेल. २.रात्रौ. ११.०० ते पहाटे ५.०० पर्यत कलाकारांची सेवा,हजेरी कार्यक्रम.<br>या मुख्य दिवशी समाधी मंदीर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | रविवार,दि.०१/१०/२०१७<br>(तृतीय दिवस) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ.१०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदानाचे स्टेजवर दर पुण्यतिथीला ठेवण्यात येतो. साईनगर मैदानावर शताब्दी महोत्सवात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याने, मंदिर परिसरातील स्टेजवर कार्यक्रम ठेवणेबाबत निर्णय निर्णय घ्यावा लागेल. |
| | सोमवार,दि.०२/१०/२०१७<br>(सांगता दिवस) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ.१०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदानाचे स्टेजवर दर पुण्यतिथीला ठेवण्यात येतो. साईनगर मैदानावर शताब्दी महोत्सवात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याने, मंदिर परिसरातील स्टेजवर कार्यक्रम ठेवणेबाबत निर्णय घ्यावा लागेल. |
| | | **ब) कीर्तन कार्यक्रम** |
| | शुक्रवार,दि.२९/०९/२०१७ ते सोमवार,दि.०२/१०/ २०१७ या कालावधीत नेहमीच्या वेळेप्रमाणे कीर्तन कार्यक्रम होतील. | श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवासाठी चार दिवस कार्यक्रम ठेवावयाचा आहे.<br>निमंत्रीत कीर्तनकारांची व कलाकारांची निवासव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदीर विभागामार्फत अदा करण्यात येईल. कीर्तनकार निश्चिती करावयाची आहे. |
| | | **क) विविध पुजा व आराधना विधी** |
| | शुक्रवार ,दि.२९/०९/२०१७ ते सोमवार, दि.०२/१०/२०१७ | भिक्षा झोळी मिरवणूक, त्यात सहभाग, पालख्या व रथ मिरवणूक आराधना विधी,विणा व पोथी त्यातील सदस्यांचा सहभाग, सिमोल्लंघन इ. कार्यक्रम नेहमीचे प्रथेप्रमाणे करण्यात येतील. |
| ३. | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात शुक्रवार,दि.२९/०९/२०१७ रोजी पहाटे ५.१५ वा श्री व्दारकामाई मंदीरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल.<br>दि.३०/०९/२०१७ रोजी पहाटे ५.०० वा पारायण समाप्ती होईल. मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य पहिले ०५ अध्याय वाचतील व उर्वरित राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ साईभक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नावे दि.२८/०९/२०१७ रोजी अनाऊंसमेंट सेंटर मधील मंदीर विभागातील कर्मचारी यांचेकडे नोंदवीले जातील त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणाकरीता नावे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तांस प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल.<br>या उत्सवात पोथी, वीणा,प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपुजा या कार्यक्रमा करीता मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होतील. |
| ४. | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी दिनांक.२९/०९/२०१७ रोजी श्रींचे पालखीचे गावांतून रात्रौ. ९.१५ वा मिरवणूक निघेल व दुस-या दिवशी दि.३०.०९.२०१७ रोजी श्रींचे रथाची गावांतून रात्रौ. ९.१५ वा मिरवणूक निघेल. |
| ५. | कार्यक्रम सांगता | काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रीत कीर्तनकार करतील. |
| ६. | श्री साईसत्यव्रत पुजा व अभिषेक पुजा | उत्सव काळात शुक्रवार, दि.२९/०९/२०१७ ते सोमवार, दि.०२/१०/२०१७ अखेर श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण पुजा) व अभिषेक पुजा चालू राहील. |
| ७. | विद्युत रोषणाई | समाधी मंदीर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान व मंदीर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री पुण्यतिथी उत्सवात व्दारकामाई मंडळ,मुंबई,विनामुल्य विद्युत रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन, चहा व नाष्टयाची व्यवस्था संस्थान मार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे-येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थानमार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ८. | गाव जेवण | उत्सवाच्या सांगता दिनी नेहमीप्रमाणे गावजेवण देण्यात येईल. |
| ९ | प्रसाद- भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नासह भक्तांना मोफत प्रसाद भोजन दिले जाते. मा. व्यवस्थापन |

| | | |
|---|---|---|
| | | समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय तसेच निर्मंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीसाठी येणा-या व्यक्तीची प्रसाद भोजनाची व्यवस्था नेहमीप्रमाणे केली जाईल. साईभक्तांचे सोयीसाठी अन्नपाकिटे,चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅंटीनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टान्न प्रसाद नेहमीप्रमाणे देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी सुरु करणेत येईल. या सबंधीत विभागाकडुन नियोजन करण्यात येईल. <br> मा.कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करुन सन २०१७ चे दसरा उत्सवात चारही दिवसांचे प्रसाद भोजनात मिष्टांन्न पदार्थ निश्चित करण्यात येतील. त्याप्रमाणे उत्सवात मिष्टान्न देता येईल. |
| १०. | संरक्षण विभाग | उत्सव काळात समाधी मंदीर व मंदीर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा. पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपण परवानगीबाबत मा.पोलिस निरिक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल. |
| ११. | लेखाशाखा | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊंटर तीन शिप्टमध्ये चालू ठेवण्यात येतील. <br> श्रींना अर्पण केलेली वस्त्रे व इतर वस्तूची प्रसाद रुपाने विहीत पध्दतीने विक्री करण्यात येईल. |
| १२. | बांधकाम | उत्सव कालावधीत समाधी मंदीर परिसरात व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ.व्यवस्था करावयाची आहे. |
| १३. | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पुर्वतयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकते नुसार ज्या त्या खात्यास नेमण्यात येईल. याकामी कामगार अधिकारी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश पारीत करतील. |
| १४. | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान, साई धर्मशाळा,व्दारावती, साईबाबा भक्त निवासस्थान इ. इमारतीमधून पालखी पदयात्री व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल |
| १५. | रुग्णालय व्यवस्था | संस्थान मार्फत मंदीर परिसर,पिंपळवाडी रोड दर्शन रांग व श्री साई प्रसादालय या ठिकाणी प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्य अशी रुग्णवाहिका मंदीर परिसरासत ठेवण्यात येईल. |
| १६. | पालखी व्यवस्था | श्री पुण्यतिथी उत्सवात ब-याच ठिकाणाहून पालख्या येत असतात,उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था साईधर्मशाळा मध्ये करण्यात येईल. येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. पालखीधारकांतील पदयात्रींना संस्थानमार्फत शिर्डी येथे आलेवर ०१ वेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येते.त्यानुसार यावर्षीही १ वेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येईल |
| १७ | पाणी पुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सव काळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहील याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १८ | खर्चाचे अंदाजपत्रक | श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव -२०१६ मध्ये अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४७,७५,०००/- मात्र इतक्या रक्कमेस मंजुरी देण्यात आली होती. प्रत्यक्षात रु. ३९,३४,५२८/- मात्र इतका खर्च झालेला आहे. <br> श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१७ करीता एकुण अंदाजपत्रकीय रु. ४४,६५,०००/- मात्रचा खर्च मंजुरीसाठी सादर केला आहे. |

**आराधना विधीबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३९४**

"आराधना विधी समाधी मंदिराच्या पहिल्या माळयावर आहे. त्याच ठिकाणी करण्यात यावा.सदरहू आराधना विधीचे थेट (Live telecast) टिव्हीवर व इतर माध्यामांना करणेस यावे.यामुळे समाधी मंदीर परिसरातील दूचित्रवाणीच्या संचावर व संपुर्ण जगात देखील भक्तांना हा सोहळा बघता येईल समाधी मंदिर (बुटी वाडयास) १०० वर्ष झाल्याने जुनी वास्तू झाली आहे. त्यामुळे गावकरी व इतर यांची वर्दळ वरती बंद करुन लाईव्ह दर्शन देणेत यावे. आराधना विधीकरीता जे यजमान (पतिपत्नी) यांची प्रसाद भोजनाची व्यवस्था मंदिराचे

पहिल्या माळयावर हॉल येथे करणेत यावी त्यांचे शिवाय इतरांना समाधी मंदीर हॉलवर प्रवेश नसावा. जे भोजन यजमान, ब्राम्हण सुवासिनीना दिले जाते.तेच शाहीभोजन गावकरी व मान्यवर यांना श्रीसाई प्रसादालयच्या व्ही.आय.पी हॉलच्या बाजूला असलेल्या दोन हॉलमध्ये ठरावीक वेळेत देणेत यावे. व्यवस्था करण्यात यावी. या दिवशी साईभक्त व गावक-यांसाठी श्री साई प्रसादालयामध्ये उत्सवाचे नेहमीचे प्रसाद भोजन संस्थान तर्फे मोफत देण्यात यावे. "

श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ करीता झालेला खर्च व अपेक्षित खर्च तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | विभाग | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१६ | | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१७ |
|---|---|---|---|---|---|
| | | | **अंदाजे खर्च** | **प्रत्यक्ष खर्च** | अंदाजे खर्च |
| १. | मंडप, कमानी, स्टेज उभारणे खर्च | बांधकाम | ७,००,०००.०० | ६,२४,६३०.०० | ६,२५,०००.०० |
| २. | कलाकार बिदागी – कीर्तनकार व निमंत्रित कलाकार कार्यक्रमासह. | मंदीर | २,५०,०००.०० | १,४४,१६८.०० | २,००,०००.०० |
| ३. | भक्तांना मिष्टान्न खर्च-मजूरी, भाडेसह खर्च | प्रसादालय | ९,००,०००.०० | ७,७२,१४९.०० | ८,००,०००.०० |
| ४. | विद्युत रोषणाई, जनरेटर भाडे, इंधन इ. खर्च | विद्युत | १०,००,०००.०० | ९,०३,९६५.०० | १०,५०,०००.०० |
| ५. | निमंत्रण पत्रिका, स्टिकर, उदीप्रसाद भरणे मजूरीसह खर्च | सामान्य प्रशासन | १४,८०,०००.०० | १२,६६,९५६.०० | १३,००,०००.०० |
| ६. | जादा कंत्राटी कर्मचारी, स्वयंसेवक (विदयार्थी ) मानधन खर्च | संरक्षण,कॅन्टीन, साईप्रसाद, साईबाबा भक्तनिवास, मंदीर, प्रसादालय | ३,००,०००.०० | १,४२,७६४.०० | २,००,०००.०० |
| ७. | पालख्याचे पिण्याचे पाणी व्यवस्था खर्च | पाणी पुरवठा | १,००,०००.०० | २३,०५२.०० | ५०,०००.०० |
| ८. | मंदिर व मंदीर परिसर फुलांची सजावट खर्च | बगीचा विभाग | २०००००.०० | - | २,००,०००.०० |
| ९. | इतर खर्च (फर्निचर) | | ४५,०००.०० | ३१,३१५.०० | ४०,०००.०० |
| | | एकूण रुपये - | ४७,७५,०००.०० | ३९,०८,९९९.०० | ४४,६५,०००.०० |

विभागाचा स्पष्ट अभिप्राय - उपरोक्त अ.नं ८ मध्ये बगीचा विभागामार्फत मंदिर व मंदिर परिसरात करावयाच्या फुल सजावटीसाठी देणगीदार साईभक्तांचा प्रस्ताव प्राप्त न झाल्यास संस्थानमार्फत फुल सजावट करणेसाठी अंदाजीत खर्चासाठी नव्याने तरतूद करणेत आलेली आहे.

निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम साईनगर मैदानाचे स्टेजवर दर पुण्यतिथीला ठेवण्यात येतात. परंतु साईनगर मैदानावर शताब्दी महोत्सवात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याने, मंदिर परिसरातील स्टेजवर कार्यक्रम ठेवावे किंवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रमाणे श्री पुण्यतिथी उत्सव- २०१७ साजरा करणेस, त्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.**४४,६५,०००.००** (अक्षरी रुपये चौरेचाळीस लाख पासष्ट हजार) मात्र चे खर्चास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.७१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव- २०१७ साजरा करणेस मान्यता देण्यात आली. परंतु या वर्षी पुण्यतिथी उत्सवासोबत शताब्दी सोहळयाचा उदघाटन समारंभ देखील आहे. त्यामुळे मागील वर्षीच्या तुलनेत या वर्षीच्या उत्सवासाठी जादा खर्च होण्याची**

**शक्यता आहे. ही बाब विचारात घेता, प्रस्तावातील तक्त्यामधील अ.नं.२ साठी अंदाजे रु.१० लाख मात्र व अ.नं.५ साठी अंदाजे रु.२५ लाख मात्र वाढीव खर्चासह अंदाजे रु.६४,६५,०००/- मात्रचे खर्चास तसेच यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन/ वशी- ०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९** **मंदिर विभागामार्फत होणाऱ्या पाद्यपुजा व इतर कार्यक्रमासाठी मान्यवर निश्चितीबाबत.**

**निर्णय क्र.७१३** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- सामान्य प्रशासन/ वशी- ०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३०** **श्री साईबाबांच्या पादुका वांद्रे (प.) सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा संस्थानकडे श्रींच्या मुळ पादुका आहेत . पालखी व रथ मिरवणूकीचे वेळी श्रींच्या पादुका साईभक्तांचे दर्शनाकरीता धुपारतीनंतर श्रींचे समाधी चौथ-यावर ठेवण्यात येतात. तसेच रात्रौ पालखीनंतर पुन्हा समाधी मंदिरातील शोरुममध्ये ठेवण्यात येतात. श्रींच्या पादुकांचे संरक्षण व संवर्धन करणे ही अत्यंत महत्वाची बाब आहे. श्रीसाईबाबांच्या मुळ पादुका यापुर्वी फक्त मुंबई येथे एक वेळेस संस्थानचे कार्यक्रमासाठी कडक बंदोबस्तामध्ये नेण्यात आल्या होत्या. त्याव्यतिरीक्त व त्यानंतर श्रींच्या मुळ पादुका या कोणत्याही ठिकाणी नेण्यात आलेल्या नाहीत. तसेच यापुर्वी संस्थानमार्फत चावडी शताब्दी वर्षामध्ये विविध ठिकाणी झालेल्या कार्यक्रमाकरीता श्रींचे समाधीचे पादुकांचे ठिकाणी पुर्वी असलेल्या व सध्या वापरात नसलेल्या चांदीच्या व म्युझियम येथील पादुकांना कार्यक्रमासाठी बाहेरगावी नेऊन संस्थानमार्फत कार्यक्रम करण्यात आलेला आहे.

<u>**प्रस्ताव-**</u> मा.आमदार ॲड.आशिष शेलार, आमदार तथा अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, मुंबई यांनी आपले दि.०८/०८/२०१७ रोजीचे पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, मा.आ.ॲड. शेलार यांचे विधानसभा क्षेत्रातील वांद्रे पश्चिम सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ हे प्रसिद्ध गणपती मंडळ असून दर वर्षी हजारो भाविक येथे गणरायाच्या दर्शनासाठी येतात. दर वर्षी आकर्षण म्हणून मंडळामार्फत देशातील प्रसिद्ध देवस्थानांची प्रतिकृती उभारण्यात येते. यावर्षी श्रीसाईनाथांच्या शिर्डी येथील देवस्थानास १००वर्षे पुर्ण होत असल्याने सदर गणेशोत्सव मंडळ साईनाथांच्या मंदिराची प्रतिकृती उभारत आहे यापुर्वी गोवा, मंगेशी देवस्थान, गणपतीपुळे येथील गणेश मंदिर, गुजरात मधील अंबाजी माता मंदिर, जेजुरी देवस्थान व अशा विविध देवस्थानांची प्रतिकृती मंडळामार्फत उभारण्यात आली आहे. तरी यावेळी श्रीसाईनाथांच्या मंदिराची प्रतिकृती उभारण्यात येत असल्याने संस्थानकडून गणेशोत्सव मंडळास श्रीसाईबाबांच्या पादुका भाविकांच्या दर्शनासाठी १२ दिवसासांठी वांद्रे येथे उभारण्यात येणाऱ्या शिर्डी साईबाबा मंदिराच्या प्रतिकृतीमध्ये ठेवणेची परवानगी मिळणेबाबत पत्राद्वारे विनंती केली आहे तसेच या कालावधीत श्रींच्या पादुकांचे पावित्र्य जपले जाईल याची आवश्यक दखल मंडळामार्फत घेण्यात येईल असे नमूद केले आहे. तसेच याबाबतचे श्री.जितेंद्र राऊत, अध्यक्ष, वांदे (प) सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांचा अशाच आशयाचा विनंती अर्जही सोबत जोडलेला आहे. तरी त्याबाबत निर्णय होणेस विनंती.

<u>**विभागाचा अभिप्राय**</u>:- श्रीसाईबाबांच्या सर्व प्रकारच्या पादुकांचे संरक्षण व संवर्धन करणे ही अत्यंत महत्वाची बाब आहे. त्यामुळे श्रींच्या पादुका इतरत्र ठिकाणी पाठविणेबाबत विचार होणेस विनंती आहे. यापुर्वी अशाच पद्धतीने खालीलप्रमाणे चांदीच्या पादुका संस्थान कर्मचारी व संरक्षण कर्मचारी दक्षिणापेटी यांचेसह दर्शनासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच त्याकामी झालेला खर्च संबंधीतांकडुन वसुल करण्यात आलेला आहे. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे-

१) श्री.गणेश अरुण डोईफोडे, सचिव, श्रीसाईसेवा प्रतिष्ठाण, मु.पो.काष्टी, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर यांचे विनंतीवरुन काष्टी येथे दि.रविवार, दि.०७/०५/२०१७ रोजी ०१ दिवस.

२) श्री.अमित व्यास, विश्वस्त, स्वयंभु श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर, बोरीवली, मुंबई यांचे विनंतीवरुन दि.०१/०६/२०१७ ते दि.०४/०६/२०१७ अखेर ०४ दिवस.

मा.आमदार ॲड.आशिष शेलार यांचे पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे श्रींचे पादुका १२दिवस देणेबाबत विनंती केलेली आहे. श्रींच्या पादुका अशा पद्धतीने कोणत्याही गणेशोत्सवाचे कार्यक्रमाकरीता देण्यात आलेल्या नाहीत. तसेच पत्रामध्ये संस्थान कर्मचारी व इतर संरक्षण कर्मचारी यांचेबाबत उल्लेख अढळुन येत नाही. त्यांनी फक्त श्रींच्या पादुका मिळाव्यात अशी विनंती केली आहे. तसेच सदर पादुका या त्यांचे ताब्यात १२दिवस द्याव्यात असा बोध होतो. तरी श्रींच्या पादुका पाठवितांना खालील बाबींचाही विचार व्हावा.

१) श्रींच्या मुळ पादुका इतरत्र कार्यक्रमाकरीता न देता सध्या वापरात नसलेल्या चांदीच्या पादुका द्याव याचे असल्यास संस्थान कर्मचा-यांचे सोबत देता येतील. तसेच श्रींच्या चांदीच्या पादुका पत्रात नमूद केल्याप्रमणे १२ दिवस न देता **एकदिवस** अथवा **दोन दिवस**संस्थान कर्मचारी यांचेसह उपलब्ध करुन देता येतील, असे नम्र मत आहे. तरी निर्णय होणेस विनंती.

२) श्रींच्या वापरात नसलेल्या चांदीच्या पादुका (वांद्रे) मुंबई येथे संस्थानचे अधिकारी, मंदिर कर्मचारी, संरक्षण अधिकारी, पहारेकरी यांचेसमवेत समाधी मंदिरातील दक्षिणापेटीसह नेणेत याव्यात व सदरचे पादुका, साहित्य व कर्मचारी यांचा संस्थानचे लेखाशाखा विभामामार्फत योग्य तो विमा उतरविण्यात यावा, असे नम्र मत आहे.

३) श्रींच्या पादुका बाहेरगावी देतांना १२ दिवसांकरीता संस्थानचे प्र.अधिक्षक(सामान्य प्रशासन), मंदिर प्र.अधिक्षक/ मंदिर पर्यवेक्षक/ लिपीक-१, पुजारी/ सहाय्यक पुजारी- ०२, चोपदार/ मदतनीस-०२, संरक्षण पहारेकरी- ०६ व इतर अनुषंगीक इतर आवश्यक कर्मचारी पुर्णवेळ नेमावे लागतील. तसेच त्यांचे बदल्यात संबंधीत विभागास तेवढे कर्मचाऱ्यांचे नियोजन सामान्य प्रशासन/ कामगार विभागामार्फत करणेस मान्यता असावी, ही विनंती.

४) कार्यक्रमाकरीता जाणा-या श्रींच्या चांदिच्या पादुका, अधिकारी/ कर्मचारी यांची जाणे-येणेची, राहण्याची, जेवणाची व इतर व्यवस्था संबंधीत मंडळामार्फत व्हावी, असे नम्र मत आहे. त्याचप्रमाणे संस्थानमार्फत होणारा इतर खर्चही मंडळाकडून घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

५) गर्दीचे ठिकाणी श्रींच्या चांदीच्या पादुकांना हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे झाल्यास श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीची बदनामी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे यापुर्वी कोणत्याही गणेशोत्सव मंडळास अशा पद्धतीने श्रींच्या पादुका देण्यात आलेल्या नाही. तरी त्याबबत निर्णय होणेस विनंती.

६) श्रींच्या चांदीच्या पादुकांचे संरक्षण व संवर्धन होणे ही अत्यंत महत्वाची बाब आहे. शिर्डी येथुन पादुका निघालेपासुन पादुका शिर्डी येथे परत येईपर्यंत तसेच गर्दीचे ठिकाणी वस्तुंची व कर्मचा-यांची सर्व जबाबदारी वांद्रे (पश्चिम) सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, मुंबई यांचेवर सोपविण्यात यावी, असे वाटते. तरी त्याबाबत निर्णय व्हावा, ही विनंती.

तरी मा.आमदार ॲड.आशिष शेलार यांचे विनंतीनुसार श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे ताब्यातील श्रींच्या चांदीच्या पादुका नेणेबाबत उपरोक्त बाबींचा विचार होऊन निर्णय होणेस मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.७१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार व प्रसार होणेकामी श्रींच्या चांदिच्या पादुका, पादुका दर्शन सोहळयाकरीता वांद्रे (प.) सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास १२ दिवसांसाठी, पादुका दर्शन सोहळयाच्या ठिकाणी दानपेटी व देणगी पुस्तक संस्थानचे राहील, या अटींवर उपलब्ध करुन देण्यात याव्या, असे ठरले. तसेच यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३१** **श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरित पारायण सोहळा मंडप- २०१७ कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी उघडणेत आलेल्या वाणिज्यीक प्रस्तावांवर निर्णय होणेबाबत. (कार्योत्तर मान्यता).**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद–** अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट– कलम (२) च्या खंड (ठ) अन्वये श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील या प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना –**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे सालाबाद प्रमाणे याही वर्षी श्रावण मास निमित्त सोमवार दि.२४/०७/२०१७ ते मंगळवार दि.०१/०८/२०१७ या कालावधीत श्री साईसच्चरीत पारायण सोहळा आयोजित करणे प्रस्तावीत आहे. सदरचे कार्यक्रमाकरीता मंडप, कमानी, स्टेज व इतर अनुषंगीक व्यवस्था करावी लागते. दरवर्षी एकावेळी साधारणतः २५०० पारायणार्थी साईभक्त पारायणास बसतात. सदरचा पारायण सोहळा कार्यक्रमासाठी मंदिर परिसराचे पूर्वेकडील मोकळया जागेत १९५०० चौ. फुट मंडप व्यवस्था

करणेत येते. यासाठी एम.एस. कॉलम व कैच्या वापरुन ताडपत्रीचे छत असलेला डोम टाईप मंडप, पार्टीशन, स्टेज, स्वागत कमानी, मॅटींन, मेकअप रुम, बॅरेकेडींग, कनात इ. व्यवस्था करावी लागते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५०४ अन्वये नुसार श्री साईसच्चरित पारायण सोहळा -२०१७ कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था ६ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरीत पारायण सोहळा मंडप - २०१७ कार्यक्रमासाठी डोम टाईप मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी येणारे एकूण रक्कम रु.४,१०,९०५/- मात्रचे खर्चास तसेच याकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेस इकडील दि.२४/०६/२०१७ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेण्यात येऊन दि.१२/०७/२०१७ पर्यंत ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर मुदतीत एकुण ०५ खालील मंडप ठेकेदारांनी ऑनलाईन ई- निविदा अपलोड केल्या होत्या.

| अ.न. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|
| १. | पाटील मंगल सेवा, लातुर |
| २. | कला साधना, नाशिक |
| ३. | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर |
| ४. | विजय मंडप साऊंड सर्व्हीस, औरंगाबाद |
| ५. | ऋतुजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद |

उपरोक्त अपलोड करणेत आलेल्या ई-निविदा दि.१४/०७/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आलेले आहेत. उघडणेत आलेल्या ई- निविदांमध्ये अपलोड केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता सर्व ठेकेदार पात्र आहे. वरील पात्र ई- निविदाधारकांचे वाणिज्यीक लिफाफे (Commercial Bid) त्याच दिवशी उघडणेत आले असून, त्यांचे दराचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | निविदाधारकाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | कला साधना, नाशिक | **३,४७,२००/-** | **निम्नतम** |
| २. | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर | ४,३३,०९५/- | -- |
| ३. | ऋतुजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद | ४,५२,१००/- | -- |
| ४. | विजय मंडप साऊंड सर्व्हीस, औरंगाबाद | ४,८३,६५०/- | -- |
| ५. | पाटील मंगल सेवा, लातुर | १०,०५,९८४/- | -- |

**प्रस्ताव:-** श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरीत पारायण सोहळा मंडप- २०१७ कार्यक्रमासाठी डोम टाईप मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी मंडप ठेकेदार कला साधना, यांचे निम्नतम दरानुसार येणारे रक्कम रु.३,४७,२००/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. दि.१७/०७/२०१७ रोजी मा. अध्यक्ष सो. उपस्थीत विश्वस्त व मा.कार्यकारी महोदया यांचे समवेत साईसच्चरित पारायण सोहळा मंडप उभारणीबाबत चर्चा झाली सदरहू चर्चेत पारायण सोहळयाचे कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी फारच थोडा कालावधी शिल्लक असल्याने निम्नतम दराचे ठेकेदार यांना मा.कार्यकारी अधिकारी महोदया यांचेकडे चर्चेस बोलावून निर्णय घेण्यात यावे, असे निर्देश दिले.

त्यानुसार दि.१८/०७/२०१७ रोजी साईसच्चरित पारायण सोहळा २०१७ निमित्त मा.कार्यकारी अधिकारी महोदया यांचे कार्यालयात आढावा बैठक आयोजित केली होती. सदरचे बैठकीत निम्न्तम दराचे मंडप ठेकेदार यांना दराबाबात चर्चा करणेसाठी बोलविणेत आले होते. त्यानुसार मंडप ठेकेदार कला साधना यांचे प्रतिनिधी श्री सुनिल महाले हे उपस्थित होते. त्याचेशी दराबाबत चर्चा केली असता त्यांनी सदरची मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था रक्कम रु.३,११,०००/- मात्र रक्कमेत पुर्ण करुन देणेस सहमती दर्शविली आहे.

तरी श्री साईसच्चरीत पारायण सोहळा मंडप व्यवस्थेसाठी रक्कम रु.३,११,०००/-मात्रचे खर्चास तसेच याकामी त्यांना कार्यादेश देणेस तसेच ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेणेस व सदरहू प्रस्तावास कार्यात्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरित पारायण सोहळा- २०१७ कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामीच्या उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३२** **संस्थानमार्फत वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव तसेच उन्हाळा व पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीकव्यवस्था उभारणेकामी येणाऱ्या वार्षिक खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये "रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** संस्थान मार्फत वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव तसेच दिपावली, नाताळ, उन्हाळा, पावसाळयाचे कालावधीत, तसेच संस्थान मार्फत वेळोवेळी आयोजित विविध कार्यक्रमाचे वेळी मंडप व्यवस्था केली जाते. याकामी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, बॅरेकेडींग, स्टेज, कनात, कमानी इ. अनुषंगीक व्यवस्था करणेत येते. सदर व्यवस्था करणेकामी येणा-या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**१) श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१७ निमित्त साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था:-**

**१) एम.एस .पाईपकैच्या वापरुन वरील बाजूने ताडपत्री व आतिल बाजुने सुशोभित काडप असलेले मंडप.**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | एम.एस .पाईपकैच्या वापरुन वरील बाजूने ताडपत्री व आतिल बाजुने सुशोभित काडप असलेले मंडप. | ९११७.०० चौ. फुट | दि.२९/०९/२०१७ ते दि.०२/१०/२०१७ अखेर ०४ दिवस | २.७५ प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,००,२८७.०० |
| २. | पाईप / बांबु व गोल्टे वापरुन वरील बाजूने ताडपत्री व आतिल बाजुने सुशोभित कापड असलेले मंडप | ३९१६०.०० चौ. फुट | | १.८५ प्र.चौ. फुट प्र. दिवस | २,८९,७८४.०० |
| ३. | साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व्यवस्था:- | ६००. चौ. फुट | | २४.७५ प्र.चौ. फुट प्र. दिवस | ५९,४००.०० |
| ४. | दर्शन रांगेसाठी व श्री साईप्रसादालय येथे तिकीट रेलिंगसाठी बॅरेकेटींग करणे: | १००० रनिंग फुट | | १४.३० प्र.र. फुट प्र. दिवस | ५७,२००.०० |
| | | | | **एकूण रक्कम रु.** | **५,०६,६७१.००** |

**०२) दिपावली सुट्टीचे कालावधीत तसेच डिसेंबर २०१७ मधील नाताळ सुट्टी व नववर्षा निमित्ताने साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था:-**

अ) **दिपावली मंडप**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे | **१३,०५५.००** चौ. फुट | दि.१९/१०/२०१७ ते ०२/११/२०१७ अखेर १५ दिवस. | ०.७७ प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,५०,७८५.२५ |
| | | | | **एकूण रक्कम रु. (अ)** | **१,५०,७८५.००** |

**ब) नाताळ मंडप**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परिमाण | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम.एस. पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर असलेले) | **१४३४३.००** चौ. फुट | दि. ०५/१२/२०१७ ते ०२/०१/२०१८ अखेर ०९ दिवस. | ०.७७ प्र.चौ. फुट प्र. दिवस | ९९,३९७.०० |
| २. | श्री साईप्रसादालयातील भोजन प्रतिक्षालय रेलींगला संरक्षण कठडे | ६५१ र. फुट | | ३.०० प्र.र. फुट | १७,५७७.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | बांधणे कामी बांबुची ४ फुटी उंचीची बॅरेकेडींग करणे. | | | प्र. दिवस | |
| ३. | साईनगर मैदानाकडे जाणारा रस्त्यावर स्वागत कमान उभारणे. ( १ दिवस) साईज -२०'X१५' | ०१ नग | ०१ दिवस | २२००/- प्र. नग | २,२००.०० |
| ४. | साईनगर मैदान येथे शिर्डी महोत्सव कार्यक्रमासाठी ग्रीनरुमसह स्टेजची उभारणी करणे ( १ दिवस) साईज - ३०'X२०' | ६००.०० चौ. फुट | ०१ दिवस | ६६/- प्र.चौ. फुट प्र. दिवस | ३९,६००.०० |
| | | | | **एकूण रक्कम रु. (ब)** | **१,५८,७७४.००** |
| | | | | **एकूण रक्कम रु. (अ+ब)** | **३,०९,५५९.००** |

**०३) श्री रामनवमी उत्सव २०१८ निमित्त करावयाची व्यवस्था:-**

(अ) **मंदिर परिसर, साई धर्मशाळा तसेच पालखी स्वागतासाठी करावयाचे मंडप, स्टेज, बॅरेकेडींग इ. व्यवस्था करणे.**

| **अ.नं.** | **मंडपाचे ठिकाण व तपशिल** | परिमाण | **कालावधी** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| १. | मंगल कार्यालय, साई धर्मशाळा तसेच पालखी स्वागतासाठी शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह उभारणे, | १२३९०.०० चौ. फुट | दि.२४/०३/२०१८ ते दि.२६/०३/२०१८ अखेर ०३ दिवस | १.४७ प्र.चौ. फुट प्र. दिवस | ५४,६३९.९० |
| २. | साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी ३०X२० साईजचे स्टेज व इतर व्यवस्था करणे. | ६००.०० चौ. फुट | | ३८.५० प्र.चौ. फुट प्र. दिवस | ६९,३००.०० |
| ३. | दर्शन व भोजन व्यवस्थेसाठी बॅरेकेडींग व्यवस्था. | ११००.०० र. फुट | | ६.६० प्र.र. फुट प्र. दिवस | २१,७८०.०० |
| ४. | कुस्ती ग्राऊंडवर १ दिवसाकरीता शामियाना मंडप उभारणे. | ४७२५.०० चौ. फुट | १ दिवस | १.६३ प्र.चौ. फुट प्र. दिवस | ७,७०१.७५ |
| | | | | **एकूण रक्कम रु. (अ)** | **१,५३,४२१.६५** |

**(ब) मुंबई येथून पायी पालखी घेवून येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी कापडी / शामियाना मंडप, कनात, बिछायत तसेच विद्युतीकरणासह व्यवस्था करणे.**

**१) मुंबई ते सिन्नर मार्गावर**

| **अ.नं.** | **मंडपाचे ठिकाण व तपशिल** | परिमाण | **कालावधी** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुंबई ते शिर्डी मार्गावर खर्डी गोलभान, कसारा बायपास, लतिफवाडी पोलीसस्टेशन, घोटी येथे कापडी मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह. | ३१५९०.०० चौ. फुट | दि.१८/०३/२०१८ ते दि.२२/०३/२०१८ अखेर ०५ दिवस | १.३२ प्र.चौ. फुट प्र. दिवस | २,०८,४९४.०० |
| २. | सिन्नर ते वावी मार्गावर सिन्नर एमआयडीसी, खोपडी दत्त मंदिराजवळ, पांगरी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे जागेत व वावी येथे शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह. | **७६,६४८.००** चौ. फुट | दि.१९/०३/२०१८ ते दि.२३/०३/२०१८ अखेर ०५ दिवस | ०.७७ प्र.चौ. फुट प्र. दिवस | २,९५,०९४.८० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | वावी ते शिर्डी मार्गावर पाथरे वनराई हॉटेलजवळ , श्री चक्रधर स्वामी महानूभाव मंदिर, दुशिंगवाडी जिल्हा परिषद शाळेमध्ये, मलढोन फाटा श्री. पवार यांचे जागेमध्ये, झगडे फाटा, येथे शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह. | **२५,३२३.५०** चौ. फुट | दि.२०/०३/२०१८ ते दि.२४/०३/२०१८ अखेर ०५ दिवस. | ०.८० प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,०१,२९४.०० |
| | | | | एकूण – (ब) | ६,०४,८८२.८० |
| | | | | **एकूण रक्कम रु. (अ+ब)** | **७,५८,३०४.००** |

**०४) <u>सन २०१८ मधिल उन्हाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था:-</u> (ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (बांबु बल्ल्याचे स्ट्रक्चर असलेले ) उभारणे.**

| **अ.नं.** | **मंडपाचे ठिकाण व तपशिल** | परिमाण | **कालावधी** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| अ) | मंदिर परिसर, साई प्रसादालय व भक्तनिवास (५०० रुम) परिसरात ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (बांबु बल्ल्याचे स्ट्रक्चर असलेले ) उभारणे. | ४९३८१.०० चौ. फुट | दि.०१/०३/२०१८ दि.१५/०६/२०१८ अखेर एकूण १०७ दिवस | ०.२० प्र.चौ. फुट प्र. दिवस | १०,५६,७५३.४५ |
| ब) | समाधि मंदिर उत्तर बाजू चावडीगेट ते नगरद्वार गेटपर्यंत एमर क्चचे स्ट्रपाईप व कैच्यां.एस. .असलेले कापडी मंडप उभारणे (१८' उंचीचा) | ६५६७.०० चौ. फुट | | ०.३८ प्र.चौ. फुट प्र. दिवस | २,६७,०१४.२२ |
| | | | | **एकूण रक्कम रु. -** | **१३,२३,७६८.००** |

**०५) <u>श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१८ निमित्त साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था:-</u>**

| **अ.नं.** | **मंडपाचे ठिकाण व तपशिल** | परिमाण | **कालावधी** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| १. | एम.एस .पाईपकैच्या वापरुन वरील बाजूने ताडपत्री व आतिल बाजुने सुशोभित काडप असलेले मंडप. | १०६०८.०० चौ. फुट | दि.२६/०७/२०१८ ते २८/०७/२०१८ अखेर ३ दिवस | ४.०३ प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,२८,२५०.७२ |
| २. | पाईप/ बांबु व गोल्टे वापरुन वरील बाजूने ताडपत्री व आतिल बाजुने सुशोभित कापड असलेले मंडप. | २०१३८.०० चौ. फुट | | ३.३० प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,९९,३६६.२० |
| ३. | पालखी पदयात्री साईभक्तांचे निवासस्थानी ताडतत्रीछत, कनात व बिछाईत इ. व्यवस्थेसह शिंगवे नाईक, गुहा ता. राहुरी, निर्मळ पिंप्री ता. राहाता येथे मंडप उभारणी करणे. | ७२००.०० चौ. फुट | | ४.९५ प्र.चौ. फुट प्र. दिवस | १,०६,९२०.०० |
| ४. | दर्शन रांगेसाठी व श्री साईप्रसादालय येथे तिकीट रेलिंगसाठी बॅरेकेटींग करणेः | ६३५ रनिंग फुट | | २०.०० प्र.र. फुट प्र. दिवस | ३८,१००.०० |
| | | | | **एकूण रक्कम रु.** | **४,७२,६३७.००** |

**०६) <u>सन २०१८ मधिल पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था:-</u>**

| **अ.नं.** | **मंडपाचे ठिकाण व तपशिल** | परिमाण | **कालावधी** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| अ) | मंदिर परिसर, साई प्रसादालय व भक्तनिवास (५०० रुम) परिसरात ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (बांबु बल्ल्याचे स्ट्रक्चर असलेले) उभारणे. | १८,०९३.०० चौ. फुट | दि.०१/०७/२०१८ दि.३०/०९/२०१८ अखेर एकूण ९२ दिवस | ०.४२ प्र.चौ. फुट प्र. दिवस | ६,९९,११३.५२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ब) | समाधी मंदिर उत्तीर बाजूस गेट नं.३ ते गेट नं. ४ पर्यत ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे. (एम.एस.पाईप व कैच्यां चे स्ट्रयक्चर असलेले ) | ६३९०.०० चौ. फुट | | ०.४८ प्र.चौ. फुट प्र. दिवस | २,८२,१८२.४० |
| **एकूण रक्कम रु. -** | | | | | **९,८१,२९६.००** |
| **एकूण पुर्णांकीत रक्कम रु. (१ ते ६)** | | | | | **४३,५२,२३५.००** |

उपरोक्त प्रमाणे संस्थान मार्फत वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव, उन्हाळयाच्या व पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता उन, वारा, पाऊस यापासून संरक्षण होणेकामी संस्थान परिसरात तसेच पायी पालखी घेऊन येणारे साईभक्तांचे निवास व्यवस्थेकरीता तात्पुरते पालखी मार्गावर मंडप व्यवस्थेकरीता रक्कम रु.४३,५२,२३५/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तसेच वर्षभरात साईभक्तांचे व इतर विभागाचे मागणीनुसार धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी तसेच उदघाटने इ. करीता आवश्यकतेनुसार मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेणेस व त्यासाठी येणारे सर्व समावेशक खर्चास असावी.

संस्थान मार्फत वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव, उन्हाळयाच्या व पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर व्यवस्था करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु. रु.४३,५२,२३५/- खर्चास मान्यता असावी. तसेच आवश्यकतेनुसार मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेता येईल. तरी याकामी येणारे खर्चास व वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई – निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, संस्थानमार्फत वर्षभरात साजरे करण्यात येणारे उत्सव तसेच उन्हाळा व पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३३** **माहे जुन- २०१७ जमा-खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे जुन २०१७ या कालावधीतील मासिक जमा खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून जुन २०१७ या महिन्याचा जमा खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे -

| **महिना** | **जमा** | **खर्च** |
|---|---|---|
| जुन २०१७ | ४५,०९,८९,७४१/- | १८,०९,३७,६४४/- |

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे जुन २०१७ या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.७१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जुन- २०१७ मधील जमा-खर्च तक्त्याची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३४** **जिल्हा सैनिक कार्यालय यांना सशस्त्र सेना ध्वजदिन निधीसाठी ५१ लाख आर्थिक मदतीबाबत.**

**प्रस्ताव-** भारताला स्वातंत्र मिळून ७० वर्ष होत आहेत. या काळात तीन युद्धे तसेच इतर अनेक लढायांना आपले जवान सामोरे गेले आहेत. आजही आपल्या देशाच्या उत्तर सीमा धगधगतच आहेत. या सर्व युद्धात आपल्या सैनिकांनी केलेल्या पराक्रमाची शर्थ बलिदान, त्याग व सोसलेल्या यातना यांचे विस्मरण होऊन चालणार नाही.

“मातृभुमिच्या संरक्षणाबरोबर देशातंर्गत उद्धवणा-या कायदा व सुव्यवस्था विषयक समस्या, भुकंप, महापूर अपघात या सारख्या असंख्य आपत्तीत दुर्वेवी नागरीकांच्या सहाय्याला तत्परतेने व समर्थपणे धावून

केलेल्या बहुमोल कामगिरीचा विसर भारतीयांना कधीही पडणार नाही. भारतीय सरहद्दीवर तसेच देशातंर्गत मोहिमेमध्ये दरवर्षी अनेक सैनिक वीरगती प्राप्त होतात.तसेच असंख्य जखमी व अपंगही होतात. त्यांचे ऋुण आपणा सर्वांवर आहे. त्याच बरोबर त्यांच्या कुटुंबीयांची जबाबदारी ही आपणावर आहे. आपण देशात सुरक्षित आहोत, याचे श्रेय सीमेवर हुतात्म स्विकारलेल्या हजारो शहिदांना व आजही प्राणपणाने लढणा-या वीरसैनिकांना द्यावे लागेल".

या सैनिकांनी केलेल्या बलिदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ७, डिसेंबर हा दिवस सर्वत्र ध्वजदिन म्हणून साजरा करण्यात येऊन ध्वजदिन निधी संकलीत करण्यात येतो. सदर निधीचा विनियोग युध्दात शहीद होणा-या वीरांच्या व अपंगत्व आलेल्या सैनिकांच्या कुटूंबांकरीता कल्याणकारी योजना राबविण्यासाठी आणि पुनर्वसनासाठी केला जातो. श्री साईबाबा संस्थानकडून रू.५१,००,०००/- मात्र (अक्षरी रूपये एक्कावन्न लाख) आर्थिक मदत मिळणेबाबत विनंती केली आहे.

**मागील वर्षीची कार्यवाही:-** मागील सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३१ ने व शासन निर्णय क्र. १०१६/१६६९/प्र. क्र.२०१/ का. १६ विधी व न्याय विभाग, दि. २०.१२.२०१६ अन्वये कर्मचा-यांकडून कपात करून जमा होणारी रक्कम व उर्वरीत संस्थानची रक्कम असे रूपये ३१ लाख जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांना देण्यास मान्यता दिलेली होती.

**अधिनियमातील तरतूद:-** सन २००४ चा अधिनियम क्र.१७ (२) (ण) मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. तसेच अधिनियम क्र.१७(६) चे तरतूदीस अधिन राहून, समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील, अशी तरतूद आहे.

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांनी रक्कम रू.५१ लाखाची मागणी केलेली असून संस्थान कर्मचारी यांचे पगारातून कपात करून जमा होणारी रक्कम रू. २,८०,०६०/- खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे आहे. मात्र प्रत्यक्ष रक्कम अदा करतेवेळी सेवानिवृत्त/बडतर्फ कर्मचारी यांचेमुळे संस्थान आस्थापनेवरील कर्मचारी कमी होऊ शकतात. त्यामुळे कर्मचारी कपात रकमेतही फरक पडू शकतो.

| अ.नं. | वेतन बॅन्ड | एकूण अधिकारी/ कर्मचारी | प्रतिअधिकारी/ कर्मचारी वसूली | वसूली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्रति नियुक्तीवरील शासकीय अधिकारी ) १५६००-३९१०० | ०१ | **३००** | ३००.०० |
| ०२ | (प्रति नियुक्तीवरील शासकीय अधिकारी ) १५६००-३९१०० | ०५ | **३००** | १५००.०० |
| ०३ | (उपअभियंता व शिक्षक) १५६००-३९१०० | ८६ | **३००** | २५,८००.०० |
| ०४ | प्रति नियुक्तीवरील शासकीय अधिकारी ९३००-३४८०० (पो. उपनिरिक्षक) | ०१ | **२४०** | २४०.०० |
| ०५ | ९३००-३४८०० (अधिक्षक व इतर) | ३९८ | **२४०** | ९५,५२०.०० |
| ०६ | ५२००-२०२०० | ७१९ | **१२५** | ८९८७५.०० |
| ०७ | ४६५०-१७४०० (अर्धवेळ शिक्षक ९३००-३४८००) | ०२ | **१००** | २००.०० |
| ०८ | ४४४०-७४४० (वर्ग ४ कर्मचारी) | ८६५ | **७५** | ६४,८७५.०० |
| ०९ | ६००० (फिक्स पे) | ०५ | **७०** | ३५०.०० |
| १० | ११,००० (फिक्स पे) | १३ | **१००** | १,३००.०० |
| ११ | १२,००० (फिक्स पे) | ०१ | **१००** | १००.०० |
| | **एकूण कर्मचारी संख्या – २०९५** | | कर्मचारी वसूली रक्कम रू. **२,८०,०६०.००** | |

उपरोक्त तक्त्यातील कर्मचारी वसूली एकूण रक्कम रू. २,८०,०६०/- व संस्थानकडून देय होणारी उर्वरीत रक्कम रू.४८,१९,९४०/- अशी एकूण रक्कम रु ५१,००,०००/- जिल्हा सैनिक कल्याण निधीसाठी उपलब्ध करता येईल.

**विभागाचा अभिप्राय:-** ज्या महिन्यात संस्थान कर्मचा-यांच्या पगारातून रक्कम कपात करण्यात येणार आहे त्या महिन्यात संस्थान अस्थापनेवर असलेल्या कर्मचा-यांकडून वर नमूद केलेप्रमाणे जेवढी रक्कम जमा होईल ती रक्कम व उर्वरीत रक्कम संस्थानकडून देऊन एकूण रक्कम रू. ५१,००,०००/- जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांना देणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जिल्हा सैनिक कार्यालय यांना सशस्त्र सेना ध्वजदिन निधीसाठी रु.५१ लाख आर्थिक मदत देणेस मान्यता देण्यात आली. या रकमपैकी संस्थान आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या वेतनामधून जमा होणारी रक्कम वगळता, उर्वरित रक्कम संस्थानमार्फत देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३५** **सोने, चांदी व इतर मौल्यवान धातूच्या वस्तू/ साहित्य देणगी म्हणून स्विकारणेकामी मार्गदर्शक तत्वे-वजा-नियमावली निश्चित करणेबाबत.**

**निर्णय क्र.७१९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३६** **कचरा वाहतुकीकरीता नवीन वाहन खरेदी करणेस, याकामी येणाऱ्या खर्चास व दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील:-** कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योत्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

**प्रस्तावना:-** सध्या संस्थान मधील कचरावाहतुकीकरीता टाटा-४०७ (हायड्रोलिक टिपरसह) हे वाहन वापरण्यात येत आहे. सदरचे वाहन दि.०३/०७/२००६ रोजी खरेदी केलेले असुन सदर वाहनास आजमितीस ११ वर्ष पुर्ण झालेली आहेत. सदर वाहन जुने झालेने या वाहनाची जाहिर लिलावाने विक्री करणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०९/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६४८ तसेच महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभागाकडील पत्र क्र.सासवि/ १०१७/२५/प्रक्र२८/का.१६ दि.१४/०७/२०१७ अन्वये मान्यता मिळालेली असुन लिलावाबाबत प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** कचरावाहतुकीचे कामात अडचण येऊ नये या करीता सद्याच्या वाहनाची जाहिर लिलावाने विक्री होणे पुर्वी एक नवीन वाहन खरेदी करणे आवश्यक आहे. या कामी सद्याचे वाहनापेक्षा मोठे म्हणजे टाटा कंपनीचे LPK-912BS-IV (इंजिन-497 TCIC CR) सहा टायर, व हायड्रोलिक टिपर सुविधा असलेले वाहन उपलब्ध आहे. संस्थानकडे सद्या टाटा कंपनीचे बरीच वाहने वापरात असुन या कंपनीच्या वाहनाची स्पेअर पार्ट लवकर उपलब्ध होतात. सदर वाहन खरेदी कामी अंदाजे रु.१५,००,०००/- (प्रथम वर्ष विम्यासह) खर्च अपेक्षीत आहे.

महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या शासन निर्णय क्रमांकः-भांखस-२०१४/ प्र.क्र.८२ भाग III/ उद्योग-४ दिनांक १/१२/२०१६ रोजीचेसुधारित नियमपुस्तिकेतील३.२.३. (दरपत्रकाच्या आधारे खरेदी) मध्ये, "कोणत्याही वाहनाचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे, मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक/वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि, मोटार वाहन (कार) खरेदी रु. १ कोटीपेक्षा जास्त असल्यास, ती ई-निविदा प्रक्रियेमार्फतच करण्यात यावी अशी तरतुद आहे.

यानुसार सदर वाहन खरेदी करणे कामी टाटा कंपनीचे अधिकृत पुरवठादारांकडून दरपत्रके मागविता येतील.

**मागणी:-** संस्थानचे कचरावाहतुकी कामी टाटा कंपनीचे LPK-912BS-IV (इंजिन-497 TCIC CR) सहा टायर, व हायड्रोलिक टिपर सुविधा असलेले वाहन खरेदी करणे कामी येणा-या खर्चास व या कामी

टाटा कंपनीचे अधिकृत पुरवठादाराकंडून दरपत्रके मागवुन विहीत पध्दतीने खरेदी करणे कामी मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.७२० **यावर सविस्तर चर्चा होऊन, कचरा वाहतुकीकरीता कामी टाटा कंपनीचे LPK-912BS-IV (इंजिन-497 TCIC CR) सहा टायर व हायड्रोलिक टिपर सुविधा असलेले नवीन वाहन खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३७** **नवीन १० प्रवासी बसेसची कंपनी, मॉडेल निश्चित करुन ई-निविदाद्वारे खरेदी करणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४** मधील १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिनराहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमतेची व कामाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पुजा अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणेसाठी आणि पार पाडणेसाठी योग्यती व्यवस्था करणे, भक्तगंणांना आवश्यक्तयासोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कार्तव्ये असतील." असे नमुद केलेले आहे.

**प्रस्तावनाः-** अ) दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील विषय क्र.४७ व निर्णय क्र.५६७ नुसार, साईभक्तांच्या सोयी सुविधेसाठी पाच प्रवासी बसेस खरेदी करणेस व या कामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

ब) तसेच दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील विषय क्र.४८ व निर्णय क्र.५६८ नुसार, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील शिर्डी व नगरमनमाड रस्त्यावरील गावे वगळुन इतर गावांतील मुलींसाठी बससेवा सुरु करणे करीता पाच बसेस खरेदी करणेस व या कामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त दोन्ही निर्णयानुसार एकुण १० प्रवासी बसेस खरेदी कराव्या लागतील.

या कामी नामांकित कंपन्याकडून त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या बसची तपशिलवार माहिती घेतली असुन त्यांचा कंपनीनिहाय तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Company | TATA | | Ashok Leyland | | Eicher |
|---|---|---|---|---|---|
| Chassis Platform | LPO 10.2 T/ 52 BS IV Diesel; 51 seater | | Vinking 222" BSIV Diesel, 56+1 seater | | 12.12K Star line Star bus 50+1 BSIV |
| Engine | 3LNGDICR BSIV engine | | H-Series 6 Cylinder CRS Engine BS-IV. | | E494 4V CRS BSIV |
| Maximum Power | 102 kW @ 3000 r/min | | 118 Kw (160 HP) @ 2400 rpm | | 134 HP @ 2600 rpm |
| Torque | 360 Nm @ 1400-2000 rpm | | 550 Nm @1200 - 1900 rpm | | 450 Nm @ 1200 - 1800 rpm |
| Gear Box | G-550 6 speed with overdrive | | 6- Speed Synchromesh Overdrive Gear Box | | ET 40 S6, 6- Speed overdrive synchromesh |
| Clutch | 330 mm | | 14"-4 finger axial spring clutch with mechanic actuation | | 330 mm dia with clutch booster |
| Suspension | Parabolic leaf spring at front & rear | | Semi-elliptical Multileaf shackle ended | | Semi-elliptical |
| Tyre Size | 235 / 75 R-17.5 | | 10:00 R20 -16 PR Radial | | 8.25 x 20 -16 PR nylon tyres |
| Steering | Power assisted | | Integral Power steering | | Power steering Tilt & Telescopic |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Brakes** | Dual circuit full air SCam brakes with ABS | | Full air Dual line with ABS | | Dual circuit full air S cam Full air brakes |
| **Fuel Tank Capacity** | 160 L | | 239 litres | | 185 litres |
| **Wheelbase** | 5200 mm | | 5639 mm | | 4650 mm (183") |
| **Front Overhang** | 1800 mm | | 2016 mm | | 2260 mm |
| **Rear Overhang** | 3120 mm | | 3383 mm | | 2790 mm |
| **No. of Seats** | 51+1 (3x2) | | 56+1 high head rest seats (HHR) (3x2) | | 50+1 high head rest seats (HHR) (3X2) |
| **Max Width** | 2550 mm | | 2550 mm | | 2470 mm |
| **Passenger Door** | One, Jack-knife type | | Pneumatic Operated JK Door at front | | |
| **Overall Length** | 10120 mm | | 11050 mm | | 9700 mm |
| **Overall Height In Laden Condition** | 2900 mm | | 3200 mm | | 3190 mm |
| **Turning Circle Diameter** | 17700 mm | | 22100 mm | | 18700 mm |
| **GVWR** | 10200 kg | | 16200 kg | | 11950 kg |
| **Battery** | 12V (150Ah) | | 24V (150Ah) | | 12V (130Ah) |
| **Alternator Capacity** | 90 Amp | | 55 Amp | | 75 Amp |
| **Approx. Price** | **2453610.00** | | **3191310.00** | | **2611000.00** |

उपरोक्त तक्त्यातील प्रत्येक कंपनीच्या बसचे टेक्नीकल स्पेशिफीकेशन व आसन क्षमता वेगवेळया असलेने त्यांचे किंमतीत तफावत आहे. त्यामुळे उपरोक्त तक्त्यातील कंपन्यांपैकी एक कंपनी, मॉडेल निश्चित करुन मिळाल्यास स्पर्धात्मक दर प्राप्त होणेकरीता एकाच कंपनीच्या बसचे ई-निविदाद्वारे दरपत्रके मागविता येतील. तसेच वरील तक्त्यातील माहितीचे अवलोकन केले असता अशोक लेलंड या कंपनीची बस इतर कंपनीच्या बस पेक्षा मोठया आकाराची व जास्त आसन क्षमतेची आहे.

**मागणी:-** तरी उपरोक्त प्रमाणे १० प्रवासी बसेस खरेदी करणे कंपनी, मॉडेल निश्चित करुन ई-निविदाद्वारे दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणे कामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांच्या सुविधेकरीता ५, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलींसाठी ५ व रेल्वे स्टेशनवरील साईभक्तांच्या वाहतुकीकरीता ५ अशा १५ आयशर कंपनीच्या नवीन प्रवासी बसेस खरेदी करण्यात याव्या, असे ठरले व याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३८** **अग्निशमन वाहन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **कायदयातील तरतुदी-** अधिनियम २००४ मधील तरतुद – १७ सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. असे नमूद आहे.

**पार्श्वभुमी-** उपरोक्त विषयानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था फायर ॲण्ड सेफ्टी विभागाकडे ०१ फोम टेंडर (५००० लि.) व ०१ मिनी टेंडर (३५० लि.) अग्निशमन वाहने कार्यरत आहे. संस्थान परिसरात आगीची घडना घडल्यानंतर फोम टेंडर वाहनाचा वापर करण्यात येतो. ज्या ठिकाणी फोम टेंडर वाहन जाण्यास अडथळा येतो त्या ठिकाणी मिनी टेंडर वाहनाचा वापर करण्यात येतो. संस्थानचे दोन अग्निशमन वाहनांपैकी फोम टेंडर हे मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त संदर्भ क्र. ०१ नुसार शिर्डी विमानतळावर संस्थानचे फोम टेंडर वाहन कर्मचारी, इंधन व इतर आवश्यक साहीत्यांसह सशुल्क पुरविणेबाबत निर्णय झालेला आहे. याबाबत शिर्डी विमानतळाचे सोबत करावयाचे MOU मध्ये सहा महीने कालावधी करीता संस्थानचे अग्निशमन वाहन पाठविणेबाबत मा.का.अ.महोदया यांनी सुचना केलेली आहे. त्यानुसार सदरची सेवा शिर्डी विमानतळाकरीता सहा महीने कालावधी करीता पुरवावयाची आहे.

शताब्दी महोत्सव कालावधीत शिर्डी संस्थान परिसरातील घडणा-या संभावित मोठया आगींवर तात्काळ नियत्रंणासाठी संस्थान कडे एक अद्यावत (मल्टीपरपज फायर टेंडर) अग्निशमन वाहनाची कर्मचा-यांसह आवश्यकता भासणार आहे. याकरीता उपरोक्त संदर्भ क्रं. ०१ नुसार अग्निशमन वाहन खरेदी करणेबाबत वाहन विभागास यापुर्वी कळविणेत आलेले होते. परंतु वाहन विभागाचे प्रमुख यांचेशी दि.०२.०६.२०१७ रोजी चर्चा केली असता त्यांनी फायर विभागामार्फत मा.व्यवस्थापन समितीचे सभेची खर्चास तसेच सदर वाहन खरेदी/ देणगी स्विकारणेस मान्यता घेवुन देणेबाबत सुचित केले आहे. याबाबत प्रथमतः संस्थानमार्फत चांगलेप्रतीची भारतबेंझ किंवा टाटा कंपणीची चेसीस खरेदी करुन त्यानंतर बॉडी बिल्डींगची कार्यवाही कोटेशन बोलावून करता येईल. याकामी खालिल प्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

**परिशिष्ट - अ**

| अ.नं. | वाहन चेसी कंपणीचे नांव | सुविधा | एकूण अंदाजे खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | TATA LPT 1613 / 48 (697 CRI36 BS4 G 600) CDWZ Chassis | मल्टीपरपज फायर टेंडर सोबतचे देवी फायर सोलापूर यांचे स्पेशिफीकेशन प्रमाणे. | चेसीस- १८,१८,६७९/-<br>अंदाजे बांधणी– ६९,१२,०००/-<br>एकूण अंदाजे खर्च –रु.**८७,३०,६७९/-** |
| ०२ | BHARAT BENZ- 2523R 6X 2 5175 E4 SLC CHS TT HD GB BS– IV emission standerd | नाशिक मुन्सीपल कॉर्पोरेशन फायर ॲण्ड एमर्जन्सी सर्व्हिसेस यांचे टेक्नीकल स्पेकिशन प्रमाणे | चेसीस अंदाजे – २२,०२४९६/-<br>अंदाजे बांधणी– ७३,००,०००/-<br>एकुण अंदाजे खर्च - **९५,०२,४९६/-** |

**विभागाचा सुस्पष्ट अभिप्राय-** सन ऑक्टोबर २०१७ ते सन ऑक्टोबर २०१८ याकालावधीत श्री साई शताब्दी महोत्सव असल्याने शिर्डीत साईभक्तांची गर्दी मोठया प्रमाणावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर गर्दीचे कालावधीत अग्निसुरक्षिततेकरीता संस्थानकडे अदयावत अग्निशमन वाहन ( वॉटर टेंडर ) प्रशिक्षीत कर्मचा-यांसह उपलब्ध असणे आवश्यक आहे. जेणेकरुन आपत्कालीन परिस्थितीमध्ये सदर अग्निशमन वाहनाचा उपयोग होईल. तसेच अग्निशमन वाहनाकरीता चेसी खरेदी व बॉडी बिल्डींगचे काम संस्थानचे वाहन विभागामार्फत करता येईल असे नम्र मत आहे.

**मागणी-** ऑक्टोबर २०१७ ते ऑक्टोबर २०१८ याकालावधीत श्री साई शताब्दी महोत्सव असल्याने शिर्डीत साईभक्तांची गर्दी मोठया प्रमाणावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर गर्दीचे कालावधीत आग प्रतिबंधक व जिव संरक्षक उपाय योजनेकरीता संस्थानकडे अदयावत अग्निशमन वाहन खरेदी करुन सदरचे वाहनावर प्रशिक्षीत कर्मचारी जसे ड्रायव्हर ऑपरेटर व फायरमन स्वतंत्र टिम पुर्णवेळ उपलब्ध असणे आवश्यक आहे.

**करीता ...**

अ. संस्थानचे अग्निशमन विभागाकरीता ०१ नवीन अदयावत अग्निशमन वाहन बनविणेकामी उपरोक्त परिशिष्ट अ मधील अ.नं. ०१ टाटा कंपनीची चेसी किंवा अ.नं. ०२ भारतबेंझ कंपणीची चेसीस खरेदी करुन बॉडी बिल्डींग करणेकामी अंदाजे ८७ लाख व ९५ लाख खर्चास मंजूरी मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्याता असावी.

ब. मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर वॉटर टेंडर अग्निशमन वाहनाकरीता चेसी खरेदी व बॉडी बिल्डींग कार्यवाही संस्थानचे वाहन विभागामार्फत करणेस मान्यता असावी.

क. नवीन अदयावत खरेदी केलेले अग्निशमन वाहनाकरीता शासन नियमाप्रमाणे मनुष्यबळ मिळणेबाबत संस्थानचे आस्थापना/ कामगार विभागास कळविणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त **अ**, **ब** आणी **क** बाबत प्रस्ताव मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील तक्त्यामध्ये नमुद केलेल्या नं.२ चे तपशीलाप्रमाणे भारत बेंज कंपनीची चेसी, अग्निशमन वाहनासाठी विहीत पध्दतीने खरेदी करणेत यावे, असे ठरले. तसेच यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- फायर ॲण्ड सेफ्टी विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३९** **डॉ.किशोर गोडगे यांची न्युरोसर्जन पदावरील एक वर्ष कालावधीची Adhoc Basis पध्दतीने दिलेली नेमणूक संपुष्टात आल्याने त्यांना पुन:र्नेमणूक देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम कलम २००४ तरतुद–**

कलम १३(४) मधील समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-याची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-यांची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ –"सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतानासमितीनेसदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी."तसेच अट शर्त क्र. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.–**

**१) मा व्यवस्थापन समिती दि. ०३/०६/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३२८ (२).**

कॅथलॅब व हृदय शस्त्रक्रियेकरीता खालीलप्रमाणे दर निश्चीत होऊन वैद्यकीय अधिका-यांना द्यावयाचे चार्जेस व संस्थानचे चार्जेस निश्चित करणेत आले.

| Services | Proposed | | Sanctioned by Sub Committee | |
|---|---|---|---|---|
| CATH LAB | Sansthan | DoctorsCharges | Sansthan | Doctors Charges |
| Coronary Angiography | 6000 | 1000 | 6000 | 1000 |
| Coronary Angioplasty | 50000-75000 | 8000 | 50000-75000 | 8000 |
| Renal & Peripheral Angiogr. | 6000 | 1000 | 7500 | 750 |
| Renal & Peripheral Angioplasty. | 50000 | 8000 | 50000 | 8000 |
| BMV | 25000 | 7500 | 25000 | 7500 |
| Permanent Pacemaker Charges | 125000-200000 | 2000 | 125000-200000 | 2000 |
| Temporary Pacing | 4000 | 500 | 4000 | 500 |
| CVTS | | | | |
| CABG | 80000 | 8000 | 60000 | 8000 |
| Single Valve Replacement | 100000 | 12000 | 100000 | 12000 |
| Double Valve Replacement | 150000 | 18000 | 150000 | 18000 |
| ASD/VSD/TOF | 110000 | 12000 | 100000 | 12000 |
| BT shunt | 25000 | 2500 | 25000 | 2500 |
| PDA Ligation | 25000 | 5000 | 25000 | 5000 |

Note: Anaesthist's share-30% of the surgeon's charges 2. Assistant Surgeon 10% of the surgeon's charges.

सर्जिकल ऑपरेटीव्ह चार्जेस पॅकेजमध्ये ३०% रूग्णालय आकार गृहीत धरलेला आहे. सदर आकाराच्या ५० % हिस्सा सर्जनला देण्यात यावा. तसेच भूलतज्ञ यांना नफ्याच्या १५% हिस्सा त्यांचे वेतनानंतरच्या रकमेवर द्यावा.

**२) मा व्यवस्थापन समिती दि. २२/०९/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७७०.**

पूर्वीच्या दरपत्रकात कन्सलटेशनवर लागू असलेल्या ७०% दर ६०% वर, जनरल सर्जरीवर डॉक्टर ५५.५५%, भुलतज्ञ १६.६६% वरुन डॉक्टर ४५%, भुलतज्ञ १३%, पूर्वी कन्सलटेशनचे दर वॉर्डप्रमाणे वाढत जात होते ते सर्व वॉर्डमध्ये जनरल वॉर्डप्रमाणे कमी राहतील. डिलक्सचे रुमचा दर रु. ८००/- वरुन रु. ५००/- व ह्दय शस्त्रक्रिया विभागात अॅन्जीओग्राफी रु. ६,०००/- वरुन रु. ५,०००/- तर परफ्युजनिस्ट व कॅथलॅब ऑपरेटरला प्रतिकेसनुसार मसिक वेतनाव्यतिरीक्त मोबदला, इंस्ेटीव्हीस्ट यांना मासिक रु. २०,०००/- ऐवजी प्रति केस नुसार मोबदला, पॅथॉलॉजिस्ट यांना २% वरुन ५% वाढ असे ठळक बदल करण्यात आलेले आहेत.

**३) मा व्यवस्थापन समिती दि. १९/०२/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र १९३.**

ज्यु रेडीओलॉजीस्ट टिकवुन ठेवण्याचे दृष्टीने रेडीओलॉजी विभागातील इतर तपासण्यांवर पुर्वीइतकाच १०% इंन्सेंटीवह ठेवुन सोनोग्राफी वकलर डॉप्लर तपासण्यांवर २०% इंन्सेंटीव्ह देणेस मान्यता देणेत आली.

**४) मा व्यवस्थापन समिती दि. १२/०४/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र २७५.**

कॅथलॅब विभागामध्ये कार्यरत असलेल्या सर्व डॉक्टरांना दि. ०१/०४/२०१४ पासून प्रति एन्जीओग्राफीसाठी रू. ३००/-, अॅन्जीओप्लास्टी व इतर समकक्ष प्रोसिजरसाठी रू. ३०००/- आणि ओपीडी, टीएमटी, २-डी इको इ. साठी सध्या लागू असलेला इंन्सेंटीव्ह देणेत यावा, असे ठरले.

**५) मा व्यवस्थापन समिती दि. ०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३७५ (५)**

संस्थान रूग्णालयांमध्ये व्हिजीटींग पध्दतीने सेवा करण्याची संधी मिळावी, यासाठी बरेचसे तज्ञ डॉक्टर्स संस्थानकडे अर्ज करतात व ते अर्ज सभेसमोर सादर करणेत येऊन त्यांना परवानगी देण्यामध्ये बराचसा कालावधी जातो. याकरीता यापुढे व्हिजीटींग पध्दतीने सेवा करण्याची ईच्छा व्यक्त करणारे अर्ज आल्यास यावर निर्णय घेण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.

**६) मा व्यवस्थापनसमिती दि. २२/१२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ९३९.**

विहीत पध्दतीने ज्यु रेडीओलॉजीस्टची नियुक्ती होईपर्यंत रूग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता व्हिजीटींग पध्दतीने नेमलेल्या ज्यु रेडीओलॉजीस्ट यांनामासिक वेतन नसल्याने सोनोग्राफी व कलर डॉप्लर तपासण्यांवर अनुक्रमे रू. २५०/- व ५५०/- या दराने इन्सेंन्टीव्ह अदा करणेत यावा, असे ठरले.

**७) मा व्यवस्थापन समिती दि. १९/०९/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६६२.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रूग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता न्युरोसर्जन या पदावर स्थायी स्वरूपात उमेदवार मिळेपर्यंत अथवा एक वर्ष कालावधीसाठी यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत डॉ किशोर उध्दवराव गोडगे यांना न्युरोसर्जन या पदावर Adhoc Basis पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली. तसेच डॉ किशोर उध्दवराव गोडगे यांना रू. ६४,०००/- मात्र एकत्रित मासिक मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा, असे ठरले.

**प्रस्ताविक-** सिव्हील अॅप्लिकेशन नं २८७/२०१५ वरील मा मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि १२/०१/२०१५ रोजीचे आदेशान्वये Adhoc Basis पध्दतीने न्युरोसर्जन घेणेबाबत परवानगी मिळालेली आहे. मा न्यायालयाचे आदेशानुसार व मा व्यवस्थापन समिती दि. १९/०९/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६६२ नुसार जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/१३१५/२०१६ दि. २२/०९/२०१६ अन्वये डॉ किशोर उध्दवराव गोडगे, एमसीएच (न्युरो) यांची श्री साईबाबा रूग्णालयात न्युरोसर्जन पदावर Adhoc Basis पध्दतीने एक वर्ष अथवा स्थायी स्वरूपात उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेत आली असुन त्यांना रू. ६४,०००/- मात्र एकित्रत मासिक मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात येत आहे.

डॉ किशोर गोडगे यांचा दि. २२/०७/२०१७ रोजीचा अर्ज प्राप्त झाला असुन त्यामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

"I DrGodageKishor U.is currently working as consultant neurosurgeon at Saibaba Superspeciality hospital since Sept 2016 on adhoc basis.

As I want to wish to extend services & want to renewal of order adhoc basis for next year. So kindly consider & allow me to work."

डॉ गोडगे यांचा उपरोक्त १ वर्षाचा नेमणूक कालावधी दि. २१/०९/२०१७ अखेर संपुष्टात येत आहे. न्युरोसर्जन पदाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| पदाचे नाव | बी जे एम सी पुणे यांनी प्रस्तावीत केलेली शैक्षणिक पात्रता | सन २००९ चे आकृतीबंधातील मंजुर पदसंख्या | सध्या कार्यरत | |
|---|---|---|---|---|
| | | | स्थायी | मानधन (Adhoc Basis) |
| न्युरोसर्जन | 1) MBBS.<br>2) MCH/DNB Neurosurgery.<br>3) MS-CIT.<br>4)MMC/MCI Registration with renewal is mandatory. | ०२ | ०० | ०१<br>डॉ गोडगे |

डॉ संजेलिया, एमसीएच न्युरो यांची श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये क्लिनीकल असिस्टंट या पदावर ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेत आलेली असुन ते सध्या न्युरोसर्जन पदाचे काम करत आहेत.

**मागणी –** डॉ किशोर उध्दवराव गोडगे, एमसीएच (न्युरो) यांची श्री साईबाबा रूग्णालयात न्युरोसर्जन पदावर Adhoc Basis पध्दतीने एक वर्ष अथवा स्थायी स्वरूपात उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात नेमणूककरणेबाबत.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –**

| | |
|---|---|
| वेतनश्रेणी, ग्रेड पे | १५६००-३९१००, ६६०० |
| बेसिक | १८७५०.०० |
| डीए (१२५%) | ३१६८८.०० |
| एनपीए (३५%) | ८८७३.०० |
| एकुण मानधन | ६५९११.०० |

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत–** डॉ.किशोर उध्दवराव गोडगे यांचा न्युरोसर्जन पदाचा नेमणूक कालावधी दि. २१/०९/२०१७ अखेर संपुष्टात येत असल्याने त्यांना पुन्हा न्युरोसर्जन या पदावर दि. २२/०९/२०१७ पासून १ वर्ष अथवा सदर पदावर स्थायी उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत Adhoc Basis पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देता येईल तसेच न्युरोसर्जन पदासाठी मंजुर असलेल्या वेतनश्रेणीनुसार होणारे सुरूवातीचे वेतनाचे जवळपासचे मानधन रू. ६५,९००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, डॉ.किशोर उध्दवराव गोडगे यांचा न्युरोसर्जन पदाचा नेमणूक कालावधी दि.२१/०९/२०१७ अखेर संपुष्टात येत असल्याने त्यांना पुन्हा न्युरोसर्जन या पदावर दि. २२/०९/२०१७ पासून पुढे १ वर्ष अथवा सदर पदावर स्थायी उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी Adhoc Basis पध्दतीने, तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच त्यांना न्युरोसर्जन पदासाठी मंजुर असलेल्या वेतनश्रेणीनुसार होणारे सुरूवातीचे वेतनाचे जवळपासचे मानधन रु.६५,९००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४०** **डॉ.संदीप देवरे, इंटरव्हेंश्नल कार्डीओलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल यांची एक वर्ष कालावधीची Adhoc Basis पध्दतीने दिलेली नेमणूक संपुष्टात आल्याने त्यांना तात्पुरत्या स्वरुपात पुन:र्नेमणूक देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद–** कलम १३ (४) नुसार समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमन्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यां व्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही.

आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी" तसेच अट शर्त अ.नं. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –**

१) मा त्रिसदस्य समिती दि. १६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ५४९.

"श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये हृदयरोग रूग्णांची गैरसोय होऊ नये याकरिता पध्दतीने नेमणूक करावयाच्या कार्डीओलॉजीस्ट यांना यापुढे रू. १,५०,०००/- मात्र एकत्रित मासिक मानधन देण्यात यावे, असे ठरले.

२) मा त्रिसदस्य समिती दि. ३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६०५.

"श्री साईबाबा रूग्णालयामध्ये Ad hoc basis पध्दतीने कार्डीओलॉजीस्टच्या केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे मंजुर आकृतीबंधात इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट ची ०२ पदे मंजुर असुन सदर पदावर डॉ हरीष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा यांची नियुक्ती करणेत आलेली आहे. तथापि दोन्ही हृदयविकारतज्ञ यांना खातेचौकशीकामी अनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी७ए/४६७/२०१४ दि. ०७/११/२०१४ व जा.नं.एसएसएस/वशी७ए/४६८/ २०१४ दि. ०७/११/२०१४ अन्वये दि. ०८/११/२०१४ पासून निलंबित करणेत आलेले आहे. रूग्णालयात येणा-या हृदयविकार रूग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने चार हृदयविकार तज्ञांची Ad-hoc basis वर नेमणूक करणेकामी मा मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे पीआयएल नं १८/२०११ मध्ये सिव्हील ॲप्लिकेशन नं ३९३७/२०१५ दाखल केले होते त्यावर मा उच्च न्यायालयाने दि. १०/०४/२०१५ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

"This is an application seeking permission to appoint on adhoc basis four cardiologists. It is submitted that there are two sanctioned posts of cardiologists and the departmental enquiry is in progress against two cardiologists and at present they are suspended. Number of patients in the hospital run by the applicant is large. Considering the above the applicant is permitted to appoint four cardiologists on adhoc basis if permissible in law. The applicant shall follow the service rules while appointing the cardiologists on adhoc basis. The applicant shall seek sanction for additional post of cardiologist from the government. It is made clear that candidate appointed on adhoc basis should be informed at time of appointment that their appointment is on adhoc basis as a temporary measure and that they will not be entitled to claim permanency and regularization so also that their appointment is not on sanctioned post."

उपरोक्त आदेश व डॉ संदीप नारायणराव देवरे, नाशिक, शिक्षण-डीएनबी कार्डीओलॉजी यांचे दि. १७/०६/२०१६ रोजीचे ज्युनिअर कार्डीओलॉजीस्ट पदावर नोकरी मिळणेबाबतचे अर्जास अनुसरून एच आर विभाग, रूग्णालये दि. १८/०७/२०१६ रोजीचे टिपणी अन्वये डॉ संदीप नारायणराव देवरे यांना इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट या पदावर एकत्रित मासिक रू. १,५०,०००/- मानधनवर Adhoc basis पध्दतीने मा त्रिसदस्य समितीचे निर्णयास अधिन राहून नेमणूक देणेस मान्यता मिळाल्याने डॉ संदीप देवरे यांना जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ ८७९/२०१६ दि. २७/०७/२०१६ अन्वये दि. २७/०७/२०१६ पासून पुढे १ वर्ष किंवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत नेमणूक केली असुन त्यास निर्णय क्र ६०५ अन्वये कार्योत्तर मान्यता घेण्यात आली आहे. सदर नेमणूकीची मुदत दि. २६/०७/२०१७ अखेर संपुष्टात येत आहे. डॉ देवरे यांनी दि. ३०/०६/२०१७ रोजीचे अर्जान्वये पुन्हा नेमणूक देणेबाबत विनंती केली आहे.

निलंबित डॉ हरिष बजाज व डॉ गौरव वर्मा यांचे विरूध्दच्या फौजदारी गुन्ह्यात चौकशी सुरू असुन अद्याप चार्जशिट दाखल झालेले नाही. ही वस्तुस्थिती विचारात घेता या दोनही डॉक्टरांच्या सेवा पुढील ४ ते ५

वर्ष उपलब्ध होणार नाहीत. तसेच दोन्ही डॉक्टर्स निलंबित असल्याने त्यांचे पदावर नियमीत भरती करता येत नाही.

त्यामुळे मा उच्च न्यायालयाच्या दि. १०/०४/२०१५ रोजीच्या निर्णयानुसार चार हृदयविकार तज्ञांची तदर्थ (Ad hoc) नियुक्ती करणेस मान्यता मिळणेकरीता जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/१०५६/२०१७ दि. १६/०८/२०१७ रोजी मा प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना प्रस्ताव पाठविणेत आला आहे.

**मागणी-** मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि१०/०४/२०१५ रोजीचे आदेशानुसार मा विधी व न्याय विभाग यांना दि. १६/०८/२०१७ रोजी पाठविलेले प्रस्तावाचे मान्यतेचे अधिन राहून डॉ संदीप देवरे यांना दि. २७/०७/२०१७ पासून पुढे ११ महिने अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत (Adhoc) पध्दतीने हृदयविकार तज्ञ (Interventional Cardiologist) या पदावर तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देणे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि १०/०४/२०१५ रोजीचे आदेशानुसार मा विधी व न्याय विभाग यांना दि. १६/०८/२०१७ रोजी पाठविलेले प्रस्तावाचे मान्यतेचे अधिन राहून डॉ संदीप देवरे यांना दि. २७/०७/२०१७ पासून पुढे ११ महिने अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तदर्थ (Ad hoc) हृदयविकार तज्ञ (Interventional Cardiologist) या पदावर नेमणूक देता येईल तसेच त्यांना रू. १,५०,०००/- मासिक एकत्रित मानधन देता येईल.

उपरोक्त प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.७२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि१०/०४/२०१५ रोजीचे आदेशानुसार, विधी व न्याय विभाग यांना दि.१६/०८/२०१७ रोजी पाठविलेले प्रस्तावाच्या मान्यतेचे अधिन राहून डॉ. संदीप देवरे यांना रु.१,५०,०००/- मात्र मासिनक मानधनावर, त्यांची मुदत संपुष्टात येत असलेचे दिनांकापासुन पुढे११ महिने अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीपर्यंत, तदर्थ (Ad hoc) हृदयविकार तज्ञ (Interventional Cardiologist) या पदावर तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४१** **पुन्हा नेमणूक आदेश व वेतनश्रेणी इतके वेतन मिळणेबाबत डॉ.राजेंद्र बिडगर यांचे दि.१७.०७.२०१७ रोजीचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम कलम २००४ तरतुद–** कलम १३(४) मधील समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-याची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-यांची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ – "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतानासमितीनेसदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी."तसेच अट शर्त क्र. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.–**

१) मा व्यवस्थापन समिती दि. २८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६३०.

संस्थान रूग्णालयामध्ये आवश्यक असलेल्या वैद्यकीय अधिका-यांच्या पदांबरोबरच वैद्यकिय संचालक पद भरणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.

२) मा व्यवस्थापन समिती सभा दि. १६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ५१०.

दि. २४/०५/२०१६ रोजी संस्थानचे दोन्ही रूग्णालयासाठी वैद्यकीय संचालक व इतर २८ पदांसाठी घेणेत आलेल्या मुलाखतीचे बंद पाकीट आजचे सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील उमेदवारांना मिळालेले गुण, त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव व रिक्त पदे या सर्व गोष्टींचे समितीने अवलोकन केले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, निवड समितीने नियुक्तीसाठी शिफारस केलेले उमेदवार व राज्य शासनाचे आरक्षण विषयक तसेच भरती संदर्भातील विविध शासन निर्णय/परिपत्रक यासह सदरहू प्रसताव अंतीम निर्णयार्थ रूग्णालय उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

**प्रस्ताविक-** मा व्यवस्थापन समिती दि. २८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६३० नुसार संस्थानचे दोन्ही रूग्णालयांसाठी वैद्यकीय संचालक व इतर २८ पदे भरेणसाठी मान्यता मिळाल्याने त्यानुसार संस्थानचे संकेतस्थळावर व वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करून पात्र उमेदवारांच्या मा डीन, बीजेएमसी, पुणे, संबंधीत विषयातील तज्ञ तसेच सिव्हील सर्जन अहमदनगर यांचेसमोर दि. २४/०५/२०१६ रोजी मुलाखती घेणेत आल्या. मुलाखती संपुष्टात आल्यानंतर डीन बीजेएमसी पुणे व सिव्हील सर्जन यांनी घेतलेल्या मुलाखतीचा निकाल व्हिडीओ चित्रीकरणासमोर पाकीटात सिल करणेत आला. सदरचे पाकीट दि. १६/०८/२०१६ रोजीचे मा व्यवस्थापन समितीमध्ये उघडणेत येऊन त्यावर दि.१६/०८/२०१६ रोजीचे मा व्यवस्थापन समितीचे सभेत उपरोक्त निर्णय क्र ५१० झाला आहे.

उपरोक्त निर्णय क्र ५१० नुसार, एच आर विभाग दि. ०८/०९/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीतील क मध्ये नमुद केलेप्रमाणे, सदरहु टिपणीतील नमुद केलेल्या तक्त्यातील अ नं २७ (RMO) मधील ८ उमेदवारांनात्यांची ११ महिने कालावधीसाठी निवड झाली असलेबाबत तसेच subject to MMC renewal of registration बाबत पुर्तता करणेबाबात पत्र पाठविणेस मान्यता असावी. त्याचप्रमाणे MMC renewal of registration चे कागदपत्र सादर केल्यानंतर संबंधीत पदांवर ११ महिने कालावधीसाठी नेमणूक देणेस व त्यांनासदर पदावरील स्थयी कर्मचा-याचे सुरवातीचे वेतनाचे जवळपासचे वेतन (मुळ वेतन १५६००+ग्रेडपे ५४००+महागाई भत्ता २४९९०=४५९९०) म्हणजेच रक्कम रू. ४५,०००/- एकत्रित मासिक मानधन देणेस तसेच त्यांचे हजर दिवसाचे प्रमाणात अर्जित रजा देणेस मान्यता देणेत आली.

उपरोक्त मान्यतेनुसार डॉ राजेंद्र उत्तमराव बिडगर यांची जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ १२३१/ २०१६ दि. १२/०९/२०१६ अन्वये आरएमओ या पदावर ११ महिने कालावधी अथवा सदर पदावर स्थायी स्वरूपात उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत रू. ४५,०००/- एकत्रित मासिक मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेत आलेली आहे.

डॉ राजेंद्र उत्तमराव बिडगर, आरएमओ (११ महिने), श्री साईनाथ रूग्णालय यांचा दि. १७/०७/२०१७ रोजीचा अर्ज कार्यालयात प्राप्त झाला असुन त्यामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

"जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच/एचआर/१२३१/२०१६ दि. १२/०९/२०१६ अन्वये माझी नेमणूक ११ महिने कालावाधीसाठी आरएमओ या पदावर सर्वसमावेशक रू. ४५०००/- मानधनावर करणेत आलेली असुन मी सध्या श्री साईनाथ रूग्णालयात आर्थोपेडीक विभागात कार्यरत आहे. माझे नेमणूकीस दि. १३/०८/२०१७ रोजी ११ महिने पुर्ण होत असुन मला पुढील नेमणूक तसेच आरएमओ पदाचे वेतनश्रेणीइतके वेतन मिळणेस विनंती आहे."

डॉ राजेंद्र बिडगर यांचे दि. १७/०७/२०१७ रोजीचे अर्जास अनुसरून प्र वैद्यकीय अधिक्षीका यांनी दि १९/०७/२०१७ चे पत्रान्वये, दि. ०१/०१/२०१७ पासुन श्री साईनाथ रूग्णालय संपुर्णपणे मोफत झालेले आहेत. त्यामुळे रूग्णसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. ज्या आरएमओ डॉक्टरांची ११ महिनेचे कालावधीसाठी रू. ५४,६००/- मानधनावर नेमणूक दिलेल्या आहेत त्यांचेप्रमाणेच डॉ राजेंद्र बिडगर यांची नेमणूक करावी असे कळविले आहे.

जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/१२३१/२०१६ दि. १२/०९/२०१६ अन्वये डॉ राजेंद्र उत्तमराव बिडगर यांना आरएमओ या पदावर ११ महिने कालावधी अथवा सदर पदावर स्थायी स्वरूपात उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात दिलेल्या नेमणूकीचा कालावधी दि. ११/०८/२०१७ अखेर संपुष्टात येत आहे.

**मागणी-** डॉ राजेंद्र उत्तमराव बिडगर यांना आरएमओ या पदावर ११ महिने कालावधी अथवा सदर पदावर स्थायी स्वरूपात उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत नेमणूक देणेबाबत.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –**

| | |
|---|---|
| वेतनश्रेणी, ग्रेड पे | १५६००-३९१००, ५४०० |
| बेसिक | १५६०० |
| डीए (१२5%) | २६२५० |
| एनपीए (३५%) | ७३५० |
| एकुण मानधन | ५४,६०० |

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत–** डॉ. राजेंद्र उत्तमराव बिडगर यांचा ११ महिने आरएमओ पदाचा नेमणूक कालावधी दि. ११/०८/२०१७ अखेर संपुष्टात येत असल्याने त्यांना पुन्हा दि. १४/०८/२०१७ पासून आरएमओ या पदावर ११ महिने कालावधी अथवा सदर पदावर स्थायी स्वरूपात उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत मासिक एकत्रित रू. ५४,६००/- मानधनावर नेमणूक करता येईल.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.७२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, डॉ. राजेंद्र उत्तमराव बिडगर यांचा ११ महिने आरएमओ पदाचा नेमणूक कालावधी दि. ११/०८/२०१७ अखेर संपुष्टात येत असल्याने त्यांना पुन्हा दि.१४/०८/२०१७ पासून पुढे आरएमओ या पदावर ११ महिने कालावधी अथवा सदर पदावर स्थायी स्वरूपात उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीपर्यंत, एकत्रित रु.५४,६००/- मात्र मासिक मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४२** **मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद रिट पिटीशन क्र.८९८७/ २०१६ श्रीमती सुनंदा किसन जगताप, परिचारीका विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी बाबत मा.न्यायालयाने दि.१३.०६.२०१७ रोजी दिलेल्या निकालानुसार वेतनाची रक्कम आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** उप कामगार आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी रेफरन्स (आयडीए) नं. ३९/२०१२ श्रीमती सुनंदा किसन जगताप, परिचारीका विरुद्ध श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीबाबत दि. २४.११.२०१५ रोजीचा निकालाची प्रत इकडील कार्यालयास दि. १०.०२.२०१६ रोजी प्राप्त झाली आहे.

मा. कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी खालीलप्रमाणे आदेश केलेले आहेत.

**Award**

1. Reference is answered partly in the affirmative as under.
2. It is declared that the act of first party terminating the services of second party by order dated 14.06.2010 being illegal is quashed and set-aside.
3. The first part is directed to reinstate the second party is service with continuity of services w.e.f. 14.06.2010, but without back wages.
4. Four copies of Award be sent to Dy. Commissioner of Labour, Nashik Division, Nashik for publication thereof.
5. Parties shall bear their own costs.

श्रीमती सुनंदा किसन जगताप यांचा संस्थान सेवेतील पूर्व इतिहास खालीलप्रमाणे आहे.

श्रीमती जगताप या जा.नं.एसएसएसएस/वशी-१/५२१६/२००६ दि. २२/०४/२००६ अन्वये दि. २८/०४/२००६ पासून श्री साईबाबा हॉस्पिटल येथे परिचारीका म्हणून कार्यरत होत्या. त्या दि. ०१.०३.२००९ पासून सतत, सलग, विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर होत्या. त्यांच्या गैरहजेरीमुळे रुग्णालयाच्या दैनंदिन कामकाजात अडचणी येत असत. त्याबद्दल जा.नं.एसएसएस/वशी-७बी/८५६७/२००९ दि. १०.०७.२००९ अन्वये रजिस्टर ए.डी. पोष्टद्वारे त्यांना पत्र पाठवून कळविण्यात आले होते की, गैरहजेरीबाबतचा लेखी खुलासा सादर करुन कामावर हजर व्हावे, अन्यथा तुम्हास संस्थान सेवेत स्वारस्य नाही, असे समजून तुमचे नाव संस्थानचे हजेरीपटावरुन कमी करण्यात येईल. सदरचे पत्र त्यांचे सध्याचे पत्त्यावर व कायमचे पत्त्यावर पोष्टामार्फत पाठविण्यात आले होते. सध्याच्या पत्त्यावर पाठविलेले पाकीट पोष्ट खात्यामार्फत परत आलेले आहे. कायमच्या पत्त्यावर पाठविलेले पत्र त्यांना प्राप्त झालेले आहे. परंतु त्या कामावर हजर झाल्या नाहीत.

श्रीमती जगताप यांनी दि. ०५.०९.२००९ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला आहे. त्या खुलाश्यात त्यांनी दि. ०१.०३.२००९ पासून सतत, सलग, विनापरवानगी गैरहजर असल्याचे कबुल केले आहे. सदरच्या खुलाश्यात गैरहजेरीचे कारण प्रेगनन्सीचे दिलेले आहे. गैरहजेरीबाबत वरिष्ठांना कळविले नसल्याचेही त्यांनी कबुल केले आहे. प्रेगनन्सी पिरेडमध्ये डॉक्टरांनी बेडरेस्ट घेणेबाबत सुचविलेले आहे. कामावर हजर होणेसाठी अजुन सहा महिने मुदतीची त्यांनी मागणी केली आहे. सिझेरियन ऑपरेशन झाल्यामुळे सध्या कामावर येऊ शकत नाही असे म्हटले आहे सदरच्या खुलाश्याबाबत डॉ. पंकज नांवदर, सिन्नर यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडलेले आहे. सदरच्या प्रमाणपत्रात सुनंदा स्वरुप खांबेकर अशा नावाचा उल्लेख आहे. त्या दि. ०३.०९.२००९ रोजी बाळंतपणासाठी दवाखान्यात दाखल झाल्या होत्या. त्यांना कन्यारत्न झाले आहे. त्यांना दि. १०.०९.२००९ रोजी रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्याचे म्हटले आहे. वैद्यकीय प्रमाणपत्रात येथून पुढे ६ महिने बेडरेस्ट घ्यावी असा उल्लेख नाही. सदरच्या खुलाश्यावर सहाय्यक अधिसेविका यांचा असा अभिप्राय आहे की, "कु. जगताप यांनी दि. १८.११.२००८ ते दि. २८.०२.२००९ या दिर्घकालावधीसाठी रजा उपभोगलेली आहे. त्यानंतर दि. ०१.०३.२००९ पासून त्या सतत, सलग गैरहजर आहे." त्या किती तारखेला हजर होणार याबाबतचा खुलाश्यात स्पष्ट उल्लेख नाही. सध्या परिचारीकेंची संख्या अपुर्ण असल्याने त्यांनी कामावर हजर होणे आवश्यक आहे. संस्थान नियमानुसार मॅटरनिटी लीव्ह संपल्यानंतर त्यांनी तात्काळ कामावर हजर होणे आवश्यक होते.

द मॅटरनिटी बेनिफिट ॲक्ट १९६१ चे कलम ५ (३) नुसार बारा आठवडयांची मॅटरनेटी लिव्ह बाळंतपणापूर्वी ६ आठवडे व बाळंतपणानंतर ६ आठवडे अशी उपभोगता येईल. परंतु कलम ६ (२) अन्वये अर्जदारांनी अशा प्रकारची नोटीस व्यवस्थापनाला देणे आवश्यक आहे. सदरच्या नोटीससोबत वैद्यकीय प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अशा प्रकारची पूर्तता कु. जगताप यांनी केलेली नाही. कलम ६ (३) नुसार ज्या अर्जदाराने अशी पूर्तता केली नसेल त्यांनी बाळंतपणानंतर शक्यतो लवकरात लवकर पूर्तता करणे आवश्यक आहे. त्यानुसार कु. जगताप यानी कागदपत्रांची पूर्तता केली नाही.

कु. जगताप या १८.११.२००८ पासून कामावर येत नाही. मॅटरनिटी बेनिफिट ॲक्ट १९६१ नुसार, बाळंतपण रजेचा कालावधी पूर्ण झालेला आहे तरी देखील आणखी ६ महिने रजेची मागणी केली होती. कु. जगताप यांची मागणी कायदेशीर नाही. त्याबद्दल जा.नं.एसएसएस/वशी-७बी/१३४१०/२००९ दि. ०३.११.२००९ अन्वये त्यांना रजिष्टर ए.डी. पोष्टाद्वारे पत्र पाठवून कळविण्यात आले होते की, द मॅटरनिटी बेनिफिट ॲक्ट, १९६१ मधील तरतुदी, कामाची निकड, त्यांचे खुलाश्यावर वैद्यकीय संचालक यांचा अभिप्राय विचारात घेता, त्यांना या पुढची दीर्घकालीन रजा मंजूर करता येणार नाही. तरी सदरचे पत्र मिळताच ७ दिवसांचे आत कामावर हजर व्हावे, अन्यथा संस्थान सेवेत स्वारस्य नाही, असे समजून संस्थानच्या हजेरी पटावरुन नाव कमी करण्यात येईल. सदरचे पत्र कु. जगताप यांना प्राप्त झाले आहे. परंतु त्या कामावर हजर झाल्या नाहीत. तसेच त्यांनी दि. ०५.०९.२००९ रोजीचे अर्जान्वये कामावर हजर होणेसाठी ६ महिन्यांची मुदत मागितली होती ती मुदत देखील संपली, तरी त्या कामावर हजर झाल्या नाहीत. अशा प्रकारे कामावर हजर होणेस संधी देऊनही कु. जगताप कामावर हजर झालेल्या नाहीत.

सबब, मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.०४.२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.४०७ नुसार जा.नं.एसएसएस/वशी-७बी/७७९२/२०१० दि. १४/०६/२०१० अन्वये श्रीमती जगताप यांचे नाव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात आलेले आहे.

तदनंतर, श्रीमती सुनंदा किसन जगताप (खांबेकर) माजी परिचारीका, यांनी दि. ०५.१०.२०१२ रोजी मा. कामगार न्यायालय, अहमदनगर येथे रेफरन्स (आयडीए) नं. ३९/२०१२ संस्थान विरुद्ध दाखल केली होती. त्यात त्यांनी खालीलप्रमाणे मागण्या केल्या होत्या.

अ) कामगारास दि. १४.०६.२०१० पासून कमी करण्याविषयक मालकाचा आदेश बेकायदेशीर, अयोग्य, नैसर्गिक न्यायाविरुद्ध असल्याचे जाहीर करुन तो रद्द करण्याचे आदेश मालकांना व्हावेत.

ब) दि. १४.०६.२०१० पासून कामगाराची नोकरी सलग धरुन मधील काळातील पूर्ण वेतन देऊन द्वितीय पक्षास पूर्ववत सेवेत घेण्याचे आदेश मालकांना व्हावेत.

क) इतर योग्य ते न्यायोचित आदेश व्हावेत.

आवश्यकता वाटल्यास वरील मजकुरात भर घालण्याची दुरुस्ती करण्याची किंवा फेर फार करण्याची परवानगी द्वितीय पक्षास असावी, ही प्रार्थना.

मा. कामगार न्यायालयाने दि. २४.११.२०१५ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे श्रीमती सुनंदा किसन जगताप यांना दरम्यानचे काळातील वेतनाशिवाय दि. १४.०६.२०१० पासून संस्थान सेवेत सलग सेवा धरुन

पूर्ववत कामावर हजर करुन घ्यावे किंवा मा. उच्च न्यायालयात निर्णया विरोधात दाद मागावी, याबाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे सभेसमोर सादर करणेकरीता मिटींग विभागास दि. २६.०२.२०१६ रोजी देण्यात आला होता. तथापि, सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत आलेला नसल्याने, सदरचा विषय चक्रीय पद्धतीने सादर करण्यात आला होता. त्यावर मा. अध्यक्ष साहेब यांनी दि. ३०.०३.२०१६ रोजी पुढीलप्रमाणे निर्देश दिले होते. Call legal opinion on this subject who has conducted this case before the labour court and then place.

त्यास अनुसरुन इकडील जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३९/२०१६ दि. ०४.०४.२०१६ अन्वये संस्थान कामगार कायदा सल्लागार ॲड. अशोकराव पाटील, अहमदनगर यांना पत्र देऊन त्यांचा कायदेशीर मत मागविणेत आले होते.

त्यानुसार ॲड. अशोकराव पाटील, अ.नगर यांनी दि. ०४.०४.२०१६ रोजीचे कायदेशीर मत दिले असुन, त्यात त्यांनी "I have seen the Award passed by Hon'ble Labour Court is reference (I.D.A.) No. 39/2012 Dtd. 24.11.2015 it is not in dispute that, the service of Smt. Sunanda Kisan Jagtap were terminated by our Trust alleging misconduct of unauthorized absenteeism. The service of the employees were regulated as per provisions of Model Standing Orders framed under Industrial Employment (Standing Order) act. 1946 prior to adopting our own service rules. It is admitted fact that the termination order dt. 14th June, 2010 specifically state that, Smt. Sunanda Jagtap remained absent w.e.f. 01/03/2009 and inspite of intimation to her she did not reported on duty. As per settled legal positon and after referring to contents of termination order the termination of Smt. Sunanda Jagtap is stigmatic and therefore her termination ought to have been followed by holding and conducting a domestic enqiry as per the provision of clasue 25 of Model Standing Orders. Admittedly, we have not followed the said statutory provision and therefore Hon'ble Labour Court has taken a view that, the termination is illegal. Another aspect of the matter is about her illness and the Hon'ble Labour Court has therefore. Concluded that the absenteeism is due to bona-fide reasons. It is also important to see that Hon'ble Court has turned down the relief of Back Wages to her. In my opinion the stigmatic termination ought to have been followed by holding and conducting a domestic enquiry in accordance with principles of natural justice and procedure laid down under Model Standing Orders. We have not followed the said procedure therefore, in my opinion it is not advisable to challenge the said award in Hon'ble High Court." असे नमुद केले आहे.

मा. कामगार न्यायालयाचा दि. २४.११.२०१५ रोजीचा आदेश व त्यावर कामगार कायदा सल्लागार ॲड. अशोकराव पाटील यांचा अभिप्राय विचारात घेता, कु. सुनंदा किसन जगताप यांना दरम्यानच्या काळातील वेतनाशिवाय दि. १४.०६.२०१० पासून संस्थान सेवेत सलग सेवा धरुन पूर्ववत कामावर हजर करुन घ्यावे किंवा कसे याबाबत निर्णय होणेकरीता चक्रीय पद्धतीने प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

दि. १९.०५.२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती विषय नं. ०४ निर्णय क्र. ३२० यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मा. कामगार न्यायालयाचा आदेश दि. २४.११.२०१५ रोजीचा आदेश व त्यावर संस्थानचे कामगार कायदा सल्लागार ॲड. अशोकराव पाटील यांचा अभिप्राय विचारात घेता कु. सुनंदा किसन जगताप यांना दरम्यानचे काळातील वेतनाशिवाय दि. २४.०६.२०१० पासून संस्थान सेवेत सलग सेवा धरुन पूर्ववत कामावर हजर करुन घेणेस समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रीय पद्धतीने मान्यता घेण्यात येऊन, कार्यवाही करण्यात आलेली आहे त्याची नोंद घेण्यात आली.

कु. सुनंदा किसन जगताप यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३०९/२०१६ दि. २२.०४.२०१६ रोजीचे आदेशान्वये परिचारीका या पदावर हजर/ रुजू होणेबाबत कळविणेत आलेले असुन कु. जगताप ह्या दि. २५.०४.२०१७ रोजी कामावर हजर/ रुजू झालेल्या आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र. ०४ चे पत्रान्वये मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद रीट पिटीशन क्र. ८९८७/२०१६ श्रीमती सुनंदा किसन जगताप (खांबेकर), माजी परिचारीका विरुद्ध श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी बाबत दि. १३.०६.२०१७ रोजीचे निकालाची प्रत इकडील कार्यालयास दि.

१४.०६.२०१७ रोजी प्राप्त झाली आहे. मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी खालीलप्रमाणे आदेश केलेले आहेत.

The Hon'ble Apex Court in the matter of Dipali Gundu Surwase Vs.Kanti Junior Adhyapak Mahavidyalaya (D.Ed) and others [2013 AIR SCW 5330] has recently concluded that once the termination is held to be illegal and the employer has the monetary capacity to pay the back wages.full back wages need to be awarded.

The petitioner,upon being orally terminated on 14/06/2010. raised an industrial dispute on 11/06/2012. The Hon'ble Apex Court in the matter of Raghubir Singh Vs.General Manager,Hariyana Roadways, Hissar [2014 AIR SCW 5515] has held that while condidering the payment of back wages,the delay caused by the employee in raising an indusrial dispute for challenging the termination should be excluded while computing the period for back wages.

In so far as the financial of the respondent is concerned.there is no dispute that the respondent is believed to be the second riched temple trust in India. Mr.Bhavar strenuously submits that the hospital is run on charity basis and @ Rs.20,000/- p.m. and the issue is of back wages to the extent of july 2012 till November 2015. I am depriving the petitioner of the back weges for the period of 2 years keeping in view the law laid down by the Hon'ble Apex Court in the Raghubir Singh case (supra.)

Keeping in view that the petitioner is a lady worker and who has delivered a child just prior to her oral rumination and is to nourish the child who is about 6 years old. I deem it proper to follow the view taken by the Hon'ble Apex Court in Raghubir Singh and Dipali Surwase case (supra) by awarding full back wages to the petitioner for the period july 2012 till November 2015.

This petition is, therefore, partly allowed. The direction of the Labour Court depriving the petitioner of back weges in clause 3 of the award is quashed and set aside and is replaced by the direction to pay the back wages as above. If the respondent pays the said back wages within 3 (three) months from today.there shall be no interest on the said amount, failing which, the said amount shall attract interest @ 6 % p.a.from November 2015 till it is actually paid.

Rule is made party absolute in the above terms.

श्रीमती सुनंदा किसन जगताप, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल, यांना जुलै २०१२ ते नोव्हे. २०१५ या कालावधीतील वेतनापोटी फरक अदा करणेबाबत मा. उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद या न्यायालयाचा आदेश झालेला आहे. तरी श्रीमती सुनंदा जगताप यांना प्रति महा रु. २०,०००/- याप्रमाणे वेतनापोटी फरक अदा करावे किंवा वेतनश्रेणीप्रमाणे देय होणा-या रकमेनुसार वेतनापोटी फरक अदा करावे याबाबतच्या कायदेशीर अभिप्रायबाबत दि.०१.०७.२०१७ रोजी ॲड. नितीन भवर, हायकोर्ट ॲडव्होकेट, औरंगाबाद यांचेशी चर्चा केली असता, त्यांनी श्रीमती जगताप यांना उपरोक्त कालावधीतील मा. उच्च न्यायलायाचे आदेशानुसार वेतनापोटी फरक प्रति महा रु. २०,०००/- इतके अदा करावे असा स्पष्ट तोंडी अभिप्राय दिलेला आहे.

श्रीमती जगताप ह्यांनी दि. २५.०६.२०१२ रोजी सहाय्यक कामगार आयुक्त यांचेकडे तक्रार अर्ज सादर केलेला आहे. दि. ०१.०३.२००९ ते दि. २४.०६.२०१२ व दि. २४.११.२०१५ ते दि. २४.०४.२०१६ अखेर या कालावधीतील फरकापोटी वेतन अदा करणेबाबतचे निर्देश मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेले नाहीत. दि. २५.०६.२०१२ ते मा. कामगार न्यायालय, अहमदनगर ह्यांनी दिलेल्या निकालाच्या तारखेपर्यंत दि. २४.११.२०१५ अखेर वेतन अदा करावे लागेल. तसेच सदरचे रिट पिटीशनमधील निकालावर रिव्हीव ॲप्लीकेशन किंवा Appeal दाखल करु नये तसेच दि. १२.०९.२०१७ पूर्वी श्रीमती जगताप यांना फरक अदा करणेत यावा असे ॲड. नितीन भवर यांनी दि. ०५.०८.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या समक्ष चर्चेच्या वेळी सांगितलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** श्रीमती सुनंदा किसन जगताप, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना दि. २५.०६.२०१२ ते दि.२४.११.२०१५ या कालावधीतील वेतनापोटी फरक अदा करणेबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद या न्यायालयाच्या आदेशानुसार प्रति महा वेतनापोटी फरक रु. २०,०००/- प्रमाणे ४० महिन्याचे एकूण रु. ८,००,०००/- (अक्षरी रु. आठ लाख फक्त) दि. ११.०९.२०१७ पर्यंत देय आहे. त्यानंतर सदर रकमेवर माहे नोव्हेंबर २०१५ पासून ६% दराने व्याज देय राहील. सदरची देय रक्कम रु. ८,८४,०००/- इतकी होईल व त्यानंतर जो पर्यंत रक्कम अदा होत नाही तोपर्यंत रक्कम रु. ४,०००/- प्रति महा याप्रमाणे रक्कम अदा करणेचा प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.७२६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.१३.०६.२०१७ रोजीचे आदेशानुसार श्रीमती सुनंदा किसन जगताप, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना वेतनापोटीचा फरक व त्यावर नोव्हेंबर २०१५ पासून जो पर्यंत रक्कम अदा होत नाही तोपर्यंत ६% दराने व्याज आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४३** **संस्थानचे भक्तनिवास, रुग्णालये, श्री साईप्रसादालय येथील लिफ्टचे CAMC करीता ई-निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतूद:** (१) कलम १४(२)(घ)– भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे. (२) कलम १७(२)(झ) - सर्व साधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा गोष्टी करील.

**प्रस्तावना:** साईभक्तांना अधिकाधिक सेवा-सुविधा उपलब्ध करुन देणेकरीता साईआश्रम भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास, व्दारावती निवासस्थान, श्री साई प्रसादालय तसेच रुग्णांकरीता श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटल येथे विविध क्षमतेच्या एकूण ३५ लिफ्टस बसविण्यात आलेल्या आहेत. सदरचे ठिकाणी बसविणेत आलेल्या लिफ्टचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

| अ.नं. | ठिकाण | लिफ्टचा तपशील | कंपनी | नग | खरेदी दिनांक रुपये | खरेदी किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | साई आश्रम भक्तनिवासस्थान | अॅटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १३. G+3 | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | १२ | २०/७/२०१२ | १,६९,००,०००/- |
| | | मालवाहतुक, कोलॅप्सीबल गेट, क्षमता – १ टन, G+3 | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | १ | | |
| २. | साई धर्मशाळा | अॅटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १३, G+3 | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | ६ | २८/०७/२०१२ | ९१,००,०००/- |
| | | मालवाहतुक, कोलॅप्सीबल गेट, क्षमता – १ टन, G+3 | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | १ | | |
| ३. | नविन भक्तनिवासस्थान | अॅटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १०, G+3 | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | ४ | ३०/०६/२०१४ | ६९,५२,१५२/- |
| ४. | व्दारावती | अॅटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १०, G+4 | कोने इलेव्हेटर प्रा. लि. | ४ | १५/८/२००९ | ६४,००,०००/- |
| ५. | श्री साई प्रसादालय | एस.एस. अॅटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १०, G+1 | ओटीस इलेव्हेटर कंपनी लि. | १ | ०१/१०/२००८ | ३०,४१,१००/- |
| | | मालवाहतुक, कोलॅप्सीबल गेट, क्षमता – २.५ टन, G+1 | ओटीस इलेव्हेटर कंपनी लि. | १ | | |
| ६. | साईनाथ रुग्णालय | अॅटोमॅटीक डोअर, हायड्रोलीक, प्रवासी क्षमता – २०, G+2 | पावरलिंक इंजिनिअर्स | २ | ११/०८/२००७ | २०,२८,७७९/- |
| ७. | साईबाबा हॉस्पीटल | एस.एस. अॅटोमॅटीक डोअर, प्रवासी क्षमता – १५, G+2 | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | ३ | ३०/०६/२०१४ | २१,५७,९६०/- |
| | | | **एकूण लिफ्ट :** | **३५** | | |

उपरोक्त ३५ लिफ्ट पैकी अ.नं. २ चे लिफ्ट बसविणेत आलेली इमारत जमीन ग्रीन झोनमधून एलो झोनमध्ये बदल करणेकामी प्रस्ताव प्रलंबीत असलेने सदरचे लिफ्ट वापराकरीता लायसन्स मिळालेले नसलेने, त्यांचा वापर करण्यात येत नाही. सदरचे लिफ्ट वगळून उर्वरित २८ लिफ्टचे CAMC करीता दिनांक २०/०५/२००७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ३८६ अन्वये मशीनरींचे उत्पादक कंपनीला देण्यात येत होते.

तथापि साईनाथ रुग्णालय येथील दोन लिफ्टचे पुढील एक वर्षे कालावधीकरीता लिफ्टचे उत्पादक मे. पावरलिंक इंजिनिअर्स, या कंपनीस वार्षिक सर्व्हीस कॉन्टॅक्ट देणेस व याकामी येणा-या रुपये १,७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यतेकरीता प्रस्ताव दिनांक १५/०६/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर केले असता, सदर प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय क्र. ४६८ अन्वये संस्थानमधील सर्व लिफ्टचे एकत्रित वार्षिक कॉम्प्रेसिव्ह कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देण्यात यावे हे कॉन्ट्रॅक्ट उत्पादक कंपनीस न देता त्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी तसेच CAMC खर्च जास्तीत जास्त लिफ्टच्या खरेदी किंमतीच्या ५% पर्यत असावा, असे ठरले.

सध्याचे वापरातील श्री साई आश्रम भक्तनिवासस्थान येथील १३ लिफ्ट, व्दारावती निवासस्थान येथील ४ लिफ्ट, साई प्रसादालय येथील २ लिफ्ट, साईनाथ रुग्णालय येथील २ लिफ्टच्या CAMC कालावधी संपलेला आहे. तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान व साईबाबा हॉस्पीटल येथील ७ लिफ्टचा CAMC चा कालावधी दिनांक ३१/०८/२०१७ रोजी संपुष्टात येत असल्याने पुढील एक वर्षाकरीता सर्व लिफ्टचे CAMC द्यावी लागणार आहे. सर्व लिफ्टचे CAMC कामी येणा-या खर्चचे अंदाजाकरीता लिफ्टचे दुरुस्ती देखभाल करणा-या अधिकृत परवानाधारक कंपनी/ कॉन्ट्रक्टर यांचेकडून दरपत्रक घेतले असता खालीलप्रमाणे निम्न्तम दर प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | ठिकाण | उत्पादक कंपनी | लिफ्ट संख्या | CAMC करीता दिलेले दर रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | साईआश्रम भक्तनिवास | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | १३ | १८,५८,५००/- |
| २ | साईबाबा भक्तनिवास | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | ०४ | |
| ३ | साईबाबा हॉस्पीटल | जॉन्सन लिफ्ट प्रा. लि. | ०३ | |
| ४ | व्दारावती भक्तनिवास | कोने इलेव्हेटर प्रा. लि. | ०४ | |
| ५ | साईनाथ हॉस्पीटल | पावरलिंक इंजिनिअर्स | ०२ | |
| ६ | साईप्रसादालय | ओटीस इलेव्हेटर कं. लि. | ०२ | |
| | | **एकुण रक्कम** | **२८** | **१८,५८,५००/-** |

उपरोक्त प्रमाणे २८ लिफ्टचे कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट CAMC देणेकरीता एकत्रित रक्कम रु. १८,५८,५००/- इतके दर दिलेले आहे. सदरच्या दरात २०% कपात करुन रक्कम रु. १४,८६,८००/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

**मागणी:** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४६८ नुसार संस्थानमधील सर्व लिफ्टचे एकत्रित CAMC चे कॉन्ट्रॅक्ट देणे करीता महाराष्ट्र शासनाच्या www\mahatenders.gov.in या वेबसाईटवर तसेच संस्थानचे संस्थान वेबसाईटवर जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस तसेच CAMC करीता येणा-या अंदाजे रक्कम रु. १४,८६,८००/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समिती सभेत मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय**: श्री साईभक्तांचे तसेच रुग्णालयातील रुग्णाचे सोई सुविधेकरीता भक्तनिवास, रुग्णालये व साईप्रसादालय येथील लिफ्ट सुरुळीत कार्यान्वित राहणे आवश्यक आहे. त्यामुळे संस्थानमधील सध्या कार्यरत असलेल्या २८ नग लिफ्टचे एकत्रित कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या रुपये १४,८६,८००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, संस्थानमधील सध्या कार्यरत असलेल्या २८ नग लिफ्टचे एकत्रित कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१४,८६,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४४** **श्री साई प्रसादालयाचे माऊंटेड गॅस प्लँटकरीता जुने व्हेपोरायझर बायबॅक करुन, नविन व्हेपोरायझर व गॅस फ्लोमीटर खरेदीकामी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतूद** : कलम 14(2)(घ) – भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.

**प्रस्तावना**: श्री साईप्रसादालयातील प्रसादभोजन, फूड पॅकेट, लाडु प्रसाद तयार करणेकामी इंधन म्हणून एल.पी. गॅसचा वापर करण्यात येत आहे. एल. पी. जी. साठविणे करीता सन २००९ मध्ये मे. ग्लोब गॅस इक्युपमेंट इंडस्ट्री प्रा. लि. मुंबई यांचेकडुन १० मे. टन क्षमतेच्या दोन माऊंटेड गॅस टॅंक बसविण्यात आलेल्या आहेत. सदरची यंत्रणा उभारणीकामी रक्कम रूपये २,७३,००,०००/- मात्रचा खर्च आलेला होता.

दिवसेंदिवस वाढणारी साईभक्तांची तसेच प्रसाद भोजन, लाडू प्रसाद तयार करतांना गॅस खर्चात होणारी वाढ यामुळे गॅस प्लॅन्ट कार्यान्वित होते वेळेस बसविण्यात आलेली व्हेपरायझरची क्षमता (तासी 250 kg/hr) ईतकी आहे, दैनंदीन गॅसचा वापर प्रतिदिनी १८०० किलो इतका आहे. दैनंदिन गॅसचा वापर वाढलेमुळे व्हेपरायझरची क्षमता कमी पडत आहे. त्यामुळे थंडीचे दिवसात सकाळी किचन सुरु झालेवर गॅस लाईनमध्ये लिक्विड येते. सदर लाईनमध्ये लिक्वीड आल्यामुळे गॅस वापरणेस विलंब होतो, त्याचप्रमाणे गॅसचा भडकाही होऊ शकतो. त्यामुळे जुने व्हेपरायझरची क्षमता (तासी 250 kg/hr) ३ नग बायबॅक करुन नविन वाढीव 500 Kg/hr क्षमतेचे दोन व्हेपोरायझर बसविणे आवश्यक आहे. जुने बायबॅक करावयाच्या व्हेपोरायझरचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

| **अ.नं.** | **तपशील** | **डेड-स्टॉक नंबर** | **नग** | **मुळ किंमत** | **खरेदी दिनांक** | **घसारा किंमत (31 मार्च 2011 अखेर)** |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Vaporisers – 100 Kg/Hr | MCN/824 | 1 | 1,17,000/- | 02/07/2002 | 1,564/- |
| 2. | Vaporisers – 250 Kg/Hr | GAS/P001 | 2 | 4,00,000/- | 31/01/2009 | 35,040/- |

उपरोक्तप्रमाणे ३ नग व्हेपोराईझरची दिनांक ३१ मार्च, २०१७ अखेर घसारा किंमत येत आहे. संस्थान अधिनियम 2004 मधील कलम 17(4) मध्ये " विश्वस्तव्यवस्थेमध्ये विहित केलेले, पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहिर, दागिने व इतर मौलयवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज, समितीकडून विकण्यात येणार नाही, तारण म्हणून ठेवण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही" असे नमूद आहे. मात्र उपरोक्त बायबॅक करावयाच्या व्हेपोराईजरची घसारा किंमत ही रुपये ५०,०००/- पेक्षा कमी असल्याने, ते बायबॅक करणेकरीता शासन मान्यतेची आवश्यकता नाही. त्यामुळे जुने व्हेपोराईझर बायबॅक करुन नविन वाढीव क्षमतेचे व्हेपोराईझर खरेदी करणेकामी तसेच गॅस प्लॅन्टचे फ्लोमीटर बंद पडलेले असून, ते खरेदी करणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे :

**A) Supply & Installation of 500 Kg/hr Vaporizer**

| **Sr. No.** | **Description** | **Unit** | **Qty** | **Unit rate in INR** | **Total In INR** |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Supply, Installation & Commissioning of Electrically heated water bath type 500 kg/hr Vaporizer, Heating Load 72 KW | No. | 2 | 4,05,000/- | 8,10,000/- |
| | | | | **Total (A)** | **8,10,000/-** |

**B) Supply & Installation of LP Gas Flow Meter**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Supply, Installation & Commissioning of Flow meter- Micro Motion | No | 1 | 380,000/- | 3,80,000/- |
| | | | | **Total (B)** | **3,80,000/-** |

**Summary**

| | |
|---|---|
| Total (A) | 8,10,000/- + Taxes |
| Total (B) | 3,80,000/-+ Taxes |
| **Sub Total (A+B)** | **11,90,000/- + Taxes** |
| **Bye-Back Old Vaporiser (3 Nos) Rs. :** | **36,604/-** |
| **Grand Total Rs. :** | **11,53,396/- + Taxes** |

**मागणी**: उपरोक्तप्रमाणे माऊंटेड गॅस प्लॅन्ट करीता जुने ३ नग व्हेपोरायझर बायबॅक करुन, नविन व्हेपोरायझर व गॅस फ्लोमीटर खरेदीकामी अंदाजे रक्कम रुपये ११,५३,३९६/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च इकडील विभागाकडील सन २०१७-२०१८ या वर्षातील मंजूर अंदाजपत्रकात 'नविन मशीनरी खरेदी खर्च' या शिर्षातील शिल्लक रक्कम रुपये १,२६,८०,०२६/- मात्रचे रकमेतून करता येईल. सदरील खरेदी विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून करता येईल. या कार्यावाहीस व खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय**: श्री साई प्रसादालयातील माऊंटेड गॅस प्लॅन्टची सुरक्षिततेच्या कारणास्तव तसेच विना व्यत्यय गॅस प्लॅन्ट कार्यान्वित राहणेसाठी जुने व्हेपोरायझर बायबॅक करुन, नविन व्हेपोरायझर व गॅस फ्लोमीटर खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व येणा-या अपेक्षित रुपये ११,५३,३९६/- (अक्षरी रुपये अकरा लाख, त्रेपन्न हजार, तीनशे शहान्नव) + टॅक्स या खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.७२८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, श्री साई प्रसादालयातील माऊंटेड गॅस प्लॅन्टच्या सुरक्षिततेच्या कारणास्तव तसेच विना व्यत्यय गॅस प्लॅन्ट कार्यान्वित राहणेकामी जुने व्हेपोरायझर बायबॅक करुन, नविन व्हेपोरायझर व गॅस फ्लोमीटर खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.११,५३,३९६/- + टॅक्सेस मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.४५ **सन- २०१७ ची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका खरेदी किंमतीवर २०% सवलतीचे दराने भक्तांना उपलब्ध करुन दिलेने झालेला खर्च प्रकाशने विभाग खाती खर्च टाकणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम क्र.१७ (२) ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे. श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताविक:-** दि.०१.१०.२०१६ रोजी विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर सन-२०१७ च्या दैनंदिनी व दिनदर्शिका मा. अध्यक्ष महोदय यांनी प्रकाशन केले होते. तद्प्रसंगी डायरी व कॅलेंडर्स भक्तांना २०% सवलतीच्या दराने देण्याचा निर्णय घेतला होता. सदर प्रसंगी मा.विश्वस्त, मा.कार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी अधिकारी उपस्थित होते. सदर प्रसंगाची छायाचित्रासह व संस्थानतर्फे प्रकाशित होणा-या सर्व प्रकारच्या साहित्यावर २०% सवलत उपलब्ध करुन देणेबाबतची प्रेसनोट स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली होती.

सदर निर्णय घेतांना विक्री किंमत छपाई दरापेक्षा (खरेदी दर) कमी असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आलेले होते. उपरोक्त प्रसंगी सर्व डायरी व कॅलेंडर्स विक्री झालेनंतर व ई-निविदेतील खरेदी किंमतच्या त्रुटीची रक्कम प्रकाशने विभाग खाती (Publication Expenses) खर्ची टाकण्याची कार्यवाही करावे असे ठरले होते.

**प्रस्ताव:-** मागील वर्षीतील खरेदी दर व विक्री एकूण आवक संख्या नग खालील प्रमाणे सादर केलेली आहे.

| अ.नं. | प्रकाशनांचे नाव | छपाई दर | प्रशासकीय खर्चासह विक्री दर रु. | २० टक्के सवलतीने विक्री रु. | विक्रीतून येणारी त्रुट रुपये. **(ब- ड)** |
|---|---|---|---|---|---|
| | **अ** | **ब** | **क** | **ड** | **इ** |
| ०१ | डायरी | ६२.६२ | ७०/- | ५५/- | - ७.३८ |
| ०२ | कॅलेंडर्स ०१ पाने | १४.४० | २०/- | १५/- | + ०.६० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०३ | डिलक्स कॅलेंडर्स | २२३/- | २५०/- | २००/- | - | २३/- |
| ०४ | ३ डि टेबल कॅलेंडर्स | २०६/- | २२०/- | १८०/- | - | २६/- |
| ०५ | मेटपेट कॅलेंडर्स | २७३/- | ३००/- | २४०/- | - | ३३/- |
| ०६ | ३ डि वॉल कॅलेंडर्स | २२५/- | २५०/- | २००/- | - | २५/- |

संस्थान कार्यालयांच्या खालील ठिकाणी २० टक्के सवलतीच्या दराने विक्री संख्या तक्ता खालील प्रमाणे सादर केलेला आहे.

| अं. नं. | प्रकाशनांचे नाव | शिर्डी कार्यालय विक्री नग | मुंबई कार्यालय विक्री नग | माहिती केंद्र विक्री नग सिकंदराबाद | माहिती केंद्र विक्री नग बंगलोर | माहिती केंद्र विक्री नग चेन्नई | एकूण विक्री नग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | डायरी | २१७०१७ | १२५०० | ५६२ | ७२० | ६२२ | २३१४२१ |
| ०२ | डिलक्स कॅलेंडर्स | २२९९७ | ५०० | ०० | ०० | ०० | २३४९७ |
| ०३ | ३ डि टेबल कॅलेंडर्स | १६४१५ | ५२८ | ०० | ०० | ०० | १६९४३ |
| ०४ | मेटपेट कॅलेंडर्स | ७७१९ | ०० | ०० | ०० | ०० | ७७१९ |
| ०५ | ३ डि वॉल कॅलेंडर्स | ३९७८ | ०० | ०० | ०० | ०० | ३९७८ |

**मागणी:-** माहे जुन- २०१७ अखेर सन-२०१७ साठीच्या डायरी व कॅलेंडर्स सवलतीच्या दराने विक्री करण्यात आलेली असल्याने खालील प्रमाणे आर्थिक त्रुट आलेली आहे. सदर रक्कम प्रकाशने विभाग खाती खर्ची टाकणे आहे.

| अं.नं. | प्रकाशनांचे नाव | विक्रीतून येणारी त्रुट रुपये. पैसे. | एकूण विक्री नग | एकूण रक्कम रुपये. पैसे |
|---|---|---|---|---|
| ०१ | डायरी – सन-२०१७ | ७.३८ | २३१४२१ | १७,०७,८८७/- |
| ०२ | डिलक्स कॅलेंडर्स सन-२०१७ | २३/- | २३४९७ | ५,४०,४३१/- |
| ०३ | ३ डि टेबल कॅलेंडर्स सन-२०१७ | २६/- | १६९४३ | ४,४०,५१८/- |
| ०४ | मेटपेट कॅलेंडर्स सन-२०१७ | ३३/- | ७७१९ | २,५४,७२७/- |
| ०५ | ३ डि वॉल कॅलेंडर्स सन-२०१७ | २५/- | ३९७८ | ९,९,४५०/- |
| | | | **एकूण रुपये.** | **३०,४३,०१३/-** |

(अक्षरी रुक्कम रु. तीस लाख त्रेचाळीस हजार तेरा मात्र.)

**संस्थानचे अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय ई छाननी करुन अनुमान:-** आर्थिक/ धोरणात्मक.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** संस्थान अधिनियम तरतूदीनुसार "साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांचा प्रचार- प्रसार होणेकामी" श्री साईबाबा दैनंदिनी-२०१७ व दिनदर्शिका-२०१७ साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या होत्या व सर्व प्रकाशनांवर २० टक्के सवलत देऊन मागणी तक्त्यात दर्शविलेप्रमाणे त्रुटीची रक्कम रुपये. **३०,४३,०१३/-** प्रकाशने विभाग खाती **(**Publication Expenses**)** खर्ची टाकण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन- २०१७ ची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका खरेदी किंमतीवर २०% सवलतीचे दराने भक्तांना उपलब्ध करुन दिल्यामुळे झालेल्या त्रुटीची रु.३०,४३,०१३/- मात्र रक्कम प्रकाशने विभाग खाती खर्च टाकणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच यापुढे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका यांची, त्यांचेसाठी येणाऱ्या एकूण खर्चाच्या किमतीमध्ये विक्री करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४६** **साईआश्रम भक्तनिवास इमारत निहाय स्वच्छता, मेंटनंन्स व इतर कामांचे नियोजनाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमः-**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:-२१ (१) (ग) "भक्तांना मंदिरात देवतेच्यादर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम (१) (ख) "भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

**मा.व्यवस्थापन समिती ठरावः-** निरंक.

**प्रस्तावनाः-**श्री साईबाबा संस्थान अधिनस्त साईआश्रम भक्तनिवास विभागामध्ये साईदर्शनासाठी आलेल्यासाईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येत असुन त्यासाठी इकडील विभागात एकूण १५३६ खोल्या आहेत त्यामध्ये ए.सी ३८४ व नॉन ए.सी ११५२ खोल्या आहेत. त्यात एकुण १५३६X ५ (३+२ व्यक्ती) =७६८० एवढ्या साईभक्तांची निवासव्यवस्थाकरण्यात येते. सदर निवासव्यवस्थेच्या ९०टक्के खोल्या ऑनलाईन आरक्षित होत असुन उरलेल्या१० टक्के खोल्या स्पॉट बुकींग पद्धतीने साईभक्तांच्या वापरासाठी दिल्या जातात.

वाजवी दर, प्रशस्त व्यवस्था, भोजन/चहा-कॉफीची व्यवस्था व मंदिरात जाणे-येणेसाठी मोफत बस इत्यादी विविध सुविधा असल्याने नेहमीच इकडील विभागात साईभक्तांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते.

दि.०१/०१/२०१७ ते दि.३१/०५/२०१७ अखेर इकडील विभागात देण्यात आलेल्या खोल्यांची मासिक टक्केवारी (ॲक्युपंसी) खालील प्रमाणे.

| अ.नं | दिनांक | दिलेल्या खोल्या (ॲक्युपंसी) |
|---|---|---|
| १ | दि.०१/०१/२०१७ ते३१/०१/२०१७ (माहे -जानेवारी २०१७) | ८९.०५% |
| २ | दि.०१/०२/२०१७ ते २८/०२/२०१७ (माहे -फेब्रुवारी २०१७) | ७७.९२% |
| ३ | दि.०१/०३/२०१७ ते ३१/०३/२०१७ (माहे -मार्च २०१७) | ८३.५५% |
| ४ | दि.०१/०४/२०१७ ते ३०/०४/२०१७ (माहे -एप्रिल २०१७) | ८२.५३% |
| ५ | दि.०१/०५/२०१७ ते ३१/०५/२०१७ (माहे -मे २०१७) | ९४.७९% |

**मागणीः-** उपरोक्त तक्त्याप्रमाणे इकडील विभागातील निवासव्यवस्था नेहमी ८० ते ९० टक्यांपर्यंत वापरात असते.त्यात ९० % खोल्या ऑनलाईन आरक्षणासाठी उपलब्ध असल्याने१५३६ X ९०% =१३८२ खोल्या आरक्षित होऊन, स्पॉट बुकींगसाठी १५३६-१३८२ =१५४ इतक्याच खोल्या शिल्लक असतात. पैकी, व्ही.आय.पी, पी.आर.ओ, मुदतवाढ, ओव्हर स्टे, मा.विश्वस्त/वरीष्ठ यांचे सुचनेनुसार रुम दिल्याजातात. त्याच बरोबर सर्व सामान्यभक्तव पुर्व नियोजन नसलेल्या आगंतुक साईभक्तांची शिल्लक १० टक्यांतुन निवासव्यवस्था करण्यात येते. त्यामुळे दैनंदिन स्वच्छतेची कामे वगळता इतर कामे जसे, डिप क्लीनींग, मेजर मेन्टनंस, इमारत स्वच्छता, पाक्षिक/मासिक स्वच्छता, विशेष स्वच्छता, औषध फवारणी, इ.कामांसाठी इमारती निहाय खोल्या उपलब्ध राहत नाही.

इकडील विभागातील स्वच्छतेच्या कामांचा तपशील **परिशिष्ट अ** प्रमाणे सादर केला असुन त्याप्रमाणे सर्व स्वच्छतेची व मेन्टनंसची कामे संबंधित ठेकेदाराकडुन करुन घेतली जात असुनसध्या साईभक्तांचे गर्दी मुळे स्वच्छतेच्याकामांचे नियोजन करतांना अडचणी येत आहे व ती कामे वेळेवर करता येत नाही साईभक्तांची गर्दी जास्त असल्यामुळे ज्या प्रमाणात रुम खाली होतील त्या प्रमाणे औषध फवारणी व इतर कामे करण्यात येतात. रुम मधील ढेकुण-झुरळांबाबत साई भक्तांच्या तक्रारी येत असतात.

किटकांचे प्रभावी निर्मुलन होणेसाठी एकाच वेळी संपुर्ण इमारतीला औषध फवारणी करणे आवश्यक असल्याने. दर दोन महिन्यांनी इमारत निहाय औषध फवारणी करावी लागते व फवारणी नंतर २४ तास खोल्या बंद ठेऊन पुढील दोन ते तीन दिवसात विद्युत, पाणी पुरवठा, बांधकाम, इत्यादि विविध विभागासंबंधी मेन्टनंसची कामे करुन डिप क्लीनींग करावी लागते.

त्यासाठी, या सर्व कामांचे नियोजनासाठी उपाययोजना करणे गरजेचे असल्याने साईभक्तांच्या गर्दीचे प्रमाणानुसार साधारणतः दर महीन्याला दोन इमारती (२५६ खोल्या) सात दिवसांसाठी माहीती तंत्रज्ञान विभागामार्फत ब्लॉक केल्यास १२ महिन्यात प्रत्येक इमारतीत दोनदा स्वच्छतेविषयी सर्व कामे करता येतील.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्रायः-** सध्यस्थितीत, साईप्रसाद निवासस्थान व साईबाबा निवासस्थान विभागाचे नुतनीकरण चालु असल्याने त्या विभागाकडील अतिरिक्त भार इकडील निवासव्यवस्थेवर पडणार आहे. साईआश्रम भक्तनिवास विभागातील परिसर मोठा असल्याने निवासव्यवस्थेच्या बाबतीत साईभक्तांच्या तक्रारी येऊ नये व साईभक्तांना उत्तम सेवा देणेकामी प्रस्तावित उपाययोजना करणे गरजेचे आहे असे नम्र मत आहे.

करीता उपरोक्त प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला. साईआश्रम भक्तनिवासकडील इमारतींची स्वच्छता, मेंटनंन्स व इतर कामे कमी गर्दीच्या दिवशी करण्यात यावीत, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४७** **गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील मोबाईल कॅमेरा क्लोकरुम नियमित चालविणेस परवानगी मिळणेबाबत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांचे दि.०२.०५.२०१४ व दि.२६.०९.२०१६ रोजीचे पत्र.**

**निर्णय क्र.७३१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४८** **श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅंडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट सन २०१७-१८ साठी देणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीच्या ०१). मंदिर परीसर, ०२). साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), ०३). श्री साईबाबा हॉस्पीटल + साईनगर, ०४). नविन धर्मशाळा + श्री साईनाथ रुग्णालय, ०५).श्री साई प्रसादालय, ०६). साईआश्रम भक्तनिवास, ०७). साई धर्मशाळा, ०८). पाणीपुरवठा साठवण तलाव, ०९). साईआश्रम भक्तनिवास ए.सी. या वेगवेगळया ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीजपुरवठा घेण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा पुरवठा काही कारणास्तव वेळोवेळी खंडीत होतो. मोठे दुरुस्तीचे कामे चालू असल्यास महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून २४ तास ते ४८ तास देखील वीजपुरवठा बंद ठेवला जातो. अशा काळात संस्थानचे कामकाज सुरळीत चालावे व गर्दीत, अंधारात काही अनुचीत घटना घडू नये म्हणून पर्यायी वीजपुरवठयासाठी ठिकठिकाणी जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहे. हे सर्व जनरेटर सुस्थितीत कार्यान्वित असणे गरजेचे आहे. त्याकरीता यासर्व जनरेटरची काही ठरावीक कालावधीत इंजिन आईल, डिझेल फिल्टर, ऑईल फिल्टर, बायपास फिल्टर, कुलंट फिल्टर बदली करुन बी चेक सर्व्हिसिंग करणे गरजेचे असते. तसेच काही फॉल्ट झाल्यास तातडीने दुरुस्त करुन जनरेटर कार्यान्वित करणे गरजेचे असते. ऑईल फिल्टर व इतर मटेरीअल हे जनरेटर उत्पादक कंपनीचे वापरणे फायदेशिर असते. हे सर्व मटेरीअल आपल्याकडे उपलब्ध नसते. म्हणून जनरेटर इंजिनची सर्व्हिसिंग हे जनरेटर इंजिन उत्पादक कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर यांचेकडून करुन घेणे गरजेचे असते.

जनरेटसेटचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | जनरेटसेट ठिकाण | जनसेट क्षमता | ईएसएन क्र. | मॉडेल क्र. | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | श्री साई मंदिर परीसर (नविन) | ५०० केव्हीए | २५२६०००३ | व्हीटीए-२८-जी. | ०१ नग. |
| ०२) | श्री साई मंदिर परीसर (जुना) | ५०० केव्हीए | २५१६७८०९ | व्हीटीए-१७१०-जी. | ०१ नग. |
| ०३) | साईबाबा भक्तनिवासस्थान(५०० रुम) | ५०० केव्हीए | २५२४२३१७ | व्हीटीए-२८-जी. | ०१ नग. |
| ०४) | साईबाबा भक्तनिवासस्थान(५०० रुम) | १०० केव्हीए | २५१८७२९६ | एनटी-४९५-जी. | ०१ नग. |
| ०५) | श्री साईबाबा हॉस्पीटल | १०१० केव्हीए | २५३६५८०५ | केटीए-३८-जी-५ | ०१ नग. |
| ०६) | श्री साईबाबा हॉस्पीटल | ५०० केव्हीए | २५३५०२८१ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| ०७) | धर्मशाळा | २५० केव्हीए | २५२४९०८५ | एनटीए-८५५-जी. | ०१ नग. |
| ०८) | धर्मशाळा | २५० केव्हीए | २५२४९२८५ | एनटीए-८५५-जी. | ०१ नग. |
| ०९) | श्री साई प्रसादालय | ५०० केव्हीए | २५३२०२७१ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १०) | श्री साई प्रसादालय | २५० केव्हीए | २५२४९०८७ | एनटीए-८५५-जी. | ०१ नग. |
| ११) | साईआश्रम भक्तनिवास | ५०० केव्हीए | २५३६९१६६ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १२) | साईआश्रम भक्तनिवास | ५०० केव्हीए | २५३६७६०४ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १३) | साई धर्मशाळा | ५०० केव्हीए | २५३५०९७० | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४) | साई धर्मशाळा | ५०० केव्हीए | २५३०९०२८ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १५) | साईआश्रम भक्तनिवास ए.सी. | ३२० केव्हीए | २५३८१०५७ | एनटीए-८५५-जी-२-I | ०१ नग. |
| १६) | साईआश्रम भक्तनिवास ए.सी. | ३२० केव्हीए | २५३८१०५८ | एनटीए-८५५-जी-२-I | ०१ नग. |
| १७) | पाणीपुरवठा साठवण तलाव | २५० केव्हीए | २५७६९५२९ | ६ सीटीएए.३-६४ | ०१ नग. |
| १८) | पाणीपुरवठा साठवण तलाव | १०० केव्हीए | २५१५४५१४ | एनटीए-४९५-जी | ०१ नग. |
| १९) | रथपालखी (सिंगल फेज) | १५ केव्हीए | ३०९७४ | F1-7G1 | ०१ नग. |
| २०) | इर्मजन्सी (थ्री फेज) (स्पेअर) | १० केव्हीए | SC21300645 | X13 G2 | ०१ नग. |
| २१) | शांतिनिकेतन | १५ केव्हीए | D21022-0300022 | DM 20 | ०१ नग. |

तरी वरील श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट संस्थान जा.नं.एसएसएस/ विद्युत/ २४१३/ २०१६ दि.१२-०८-२०१६ अन्वये रक्कम रु. ३४,४५,९८७/- मात्र रकमेस जनसेट उत्पादक कंपनी मे.कमिन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना दि१-०९-२०१६ ते दि.३१-०८-२०१७ या कालावधीकरीता देण्यात आलेले होते. मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक हे मे.कमिन्स यांचे अहमदनगर, नाशिक, जळगांव व औरंगाबाद जिल्ह्याकरीता एकमेव कंपनी मान्यताप्राप्त अधिकृत सर्व्हीस सर्व्हिस डिलर आहेत. या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी उत्तमरित्या सर्व्हिस दिली असून सर्व जनसेट सुरळीत कार्यान्वित आहेत. आता या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दि.३१-०८-२०१७ रोजी संपत आहे. सदरील सर्व जनसेट नेहमी कार्यान्वित राहावे म्हणून वेळोवेळी सर्व्हिसिंग करणे गरजेचे असते. त्यामुळे श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनरेटरसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणे गरजेचे आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** आता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या ०१). मंदिर परीसर, ०२). साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), ०३). श्री साईबाबा हॉस्पीटल + साईनगर, ०४). नविन धर्मशाळा + श्री साईनाथ रुग्णालय, ०५). श्री साई प्रसादालय, ०६). साईआश्रम भक्तनिवास, ०७). साई धर्मशाळा, ०८). पाणीपुरवठा साठवण तलाव, ०९). साईआश्रम ए.सी. या वेगवेगळया परीसरातील जनरेटरसेटच्या इंजिनचे सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी मान्यता मिळणेस तसेच येणा-या अपेक्षित रुपये ३४,५०,०००/- इतक्या अंदाजित खर्चास मान्यता मिळणेस व शासनाच्या वेबसाईटवर ई-निविदा प्रकाशित करुन मे.कमिन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलर यांचेकडून ई-निविदा मागविणेस तसेच मराठीतील, व इंग्रजीतील जादा खपाच्या वृत्तपत्रांच्या मुंबई-पुणे येथील आवृत्तीत जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई- निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे सन २०१७-१८ साठी वार्षिक कॉन्ट्रॅक्ट देणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३४,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४९** **एअर सर्कीट ब्रेकर्सचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) सन २०१७-१८ साठी देणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा संस्थानचे मंदिर परीसर, साईनगर, श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईनाथ रुग्णालय + व्दारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान, श्री साई प्रसादालय, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा याठिकाणीच्या इमारतींना वीजपुरवठयाकरीता स्वतंत्र आठ ठिकाणी सबस्टेशन उभारुन विद्युतपुरवठा करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर

करावयाच्या तातडीच्या वीजपुरवठयासाठी प्रत्येक ठिकाणी जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहेत. सदरचे जनरेटर सेट ऑपरेटींग करणेकरीता स्वतंत्र ए.एम.एफ.पॅनेल बसविण्यात आलेले आहे. प्रत्येक सबस्टेशन मध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा व जनरेटरच्या ए.एम.एफ.पॅनेलमार्फत येणारा वीजपुरवठा वरील इमारतींना पुरविणेकरिता मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेल बसविण्यात आलेले आहेत. संस्थानमध्ये आजपर्यंत विविध ठिकाणच्या ए.एम.एफ.पॅनेल व मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेलमध्ये ८०० ॲम्पीअर ते २०००ॲम्पीअर कॅपॅसिटीचे एल.अँड.टी.कंपनीचे व सिमेन्स कंपनीचे **प्रत्येकी रु. १,३०,०००/- ते रु. ४,५०,०००/- किंमतीचे एकुण १०२ नग एअर सर्कीट ब्रेकर बसविण्यात आलेले आहेत.**

जनरेटरच्या ए.एम.एफ.पॅनेलमधील एअर सर्कीट ब्रेकर हे वीजपुरवठा चालू बंद होण्याच्या वेळेस म्हणजेच जनरेटर सेट चालू बंद होण्याच्या वेळेस कंट्रोल सर्किटव्दारे ऑटोमॅटीक ON / OFF होतात. त्याचप्रमाणे मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेलमधील एअर सर्किट ब्रेकर हे Mannually ON / OFF करावे लागतात. सततच्या ON / OFF होण्याच्या क्रियेमुळे कॉन्टॅक्ट ब्रेकरचे स्क्रू, नट, बोल्ट, कनेक्टर स्प्रिंग हे लूज होत असतात. तसेच ब्रेकर ज्याठिकाणी सप्लायला जोडला जातो त्याठिकाणी स्पार्किंग होऊन कॉन्टॅक्टवर कार्बन जमा होत असतो. त्यामुळे कधी कधी ब्रेकर चालू / बंद होण्यास व सप्लाय त्यामधून पास होण्यास अडथळा येऊ शकतो. त्याचप्रमाणे एखादया मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेल अथवा ए.एम.एफ.पॅनेल मधील एअर सर्किट ब्रेकर पासून पुढे जोडलेला एखादा मेनस्वीच अथवा विद्युत उपकरण अथवा मेनस्वीच भूसंपर्कित झाल्यास ज्या एअर सर्कीट ब्रेकर मधून क्षमतेपेक्षा जास्त वीज प्रवाह वाहुन पुढील हानी व धोका टळण्यासाठी एअर सर्कीट ब्रेकरमधील Over current & Earth fault सेंन्सर कार्यान्वित होऊन वीजपुरवठा खंडीत होतो. त्यामुळे पुढील हानी अथवा धोका टळत असतो. **संस्थानमधील काही ठिकाणचे एअर सर्किट ब्रेकर हे २२ वर्षापुर्वी बसविलेले आहेत.** वरील सर्व कारणांमुळे एअर सर्किट ब्रेकरमार्फत वीजपुरवठा करण्यास काही अडथळा येऊन नये. याकरीता सदरच्या एअर सर्किट ब्रेकरची नियमित सर्व्हिसिंग करावी लागते. सर्व्हिसिंगचे वेळेस खराब झालेले कॉन्टॅक्ट व ब्रेकरच्या आतील मेकॅनिझमचे सदोष पार्ट बदलून एअर सर्किट ब्रेकरची सर्व्हिसिंग करण्यात येते. एअर सर्कीट ब्रेकरचा तपशिल खालीलप्रमाणे.

**01). L & T कंपनीचे Air Circuit Breaker**

| Sr.No. | Description | Nos. |
|---|---|---|
| **Regular Preventive Maintence of following low Voltage Air Circuit Breaker** | | |
| 01) | L & T Make 800 A 3 Pole Air Circuit Breaker | 50 Nos. |
| 02) | L & T Make 1000 A 3 Pole Air Circuit Breaker | 10 Nos. |
| 03) | L & T Make 1000 A 4 Pole Air Circuit Breaker | 04 Nos. |
| 04) | L & T Make 1600 A 3 Pole Air Circuit Breaker | 11 Nos. |
| | Total :- | 75 Nos. |

**0**

**2). Siemens कंपनीचे Air Circuit Breaker**

| Sr.No. | Description | Nos. |
|---|---|---|
| **Regular Preventive Maintence of following low Voltage Air Circuit Breaker** | | |
| 01) | Siemens Make 800 A 4 Pole Air Circuit Breaker | 11 Nos. |
| 02) | Siemens Make 1000 A 4 Pole Air Circuit Breaker | 04 Nos. |
| 03) | Siemens Make 1600 A 4 Pole Air Circuit Breaker | 07 Nos. |
| 04) | Siemens Make 2000 A 4 Pole Air Circuit Breaker | 05 Nos. |
| | Total :- | 27 Nos. |

०१). श्री साईबाबा संस्थानचे एल.अँड टी. मेक ६८ नग एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट संस्थान जा.नं.एसएसएस / विद्युत / ३५९८ / २०१६ दि.०६-१०-२०१६ अन्वये रक्कम रु. १०,००,००१/- मात्र रकमेस एअर सर्कीट ब्रेकरचे उत्पादक कंपनी मे.एल.अँड.टी.कंपनी, मुंबई यांचे अधिकृत सर्व्हीस डिलर मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई यांना दि१-१०-२०१६ ते दि.३०-०९-२०१७ या कालावधीकरीता देण्यात आलेले होते. या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी उत्तमरित्या सर्व्हिस दिली असून सर्व एअर सर्कीट ब्रेकर सुरळीत कार्यान्वित आहेत. आता या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दि.३०-०९-२०१७ रोजी संपत आहे.

०२). मे.सिमेन्स कंपनी यांना संस्थान जा.नं.एसएसएसटी / विद्युत / ११६४ / २०१६ दि.१०-०६-२०१६ व जा.नं.एसएसएसटी /विद्युत /१६९६ /२०१६ दि.०७-०७-२०१६ अन्वये पत्र व स्मरणपत्र पाठवून वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट संदर्भात पत्रव्यवहार करण्यात आला होता. परंतू त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे मागील वर्षी सिमेन्स कंपनीचे एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देण्यात आले नव्हते. एल.अँड.टी.कंपनीचे सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट दिलेले मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई यांना विनंती केल्यानुसार त्यांनी श्री साईंची सेवा म्हणून सिमेन्स कंपनीच्या ज्या नऊ ब्रेकरला प्रॉब्लेम आला त्या ब्रेकरची तात्पुरती दुरुस्ती करुन दिलेली आहे. त्यामुळे मागील वर्षी फक्त एल.अँड टी.मेक ६८ नग एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देण्यात आले होते. यावर्षी एल.अँड.टी.मेक आणि सिमेन्स मेक या दोन्ही कंपनीच्या ब्रेकरची संख्या एकत्रित केल्याने त्याअनुषंगाने वाढलेल्या संख्येनुसार वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचीही अंदाजित रक्कम वाढलेली दिसून येते. तरी सदरील एल.अँड.टी.मेक आणि सिमेन्स मेक या दोन्ही कंपनीचे सर्व एअर सर्कीट ब्रेकर नेहमी कार्यान्वित राहावे म्हणून वेळोवेळी सर्व्हिसिंग करणे गरजेचे असते. त्यामुळे श्री साईबाबा संस्थानचे एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणे गरजेचे आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** एल.अँड टी. आणि सिमेन्स कंपनीचे एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट दयावयाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr.No. | Description | Qty. |
|---|---|---|
| 01) | Regular Preventive Maintence low Voltage L&T make Air Circuit Breaker | 75 Nos. |
| 02) | Regular Preventive Maintence low Voltage Siemens make Air Circuit Breaker | 27 Nos. |
| | Total :- | 102 Nos. |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे मंदिर परीसर, साईनगर, श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईनाथ रुग्णालय + व्दारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान, श्री साई प्रसादालय, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या विविध ठिकाणी कार्यान्वित असलेल्या एल.अँड टी कंपनी व सिमेन्स कंपनी अशा दोन्ही कंपन्याचे एकुण १०२ नग एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन २०१७-२०१८ साठी देणेकामी अंदाजे रक्कम रुपये १३,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तेरा लाख पन्नास हजार) मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. तरी श्री साईबाबा संस्थानचे सर्व एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट सन २०१७-२०१८ या कालावधीसाठी देणेकरीता येणा-या खर्चास व शासनाच्या वेबसाईटवर ई-निविदा प्रकाशित करुन उत्पादक कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलर व इतर यांचेकडून ई-निविदा मागविणेस तसेच मराठीतील, व इंग्रजीतील जादा खपाच्या वृत्तपत्रांच्या मुंबई-पुणे येथील आवृत्तीत जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, एअर सर्कीट ब्रेकर्सचे सन २०१७-१८ साठी वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) देणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१३,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५०** **फायर फायटरसाठी ट्रॉली माऊंटेड ५० के.व्ही.ए. पॉवर जनरेटर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवात्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-**आपत्कालीन प्रसंगी इमारतींना आग लागण्याची घटना घडल्यास यावर उपाययोजना म्हणून संस्थानमार्फत मंदिर परीसर व श्री साई प्रसादालय याठिकाणी वॉटर हायड्रंट यंत्रणा बसविण्यात आलेली आहे या वॉटर हायड्रंट यंत्रणेला १२.५ एच.पी.चे मोटार पंपसेट बसविण्यात आलेले आहेत. फायर ऑडीट सुचनेनुसार आता १२.५ एच.पी.मोटार पंपसेट ऐवजी ५० एच.पी.मोटार पंपसेट बसविण्यात येणार असल्याने फायर अँण्ड

सेफ्टी विभागाने कळविले आहे. या वॉटर हायड्रंट च्या मोटार पंपसेटकरीता विद्युतपुरवठयाकामी आपत्कालीन घटनेच्या प्रसंगी पर्यायी वीजपुरवठयाकरीता फायर ॲण्ड सेफ्टी विभागाने विद्युत विभागाकडे ०१ नग ५० केव्हीए ट्रॉली माऊंटेड डिझेल जनरेटरसेट ची मागणी केलेली आहे.

**मागणी:-** ५० केव्हीए डिझेल जनरेटरसेट ट्रॉलीसह खरेदी करणेकरीता येणार खर्च हा महाराष्ट्र शासनमान्य सी.एस.आर.सन २०१५-२०१६ नुसार तयार केलेला आहे. तरी ५० केव्हीए डिझेल जनरेटरसेट ट्रॉलीसह खरेदी करणेकरीता पुरवठादार यांचेकडून ई-निविदा मागवून खरेदी करावा लागणार आहेत. खरेदी करावयाच्या जनरेटरसेटचा तपशिल पुढीलप्रमाणे :-

| Sr.No. | CSR No. | Description | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 11-1-9 | Suppliyng,Erecting & Commissioning of 40 KW / 50 KVA Four Wheel Trolly mounted silent Diesel Genrating set with CPCB approved acoustic enclosure.Comprising of: "Cummins" Model 4 BTAA3.3-G11 Radiator cooled Diesel engine developing 66 BHP at 1500 RPM complete with standard accessories copled to alternator rated at 40 kw / 50 KVA at 415 volts mounted on channel Iron Base frame.Complete with fuel tank of 150 ltrs.capacity with standard of manual control Panel and Battery with 1 No.12V. | 01 Set. | Rs.6,40,593/- | **Rs.7,35,593/-** |
| 02) | Non CSR | Four Wheel Trolly for above genset (The above genset to be supplied with erected on the said trolley) | | Rs.0,95,000/- | |
| | | | **Total Amount :-** | | **Rs.7,35,593/-** |

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** उपरोक्तप्रमाणे जनरेटसेट ट्रॉलीसह खरेदी करणेकामी **महाराष्ट्र शासनमान्य सी.एस.आर.सन २०१५-२०१६ नुसार** अंदाजे रक्कम रुपये ७,३५,५९३/- मात्र इतका खर्च येणे अपेक्षित असून सदरील खर्चास व बाहेरील ठेकेदार / पुरवठादार यांचेकडून ई-निविदा मागविणेकामी मराठीतील, व इंग्रजीतील जादा खपाच्या वृत्तपत्रांच्या मुंबई-पुणे येथील आवृत्तीत जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई- निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, फायर फायटरसाठी ट्रॉली माऊंटेड ५० के.व्ही.ए. पॉवर जनरेटर खरेदी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७,३५,५९३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५१** **सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता वार्षिक पध्दतीने इलेक्ट्रिकल साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवात्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-** श्री साई मंदिर, सर्व दर्शनरांग हॉल व शेड, सर्व भक्तनिवासस्थाने, श्री साई प्रसादालय, दोन्ही हॉस्पीटल, शैक्षणिक संकुले, साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा, मध्यवर्ती भांडार, नविन भांडार, सर्व कर्मचारी अधिकारी निवासस्थान या सर्व इमारतींमधील इलेक्ट्रीकल मेन्टेनन्सची कामे विद्युत विभागामार्फत केली जातात. तसेच मंदिर परिसर, सर्व भक्तनिवासस्थाने परीसर, श्री साई प्रसादालय परिसर, दोन्ही हॉस्पीटल परिसर, शैक्षणिक संकुले परीसर, कर्मचारी निवासस्थाने परिसर, हेलिपॅड परीसर, पाणीपुरवठा साठवण तलाव परीसर, येसगांव

पालखी विसावा थांबा, साई पालखी निवारा-निमगांव, पांगरी पालखी विसावा थांबा, पांढुर्ली विसावा थांबा येथील इमारती व परिसरातील स्ट्रीट लाईट मेन्टेनन्सचे काम विद्युत विभागामार्फत केली जातात. तसेच विविध विभागांच्या मागणीप्रमाणे किरकोळ स्वरुपातील वायरींगची कामे तातडीने पुर्ण करुन दयावी लागतात. काही वेळेस काही ठिकाणी नविन केबल टाकून नविन मेनस्वीचेस बसवून सप्लाय चालू करुन दयावा लागतो. तसेच सन २०१७-१८ या वर्षामध्ये येणा-या शताब्दी वर्षाकरीता उभारण्यात येणा-या संस्थान जागेतील मंडपामध्ये लाईट व्यवस्था करुन देणेकामी इलेक्ट्रीकल मटेरीयलची आवश्यकता भासणार आहे. तसेच श्री रामनवमी उत्सव, श्री गुरुपौर्णिमा उत्सव, श्री पुण्यतिथी उत्सव, नाताळ तसेच नववर्षारंभा करीता ठिकाठिकाणी उभारण्यात येणा-या मंडपामध्ये इलेक्ट्रीकल मटेरीयलची आवश्यकता असते. तसेच संस्थानमार्फत दरवर्षी साज-या केल्या जाणा-या श्री साई सच्चरित्र पारायण कार्यक्रमासाठी मंडपामध्ये मोठया प्रमाणात इलेक्ट्रीकल मटेरीयलची आवश्यकता असते. याशिवाय कर्मचारी / अधिकारी निवासस्थानाच्या मेन्टेनन्सकामीही मटेरीयलची गरज भासते. यासर्व कामाकरीता लागणारे इलेक्ट्रीकल साहित्य वेळेवर उपलब्ध असावे लागते. मेन्टेनन्स करणेकामी येणा-या परीसरातील इमारतींचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | परीसराचे नांव | इमारतींचा तपशील |
|---|---|---|
| ०१) | मंदिर परीसर | ०१).समाधी मंदिर, ०२). शनी मंदिर ,०३).गणपती मंदिर, ०४).महादेव मंदिर, ०५). गुरुस्थान, ०६). चावडी, ०७). व्दारकामाई, ०८).दिक्षित वाडा, ०९). सभामंडप, १०). म्युझियम हॉल, ११). शांतिनिवास इमारतीमधील सर्व ऑफिसेस, १२). भक्तनिवास इमारतीमधील सर्व ऑफिसेस, १३). शांतीनिवास इमारतीमधील दर्शन हॉल, १४). भक्तनिवास इमारतीमधील दर्शन हॉल, १५). पिंपळवाडी रोडवरील दर्शन लाईन शेड, १६). साईनाथ छाया इमारत, १७). सेवाधाम इमारत, १८). साईनिवास अतिथीगृह १९). मुख्य भांडार, २०). सुलभ शौचालय इमारत, २१). साईउद्यान इमारत, २२). मंगल कार्यालय इमारत, २३). शांतिनिकेतन, २४).साई कॉम्प्लेक्समधील मिटींग हॉल, २५). साई कॉम्प्लेक्समधील ०४ काऊंटर, २६). मंदिर परीसरातील दोन्ही डोनेशन काऊंटर, २७). सत्यनारायण पुजेचा हॉल, २८). हनुमान मंदिर, २९). खुले नाटयगृह, ३०).गुरुस्थान समोरील ध्यान मंदिर (सध्या सी.सी.टि.व्ही.करीता वापर), ३१). केशव मंदिर, ३२). १६ गुंठे परीसर, ३३). लेंडीबाग धबधबा, ३४).जनरेटर रुम, ३५). सरंजाम बाग, ३६). सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०२) | साईनगर परीसर | ०१). श्री साईबाबा हॉस्पीटल, ०२).साईध्यान नं.०१, ०३). साईध्यान नं.०२, ०४).साईनगर, ०५).समर्पण, ०६). साईस्मरण नं.०१, ०७). साईस्मरण नं.०२, ०८). साईस्मरण नं.०३, ०९).साईचिंतन नं.०१, १०).साईचिंतन नं.०२, ११). साईचिंतन नं.०३, १२).साईचिंतन नं.०४, १३). मुख्य भांडार, १४). व्यायाम शाळा, १५). आर.एम.ओ.इमारत, १६). मेडीकल स्टोअर, १७). ब्लड बँक, १८). जनरेटर रुम, १९).एस.टी.पार्कींग २०) सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०३) | धर्मशाळा परीसर | ०१).व्दारावती भक्तनिवास, ०२). श्री साईनाथ हॉस्पीटल,०३).कॅन्टीन, ०४).केसपेपर कार्यालय, ०५). जनरेटर रुम, ०६).बगीचा, ०७).लॉण्ड्री, ०८). सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०४) | साईआश्रम भक्तनिवास परीसर | ०१).ए ब्लॉक, ०२).बी ब्लॉक,०३).सी ब्लॉक, ०४).डी ब्लॉक, ०५).ई ब्लॉक,०६). एफ ब्लॉक,०७).जी ब्लॉक, ०८).एच ब्लॉक,०९).आय ब्लॉक, १०).जे ब्लॉक, ११).के ब्लॉक,१२).एल ब्लॉक,१३).आर ब्लॉक, १४).ॲम्पिथिएटर, १५).जनरेटर रुम, १६).एच.टी.पी.प्लॅण्ट, १७).सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०५) | साई धर्मशाळा परीसर | ०१).ए ब्लॉक, ०२).बी ब्लॉक ,०३).सी ब्लॉक, ०४).डी ब्लॉक, ०५). ई ब्लॉक, ०६).एफ ब्लॉक, ०७).आर ब्लॉक, ०८).जनरेटर रुम, ०९).एच.टी.पी.प्लॅण्ट, १०).सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०६) | ५०० रुम परीसर | ०१).इमारतीमधील सर्व खोल्या, ०२). कॅन्टीन,०३).बगीचा, ०४).सर्व गाळे, ०५). सर्व हॉल, ०६). मा.कार्यकारी अधिकारी निवासस्थान, ०७). साई सहवास नं.०१, ०८).साई सहवास नं.०२, ०९).साईसहवास नं.०३, १०). साईसहवास नं.०४, ११). वाहन विभाग, १२). बगीचा, १३). जनरेटर रुम, १४). वर्कशॉप , १५). पंपरुम, १६). लॉण्ड्री, १७). गुलाब गार्डन, १८). कन्या शाळा, १९). इंग्लीश मेडियम स्कुल, २०).आय.टी.आय., २१). सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०७) | श्री साई प्रसादालय | ०१).कार्यालय,०२).जनरल हॉल, ०३).बुफेहॉल, ०४).व्ही.आय.पी.हॉल, ०५).व्ही.व्ही. |

| | | |
|---|---|---|
| | परीसर | आय.पी.हॉल, ०६).मेन किचन, ०७).चपाती किचन, ०८).स्टोअर, ०९).आय.टी.विभाग, १०).गॅस प्लँट एरिया, ११).मेकॅनिकल विभाग, १२).लाडू विभाग, १३).जनरेटर रुम, १४).पंपरुम, १५).सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०८) | नवीन सेवाधाम परीसर | ०१).ए ब्लॉक, ०२). बी ब्लॉक,०३). सी ब्लॉक, ०४).डी ब्लॉक, ०५).ई ब्लॉक, ०६).एफ ब्लॉक, ०७).जी ब्लॉक, ०८).एच ब्लॉक, ०९). सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट |
| ०९) | कनकुरी साठवण तलाव परीसर | ०१).सर्व ठिकाणची स्ट्रीट लाईट, ०२). जनरेटर रुम,०३). पंपरुम, ०४).वर्कशॉप, ०५).स्टोअर रुम |
| १०) | पालखी थांबे | ०१).पांगरी पालखी थांबा, ०२). सिन्नर पालखी थांबा,०३). पांढुर्ली पालखी थांबा, ०४).येसगांव पालखी थांबा |
| ११) | हेलीपॅड | हेलीपॅडवरील विश्रांतीगृह, नगर-मनमाड रोड ते हेलीपॅड स्ट्रीट लाईट |

उपरोक्तप्रमाणे या सर्व ठिकाणी साई भक्तांकरीता साधारणत: ७००० नग सिलिंग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्टॅण्ड फॅन व साधारणत: ९००० नग टयुबलाईट तसेच ५०० नग स्ट्रीट लाईट फिटींग्ज बसविण्यात आलेल्या आहेत. तसेच साई भक्तांचे सोयी सुविधेसाठी दर्शनलाईन समाधी मंदिर, प्रत्येक इमारतीमध्ये व परिसरामध्ये २४ तास अखंडित विद्युत पुरवठयाची व्यवस्था केलेली आहे. वीजपुरवठयाकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून विविध ठिकाणी उच्चदाब वीजपुरवठा जोडून घेऊन नऊ ठिकाणी सबस्टेशनची उभारणी करण्यात आलेली आहे. विद्युत विभागाचे दैनंदिन मेन्टेनन्सकामी तसेच मर्यादित स्वरुपाच्या नविन कामांसाठी साहित्याची आवश्यकता असते. मटेरीयल वेळेवर उपलब्ध न झाल्यास देखभाल व दुरुस्तीस अथवा नविन स्वरुपाच्या करावयाच्या कामास विलंब होतो.

विद्युत विभागास लागणा-या विविध प्रकारच्या इलेक्ट्रीकल मटेरीअलची खरेदीसाठी दि.१५-१०-२०१४ रोजी खरेदी विभागाकडे प्रस्ताव पाठविल्यानंतर खरेदी विभागामार्फत ही खरेदी सन-२०१६ मध्ये करण्यात आली होती. त्यासाठी खरेदी विभागामार्फत एकुण रक्कम रुपये १,३०,६०,२५५/- इतक्या रकमेच्या मटेरीयलची खरेदी झाली होती. या सन-२०१६ मध्ये झालेल्या वार्षिक खरेदीमध्ये फक्त ४० ते ५० टक्के मटेरीयल पुरवठाधारकांकडून पुरविण्यात आले आहे. त्यामुळे इलेक्ट्रीकल मेन्टेनन्ससाठी अडचणी निर्माण होत आहे.

यापूर्वी सन २०१३ ते २०१५ या तीन वर्षात खरेदी झालेली नव्हती. साधारणत: दरवर्षी वार्षिक खरेदी होत असते. परंतू मध्यंतरी खंड पडल्याने परंतू सर्व इमारतींमधील इलेक्ट्रीकलचे मेन्टेनन्स सतत चालू असल्याने इलेक्ट्रीकल मटेरीयलची अत्यंत गरज भासत आहे. त्यामुळे विद्युत विभागामार्फत करावयाच्या दैनंदिन मेन्टेनन्सकामी व नविन कराव्या लागणा-या कामासाठी विविध प्रकारचे लागणारे इलेक्ट्रीकल मटेरीयल संस्थानचे मुख्य भांडार व विद्युत विभागाचे सबस्टोअरला शिल्लक नसल्याने दैनंदिन कामकाजात अडचणी निर्माण होत आहे.

विद्युत विभागाकरीता आवश्यक असणा-या इलेक्ट्रिकल मटेरियलच्या दराबाबत विविध कंपन्यांची दरपत्रके तसेच दुरध्वनीवरुन मार्केटमधील विविध सप्लायर्स कडून दराची माहिती घेऊन त्या दरांचा उल्लेख यात केलेला आहे. प्रत्यक्ष ई-निविदेमध्ये या दरांपेक्षा कमी दर येऊ शकतात.

मागणी:- सोबतच्या यादीनुसार विद्युत विभागाचे दैनंदिन इलेक्ट्रीकल मेन्टेनन्सकरीता विविध प्रकाराचे साहित्य खरेदी करावे लागणार आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- उपरोक्तप्रमाणे सोबतच्या यादीनुसार विद्युत विभागाचे दैनंदिन इलेक्ट्रीकल मेन्टेनन्सकरीता विविध प्रकाराचे साहित्य खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये १,४१,९९,३२०/- मात्र इतका खर्च येणे अपेक्षित असून सदरची खरेदी ही संस्थानच्या खरेदी विभागामार्फत होणेस, येणा-या खर्चास मान्यता मिळणेस तसेच बाहेरील ठेकेदार / पुरवठादार यांचेकडून खरेदी विभागामार्फत ई-निविदा मागविणेकामी मराठीतील, व इंग्रजीतील जादा खपाच्या वृत्तपत्रांच्या मुंबई-पुणे येथील आवृत्तीत जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई- निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता आवश्यक असलेले इलेक्ट्रिकल साहित्य खरेदी करणेकामी, वार्षिक दर ठरविणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.१,४१,९९,३२०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५२** **सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षातील श्री साई प्रसादालयातील धान्य-कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद :-सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ भाग-४ मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

प्रस्ताविक:- मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१५.६.२०१७ रोजीचे सभेत श्री साई प्रसादालयातील धान्य-कडधान्य व किराणा मालाची प्रस्तावात नमुद केलेली दि.०१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७ वर्षाअखेरची घट-तुटीस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. परंतू संदर्भिय नूसार सदर सभेतील निर्णय क्रं.४७६ नूसार सदरील घट-तुट कशाचे आधारे काढली, त्यासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असा निर्णय झालेला आहे.

श्री साई प्रसादालयामध्ये दररोज अंदाजे ३५ ते ४० हजार साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेत असून उत्सव कालावधीमध्ये ही संख्या वाढून ८० ते ८५ हजारापर्यंत जाते. तसेच दररोज सुमारे ९००० अन्नपाकीटांची विक्री होत आहे. त्याकामी लागणारा किराणा माल, धान्य- कडधान्य डाळी इत्यादी साफ केल्यानंतर वापरासाठी देण्यात येतात. सदर माल डिस्टोनर मशिनव्दारे व मनुष्यबळाकरवी साफ करण्यात येतो. सर्व प्रकारचे धान्य व कडधान्य स्वच्छ करण्यात येत असून गहू व हरबरा दाळ दळल्यानंतर काही प्रमाणात घट येते. त्याचप्रमाणे दळण-कांडन व साफ केल्यानंतर काही प्रमाणात कचरा, खडे, मातेरे निघते. तसेच वातावरणात वेळोवेळी होणाऱ्या बदलामुळेही कडधान्याच्या वजनात घट येते. या सर्व कारणामुळे व प्रक्रिया करतांना किराणा मालामध्ये घट-तुट येत असते. वरीलप्रमाणे भाजी बनविणेसाठी लागणारा मसाला देखील तयार करण्यात येतो. त्याकरीता मसाल्याचे पदार्थ उदा. हिरवी विलायची, लवंग, तेजपान, हळद, मिरची इ.वापरणेत येत असून त्यामध्ये देखील वरील प्रमाणे प्रक्रीया केली असता काही प्रमाणात घट येत असते.

याबाबत सन-२००५-२००६ मध्ये प्रसादालयाचे लेखापरिक्षणामधील मुद्दा व मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०५/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४०५ नूसार, सन २००७-०८ पासून पुढे श्री लोंगाणी, स्थानिक अंतर्गत लेखापरिक्षक यांचे सुचनेनूसार शासकीय डिपार्टमेंटकडून माहीती घेवून श्री लोंगाणी यांचे मार्गदर्शनाने नियमावली करुन घट-तुट दर्शविण्याची कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली होती. घट-तुटीबाबत शासनाची निश्चित अशी नियमावली नसल्यामुळे त्याकरीता शासकीय संस्था, इतर देवस्थान, सरकारी कारागृह, मिलीटरी कॅम्प, सरकारी अन्नधान्य महामंडळ अशा १० संस्थांना प्रशासन शाखा जा.नं.७८३७ दि.२१/०५/२००७ पत्र पाठवून त्यांचेकडे असलेली धान्य कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीची पध्दती लिखीत स्वरुपात मागविणेत आलेली होती.

त्यानूसार धान्य कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबत खालील तीन शासकीय व धार्मिक देवस्थानांकडून धान्य कडधान्य व किराणा मालाचे प्रचलीत घट-तुटीबाबत माहीती प्राप्त झाली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| **अ.नं.** | **संस्थेचे नांव** | **तपशिल (प्रति क्विंटल घट-तुट)** |
|---|---|---|
| ०१. | येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे | ज्वारी-४%, बाजरी-५%, गहू-५%, तांदूळ-२%, सर्व प्रकारच्या डाळी-२%, फळभाजी-५%, पालेभाजी-१०%, ज.लाकूड/कोळसा-५% |
| ०२. | मध्यवर्ती कारागृह, नासिकरोड | साखर व वन.तुप या खाद्यतेलास घट नाही मात्र कडधान्य व डाळी-२% |
| ०३. | गजानन महाराज संस्थान, शेगांव | प्रती क्विंटल ३% ते ५% एवढी घट-तुट दर्शविलेली आहे. |

उपरोक्त सदर पध्दतीचा विचार करुन मा.श्री अभय शास्त्री (सी.ए.), मा.श्री.ए.जी.लोंगाणी, (सी.ए.) हे संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षक व मुख्य लेखाधिकारी यांनी खालीलप्रमाणे संस्थानची घट-तुटीबाबतची नियमावली बनविणेत आलेली असून त्यास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेत निर्णय क्रं.५६० नूसार मान्यता मिळालेली आहे तेंव्हापासून प्रचलीत नियमावलीप्रमाणे आजतागायत कार्यवाही चालू आहे.

1) सन २००७ -२००८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचिलत घट-तुटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तुट योग्य असून इतरांचे तुलनेने कमी असलेने दर सहा महिन्यानंतर प्रस्तावित घट-तुट नांवे टाकणेत यावी.

2) दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे दिसणारा मालाचा साठा याची पडताळणी करावी.

3) दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिष्टरप्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढळल्यास त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल मा. व्यवस्थापन समिती समोर अवलोकनार्थ सादर करावा. मात्र प्रस्तावित सरासरी पेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.

उपरोक्त नियमावलीनुसार व मा.व्यवस्थापन समिती निर्णयानूसार प्रसादालयातील धान्य-कडधान्य व किराणा मालाची घट-तुट खर्ची टाकणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षामध्ये श्री साई प्रसादालयातील धान्य-कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

सन २०१६-२०१७ मध्ये धान्य-कडधान्य व किराणा मालामध्ये आलेल्या घट-तुटीचा तपशिल-

| **अ.नं.** | **मालाचा तपशिल** | **दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ अखेर प्रत्यक्ष खर्च झालेला माल** | **दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ अखेर प्रत्यक्ष आलेली घट-तुट** | **घट-तुटीचे प्रमाण** | **मान्य झालेल्या घट-तुटीचे प्रमाण** |
|---|---|---|---|---|---|
| | | किलो/ग्रॅम | किलो/ग्रॅम | टक्केवारीमध्ये | टक्केवारीमध्ये |
| १ | गहु | ११७४२३६.००० | ३०९९२.००० | २.६४ | ३.०० |
| २ | तांदूळ | ८०१४५५.००० | ४५४९.००० | ०.५७ | १.०० |
| ३ | तुरदाळ | ९७८६६.२५० | ६२२.००० | ०.६४ | १.०० |
| ४ | हरबरा दाळ | ४६४६६.५०० | ३७३.५०० | ०.८० | २.०० |
| ५ | मुगदाळ | ७६९९०.००० | ५३८.००० | ०.७० | १.०० |
| ६ | गुळ | २६८६९.२०० | १४४.५०० | ०.५४ | १.०० |
| ७ | रवा | ४८७०२.५०० | ३४३.५०० | ०.७१ | १.०० |
| ८ | शेंगदाणे | ३९८८२.५०० | ३२३.००० | ०.८१ | १.०० |
| ९ | मिरची | १४०३३.००० | ३९०.००० | २.७८ | ४.०० |
| १० | हळद | ९८४१.४५० | २९१.००० | २.९६ | ४.०० |
| ११ | मोहरी | ४८८२.००० | ६८.००० | १.३९ | २.०० |
| १२ | जिरे | ६०९२.००० | ९३.००० | १.५३ | २.०० |
| १३ | मसाला | २१४०.४५० | ४४.२५० | २.०७ | २.२५ |
| १४ | धने पावडर | १४२९१.७०० | २६२.५०० | १.८४ | २.५० |
| १५ | खोबरेवाटी | १४९०१.२५० | १०४.००० | ०.७० | १.०० |
| १६ | हरबरा | ६१५६६.२५० | ४५१.००० | ०.७३ | १.०० |
| १७ | वाटाणा | ५१९४५.००० | ३११.००० | ०.६० | १.०० |
| १८ | मुग | ७८४२९.२५० | ५७६.००० | ०.७३ | १.०० |
| १९ | मठ | ८०५००.००० | ५३०.००० | ०.६६ | १.०० |
| २० | मेथी | ३०९.८०० | ४.५५० | १.४७ | २.२५ |
| २१ | सुंठ | २३५.००० | ८.९५० | ३.८१ | ५.२५ |
| २२ | मैदा | ३६०३०.००० | १२९.००० | ०.३६ | ०.५० |
| २३ | भगर | २२५.५०० | ४.५०० | २.०० | २.०० |
| २४ | साबुदाणा | २३८८३.००० | २२८.००० | ०.९५ | १.२५ |
| २५ | कच्चे पोहे | १२३१.५०० | १०.३०० | ०.८४ | १.०० |
| २६ | भाजके पोहे | २०२०.००० | ६३.००० | ३.१२ | ४.०० |
| २७ | डाळ्या | ४८७.००० | ४.००० | ०.८२ | १.२५ |
| २८ | चवळी | १६८२४.००० | ७४.००० | ०.४४ | १.०० |
| २९ | काबुली चना | ६६८०.००० | ३४.००० | ०.५१ | १.०० |

मागणी:- सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षामध्ये प्रत्यक्ष शिल्लक किराणा मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे खर्ची पडलेला किराणा माल याची तपासणी करण्यात आलेली आहे. सदर घट-तुटीचे अवलोकन करता प्रत्यक्ष आलेली घट-तुट ही मान्य असलेल्या घट-तुटीचे प्रमाणापेक्षा कमी प्रमाणात आहे. त्यामुळे सदरील घट-तुट नांवे टाकण्याचा वस्तुनिष्ठ अहवाल मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणे गरजेचे आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान :- आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :- तरी उपरोक्तप्रमाणे सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षामध्ये श्री साई प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट ही संस्थानने निश्चित केलेल्या प्रमाणापेक्षा कमी प्रमाणात आहे. तरी सदरचे अहवालास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी उपरोक्त विषयाची टिपणी मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ फेरसादर.

**निर्णय क्र.७३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षातील श्री साई प्रसादालयातील धान्य-कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबतच्या उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५३** **श्री साई समाधी शताब्दी वर्ष २०१७-१८ चे निमित्ताने होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभुमीवर साईभक्तांना विक्री करण्यात येणाऱ्या मोतीचुर लाडू प्रसाद पाकिटांऐवजी १५० ग्रॅम वजनाचे बुंदी प्रसाद पाकीटे विक्रीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ)** - सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

**प्रास्ताविक-** श्रींचे दर्शन झालेनंतर बाहेरुन येणा-या साईभक्तांना प्रसाद म्हणुन एखादा पदार्थ घरी नेता यावा, या उद्देशाने शुध्द गावराण तुपापासुन मोतीचुर लाडु बनविण्याचे ठरले. सदरचे मोतीचुर लाडु शुध्द गावराण तुपात बनविलेले असल्याने सकस व पौष्टीक असतात, त्यामुळे प्रथतमः दर्शन रांगेमधून साईभक्तांना प्रसाद लाडूचे मोफत वितरण करण्यास मान्यता देण्यात आली होती. साईभक्तांना त्याचा अल्पोपहार/प्रसाद म्हणूनही उपयोग करता येईल, असा मा.त्रिसदस्यीय समितीचा हेतु होता. या सर्व बाबींचा विचार करुन मा. त्रिसदस्यीय समितीने मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या निर्णयास अधीन राहुन दि.१५ ऑगस्ट २०१३ पासुन साईभक्तांना प्रथमतः दर्शन रांगेमध्ये मोफत लाडू प्रसाद वाटप करणेस मान्यता दिली होती.

परंतु भक्तांची वाढती गर्दी व तयार होणारे मोंतीचुर लाडु प्रसाद पाकीटे साठा यांचा ताळेबंद लक्षात घेता, तयार होणारी पाकीटे ही गर्दीच्या संख्येपेक्षा निश्चितच कमी आहेत. त्यामुळे दर्शनरांगेमधील भक्तांना मोतीचुर लाडु पाकीटाऐवजी १०० ग्रॅम वजनाच्या बुंदी प्रसाद पाकिटाचे वाटप करण्यात यावे." असे ठरले होते. मात्र नंतर सदरची १०० ग्रॅम बुंदी प्रसाद साईभक्तांकडुन पुर्ण खाल्ला जात नाही व तो इतरत्र सांडुन पायाखाली येत असल्याने १०० ग्रॅम बुंदी प्रसादाचे पाकीटाऐवजी ५० ग्रॅम बुंदी प्रसाद पाकीटाचे वाटप करण्यात यावे असे ठरले आहे. त्यानुसार सदरची कार्यवाही दि.०३/०९/२०१६ पासुन सुरु आहे.

त्याचप्रमाणे श्री साई समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोंबर, २०१७ पासुन सुरु होत असल्याने शिर्डीमध्ये साईभक्तांची प्रचंड प्रमाणात गर्दी वाढणार आहे. त्यामुळे येणा-या साईभक्तांच्या गर्दीनुसार त्यांना प्रसादरुपी लाडु/बुंदी प्रसाद पाकीटे वितरण करणे गरजेचे आहे. लाडु निर्मितीचे काम हे मनुष्यबळाव्दारे (Man Power) करुन घेतले जात आहे, त्यासाठी कोणतीही अत्याधुनिक मशिनरी अजुन विभागाकडे तसेच बाजारातही तपास केला असता तशी मशीनरी उपलब्ध नसल्यामुळे होणा-या संभाव्य गर्दीच्या प्रमाणात लाडु निर्मिती होणे आवश्यक आहे. मात्र त्यासाठी पुरेशी मोकळी जागा व साधनसाम्रगीची आवश्यकता आहे. सदरचे ठिकाणी मोकळी जागा व साहित्य यांचा अभाव असल्यामुळे केवळ लाडु प्रसाद वितरण करुन होणा-या गर्दीचे नियोजन करण्यास अडचणींचे होणार आहे .

त्यासाठी साई समाधी शताब्दी वर्ष २०१७-१८ चे निमित्ताने होणा-या गर्दीचे पार्श्वभुमीवर जास्तीत जास्त साईभक्तांना प्रसादाचा लाभ मिळावा या उद्देशाने मागील कुंभमेळा पर्वामध्ये आपत्ती व्यवस्थापन म्हणुन केलेप्रमाणे १५० ग्रॅम सुटी बुंदीची पाकीटे पॅकींग करुन विक्री करणेसाठी दि.२३.०७.२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.२०७ अन्वये, मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार कुंभमेळा पर्वामध्ये

विविध ठिकाणच्या काऊंटर्सवर प्रत्येकी १५० ग्रॅम वजन असलेले बुंदीची पाकीटे भक्तांना विक्रीसाठी ठेवण्यात आली होती. त्याप्रमाणे साई समाधी शताब्दी वर्षात आपत्तकालीन परिस्थितीमध्ये १५० ग्रॅम वजनाचे बुंदी पाकीटे भक्तांना विक्री केल्यास गर्दीवर नियंत्रण ठेवता येईल व प्रसादाचे नियोजन करता येऊन जास्तीत जास्त भक्तांना त्याचा लाभ देता येईल व एका १५० ग्रॅम सुटी बुंदी पाकीटाची किंमत लाडु प्रसाद पाकीटाप्रमाणेच रु.२५/- इतकी ठेवता येईल.

मागणी- साई समाधी शताब्दी वर्षात लाडु/बुंदी प्रसादाचा सर्व साईभक्तांना लाभ मिळावा या दृष्टीने लाडु निर्मितीमध्ये उत्पादनात वाढ करणेसाठी प्रयत्न करता येईल सध्या लाडू पाकीटाची किंमत रु.२५/- इतकी आहे, त्याप्रमाणे सदर १५० ग्रॅम वजनाचे ०१ सुटी बुंदी पाकीटाची किंमत रु.२५/- इतकी ठेवता येईल व भविष्यात लाडू पाकीटांची किंमतीत वाढ झाल्यास त्याप्रमाणे बुंदी पाकीटाची किंमत ठेवता येईल. जास्त गर्दीच्या आपत्तकालीन परिस्थितीमध्ये श्रींचा प्रसाद म्हणुन साईभक्तांना सदरची बुंदी पाकीटे विक्रीसाठी उपलब्ध करुन देता येईल.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- श्रीसाई समाधी शताब्दी वर्षात लाडु/बुंदी प्रसादाचा सर्व साईभक्तांना लाभ मिळावा या दृष्टीने लाडु निर्मितीमध्ये उत्पादनात वाढ करणेसाठी प्रयत्न करुन जास्तीत जास्त साईभक्तांना त्याचा लाभ देता येईल. व सदर १५० ग्रॅम वजनाचे सुटी बुंदी पाकीटांची किंमत रु.२५/- इतकी करता येईल. व जास्त गर्दीच्या वेळेस आपत्तकालीन परिस्थितीमध्ये प्रसाद म्हणुन साईभक्तांना सदरची बुंदी पाकीटे विक्रीसाठी उपलब्ध करुन देता येईल. असे विभागाचे स्पष्ट मत आहे. त्यानुसार मोतीचुर लाडु प्रसादाच्या उत्पादनात वाढ करणेसाठी प्रयत्न करणेही अनिवार्य आहे.

तरी उपरोक्त वस्तुस्थिती व कुंभमेळा पर्वामध्ये झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयास अनुसरुन, श्री साई समाधी शताब्दी वर्षात देखील संभाव्य गर्दीचे नियोजन व नियंत्रण करणेसाठी प्रत्येकी १५० ग्रॅम वजानाचे बुंदी पाकीटे पॅकींग करुन सदरची बुंदी पाकीटे आपत्तकालीन परिस्थितीमध्ये साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यास व प्रती १५० ग्रॅम बुंदी पाकीटाची किंमत लाडू पाकीटाप्रमाणे ठेवण्यास, मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई समाधी शताब्दी वर्ष २०१७-१८ चे निमित्ताने होणाऱ्या गर्दीच्या पार्श्वभुमीवर, आपत्कालीन परिस्थितीमध्ये साईभक्तांना विक्री करण्यात येणाऱ्या मोतीचुर लाडू प्रसाद पाकिटांऐवजी १५० ग्रॅम वजनाचे बुंदी प्रसाद पाकीटे विक्री करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.५४** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाचे कालावधीत आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास भाविकांना आश्रय देण्यासाठी अथवा अन्य कारणांसाठी जागा अधिग्रहण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील १७(१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्थापाहणे,मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे,ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवथेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक तया जमीनी व इमारती संपादित करील किंवा खरेदी करील.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम १(ग) अन्वये भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे, अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव-** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाचे कालावधीत आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास भाविकांना आश्रय देण्यासाठी अथवा अन्य कारणांसाठी जागा अधिग्रहण करणे..

**प्रस्तावना-**श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवासाठी मान्यता मिळालेल्या कृती आराखडयाप्रमाणे घेण्यात आलेल्या विविध निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी श्री.प्रविण परदेशी, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे प्रधान सचिव यांचे अध्यक्षतेखाली दि.०३/०५/२०१७ रोजी मंत्रालय,मुंबई येथे आढावा बैठक पार पडली आहे. त्यात शासनाच्या संबंधीत प्रशासकीय विभागामार्फत कृती आराखडयातील निर्णयाची अंमलबजावणीसाठी सर्वंकष चर्चा करण्यात आली व सदर चर्चेच्या अनुषंगाने विविध निर्णय घेण्यात आलेले आहेत. त्यात अ.नं.९ प्रमाणे शिर्डी नगरपंचायत हद्दीतील आरक्षण क्र.०६ व ३१ मध्ये एकूण १२.०१ एकर हे बगीचासाठी आरक्षित असलेले खाजगी क्षेत्र आहे. शताब्दी कालावधीत आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास भाविकांना आश्रय देण्यासाठी दोन महीन्यांकरीता आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत सदर जागा अधिग्रहण संस्थानला करुन देण्यात यावी,असेबाबतचा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने संस्थानच्या मा.मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रुबल अग्रवाल मॅडम, श्री.मनोज घोडेपाटील, उपजिल्हाधिकारी, श्री.धनंजय निकम, उपजिल्हाधिकारी, डॉ.संदिप आहेर, उपकार्यकारी अधिकारी, संस्थान बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीघुले व उपकार्यकारी अभियंता श्रीआर.बी.आहेर यांनी उपरोक्त खाजगी क्षेत्राचे तसेच शिर्डी नगरपंचायत हद्दीतील संस्थान मालकीचे सर्वे नं.५४ व ५५ पै.मधील सुमारे ५ एकर क्षेत्राचे समक्ष स्थळनिरीक्षण केले असता त्यात श्री साईबाबा समाधी मंदिरापासून उपरोक्त खाजगी क्षेत्राचे अंतर ४५३ मीटर इतके असलेचे आणि समाधी मंदिर ते संस्थान मालकीचे क्षेत्राचे अंतर मार्ग क्रं.२ ने ३१३ मीटर व मार्ग क्रं.३ ने ४०५ मीटर असलेचे दिसून आलेले आहे. संस्थान मालकीचे क्षेत्रापासून समाधी मंदिराकडे जाणेसाठी दोन मार्ग आहेत. मात्र उपरोक्त खाजगी क्षेत्राकडून समाधी मंदिराकडे जाणेसाठी एकच मार्ग आहे शिवाय त्याचे अंतर देखील संस्थान मालकीच्या क्षेत्रापेक्षा जास्त आहे, सदरचे खाजगी क्षेत्र आरक्षित केल्यास सदर खाजगी मालकांना नियमाप्रमाणे भाडयाची रक्कम अदा करावी लागेल.

**विभागाचा अभिप्राय-** सदर दोन्ही जागांपैकी संस्थानचे मालकीची जागा, आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास भाविकांना आश्रय देण्यासाठी यथायोग्य असल्याचे दिसून आलेले आहे. त्यासाठी सदर जागेचा उपयोग करता येईल. परिणामी शिर्डी नगरपंचायत हद्दीतील आरक्षण क्रं.०६ व ३१ मधील एकूण १२.०१ एकर बगीचासाठी आरक्षित असलेले खाजगी क्षेत्र उक्त कारणासाठी सध्यस्थितीत अधिग्रहण करण्याची आवश्यकता नाही. तथापि उक्त कारणास्तव अथवा याव्यतिरिक्त अन्य कारणासाठी समाधी शताब्दी वर्षातील उत्सव कालावधीतील व शेवटच्या महीन्यातील गर्दीच्या अंदाजानुसार भविष्यात गरज पडल्यास सदरचे शिर्डी नगरपंचायत हद्दीतील आरक्षण क्रं.६ व ३१ मधील एकूण १२.०१ एकर बगीचासाठी आरक्षित असलेले खाजगी क्षेत्र अधिग्रहण करता येईल.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाचे कालावधीत आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास भाविकांना आश्रय देण्यासाठी अथवा अन्य कारणांसाठी शिर्डी नगरपंचायत हद्दीतील आरक्षण क्रं.६ व ३१ मधील एकूण १२.०१ एकर बगीचासाठी आरक्षित असलेले खाजगी क्षेत्र अधिग्रहण करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५५** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षानिमित्त साईभक्तांच्या सुविधेकरीता शिर्डी परिसरातील खाजगी मालकीच्या जमीनी तात्पुरत्या कालावधीसाठी मोफत दर्शनरांग प्रवेशपत्र काऊंटरसाठी अधिग्रहीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) मधील तरतुदीनुसार विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबवविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील.

**प्रस्ताव–** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षानिमित्त साईभक्तांच्या सुविधेकरीता शिर्डी परिसरातील खाजगी मालकीच्या जमीनी तात्पुरत्या कालावधीसाठी मोफत दर्शनरांग प्रवेशपत्र काऊंटरसाठी अधिग्रहीत करणे व त्यासाठी होणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत..

**प्रस्तावना-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षानिमित्तच्या कृती आराखडयाप्रमाणे संस्थानचे जूने प्रसादालय इमारत परिसरातील इमारती पाडून त्या ठिकाणी प्रस्तावित दर्शनरांगेचे काम सुरु करावयाचे

असल्याने सध्यस्थितीत त्याठिकाणी असलेले मोफत दर्शन रांग प्रवेशपत्र काऊंटर अन्यत्र हलविणे क्रमप्राप्त झालेले आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त ०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत शिर्डी येथे होणा-या साईभक्तांच्या संभाव्य गर्दीचे व्यवस्थापन करणेच्या दृष्टिने तात्पुरती व्यवस्था म्हणून साईभक्तांच्या सुविधेच्या दृष्टिने मोफत दर्शनरांग प्रवेशपत्र काऊंटर हे मंदिर परिसराच्या नजीक असणे आवश्यक आहे. त्या दृष्टिकोनातून शिर्डी येथील श्री.नितीन उत्तम कोते व इतर यांचे मालकीची जमीन सर्वे नं.४/१ क्षेत्र ३ हेक्टर ०२ आर ही संस्थान परिसराचे नजीक व सोयीस्कर असलेचे दिसून येते. उपरोक्त क्षेत्रापैकी मोफत दर्शनरांग प्रवेशपत्र काऊंटरसाठी आवश्यक असलेले खालील नमूद केलेले सोबतच्या नकाशात दर्शविलेले क्षेत्र तात्पुरत्या स्वरुपात सुमारे १८ महीने ते २४ महीने कालावधीसाठी किंवा प्रस्तावित दर्शनरांगेचे काम पूर्ण होईपर्यंत मुंबई जमीन अधिग्रहण अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार अधिग्रहण करुन मिळणेकामी तहसिलदार,राहाता यांचेकडेस प्रस्ताव सादर करता येईल.

| अ.नं. | गाव | सर्वे नं./ गट नं. | ठिकाण | जागा मालक | ७/१२ प्रमाणे क्षेत्र (हे.आर) | आवश्यक क्षेत्र (हे.आर) | जागा वापराचे प्रयोजन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिर्डी | ४/१ | हॉटेल कल्पतरुचे मागे (सोबतच्या नकाशात दर्शविलेले क्षेत्र) | श्री.नितीन उत्तमराव कोते व इतर | ०३.४५ | ००.८० | मोफत दर्शनरांग प्रवेशपत्र काऊंटरसाठी |

**मोफत दर्शनरांग प्रवेशपत्र काऊंटरसाठी जमीन अधिग्रहण (भाडे दराबाबत)**

| | |
|---|---|
| भाडयाने घ्यावयाचे प्रस्तावित क्षेत्र (०.८२ आर) | ८२०० चौमी |
| रेडी रेकनरप्रमाणे दर प्रति चौमी | रु.२३,२००/- |
| रेडी रेकनरप्रमाणे जमीनीची एकूण होणारी किंमत | रु.१९,०२,४०,०००/- |

**मुद्रांक शुल्कव नोंदणी फी**

| | |
|---|---|
| जमीनीचे मुल्यांकन | रु.१९,०२,४०,०००/- |
| १ वर्षे मुदतीने असल्याने सदर रकमेच्या १० % रक्कम | रु. १,९०,२४,०००/- |
| सदर १० % रकमेवर ४% मुद्रांक शुल्क | रु. ७,६०,९६०/- |
| नोंदणी फी | रु. ३०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| १) | वार्षिक भाडे | रु. १,१४,१४,४००/- |
| २) | मुद्रांक शुल्क | रु. ७,६०,९६०/- |
| ३) | नोंदणी फी | रु. ३०,०००/- |
| | एकूण | रु. १,२२,०५,३६०/- |

सदरचे क्षेत्र १८ महीने ते २४ महीने या कालावधीसाठी अधिग्रहीत करावयाचे झाल्यास शासकीय रेडी रेकनरचे दराप्रमाणे सुमारे २ वर्षाचे भाडे, मुद्रांक शुल्क व नोंदणी फी असे एकूण सुमारे रु.२,३७,००,०००/- (अक्षरी रु.दोन कोटी सदोतीस लाख मात्र) इतका खर्च होणार आहे.

**विभागाचा अभिप्राय-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त साईभक्तांच्या सुविधेकरीता सध्यस्थितीत जून्या प्रसादालयात असलेले मोफत दर्शनरांग प्रवेशपत्र काऊंटर हे मंदिराच्यानजीकच्या परिसरातील श्री.नितीन कोते व इतर यांचे मालकीचे जमीन सर्वे नं.४/१ क्षेत्र ३.२ आर पैकी नकाशात दर्शविल्याप्रमाणे ०.८२ आर तातडीने ऑगस्ट २०१७ पासून ते कमीत कमी शताब्दी महोत्सव संपेपर्यंत म्हणजे डिसेंबर २०१८ किंवा नवीन दर्शनरांग प्रकल्प पूर्ण होईपर्यंत साधारणत १८ महीने ते २४ महीने या कालावधीसाठी भाडेकराराने अधिग्रहीत करणे आवश्यक आहे. त्यापोटी अंदाजे सरकारी मुल्यांकनाप्रमाणे २ वर्षाकरीता २,३७,००,०००/- (अक्षरी रु.दोन कोटी सदोतीस लाख मात्र) इतका खर्च करावा लागणार आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेली जमीन मुंबई जमीन अधिग्रहण अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार अधिग्रहण करुन मिळणेकामी तहसिलदार,राहाता यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेच्या व सुमारे १८ महीने ते २४ महीने या कालावधीसाठी भाडेकराराने आवश्यक असलेल्या खर्चास मान्यतेचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे चर्चा करुन निर्णय घेणेसाठी सादर.

**निर्णय क्र.७३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षानिमित्त साईभक्तांच्या सुविधेकरीता मोफत दर्शनरांग प्रवेशपत्र काऊंटरसाठी उपरोक्त जमीन नमुद कालावधीसाठी अधिग्रहीत करणेस व त्यासाठी प्रस्तावास नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. तथापि, जमिन मालकांशी चर्चा होईपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५६** **श्रीसाई प्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधिल फ्लोअरिंग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ ट्रेमिक्स कॉंक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन ग्रेनाईट फ्लोअरींग व डॅडो बसविणेकामी प्राप्त ई-निविदाचे देकारांवर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ (१) पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ रोजी सभेतील निर्णय क्र.३९६ अन्वये खालील प्रमाणे ठराव संमत झालेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधील फ्लोअरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ ट्रेमिक्स कॉंक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन फ्लोअरींग व डॅडो बसविणेबाबत प्रस्तावात नमुद केलेल्या पर्याय क्र.१ नुसार कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली."*

**प्रस्तावना:** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील उपरोक्त निर्णयानुसार श्री साईप्रसादालयाचे मुख्य प्रसाद भोजन हॉलमधील व्हिट्रीफाईल्ड फ्लोरींग काढुन त्याऐवजी आर्किटेक्ट शक्ती परमार ॲण्ड असो., मुंबई यांनी सुचविल्याप्रमाणे प्रसादालयाचे मुख्य भोजन हॉलचे फ्लोअरींग व हॉलमधील कॉलमचे भोवती डॅडो करीता १८ ते २० एमएम जाड ग्रेनाईट स्टोन बसविणे व पाणी वाहून जाण्यासाठी स्टेनलेस स्टील नाल्या बसविणेस येणा-या रक्कम रु. १,३५,९६,९४७/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली आहे. तसेच मुख्य किचन व बुंदी किचनमध्ये सध्याचे ट्रिमीक्स कॉन्क्रीट फ्लोअरींग चार ते पाच इंच पर्यंत तोडून त्यावर २० ते २५ एम एम जाड लेदर फीनीश ग्रेनाईट फ्लोअरींग बसविणे व किचन मधील छोटया पार्टीशन वॉलच्या भिंतींना डॅडो करीता १८ ते २० एमएम जाड ग्रेनाईट बसविणे व किचनमधील पाणी वाहून जाण्यासाठी स्टील नाल्या बसविणे कामासाठीरु.८८,६५,८०३/- याप्रमाणे एकूण रु.२,२४,६२,७५०/- इतक्या खर्चास आणि उपरोक्त कामांकरीता विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देणेत आली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सदरहू निर्णयानुसार याकामी वृत्तपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. ठेकेदार यांना ई-निविदा अपलोड करण्याची अंतीम मुदत दि. ०१/०८/२०१७ अखेर ठेवण्यात आली होती. या मुदतीत खालील तीन ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केलेल्या आहेत.

| अ.न. | ठेकेदाराचे नाव |
|---|---|
| १ | C4 Infrastructure Pvt. Ltd. Nashik |
| २ | Shri D.S. Shewale, Junnar, Pune |
| ३ | Shri R.K. Sawant, Nashik |

वरील प्राप्त ई-निविदांचे तांत्रिक लिफाफे मा. खरेदी समितीचे दि. ०४/०८/२०१७ रोजीचे सभेपुढे उघडणेत आले असुन ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असताउपरोक्त तीनही ठेकेदार पात्र

झाले आहेत.ठेकेदार यांनी सादर केलेल्या ई-निविदांचा वाणिज्यीक लिफाफा दि. १९/०८/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आला असुन त्यांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | ठेकेदाराचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | C4 Infrastructure Pvt. Ltd. Nashik | रु. २,१०,३४,७४०/- | -- |
| २ | Shri D.S. Shewale, Junnar, Pune | रु. २,००,६३,१५५/- | -- |
| ३ | Shri R.K. Sawant, Nashik | **रु. १,८९,६२,२२३/-** | निम्नतम |

उपरोक्त तपशिलानूसार तीन निविदाधारकांपैकी ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांचे दर निम्नतम आहेत. तरी याकामी निम्नतम दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाई प्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मध्ये सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ ट्रेमिक्स कॉंक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन ग्रेनाईट फ्लोअरींग व डॅडो बसविणेकामी आर. के. सावंत, नाशिक यांचे रु.१,८९,६२,२२३/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५७** **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे उर्वरीत ३८६ खोल्यांसह नुतनीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :**

1. निर्णय क्र. ७४५ दिनांक १५/०९/२०१२
2. निर्णय क्र.४४८ दिनांक २१/०६/२०१३
3. निर्णय क्र. ५३३ दिनांक २६/०६/२०१४
4. निर्णय क्र. २५७ दिनांक २७/०४/२०१७

**प्रस्तावना:** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) इमारतीतील १०० खोल्यांचे नुतनिकरण पहिल्या टप्प्यात करणेत आले असुन उर्वरीत ३८६ खोल्या व इमारतीचे नुतनीकरण कामातील सिव्हील कामांसाठी दि.१७/०७/२०१७ अखेर रु. १२,३७,६१,६५९/- मात्र खर्चाच्या ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. या कामासाठी खालील एकूण ८ ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केल्या होत्या.

| Sr. No. | Name of Bidder |
|---|---|
| 01. | M/s.Sai Construction, Ahmednagar |
| 02. | Klassic Associates, Nashik |
| 03. | Prakash Constrowell Limited, Nashik |
| 04. | Accord Associates, Ulhasnagar |
| 05. | Shrinath Construction, Nashik |
| 06. | Jagtap Infraventures Pvt. Ltd., Kolhar |
| 07. | Bafna Realtors Pvt. Ltd., Jalgaon |
| 08. | J.K. Construction & Co., Parali Vaijnath |

वरीलप्रमाणे प्राप्त ई-निविदांचा तांत्रिक माहितीचा लिफाफा क्र.१ (Technical bid) दि.०४/०८/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आला असून त्यांचे छाननी अहवालानुसार अ. क्र.०८ चे निविदा सादरकर्त्या कंपनीचा Turnover रु.६.२० कोटीपेक्षा कमी असल्याने ती अपात्र आहे. उर्वरीत ०७ निविदा सादरकर्ते पात्र होत असल्याने या पात्र ठेकेदारांचा वाणिज्यिक लिफाफा क्र.०२ (Commercial bid) दि.१९/०८/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले आहे. त्यांचे दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे .

| Sr. No. | Name of Bidder | Quoted Amount Rs. | Remark |
|---|---|---|---|
| 01. | M/s.Sai Construction, Ahmednagar | 14,51,10,052.68 | |

| | | | |
|---|---|---|---|
| 02. | **Klassic Associates, Nashik** | **10,98,27,299.60** | **L-1** |
| 03. | Prakash Constrowell Limited, Nashik | 11,94,00,002.57 | |
| 04. | Accord Associates, Ulhasnagar | 15,35,27,533.27 | |
| 05. | Shrinath Construction, Nashik | 13,78,67,948.85 | |
| 06. | Jagtap Infraventures Pvt. Ltd., Kolhar | 19,28,52,748.75 | |
| 07. | Bafna Realtors Pvt. Ltd., Jalgaon | 12,60,67,917.95 | |

**प्रस्ताव:** वरीलप्रमाणे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) इमारतीचे उर्वरीत खोल्यांचे नूतनीकरण कामासाठी प्राप्त झालेले दरामध्ये ठेकेदार Klassic Associates, Nashik यांनी देऊ केलेले दर निम्नतम (L-1) स्वरुपाचे (रु.10,98,27,299.60) आहेत. तरी त्यांचे दर स्विकारणेत येवून, त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७४१** **प्रस्तावितकामीचे निम्नतम दरधारक Klassic Associates, Nashik हे आजचे सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांनी समितीने विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली व या कामासाठी पुर्वी १२% VAT लागू होता, परंतु आता १८% जी.एस.टी. कर प्रणाली लागू झालेली असल्यामुळे यामधील ६% फरकाची रक्कम मिळावी, अशी विनंती केली. तसेच त्यांनी ई-निविदेमध्ये डिफेक्टलायबलीटी कालवधी ६ महिन्यांचा दिलेला होता, तो २ वर्ष करण्यास सभेसमोर संमती दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील उर्वरीत ३८६ खोल्यांचे नुतनीकरण करणेकामी Klassic Associates, Nashik यांचे रु.१०,९८,२७,२९९/- मात्र निम्तम दर स्विकारणेत यावेत. तसेच त्यांचेबरोबर झालेल्या चर्चेप्रमाणे Klassic Associates, Nashik यांना ६% फरकाची रक्कम वेगळी आदा करणेत यावी व त्यांचेकडून २ वर्षाचा डिफेक्टलायबलीटी कालवधी घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५८** **श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेबाबत तसेच दररोज ५० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणे कामाचे ई-निविदेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं १४.(भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

**प्रास्तविक**:- मा.व्यवस्थापन समिती दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३०७ नूसार, श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेबाबत तसेच दर्रोज ५० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणेकामी ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,९२,०३,७२९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन ऑनलाईन ई-निविदा मागविणे आल्या होत्या. विहीत वेळेत प्राप्त झालेले ०३ तांत्रिक ई-निविदा मा.खरेदी समिती दि.२८/०६/२०१७ रोजीचे सभेत उघडणेत आलेली असून त्यामध्ये फक्त दोनच तांत्रिक ई-निविदा पात्र ठरत असल्यामुळे व शासन मानकानूसार व संस्थान नियमानूसार कमीत कमी ०३ निविदा पात्र असणे गरजेचे होते.

त्यामुळे विषयांकितकामी पुन्हा वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन फेर ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. त्यानूसार विहीत वेळेत ०४ (चार) ई-निविदा प्राप्त झालेल्या असून सदर चारही ई-निविदांचे तांत्रिक बीड मा.खरेदी समिती दि.०४/०८/२०१७ रोजीचे सभेत उघडणेत आलेले होते.

निविदेतील अटी/शर्तीनूसार तांत्रिक बीडमध्ये खालील ०३ ई-निविदा पात्र ठरलेल्या असून त्यांचे प्राईसबीड मा.खरेदी समिती दि.१९/०८/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिती सभेपुढे उघडणेत आलेले असून त्यात खालीलप्रमाणे दर देण्यात आलेले आहेत.

| **अ.नं.** | **कामाचा तपशिल** | **बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे** | **बक्शी सिक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्व्हीसेस प्रा.लि.** | **अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेसे, चेन्नई** |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पेस्टकंट्रोलचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेबाबत तसेच दर्रोज ५० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणेबाबत. | रु.३२,७३,१६३/- | रु.२५,८५,७१९/- | रु.१८,९८,०००/- |
| | **प्रति महिना सर्व करांसहीत एकूण रक्कम (दर) रुपये =** | रु.३२,७३,१६३/- | रु.२५,८५,७१९/- | **रु.१८,९८,०००/-** |

**मागणी:-** उपरोक्त प्रास्तविक मधील दराचे तुलनात्मक तक्त्यानूसार, श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेबाबत तसेच दर्रोज ५० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणेकामी अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई यांचे ई-निविदेतील दर सर्व करांसहीत प्रति महिना रक्कम रुपये १८,९८,०००/- (अक्षरी रक्कम रु.अठरा लाख अठ्यान्नव हजार मात्र) असे निम्नतम L1 आलेले आहेत. त्यामुळे वर तक्तयात दर्शविलेप्रमाणे श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेबाबत तसेच दर्रोज ५० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणेकामी अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई यांना मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे बोलावून चर्चा/वाटाघाटी अन्वये निर्णय होणे गरजेचे आहे.

**संस्थान अधिनियम ठराव यानूसार अनुमान/:-** आर्थिक

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:-** तरी प्रास्तविक व मागणी नूसार, श्री साई प्रसादालयील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेबाबत तसेच दर्रोज ५० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदेसाठी अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई यांचे दर सर्व करांसहीत प्रति महिना रक्कम रुपये १८,९८,०००/- (अक्षरी रक्कम रु.अठरा लाख अठ्यान्नव हजार मात्र) असे निम्नतम दर (L1) आलेले आहेत. त्यामुळे त्यांना मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे बोलावून चर्चा/ वाटाघाटी अन्वये दर निश्चित करुन कार्यादेश देणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.७४२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे आऊटसोर्सिंग पध्दतीने काम करुन घेणे तसेच दररोज ५० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणेकामी अपशॉट युटिलिटी सर्व्हीसेस, चेन्नई यांचे प्रति माह रु.१८,९८,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा.**

**तसेच एजन्सीकडून पुरविण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे पोलिस व्हेरीफिकेशन करणे बंधणकारक करावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५९** **सन २०१७-२०१८ करीता मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ नूसार भक्तांना तसेच भक्तांच्या सोयीसाठी आवश्यकत ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**प्रस्तावना:-** सन २०१७-१८ करीता श्री साई प्रसादालयात मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करणेकामी ई-निविदा मागविणेत आलेल्या असून, विहीत वेळेत ०३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर पात्र निविदांचे दरपत्रक मा.खरेदी समिती सभेपुढे उघडणेत येवून, त्यातील प्रथम क्रमांकाचे निम्नतम दर असलेले निविदाधारक दि.यशोधरा महिला सह.उत्पाद.संस्था, नाशिक यांनी चपाती तयार करणेकामी प्रति क्विंटल कोरडा आटा+मैदयास रु.८९०/- सर्व करांसहीत असे दर दिलेले आहेत. व पुरी तयार करणेकामी प्रथम क्रमांकाचे निम्नतम दरधारक श्री साई प्रयाग केटरर्स, शिर्डी यांनी पुरी तयार करणेकामी रु.७४९/- सर्व करांसहीत असे निम्नतम दर दिलेले आहे.

त्यानूसार वरीलप्रमाणे प्राप्त दरपत्रकांचा प्रस्ताव पुढील कार्यवाही मा.व्यवस्थापन उपसमिती दि.०७/०७/२०१७ रोजीचे सभेत सादर करणेत आलेला होता. सदर सभेतील निर्णय क्रं.५२४ नूसार, "श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनमधील स्वामी नारायण पोळी (चपात्या) व पुरी तयार करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील चपाती बनविणेकामीचे निम्नतम दरधारक दि.यशोधरा महिला सह.उत्पाद.संस्था,नाशिक यांनी दिलेल्या प्रति क्विंटल आटा रु.८९०/- मात्र तसेच पुरी तयार करणेकामीचे निम्नतम दरधारक श्री साई प्रयाग

केटरर्स ॲण्ड सप्लायर्स,शिर्डी यांनी दिलेल्या प्रति क्विंटल आटा रु.७४९/- मात्र मध्ये कर्मचा-यांचे वेतनासाठी किती रक्कम व सर्व्हीस टॅक्स वगैरेसाठी किती रक्कम वापरणार , याबाबतचे विवरण लेखी स्वरुपात घेण्यात यावे, त्यानंतर प्रस्तावितकामी कार्यादेश देणेबाबतचा निर्णय घेण्यात यावा. असे ठरलेले आहे."

त्यानूसार मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करुन घेणेकामी १) दि.यशोधरा महिला सह.उत्पाद.संस्था, नाशिक २) श्री साई प्रयाग केटरर्स ॲण्ड सप्लायर्स, शिर्डी यांनी दिलेल्या दरामध्ये कर्मचा-यांचे वेतनासाठी किती रक्कम, सर्व्हीस टॅक्स वगैरेसाठी किती रक्कम वापरणार याबाबतचे विवरण लेखी स्वरुपात दिलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

अ) दि.यशोधरा महिला सह.उत्पाद.संस्था,नाशिक यांनी चपाती/पुरी तयार करणेकामी दिलेल्या प्रति क्विंटल आटा रु.८९०/- मात्र मध्ये कसे काम करुन घेणार याबाबतची माहीती.

| **कमी गर्दीचा कालावधी** | | | **जादा गर्दीचा कालावधी** | | |
|---|---|---|---|---|---|
| **दररोज लागणारा आटा (क्विं.मध्ये)** | **प्रतिक्वि.दर** | **बिलाची रक्कम** | **दररोज लागणारा आटा (क्विं.मध्ये)** | **प्रतिक्वि. दर** | **बिलाची रक्कम** |
| १२ | ८९०.०० | १०,६८०/- | १५ | ८९०.०० | १३,३५०/- |
| कामगार संख्या - २४ | किमान वेतन दर २९४.४७ | ७,०६७/- | कामगार संख्या - ३२ | किमान वेतन दर २९४.४७ | ९,४२३/- |
| ठेकेदार यांनी भरावयाची पी.एफ रक्कम १३.६१% वजा | | ९६२/- | ठेकेदार यांनी भरावयाची पी.एफ रक्कम १३.६१% वजा | | १२८२/- |
| सर्व्हीस टॅक्स १८% वजा | | १९२२/- | सर्व्हीस टॅक्स १८% वजा | | २४०३/- |
| शिल्लक रक्कम = | | ७२९/- | शिल्लक रक्कम = | | २४२/- |

**ब)** श्री साई प्रयाग केटरर्स व सप्लायर्स, शिरडी यांनी चपाती/पुरी तयार करणेकामी दिलेल्या प्रति क्विंटल आटा रु.११९९/- मात्र मध्ये कसे काम करुन घेणार याबाबतची माहीती.

| **चपाती तयार करणेकामी** | | | **पुरी तयार करणेकामी (४ क्विंटल आटाकरीता)** | | |
|---|---|---|---|---|---|
| **दररोज लागणारा आटा (क्विं.मध्ये)** | **प्रतिक्वि.दर** | **बिलाची रक्कम** | | **प्रतिक्वि.दर** | **बिलाची रक्कम** |
| ०४ | ११९९/- | ४,७९६/- | ०४ क्विंटल | ७४९.०० | २,९९६/- |
| कामगार संख्या – १५<br>किमान वेतन दर व लेबर पी.एफसह १२.५%<br>किमान वेतन दर - ३१८/- | | ४,७७०/- | ०१ भट्टीसाठी कामगार संख्या – ०७<br>किमान वेतन दर व लेबर पी.एफसह १२.५%<br>किमान वेतन दर - ३१८/- | | २२२६/- |
| शिल्लक रक्कम = | | ०२६/- | शिल्लक रक्कम = | | ७७०/- |

**श्री साई प्रसादालयाकडील वस्तुस्थिती:-** श्री साई प्रसादालयात मनुष्यबळाव्दारे चपाती बनविणेकामी दररोज सरासरी ४ ते ५ क्विंटल आटयाची आवश्यकता आहे तसेच गर्दीच्या काळात त्याचेच साधारणत: २ ते ३ क्विं वाढ अपेक्षीत आहे. त्यामुळे वरील अ) ठेकेदार दि.यशोधरा महिला सह.उत्पाद.संस्था, नाशिक यांनी दिलेल्या माहीतीमध्ये ब-याच प्रमाणात विसंगती दिसून येत असून त्यांनी दर्शविलेला आटा हा फार मोठया प्रमाणात असल्यामुळे विगतवारीमध्ये त्यांना नफा दिसून येतो. तसेच ब) ठेकेदार श्री साई प्रयाग केटरर्स व सप्लायर्स, शिरडी यांनी नमूद केलेली माहीती काहीशा प्रमाणात बरोबर आहे. मात्र त्यामध्ये त्यांनी सर्व्हीस टॅक्सची रक्कम दर्शविलेली नाही. ती दर्शविल्यास त्यांचे नफ्याबाबत संभ्रम निर्माण होतो.

१. प्रसादालयाचे दफ्तरी मनुष्यबळाव्दारे चपाती तयार करणेकामी खर्ची पडत असलेल्या आटयाचा व दि.यशोधरा महिला सह.उत्पा.सह.संस्था,नाशिक यांचेबाबतचा लेखा-जोखा खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| **चपाती करीता कमी गर्दीचा कालावधी** | | | **चपाती करीता जादा गर्दीचा कालावधी** | | |
|---|---|---|---|---|---|
| **दररोज लागणारा आटा (क्विं.मध्ये)** | **प्रति क्वि. दर** | **बिलाची रक्कम** | **दररोज लागणारा आटा (क्विं. मध्ये)** | **प्रतिक्वि. दर** | **बिलाची रक्कम** |
| ०५ | ८९०.०० | ४,४५०/- | ०८ | ८९०.०० | ७,१२०/- |
| कामगार संख्या - २४ | किमान वेतन दर | ७,०६७/- | | किमान वेतन | ९,४२३/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २९४.४७ | | कामगार संख्या - ३२ | दर २९४.४७ | |
| ठेकेदार यांनी भरावयाची पी.एफ रक्कम १३.६१% वजा | | + ९६२/- | ठेकेदार यांनी भरावयाची पी.एफ रक्कम १३.६१% वजा | | + १२८२/- |
| सर्व्हीस टॅक्स १८% वजा | | + ८०१/- | सर्व्हीस टॅक्स १८% वजा | | + १२८२/- |
| प्रत्यक्षात होणारी तुट = (खर्च-८८३०/- वजा ४४५०/-जमा ) | | - ४३८०/- | प्रत्यक्षात होणारी तुट = (खर्च- ११९८७/- वजा ७१२०/-जमा ) | | - ४८६७/- |

ब) प्रसादालयाचे दफ्तरी खर्ची पडत असलेल्या मनुष्यबळाव्दारे चपाती तयार करणेकामी आटयाचा व श्री साई प्रयाग केटरर्स यांचेबाबतचा लेखा-जोखा खर्चाचा तपशिलामध्ये सेवा कर दर्शविणेत आलेला नसल्याने तो दर्शविल्यास येणारा लेखा-जोखा खालीलप्रमाणे.

| **चपाती तयार करणेकामी** | | | **पुरी तयार करणेकामी (४ क्विंटल आटाकरीता)** | | |
|---|---|---|---|---|---|
| **दररोज लागणारा आटा (क्विं.मध्ये)** | **प्रतिक्वि. दर** | **बिलाची रक्कम** | **दररोज लागणारा आटा (क्विं. मध्ये)** | **प्रतिक्वि. दर** | **बिलाची रक्कम** |
| ०४ | ११९९/- | ४,७९६/- | ०४ | ७४९.०० | २,९९६/- |
| कामगार संख्या – १५ (किमान वेतन दर - २९४.४७) किमान वेतन दर व लेबर पी.एफसह - १३.६१% | | ४,४१७/- ६०१/- | ०१ भट्टीसाठी कामगार संख्या – ०७ किमान वेतन दर - २९४.४७ किमान वेतन दर व लेबर पी.एफसह १३.६१% | | २०६१/- २८१/- |
| सर्व्हीस टॅक्स १८% वजा | | + ८६३/- | सर्व्हीस टॅक्स १८% वजा | | + ५३९/- |
| प्रत्यक्षात होणारी तुट = (खर्च-५८८१/- वजा ४७९६/-जमा ) | | - १०८५/- | प्रत्यक्षात होणारा नफा = (खर्च-२८८१/- वजा २९९६/-जमा ) | | ११५/- |

त्यामुळे वरील १) दि.यशोधरा महिला सह.उत्पाद.संस्था, नाशिक व २) श्री साई प्रयाग केटरर्स अॅण्ड सप्लायर्स, शिर्डी या दोहोंनी दिलेल्या माहीती व प्रत्यक्ष खर्च यामध्ये विसंगती आढळून येत असून त्यांनी संस्थानचे नियमानूसार किमान वेतन व इतर अनुषंगिक कर (पी.एफ, सेवा कर वगैरे) भरल्यास त्यांना मोठया प्रमाणात तोटा सहन करावा लागणार आहे असे नम्र मत आहे.

**मागणी:-** सन २०१७-२०१८ करीता मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदेबाबत, मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करणेकामी १) दि.यशोधरा महिला सह.उत्पाद.संस्था, नाशिक यांचे व २) श्री साई प्रयाग केटरर्स, शिरडी यांचेकडून घेण्यात आलेले लेखी स्वरुपातील माहीतीचा विचार करता, त्यांनी दिलेली माहीती व प्रत्यक्ष खर्च यामध्ये विसंगती आढळून येत असून त्यांनी संस्थानचे नियमानूसार किमान वेतन व इतर अनुषंगिक कर (पी.एफ, सेवा कर वगैरे) भरल्यास त्यांना मोठया प्रमाणात तोटा सहन करावा लागणार आहे. याची त्यांना पुर्वकल्पना देवून त्यांचेकडून तसा करारनामा करुन घेवून त्यांनी मान्य केल्यासच त्यांचे निविदेचा विचार करावा लागेल.

त्याकरीता या दोहोंचे लेखी विवरण व प्रसादालयातील अंदाजे प्रत्यक्ष खर्च याबाबतची माहीती मा.व्यवस्थापन उपसमिती सभेपुढे सादर करीत आहोत.

तसेच चपाती मशिनमध्ये अचानक तांत्रिक बिघाड झाल्यास चपाती ठेकेदाराकडील लेबरकडून त्वरीत पुरी तयार करावी लागत असल्याकारणाने चपाती व पुरी तयार करण्याचे काम हे एकाच ठेकेदाराला असावे असे इकडील विभागाचे मत आहे. तरी उपरोक्त प्रस्तावाबाबत मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय होणे गरजेचे आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान:- आर्थिक**

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:-** सन २०१७-२०१८ करीता मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदेबाबत, मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करणेकामी १) दि.यशोधरा महिला सह.उत्पाद.संस्था, नाशिक यांचे व २) श्री साई प्रयाग केटरर्स, शिरडी यांचेकडून घेण्यात आलेले लेखी स्वरुपातील माहीतीचा विचार करता, त्यांनी दिलेली माहीती व अंदाजे प्रत्यक्ष खर्च यामध्ये विसंगती आढळून येत असून त्यांनी संस्थानचे नियमानूसार किमान वेतन व इतर अनुषंगिक कर (पी.एफ, सेवा कर वगैरे) भरल्यास त्यांना मोठया प्रमाणात तोटा सहन करावा लागणार आहे. याची त्यांना पुर्वकल्पना देवून त्यांचेकडून तसा करारनामा करुन घेवून त्यांनी मान्य केल्यासच त्यांचे निविदेचा विचार करावा लागेल.

त्याकरीता या दोहोंचे लेखी विवरण व प्रसादालयातील अंदाजे प्रत्यक्ष खर्च याबाबतची माहीती मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे पुढील निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.७४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-२०१८ करीता मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करुन घेणेसाठी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रकियेमधील चपाती तयार करणेकामीचे निम्नतम दरधारक दि.यशोधरा महिला सह.उत्पाद.संस्था, नाशिक या संस्थेने सदरचे काम मक्तेदारी पध्दतीने घेतलेले आहे, त्यामुळे किमान वेतन कायद्याप्रमाणे कामगारांना वेतन देणे शक्य होणार नाही, असे नमुद करुन सदर काम करणेस असमर्थतता व्यक्त केली. सबब सदरहू ई-निविदा प्रक्रिया रद्द करुन मनुष्यबळाद्वारे चपाती व पुरी तयार करुन घेणेकामी एकत्रित फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६०** **श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं १४.(भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे .

**प्रास्तविक**:- मा.व्यवस्थापन समिति दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२४७ नूसार, श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३९,५३,१७९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार विहीत वेळेत प्राप्त झालेले तांत्रिक कोटेशन मा.खरेदी समिति दि.१६/०५/२०१७ रोजीपर्यंत फक्त दोनच टेंडर प्राप्त झाले होते. त्यामुळे दि.२६/०५/२०१७ पर्यंत टेंडर भरणेकामी मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानूसार ०३ ई-निविदा प्राप्त झाल्या परंतू एक निविदा तांत्रिक दृष्ट्या अपात्र ठरलेमुळे पुन्हा वृत्पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन फेर ई-निविदा मागविणेत आल्या.

त्यानूसार मागविणेत आलेल्या विहीत तारीख १९/०७/२०१७ पर्यंत फक्त दोनच निविदा आल्या होत्या. त्यामुळे पुन्हा ऑनलाईन टेंडर भरणेच्या मुदतीत दि.२८/०७/२०१७ रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. मुदतीत आलेल्या खालीलप्रमाणे ०२ निविदांचे तांत्रिक बीड दि०४/०८/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिति सभेपुढे उघडणेत आलेले असून पात्र ई-निविदाधारकांचे प्राईसबीड दि.१९/०८/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिति सभेपुढे उघडणेत आलेले असून पात्र निविदाधारकांच्या निविदा (दरपत्रक) मा.खरेदी समिति दि.१९/०८/२०१७ रोजीचे सभेपुढे उघडणेत आलेले असून, त्यात खालीलप्रमाणे दर देण्यात आलेले आहे.

| **अ.नं.** | **कामाचा तपशिल** | **संख्या तपशिल** | **श्री साई केटरर्स, श्रीरामपूर रु. पै.** | **दि.यशोधरा महिला सह. औद्योगिक उत्पा.संस्था, नाशिक रु. पै.** |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई प्रसादालयात (२५ ग्रॅम वजनाच्या पाच पुरी, सुकी भाजी, बर्फी किंवा शिरा अंदाजे वजन २५० ते २७५ ग्रॅम) अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) पॅकींग करुन देणेकामी प्रति पाकीटास सर्व करांसहीत मजुरी दर रुपये | **प्रति ०१ पाकीटास** | २.९५ | **२.६९** |
| | **प्रति पाकीटास सर्वकरांसहीत एकूण रक्कम रुपये =** | | २.९५ | **२.६९** |

**मागणी:-** उपरोक्त प्रास्तविक मधील दराचे तुलनात्मक तक्त्यानूसार, श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी दि.यशोधरा महिला सह.उत्पा. संस्था, नाशिक यांचे सर्व करांसहीत प्रति पाकीटास दर रु.२.६९ पैसे असे निम्नतम (L1) आलेले आहेत. त्यामुळे वर तक्तयात दर्शविलेप्रमाणे अन्नपाकीटे तयार करणेकामी निम्नतम दरधारक दि.यशोधरा महिला सह. औद्योगिक उत्पा.संस्था, नाशिक यांना मा.व्यवस्थापन समिति सभेपुढे बोलावून चर्चा/वाटाघाटी करणे गरजेचे आहे.

**संस्थान अधिनियम ठराव यानूसार अनुमान/:-** आर्थिक

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:-** तरी प्रास्तविक व मागणी नूसार, श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे तयार करणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदेसाठी दि.यशोधरा महिला सह.उत्पा. संस्था, नाशिक यांचे दर प्रति अन्नपाकीटास रु.२.६९ इतके निम्नतम आलेले आहेत. त्यामुळे दि.यशोधरा महिला

सह.उत्पा. संस्था, नाशिक यांचेबरोबर चर्चा/वाटाघाटी करुन कार्यादेश देणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करुन घेणेकामी दि.यशोधरा महिला सह.उत्पा. संस्था, नाशिक यांचे दर प्रति अन्नपाकीटास रु.२.६९ मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा.**

**तसेच किमान वेतन कायद्याप्रमाणे कामगारांना वेतन देणे व वेतन कामगारांचे बँक खात्यामध्ये जमा करणे बंधणकारक असल्याचा उल्लेख त्यांचेबरोबरील करारनाम्यात करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

--------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६१** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील रु. ५० हजार पेक्षा अधिकघसारा वजा किंमत असलेली जुनी वैद्यकिय मशिन्स/ उपकरणे निर्लेखित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद:-** कलम १७ (४)

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:** निर्णय क्र. ६०४, मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०७/२०१७

**प्रस्ताविक:** श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रूग्णालयात सन २००५ पासुन आजपावेतो खरेदी करुन व देणगीदाखल प्राप्त वैद्यकिय उपकरणे व मशिन्सची संख्या अंदाजे एकुण 14319 नग आहे. तसेच श्री साईनाथ रूग्णालयात सन १९९९ त्यापुर्वी पासुन आजपावेतो खरेदी करुन व देणगीदाखल प्राप्त झालेली वैद्यकिय उपकरणे व मशिन्सची संख्या अंदाजे एकुण 13233 नग आहे.

उपरोक्त सर्व मशिन्स नियमीत वापरुन वापरुन खराब होत असतात. सध्या दोन्ही रूग्णालयातीलसर्व मशिन्स/ उपकरणाद्वारे इतर कोणत्याही रूग्णालयापेक्षा अधिक रूग्णांची तपासणी/ उपचार केले जातात. त्यामुळे तसेच काही मशिन्स/ उपकरणे यांचा वापरायोग्य कालावधी देखील संपला आहे. तर काही मशिन्स/ उपकरणे यांचा अधिक वापर होत असल्याने खराब झालेली आहेत. तसेच बाजारात नवीन तंत्रज्ञान आल्यामूळे देखील सदर मशिन्स/ उपकरणे बदलणे आवश्यक आहे. त्यामूळे अशा एकुण ५७ नग मशिन्स/ उपकरणे नवीन खरेदी करणेकरीता श्री साईबाबा हॉस्पीटलच्या खरेदी विभागामार्फत कार्यवाही सुरू आहे. तर त्याव्यतिरिक्त उर्वरीत एकुण २२० नग बदलणेकरीता बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्यास मा. व्यवस्थापन समितीच्या दि. २५/०७/२०१७ च्या सभेत मान्यता मिळाली आहे.

शासन निर्णयानुसार संस्थान अधिनियम 2004 मधील कलम 17 (4) च्या तरतुदीनुसार विश्वस्तव्यवस्थेत निहीत केलेले पन्नास हजार पेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहिर, दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पुर्व मंजुरी शिवाय समितीला विकता येत नाही, तारण म्हणुन ठेवता येत नाही अन्यथा अन्य संक्रामित करता येत नाही. सदर तरतुदीनुसार रू. 50 हजार पेक्षा अधिक मुल्य असणा-या वस्तु निर्लेखित करुन बायबॅक करणेसाठी अथवा लिलावाने विक्री करणेसाठी संस्थानला शासनाची पुर्व मान्यता घेणे बंधनकारक आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचेद्वारे श्री साईनाथ रूग्णालय व श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रूग्णालय ही दोन रूग्णालये चालविली जातात. या दोन्ही रूग्णालयातील, पन्नास हजार पेक्षा अधिक मुल्य असणारी जुनी वैद्यकिय उपकरणे निर्लेखित करणेचे प्रस्ताव संस्थानद्वारे शासनास सादर केले जातात.

राज्य शासन नियंत्रीत अन्य शासकिय रूग्णालयातील जुनी/ निरूपयोगी वैद्यकिय उपकरणे निर्लेखित करणेसाठी निर्लेखन समिती गठीत करण्यात आली असुन सदर समितीच्या अंतिम मान्यतेने शासकिय रूग्णालयातील जुनी वैद्यकिय उपकरणे निर्लेखित करणेस शासन मान्यता दिली जाते. याच धर्तीवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी संचलित दोन्ही रूग्णालयातील जुनी वैद्यकिय उपकरणे निर्लेखित करण्याचे प्रस्ताव शासनास सादर करणे पुर्वी अशी उपकरणे निर्लेखन पात्र आहेत अथवा कसे याबाबत छाननी करणेसाठी संस्थान स्तरावर निर्लेखन समिती खालीलप्रमाणे शासन निर्णयाद्वारे गठीत करणेत आलेली आहे.

शासन निर्णय क्र. क्र. सासंवि १०१६/८७३/प्र.क्र.११४/क्र.१६ ,दि. १५ एप्रिल २०१७ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी संचलित श्री साईनाथ रूग्णालय व श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रूग्णालय या दोन्ही रूग्णालयातील जुनी वैद्यकिय उपकरणे निर्लेखित करण्याचे प्रस्ताव शासनास सादर

करण्यापुर्वी अशा उपकरणांच्या निर्लेखन पात्रतेची संस्थान स्तरावर योग्य पध्दतीने छाननी करणेसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करणेत येत आहे.

1. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी - अध्यक्ष
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी - सदस्य
3. वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा रूग्णालय, शिर्डी - सदस्य
4. वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रूग्णालय, शिर्डी - सदस्य
5. वरिष्ठ जीव वैद्यकिय यंत्र अभियंता, श्री साईबाबा रूग्णालय शिर्डी - सदस्य

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था संचलित दोन्ही रूग्णालयातील जुनी वैद्यकिय उपकरणे निर्लेखित करावयाची असल्यास उपरोक्त समितीच्या मान्यतेने प्रस्ताव शासनास सादर करणे बंधनकारक राहील तसेच निर्लेखन करतेवेळी उपकरणाचे आयुर्मान किमान दहा वर्ष असणे आवश्यक राहील.

वित्त विभाग, परिपत्रक क्र. डीएफपी १०९१/प्र.क्र.४/विनियम, दि. १८/०३/१९९१ सोबत दिलेल्या सहपत्र– महाराष्ट्र पब्लिक वर्क्स मॅन्युअलच्या परि.क्र. ४१५ च्या उता-यानुसार निर्लेखन पात्र उपकरणांचा घसारा काढण्यात यावा. निर्लेखन पात्र उपकरणांची हातची किंमत निश्चित करण्यासाठी आणि निर्लेखन करावयाच्या विविध उपकरणांची जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्यासाठी संस्थान अंतर्गत समिती गठित करण्यात यावी. जुने वैद्यकिय उपकरण बायबॅक करावयाचे नसल्यास अशा वैद्यकिय उपकरणांची विक्री जाहीर लिलाव पध्दतीने करणे बंधकारक राहीलअसे आदेश प्राप्त झाले आहेत.

**मागणी–** खालीलपैकी काही मशिन्सचा शासन निर्णयानसुार १० वर्ष व WHO Guideline नुसार विशीष्ट कालावधीचा वापर झालेला नाही परंतु सदर अशा मशिन्सचे ब्रेकडाउन अधिक प्रमाणात होत असुन त्या करीता खर्च देखील अधिक होत आहे त्यामूळे अशा मशिन्स देखील बदलणे आवश्यक आहे. श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ५८ नग व श्री साईनाथ रूग्णालयातील ५ नग मशिन्स ज्यांची घसारा वजा जाता किमत रू ५० हजार पेक्षा अधिक आहे अशा मशिन्स निर्लेखन पात्र आहेत किंवा नाहीत यांची छाननी करणेसाठी निर्लेखन समितीची बैठक आयोजित करणेस तसेच मशिन निर्लेखित करणेबाबत सदर बैठकीमध्ये निर्णय होणेसाठी खालीलप्रमाणे दोन्ही रूग्णालयातील मशिन्सची यादी सादर करणेत येत आहे.

**Shri Saibaba Hospital, Shirdi**

**Annexure 'A' -Replacement list -Depreciated cost more than Rs. 50000/-**

| Sr No | Name of Medical Equipment/ Machine | Model | Make | Qty | Purchase year | Cost in Rs. | Depreciated Cost on Dt. 31/03/17 (in Rs.) | Expenditure On Machines In Rs. | Life Expectancy in Yrs as per WHO Guidelines | Used for Yrs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **A** | **End of Life as per Govt. Resolution(10 years) & WHO Guidelines** | | | | | | | | | |
| **a** | **Radiology- CT Scan** | | | | | | | | | |
| 1 | 64 Slice CT Scan Machine with accessories | Somatom Sensation 64 Cardiac | M/s. Siemens Ltd, Mumbai | 1 | 2006 | 39837835 | **946437.75** | 31916401 | 8 | 11 |
| **b** | **Radiology- MRI Deptt.** | | | | | | | | | |
| 1 | MRI Machine with accessories and UPS | Magneto mAvanto | M/s.Siemens Ltd, Mumbai | 1 | 2006 | 50500000 | **2132874.00** | 18169433 | 8 | 11 |
| **c** | **Radiology- Sonography Deptt.** | | | | | | | | | |
| 1 | Color Doppler | Sonoline G50 | M/s.Siemens Ltd., Mumbai | 1 | 2004 | 1900000 | **60184.00** | 741146 | 8 | 13 |
| **d** | **Radiology- X-ray Deptt.** | | | | | | | | | |
| 1 | CR 500 with Laser Imager DVB 8900 | CR 500 with DVB 8900 | M/s. Carestream Health India Pvt. Ltd., Mumbai | 1 | 2006 | 3000000 | **126704.00** | 2091301 | 6 | 11 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **e** | **Pathalogy Lab.** | | | | | | | | | |
| 1 | Fully Automatic Bio- chemistery Analyzer | Konelab 20 i | Trivitron Healthcare | 1 | 2005 | 1650000 | **52251.00** | 418305 | 8 | 12 |
| **f** | **General O.T.** | | | | | | | | | |
| 1 | Laproscopy Set | Karl Storz | Karl Storz | 1 | 2006 | 2000000 | **84470.25** | 393101 | 10 | 11 |
| **g** | **Casualty** | | | | | | | | | |
| 1 | Ventilator | Ivent | Versamed | 1 | 2006 | 300000 | **122920.5** | 146093 | 10 | 11 |
| **h** | **Neuro OT** | | | | | | | | | |
| 1 | High Speed pneumatic Drill | Sodem | Sodem | 1 | 2007 | 1419059 | **79912.50** | 7650 | 10 | 10 |
| **i** | **Ortho O.T.** | | | | | | | | | |
| 1 | C-Arm Machine | MM5C | Siemens | 1 | 2005 | 1700000 | **53849.25** | 418890 | 8 | 12 |
| 2 | Shaver System | Aesulap | BBraun | 1 | 2006 | 517500 | **51807.75** | 213262 | 8 | 11 |
| **j** | **G.I.C.U.** | | | | | | | | | |
| 1 | Multipara Monitor With All Accessories | Planet 50 | M/s. L&T Ltd. Pune | 8 | 2005 | 1000000 | **56313.52** | 1159080 | 8 | 12 |
| 2 | Multipara Monitor With All Accessories | Star Plus 200 | M/s. L&T Ltd. Pune | 2 | 2005 | 552900 | **73803.30** | 177890 | 8 | 12 |
| **k** | **I.C.C.U.** | | | | | | | | | |
| 1 | Multipara Monitor With All Accessories | Star Plus200 | M/s. L&T Ltd. Pune | 2 | 2005 | 552900 | **73803.24** | 177890 | 8 | 12 |
| **l** | **Dialysis** | | | | | | | | | |
| 1 | Dialysis Machine With Accessories | Surdial | M/s. Atlantic Pharmaceuticals, Mumbai | 2 | 2004 | 1250000 | **22272.4** | 157706.5 | 5 | 12 |
| **m** | **C. V. T. S. OT- I** | | | | | | | | | |
| 1 | Shadowless Lamp | Hanulux Blue 130+90+90 | M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd. | 1 | 2005 | 1275341 | **226983.29** | 72380 | 8 | 12 |
| 2 | Heart Lung Machine | Jostra | M/s. Maquet Medical (I) Pvt. Ltd. Mumbai | 1 | 2005 | 4389000 | **247160.00** | 4333874 | 8 | 12 |
| 3 | Boyles Machine with Ventilator (Anesthesia Workstation) | Drager Febius CE | M/s. HL Medical Systems Pvt. Ltd. Mumbai (Drager Dealer) | 1 | 2005 | 1350000 | **57017.25** | 641072 | 10 | 12 |
| 4 | IABP | Datascope | M/s. Emergent Meditech (I) Pvt. Ltd. | 1 | 2005 | 2153840 | **90967.72** | 1475379 | 8 | 12 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **n** | **Cath Lab** | | | | | | | | | |
| 1 | Cath Lab | Axiom ArtisdFC | M/s. Siemens Ltd. Mumbai | 1 | 2005 | 29500000 | **934452.75** | 28096329 | 7 | 12 |
| 2 | Hemodynamic Recorder | Axiom Sensis Lite System | M/s. Siemens Ltd, Mumbai | 1 | 2005 | 1500000 | **84470.26** | | 8 | 12 |
| 3 | 2D Echo Machine | Sonos 7500 | M/s. Philips Medical Electronics Pvt. Ltd. | 1 | 2005 | 4000000 | **126705.75** | 3601971 | 8 | 12 |
| **o** | **MGW** | | | | | | | | | |
| 1 | Pulse Oximeter | Commet P | M/s. L&T Ltd. Pune | 1 | 2007 | 84000 | **79101.56** | 52723 | 10 | 10 |
| **p** | **CRU - I** | | | | | | | | | |
| 1 | Multipara Monitor | MP20 | M/s. Philips Electronics Pvt. Ltd | 8 | 2006 | 1932344 | **81612.50** | 2115032 | 8 | 11 |
| 2 | Multipara Monitor | MP20 | M/s. Philips Electronics Pvt. Ltd | 11 | 2005 | 2656973 | **84163.50** | 2908169 | 8 | 12 |
| | | **Total no. of machines** | | **51** | | **155021691.8** | **5950238.04** | **98732621.5** | | |
| **B** | **End of Life as per WHO Guidelines but not used for 10 years as per Govt. Resolution** | | | | | | | | | |
| **q** | **Radiology- X-ray Deptt.** | | | | | | | | | |
| 1 | CR Classic | CR classic | M/s. Carestream Health India Pvt.Ltd., Mumbai | 1 | 2010 | 2198385 | **293448.75** | 274200 | 6 | 7 |
| r | **Casualty** | | | | | | | | | |
| 1 | Six Body Mortuary Cabinet | Model: RTU10 | Bluestar | 1 | 2008 | 504000 | **50456.25** | 9225 | 8 | 9 |
| s | **Dialysis** | | | | | | | | | |
| 1 | Dialysis Machine With Accessories | Surdial | M/s. Atlantic Pharmaceuticals, Mumbai | 1 | 2009 | 495000 | **66074.52** | 82305 | 5 | 8 |
| t | **Cathlab** | | | | | | | | | |
| 1 | TEE Probe | Omni III TEE | M/s.Care Mediequip, Mumbai | 1 | 2009 | 2000000 | **200231.25** | Nill | 8 | 8 |
| **u** | **CRU 4** | | | | | | | | | |
| 1 | Multipara Monitor With All Accessories | Star Plus200 | M/s. L&T Ltd. Pune | 2 | 2009 | 552900 | **73803.24** | 88945 | 8 | 8 |
| **C** | **End of Life as per Govt. Resolution but not as per WHO Guidelines** | | | | | | | | | |
| **v** | **CVTS-1** | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | OT Table | Betastar | M/s. Janak Manufacturing Works, Mumbai | 1 | 2005 | 1815000 | **102209.00** | 1704020.65 | 15 | 12 |
| | | Total Machines ( B+C) | | 7 | Total in Rs. | | | | | |
| | **Total Machines(A+B+C)** | | | **58** | **Total in Rs.** | **154100191.69** | **5857984.29** | **98727440.35** | | |

| **Shri Sainath Hospital, Shirdi.** | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Annexure 'B' -Replacement list -Depreciated cost more than Rs. 50000/-** | | | | | | | | | | |
| **Sr. No.** | **Equipment Description** | **Model No. Or Name** | **Manufacturer/ Supplier** | **Qty** | **Date of Inst.** | **Purchase Price (Rs.)** | **Depreciated cost Approx. Up to 31/03/2017** | **Expenses On Machines (Approx.) In Rs.** | **Life Expectancy as per WHO Guidelines** | **Used for Yrs.** |
| **A** | **End of Life as per Govt. Resolution & WHO Guidelines** | | | | | | | | | |
| **a** | **ENT/Opthal OT** | | | | | | | | | |
| 1 | Phecoemulcification Machine | Legacy | M/s. Alcon Laboratories, Mumbai | 1 | 2006 | 2300000 | **97140.81** | 40000.00 | 7 | 11 |
| 2 | Microdebrider set | Karl Storz, | M/s. Chimco Biomedicals, Mumbai | 1 | 2006 | 1394195 | **74586.42** | 248863 | 10 | 11 |
| **b** | **Physiotherapy** | | | | | | | | | |
| 1 | Shortwave Diathermy | Autotherm | M/s.MedtechInd Pvt.Ltd | 1 | 2007 | 1024868 | **57713.91** | 1732.00 | 10 | 10 |
| **B** | **End of Life as per WHO Guidelines but not used for 10 years as Govt. Resolution** | | | | | | | | | |
| **c** | **Radiology Deptt** | | | | | | | | | |
| 1 | X-ray Auto Film Processor | Compact-2 | M/s. Choksi Imaging Ltd., Mumbai | 1 | 2009 | 534375 | **53499.75** | 314836 | 8 | 8 |
| **C** | **End of Life as per Govt. Resolution but not as per WHO Guidelines** | | | | | | | | | |
| **d** | **ENT/Opthal OT** | | | | | | | | | |
| 2 | Marathon Power Unit | Marathon-7 | M/s. Kalelkersurgicals, Mumbai | 1 | 2006 | 1394195 | **58884.01** | 40897.00 | 12 | 11 |
| | **Total Machines(A+B+C+D)** | | | **5** | | **6647633** | **341824.9** | **646328** | | |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** वरीलसंस्थान अधिनियमनुसार 2004 मधील कलम 17 (4) च्या तरतुदीनुसार विश्वस्तव्यवस्थेत निहीत केलेले पन्नास हजार पेक्षा अधिक किंमतचे कोणतेही जडजवाहिर, दागिने व इतर मैल्यवान जंगम मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पुर्व मंजुरी शिवाय समितीला विकता येत नाही, तारण म्हणुन ठेवता येत नाही अन्यथा अन्य संक्रामित करता येत नाही. सदर तरतुदीनुसार रू. 50 हजार पेक्षा अधिक मुल्य असणा-या वस्तु निर्लेखित करुन बायबॅक करणेसाठी अथवा लिलावाने विक्री करणेसाठी संस्थानला शासनाची पुर्व मान्यता घेणे बंधनकारक आहे.

शासन निर्णय क्र. क्र. सासंवि १०१६/८७३/प्र.क्र.११४/क्र.१६ ,दि. १५ एप्रिल २०१७ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी संचलित श्री साईनाथ रूग्णालय व श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रूग्णालय या दोन्ही रूग्णालयातील जुनी वैद्यकिय उपकरणे निर्लेखित करण्याचे प्रस्ताव शासनास सादर करण्यापुर्वी अशा उपकरणांच्या निर्लेखन पात्रतेची संस्थान स्तरावर योग्य पध्दतीने छाननी निर्लेखन समितीद्वारे करता येईल असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** सोबतच्या तक्त्यानुसार श्रीसाईबाबा हॉस्पिटल व श्रीसाईनाथ रूग्णालयाच्या मशीन्स निर्लेखीत करणेबाबत निर्लेखन समितीची मान्यता मिळालेनंतर शासनाची मान्यता घेवुन सदर मशिन्स विहीत पध्दतीने निर्लेखित करुन श्रीसाईबाबा हॉस्पिटलच्या खरेदी विभागामार्फत नवीन मशिन खरेदी करताना Buyback करणे किंवा लिलावाद्वारे विक्री करता येईल असे नम्र मत आहे. उपरोक्त मशिन्सपैकी 1) शासन निर्णयानुसार १० वर्ष वापर झालेल्या तसेचWHO Guidelines नुसार वापरायोग्य कालावधी संपलेल्या अ.क्र. –A तक्त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये ५१ नग व श्री साईनाथ रूग्णालयात ०३ नग मशिन्स आहेत. 2) शासननिर्णयानुसार १० वर्ष वापर पुर्ण न झालेल्या परंतु WHO Guidelines नुसार वापरायोग्य कालावधी पुर्ण झालेल्या अ.क्र–B तक्त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ६ नग मशिन्स व श्री साईनाथ रूग्णालयातील १ नग मशिन्स आहेत.

3) शासननिर्णयानुसार १० वर्ष वापर पुर्ण झालेल्या परंतु WHO Guidelines नुसार वापरायोग्य कालावधी पुर्ण न झालेल्या अ.क्र.- C तक्त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रूग्णालयात प्रत्येकी १ मशिन आहे.

उपरोक्तपैकी काही मशिन्सचा शासननिर्णयानुसार १० वर्ष व WHO Guideline नुसार विशीष्ट कालावधीचा वापर झालेला नाही परंतु सदर अशा मशिन्सचे ब्रेकडाउन अधिक प्रमाणात होत असुन त्या करीता खर्च देखील अधिक होत आहे त्यामूळे अशा मशिन्स देखील बदलणे आवश्यक आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ५८ नग व श्री साईनाथ रूग्णालयातील ५ नग मशिन्स निर्लेखीत करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेनुसार, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ५८ नग व श्री साईनाथ रूग्णालयातील ५ नग मशिन्स निर्लेखीत करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६२** **दिनांक ३० जुलै २०१७ रोजी हॉटेल सेंट लॉरेन येथे आयोजित करण्यात आलेल्या साई पत्रिका संमेलनाचे भोजन, नास्ता व अनुषंगिक खर्चाचेबील देणगीदार साईभक्तांमार्फत आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद–** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक–** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.०६.२०१७ चे सभेतील निर्णय क्र. ४९६

**प्रस्ताविक –** मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त संदर्भीय निर्णयानुसार श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने श्री साईबाबांच्या कार्याचा प्रचार व प्रसार करणा-या देशातील साई पत्रिकाच्या प्रतिनिधींचे ०१ दिवसाचे संमेलन दिनांक ३० जुलै २०१७ रोजी हॉटेल सेंट लॉरेन, शिर्डी येथे आयोजित करण्यात आले होते. सदरचे संमेलनासाठी आलेल्या नियतकालीकांच्या प्रतिनिधींची कार्यक्रमाचे ठिकाणी नास्ता, भोजन, स्टेज व एल.सी.डी. आदि व्यवस्था हॉटेल सेंट लॉरेन, शिर्डी यांचेमार्फत करण्यात आली होती. पत्रिका संमेलन कार्यक्रमासाठीचे नास्ता, भोजन, स्टेज, पी.ए.सिस्टीम व एल.सी.डी. आदि व्यवस्थेसाठी हॉटेल सेंट लॉरेन, शिर्डी रक्कम रुपये १,९०,५१५/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख नव्वद हजार पाचशे पंधरा मात्र) चे बील सादर केले होते. तथापि सदरचे बीलामध्ये सुट देणेबाबत संबंधीतांना विनंती केली असता त्यांनी (बफेट ब्रेकफास्ट चे बील नं.३५११ दिनांक ३०.०७.२०१७ रुपये २७,२९८/-, भोजनाचे बील नं.३५३२ दिनांक ३०.०७.२०१७ रुपये १,२३,९९७/- व स्टेज, पी.ए. व एल.सी.डी चे बील नं.२८ दिनांक ३०.०७.२०१७ रुपये १९,७२०/-) **रुपये १,७१,०१५/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख एकहात्तर हजार पंधरा मात्र)** चे बील आदा करणेबाबत

कळविले असून कार्यक्रमासाठी वापरण्यात आलेल्या हॉलचे ०१ दिवसाचे भाडे रुपये ५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पन्नास हजार मात्र) त्यांनी आकारले नाही. सदरचा हॉल त्यांनी कार्यक्रमासाठी विनाशुल्क दिलेला आहे.

दिनांक ३० जुलै २०१७ रोजी आयोजित करण्यात आलेल्या साई पत्रिका संमेलनाचे नास्ता, भोजन, स्टेज, पी.ए.सिस्टीम व एल.सी.डी.चे व्यवस्थेपोटी हॉटेल सेंट लॉरेन, शिर्डी यांनी कळविलेल्या बीलाची रक्कम रुपये १,७१,०१५/- मुंबई येथील साईभक्त श्री.प्रिन्स गोयल व श्री.दिपक भतिजा यांनी आदा करण्याची इच्छा दर्शविली आहे. मात्र हॉटेल सेंट लॉरेन यांना आदा केलेल्या रक्कमेची देणगीपावती त्यांना संस्थानकडून मिळणेबाबत त्यांनी विनंती केली आहे. तरी साई पत्रिका संमेलनाचे हॉटेल सेंट लॉरेन, शिर्डी यांनी कळविलेले बीलाची रक्कम श्री.प्रिन्स गोयल, मुंबई व श्री.दिपक भतिजा, मुंबई यांचेकडून देणगीदाखल स्विकारणेस व त्यांना लेखाशाखा विभागाकडून त्यांनी हॉटेल सेंट लॉरेन, शिर्डी यांना साई पत्रिका संमेलनाचे बालापोटी आदा केलेल्या रक्कमेची देणगी पावती देणेस मान्यता असावी.

**मागणी-** साई पत्रिका संमेलनाचे अनुषंगाने हॉटेल सेंट लॉरेन, शिर्डी यांनी कळविलेले बील देणगीदार साईभक्तांचे देणगीतून स्विकारणेबीबत.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय–** साई पत्रिका संमेलनाचे नास्ता, भोजन, स्टेज, पी.ए.सिस्टीम व एल.सी.डी.चे व्यवस्थेपोटी हॉटेल सेंट लॉरेन, शिर्डी यांनी एकूण रक्कम रुपये १,७१,०१५/- कळविलेले असून सदरचे बीलाची रक्कम मुंबई येथील साईभक्त श्री.प्रिन्स गोयल व श्री.दिपक भतिजा यांनी आदा करण्याची इच्छा दर्शविली आहे. मात्र त्यांनी हॉटेल सेंट लॉरेन यांना आदा केलेल्या रक्कमेची देणगीपावती संस्थानकडून मिळणेबाबत विनंती केली आहे. तरी साई पत्रिका संमेलनाचे नास्ता, भोजन, स्टेज, पी.ए.सिस्टीम व एल.सी.डी.चे हॉटेल सेंट लॉरेन, शिर्डी यांनी कळविलेले बीलाची रक्कम रुपये १,७१,०१५/- श्री.प्रिन्स गोयल, मुंबई व श्री.दिपक भतिजा, मुंबई यांचेकडून देणगीदाखल स्विकारणेस व त्यांना लेखाशाखा विभागाकडून त्यांनी हॉटेल सेंट लॉरेन, शिर्डी यांना साई पत्रिका संमेलनाचे बालीपोटी आदा केलेल्या रक्कमेची देणगी पावती देणेस मान्यता असावी.

तथापि सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६३** **आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये संस्थान व्यवस्थापनाच्या दृष्टीने मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**निर्णय क्र.७४७** साईभक्तांच्या सुविधेकरीता ९०% संस्थान निवासस्थाने ऑनलाईन ठेवलेली आहेत. परंतु बऱ्याचशा शहरी/ ग्रामीण भागातील साईभक्तांना ऑनलाईन खोली आरक्षित करता येत नाही व शिर्डी येथे आल्यानंतर निवासस्थानांच्या काऊंटरवरुनही खोली मिळत नाही. याकरीता संस्थानमधील सर्व निवासस्थाने ९०% ऐवजी उत्सव व गर्दीचे कालावधीमध्ये ८०% ऑनलाईनसाठी राखीव ठेवणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही- सर्व निवासस्थाने/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.७४८** वर्तमानपत्रामध्ये व्यवस्थापन समितीच्या विरोधात अनेकदा बदनामकारक बातम्या छापुन येतात, अशा वेळी स्थानिक समिती सदस्यांनी त्याला संस्थानचे वतीने योग्य उत्तर द्यावे. (कार्यवाही- जनसंपर्क विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.७४९** "साई महिमा" या कार्यक्रमासाठी साईआश्रम भक्तनिवास येथील ॲम्पीथिएटरची जागा Immersity InfoTech Pvt. Ltd., Mumbai या संस्थेस BO तत्वावर देणेबाबत, महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग यांचेकडून दिनांक १३/०७/२०१७ रोजी प्राप्त झालेल्या पत्रातील नमुद मुद्यावर समितीचे आजचे सभेत सविस्तर चर्चेसाठी संबधित कंपनीचे प्रतिनिधी समक्ष उपस्थित होते. सदर प्रकल्पाचा सर्व खर्च कंपनी करणार असल्याचे तसेच सदर प्रकल्पासाठी अंदाजे रक्कम रु.२० ते २५ कोटी मात्र खर्च असलयाचे कंपनी प्रतिनिधींनी समितीला सांगीतले.

श्री साईबाबांवर आधारीत Holograhic कार्यक्रमाची अव्दितीय (Unique) अशी कल्पना असल्याकारणामुळे तसेच त्यासाठीचा संपुर्ण खर्च Immersity InfoTech Pvt.Ltd., Mumbai कंपनीव्दारे करण्यात येणार आहे व मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४५९(३) मध्ये श्री

साईभक्तांकडुन आकारावयाचे शुल्क अत्यल्प ठेवण्यात यावे, जेणेकरुन जास्तीत-जास्त साईभक्त या कार्यक्रमाचा लाभ घेऊ शकतील, असे ठरले होते.

यावर आजचे सभेत सविस्तर चर्चा होऊन, Immersity InfoTech Pvt.Ltd., Mumbai या संस्थेस प्रकल्पाच्या उभारणीसाठी भांडवली गुंतवणुक आणि नियमित कामकाज खर्च (Operational Cost) खुप मोठया प्रमाणात असल्याने सदर प्रकल्प ना नफा ना तोटा या तत्वावर राबवून साईभक्तांकडुन प्रति भक्त रक्कम रुपये १००/- + कर इतक्या रकमेची आकारणी करुन त्यात प्रतिवर्षी १०% रक्कम दरवाढ करणेस परवानगी दिली. तसेच दि.०७/०७/२०१७ रोजीचे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाचे पत्रान्वये सदर जागेचे मासिक भाडे रक्कम रुपये २,५२,८४०/- मात्र संस्थानने आकारणी करुन त्यात प्रतिवर्षी १०% भाडेवाढ आकारुन Immersity InfoTech Pvt.Ltd., Mumbai यांना वापरण्यास देण्याचे ठरले.

त्याचप्रमाणे विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दिनांक १३/०७/२०१७ रोजीचे पत्रातील उपस्थित मुद्यांबाबत समितीचे सभेत झालेल्या चर्चेनुसार समितीने दिलेल्या निर्देशानुसार मुद्देनिहाय माहिती तयार करुन विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना पत्राव्दारे कळविण्यात यावे व सदर प्रस्तावास विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची परवानगी घेणेत येऊन, त्यांचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- ध्वनिक्षेपण व टेलिफोन विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र.६७६ ते ७४९ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्रौ ०९.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**